ગુજરાત રાજ્યના શિક્ષણવિભાગના પત્ર-ક્રમાંક
મશબ/1215 / 170-179 /છ, તા. 4-3-2016 - થી મંજૂર

# मराठी

## इयत्ता 9

### प्रतिज्ञापत्र

भारत माझा देश आहे.
सारे भारतीय माझे बंधुभगिनी आहेत.
माझ्या देशावर माझे प्रेम आहे.
माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.
त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.
मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.
माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करतो.
त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावलेले आहे.

રાજ્ય સરકારની વિનામૂલ્યે યોજના હેઠળનું પુસ્તક

गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ
'विद्यायन', सेक्टर 10-ए, गांधीनगर - 382010

© गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ, गांधीनगर
या पाठ्यपुस्तकाचे सर्व हक्क गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळाच्या स्वाधीन आहेत.
या पाठ्यपुस्तकातला कोणताही भाग कोणत्याही स्वरूपात गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळाच्या नियामकांच्या लेखी परवानगाशिवाय प्रकाशित करता येणार नाही.

**विषय-सल्लागार**
डॉ. मृणालिनी कामत

**कन्वीनर**
श्री रोहिणी खांडेकर

**लेखन-संपादन**
श्री एस. वाय. मांडलिक
श्री पी. एम. पाटील
श्री निशा काळुस्कर
श्री प्रिती सुधाळकर
श्री दीपा आर. शिंपी

**समीक्षा**
श्री सुदेष्णा मुरलीधर कदम
श्री हिरामण डी. महाले
श्री राजेंद्र पंडित वानखेडे
श्री संजय गोपा शेलार
श्री अशोक नवल बोरसे

**संयोजन**
डॉ. कमलेश एन. परमार
(विषय-संयोजक : हिन्दी)

**निर्माण-संयोजन**
श्री हरेन शाह
(नायब नियामक : शैक्षणिक)

**मुद्रण-आयोजन**
श्री हरेश एस. लीम्बाचीया
(नायब नियामक : उत्पादन)

## प्रस्तावना

एन. सी. ई. आर. टी. द्वारे तयार करण्यात आलेल्या नव्या राष्ट्रीय अभ्यासक्रम (NCF) च्या अनुसंधानात गुजरात माध्यमिक आणि उच्चत्तर माध्यमिक शिक्षण बोर्ड, गांधीनगरने राज्याच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक कक्षेच्या विविध विषयांचे नवीन अभ्यासक्रम तयार केले. ज्याला गुजरात सरकारच्या शिक्षण विभागाद्वारे मंजूर करण्यात आले.

नवीन राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या परिप्रेक्ष्यात तयार केलेला राज्याच्या वेग-वेगळ्या विषयांचे नवीन अभ्यासक्रमानुसार तयार करण्यात आलेले **इयत्ता-9वी मराठी** चे हे पुस्तक ह्या स्तरावर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर सादर करतांना आनंद होत आहे. लेखन-संपादन पॅनलच्या सभ्याश्रींनी या पाठ्यपुस्तकाच्या हस्तप्रत निर्माण प्रक्रियेत संपूर्ण काळजी घेतली आहे. एन.सी.ई.आर.टी. च्या आणि इतर राज्याचे अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तकांना पाहून-तपासून, राज्याचे पाठ्यपुस्तक जास्त गुणवत्तापूर्ण बनविण्यासाठी लेखक संपादकांनी भरपूर मेहनत घेतली आहे.

हे पाठ्यपुस्तक प्रसिद्ध करण्याअगोदर या हस्तप्रतची या स्तरावर शिक्षणकार्य करणारे शिक्षण तज्ज्ञांद्वारे सर्वांगीण समीक्षा करण्यात आली आहे. समीक्षा शिबिराच्या सुधारणा घेण्यात आल्या आहेत. तसेच मंजुरी क्रमांक प्रक्रिये दरम्यान गु.मा.आणि उ.मा. शिक्षण बोर्ड, गांधीनगरने केलेली तपासणी अहवाला नंतर मिळालेल्या सुधारणा घेण्यात आल्या आहेत. या पुस्तकाची शेवटची प्रत तयार करून प्रसिद्ध करण्यात आली आहे.

नवीन अभ्यासक्रमाचा एक उद्देश विद्यार्थी व्यावहारिक भाषेचा उपयोग करतील तसेच भाषेची अभिव्यक्ती अधिक परिणामकारक बनवेल असा आहे. परंतु साहित्यिक स्वरूपे आणि सर्जनशील भाषेच्या परिचयासोबत भाषेचे वैशिष्टये समजून स्वत:च्या लेखनात उपयोग करतील असे ध्येय ठेवण्यात आले आहे. यासाठी भाषा-अभिव्यक्ती तसेच लेखन विषयी संपूर्ण माहिती दिली आहे. या विषयी विद्यार्थ्यांकडून अधिक सराव करावा.

प्रस्तुत पाठ्यपुस्तकाला रसप्रद, उपयोगी आणि क्षतिरहित बनविण्यासाठी पूर्ण काळजी घेतली आहे. तरी सुद्धा शिक्षणाची आवड असणाऱ्या व्यक्तिकडून पाठ्यपुस्तकाची गुणवत्ता वाढेल अशा सूचना आल्यास त्यांचा स्वीकार होईल.

**पी. भारती** (IAS)
नियामक
ता.: 13-11-2019

कार्यवाह प्रमुख
गांधीनगर

**प्रथम आवृत्ती :** 2016 **पुनःमुद्रण :** 2017, 2018, 2019, 2020

**प्रकाशक** : गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ, 'विद्यायन', सेक्टर 10-ए, गांधीनगरसाठी पी. भारती, नियामक

**मुद्रक** :

# मूलभूत कर्तव्ये

भारतातील प्रत्येक नागरिकाची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत :*

(क) घटनेचे पालन करणे आणि तिचे आदर्श व संस्थांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे;

(ख) ज्यामुळे आपल्याला राष्ट्रीय स्वातंत्र्यलढयास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुकरण करणे;

(ग) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे;

(घ) आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे;

(च) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथा सोडून देणे;

(छ) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे;

(ज) अरण्ये, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यासह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करणे, त्यात सुधारणा करणे, आणि सजीव प्राण्यांविषयी दयाबुद्धी बाळगणे;

(झ) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे;

(ट) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे;

(ठ) राष्ट्र सतत पुरूषार्थ व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे; हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे;

(ड) आई-वडीलांनी किंवा पालकांनी 6 ते 14 वर्षांतील मुलांना किंवा पाल्यांना शिक्षणाची संधी पुरवावी;

*भारतीय घटना : कलम 51-क

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नांव | साहित्यप्रकार | लेखक/कवी | पृष्ठ नंबर |
|---|---|---|---|---|
| 1. | नामयाची वाणी | (संतकाव्य) | संत नामदेव | 1 |
| 2. | आग्र्याहून पलायन | (बखर) | कृष्णाजी अनंत सभासद | 3 |
| 3. | पत्रावळ | (कांदबरी अंश) | साने गुरुजी | 6 |
| 4. | कुब्जा | (निसर्ग कविता) | इंदिरा संत | 10 |
| 5. | कहाणी आदित्य राणूबाईची | (लोककथा) | – | 12 |
| 6. | कंदिलाच्या प्रकाशात | (कथा) | वामन चोरघडे | 16 |
| 7. | ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे | (निसर्ग कविता) | ना.धों. महानोर | 21 |
| 8. | बाबू पैलवानाचे उपोषण | (विनोदी कथा) | द.मा.मिरासदार | 23 |
| 9. | हुजूरपागा | (आत्मकथनात्मक) | सुमा करंदीकर | 30 |
| 10. | हे राष्ट्र देवतांचे | (देशभक्तिपर गीत) | ग.दि.माडगूळकर | 33 |
| 11. | अमंगलाचा पहारा | (नाट्यांश) | वि.वा.शिरवाडकर | 35 |
| 12. | मोट | (निबंध) | द.ता.भोसले | 40 |
| 13. | कंसवध | (प्राचीन गद्य) | चक्रधरस्वामी | 44 |
| 14. | ऐसे केले या गोपाळे | (अभंग) | शेख महंमद | 46 |
| 15. | अन्योक्ति | (बकान्योक्ति, मयूरान्योक्ति कोकिलन्योक्ति) | कृष्णशास्त्री चिपळूणकर | 48 |
| 16. | जगावेगळा न्याय | (कांदबरी अंश) | बाबा भांड | 53 |
| 17. | किल्ला | (निबंध) | अनिल अवचट | 58 |
| 18. | रिकामे मधुघट | (भावगीत) | भा.रा.तांबे | 64 |
| 19. | कन्यादान | (भावकथा) | महादेवशास्त्री जोशी | 67 |
| 20. | दाट रानात | (निबंध) | रस्कीन बॉन्ड, अनुवाद: सुमती सरन | 76 |
| 21. | दिंडी | (दलित कविता) | हिरा बनसोडे | 79 |
| 22. | सुंदर | (कथा) | श्री. दा. पानवलकर | 82 |
| 23. | सण | (कविता) | अरुणा ढेरे | 87 |
| 24. | चिमण्या | (ललित गद्य) | राजन गवस | 89 |


**व्याकरण**


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | अव्यय आणि त्याचे प्रकार | 93 | 5. | वृत्ते | 101 |
| 2. | विभक्ति – विचार | 95 | 6. | उपयोजित लेखन | 103 |
| 3. | समास | 96 | 7. | सारांश लेखन | 105 |
| 4. | अलंकार | 99 | 8. | निबंध लेखन | 106 |


**स्थूल वाचन**


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | देव विद्येचा! उत्सव...? | विजय कुवळेकर | 107 |
| 2. | मुजावर गुरुजी | कृष्णात खोत | 110 |
| 3. | मराठी अभिमान गीत | सुरेश भट | 114 |
| 4. | माणसं अजून गाऊ शकतात | मंगेश पाडगावकर | 116 |

# 1 नामयाची वाणी

**– संत नामदेव**

(जन्म : 1270, समाधी : 1350)

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. या संतांच्या भगवद्‌भक्तीतून मराठी साहित्यातील काव्यरचनेत विपुल भर पडली आहे. संत नामदेव भागवत् धर्माचे पहिले प्रसारक होते. 'नाचु कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावु जगी' म्हणणाऱ्या नामदेवांनी आपल्या अभंगांच्या आणि कर्तृत्वाच्या माध्यमाने समाजाला मानवता, भुतदया, शांती, सर्वाभुती प्रेमभाव यांची मूल्ये शिकविली.

प्रस्तुत नामदेवांचे काव्य 'गौळणी' या प्रकाराने ओळखले जाते.

**गौळणी**

भक्ती आणि प्रेमभाव या दोन्हीचा संगम असणाऱ्या गौळणी ज्ञानेश्वरांपासून सर्व संतांनी रचलेल्या आहेत. कृष्णभक्ती पर गौळणींच्या मधून देव आणि भक्त यांच्यातील आगळे वेगळे नाते संतांनी व्यक्त केले आहे.

भक्तिभावनेच्या बरोबरीने प्रेमभावनेतील आर्तता आणि विरहाची वेदना त्यातून आढळते. गोपी आणि कृष्णाच्या नात्यातून गौळणीच्या रचनेद्वारे शृंगार आणि भक्ती यांची सांगड संतांनी घातलेली दिसते. कृष्णाचे बासरीवादन आणि रासक्रीडा करणाऱ्या गोपी, कृष्ण मथुरेला गेल्यानंतर त्याच्या विरहाने व्याकुळ झालेल्या गोपी, 'राधाकृष्ण' वर्णनातून भक्तिरसाला प्रधानता दिलेली आहे.

---

(1) मल्हार महूडें गगनीं दाटलें ॥
विजु खळें गर्जिन्नलें गे माये ॥ 1 ॥
गोविंद पाहाया लौकरी ।
कैसे वरुषताहे मधूधारी गे माय ॥ 2 ॥
आनंदें मयूरें नाचती आपैसें ।
प्रेमें नीळकंठ जाले कैसैं ॥ 3 ॥
नामया स्वामी दृष्टी सोज्चळ ।
जीव लागला गोपाळा गे माय ॥ ॥ 4 ॥ (251)

(2) रात्र काळी घागर काळी ।
यमुना जळेंही काळीं वो माय ॥ 1 ॥
बुंथ काळी बिलवर काळी ।
गळां मोती एकावळी काळी वो माय ॥ 2 ॥
मी काळी कांचोळी काळी ।
कांस कांसिली के काळी वो माय ॥ 3 ॥
एकली पाणीया नवजाय साजणी ।
सवें पाठवा मूर्ति सांवळी वो माय ॥ 4 ॥
विष्णुदास नाम्याची स्वामिनी काळी ।
कृष्णामूर्ती बहु काळी वो माय ॥ 5 ॥ (255)

## शब्दार्थ

**मल्हार** संगीतातील एक राग (पावसाळ्यात गायला जाणारा) **महूडा** ढग, मेघ **विजु** वीज **खळे** शेत, शेतातील धान्य साठविण्याची जागा **सोज्वळ** निष्पाप **वरुषणे** वर्षाव होणे, बरसणे **एकावळी** एक पदरी हार **घागर** घडा **बुंथ** घुंघट, बुरखा **कांचोळी** पाठीवर बंद असलेली चोळी **स्वामिनी** मालकीण

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) 'मल्हार महूडे' यातील पावसाचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

(2) 'रात्र काळी, घागर काळी' यातील 'गौळणीच्या' साजशृगांराचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

**2. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) नामदेवांनी नीलकंठ कोणाला म्हटले आहे ?

(A) श्रीकृष्ण (B) मयूर (C) शंकर (D) भारद्वाज

(2) गौळणीच्या गळयातला अलंकार कोणता आहे ?

(A) मोत्यांची माळ (B) लक्ष्मीहार (C) एकावळी (D) कंठा

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- नामदेवांच्या अजून काही गौळणी शोधा.

### शिक्षक-प्रवृत्ती

- नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम या संतांच्या गौळणी शोधा व विद्यार्थ्यांना शिकवा.

## भाषासज्जता

**(1) मल्हारमहुडे :** गौळणी आणि कृष्ण यांच्यातील नाते नामदेवांनी मल्हारमहुडे या शब्दांद्वारे सांगितले आहे. मल्हार हा राग पावसाळयात गायला जातो. महुडे म्हणजे मेघ, ढग. पावसाळ्यात ढंगाची दाटी झाली की. सहजपणाने मल्हाराचे सुर गायकांच्या मनात येतात. तशाच प्रकारे गौळणी आणि कृष्णाचे अभेद्य नाते आहे. सर्व सृष्टी कृष्णाच्या रुपाला भेटायला आली आहे असे नामदेवाला वाटते. पावसाच्या धारा विजांचा चमचमाट साऱ्यांनाच कृष्णाला भेटण्याची ओढ वाटते. एवढेच नव्हे तर मोर सुद्धा आनंदाने नाचु लागतो. नामदेवांनी अशी कल्पना केली आहे की कृष्णप्रेमात रंगलेल्या मोराचा गळा सुद्धा कृष्णासारखा निळासावळा झाला आहे. असे सगळे प्राणीमात्र आणि जीवसृष्टीं कृष्णप्रेमा मध्ये रंगलेली, दंगलेली आहे.

**(2) रात्र काळी घागर काळी :** या गौळणीतही कृष्णप्रेमाची सावळी माया गौळणीच्या तनामनावर कशी पसरली आहे. ते काळ्या रंगाच्या योजनेतून संत नामदेव दाखवून देतात.

रात्रीच्या अंधारात पाण्याला निघालेली ही गवळण खरे तर कृष्णाच्या भेटीलाच निघालेली आहे. पण स्वत:ला कोणी पाहू. नये ही तिची इच्छा आहे म्हणून तिने सगळा साजशृंगार सुद्धा काळ्या रंगाचा केला आहे. कृष्णभक्तीची पराकोटी सांगणारी ही गौळण आहे.

●

# 2 आग्र्याहून पलायन

**– कृष्णाजी अनंत सभासद**

'शिवछत्रपतींचे चरित्र' या बखरीतून हा भाग घेतलेला आहे. राजाराम महाराज (शिवाजी महाराजांचे दुसरे पुत्र) यांच्या राज्यकारभारात इ.स. 1668 पासून कार्यरत होता. राजाराम महाराजांच्याबरोबर जी निवडक आणि विश्वासू मंडळी होती त्यामध्ये कृष्णाजी अनंत सभासद यांचा समावेश होता. त्यांना शिवाजीच्या चरित्राची आणि काळाची चांगली माहिती होती. ह्या बखरीचा लेखनकाळ मार्च 1697 असा सांगितला जातो.

या उताऱ्यामध्ये जो प्रसंग आहे, तो शिवाजी महाराजांच्या चरित्रातील थरारक प्रसंग आहे. प्रत्यक्ष औरंगजेबाच्या आग्र्यात त्याच्या नजरकैदेत असताना विलक्षण बुद्धिचातुर्याच्या शिवाजी महाराजांनी स्वतःची सुटका कशी करुन घेतली ते या प्रसंगातून कळते. अतिशय परिणामकारकतेने प्रत्यक्ष नजरेसमोर घडत असावा, अशा चित्रमयतेने हा प्रसंग बखरकाराने रंगवलेला आहे.

---

दुसरे दिवशीं पादशहा यांणीं राजापाशीं 5000 स्वार व पायदळ (नेमून) पोलादखान कोतवाल यास हुकूम केला कीं, ''तू राजाच्या डेऱ्याभोंवतीं चौकी देऊन खबरदारीने राहाणें,'' त्यावरुन कोतवाल येऊन डेरा ठोकून राहिला. मग राजे घाबरे जाले. कष्टी होऊं लागले. संभाजीराजे यांस पोटाशी धरून बहूत खेद केला. निराजीपंत व दत्ताजीपंत व त्रिंबकपंत यांणीं बहुता प्रकारें समाधान केलें. तेंव्हा राजे बोलिले जे, ''आतां काय हुन्नर करावा ?'' असा विचार करिता रात्र जाली. मग श्रीभवानी स्वप्नात येऊन साक्षात्कार जाला कीं, ''कांही चिंता न करणे. येथून तुजला सर्व शत्रूंस मूल घालून, मोहनास्त्र घालून, पुत्रासहवर्तमान घेऊन जातें. चिंता न करणें'', म्हणोन अभय जालें. मग जागृत होऊन आप्तविषयीं लोकांस सांगितलें आणि समाधान मानिले.

### मेव्याचे पेटारे

दुसरे दिवशीं नाना जिन्नस मेवा खरेदी करून आणविला, आणि वेळूचे पेटारे आणवून 10 पेटारे मेवा भरिला. एका पेटाऱ्यास दोघे दोघे मजूर लावून, मध्यें लाकूड घालून मेवा वजिरांस पाठविला. चौकीच्या लोकांनी पुसलें कीं. ''पेटारे कोणाचे? कोठें जातात?'' मजुरांनीं उत्तर दिलें कीं, ''राजे यांणीं चौघा वजिरांस मेवा पाठविला आहे.'' त्यांणीं एक दोन उघडून पाहिले. तों मेवा खरा. मग जाऊं दिले. असा राबता रोज लाविला. मग आठ चहूं राजांनी आपले स्वार व कित्येक कारकून लोक यांसही 'पळणें', म्हणून पाठविलें.मग ते कुल पळाले.

### राजांचे पलायन

मग एके दिवशी राजे व राजपुत्र एकच पेटाऱ्यांत बसले. पुढें मागें पेटारे करून मध्यें पेटारियांत बसून चालिले. ते वेळीं आपला साज सर्व उतरून हिरोजी फरचंद यास घालून आपले पलंगावरि निजविला. हात मात्र त्याचा उघडा बाहेर दिसूं दिला आणि शेला पांघरून निजवला. आणि एक पोरगा रगडावयास ठेविला. जवळील कारकून होते त्यांस अगोदर दिल्लीपलीकडे तीन कोसांवर एक गांव होता तेथें ठिकाण करून पुढें रवाना केले होते. आणि आपण उभयतां पेटारियांत बसून निघोन चालिले. चौकीचे लोक होते त्यांनी एक दोन पुढील पेटारे उघडून पाहोन वरकड पेटारे न उघडितां जाऊं दिले. शहराबाहेरे दोन कोसांवरि जाऊन, पेटारे टाकून, पायउतारा होऊन, कारकून ज्या गांवीं होते त्या गांवास गेले. कारकून बराबरि घेतले. अवघियांनीं रानात बसून विचार केला कीं, ''आता जरि नीट आपले देशास जातों तरि तिकडे लाग करून फौजा धावतील. तिकडे जाऊं नये. दिल्लीपलीकडे जावें. वाराणशीकडे जावें ''. असे करून राजे व संभाजीराजे व निराजी राऊजी व दत्ताजी त्रिंबक व राघो मित्रा मराठा ऐसे निघोन चालिले. वरकडांस मनास मानेल तिकडे जाणें, म्हणून सांगितले. आपण व राजपुत्र व इतर लोक कारकून ऐसे वाराणशीकडे आंगास राखा लावून, फकिराचें सोंग घेऊन मथुरेकडे गेले.

### शब्दार्थ

**कोतवाल** शहराचा मुख्य संरक्षक अधिकारी **पादशहा** औरंगजेब **डेरा** मुक्काम, तात्पुरते राहण्याचे ठिकाण **हुन्नर** युक्ति **आप्त** नातेवाईक **मेवा** फळे **वेळूचा पेटारा** बांबूची मोठी पेटी **राबता लावणे** रोज ठराविक वस्तू देण्याचे निश्चित प्रमाणात ठरविणे **आठ चहू** आठ दिवसांनी **पळणे** निघून जाणे **एकच** दोन पेटाऱ्यात दोघे **साज** अलंकार, कपडे **शेला** पांघरण्याचे रेशमी वस्त्र **रगडणे** हात – पाय – चेपणे **वरकड** बाकीचे **लाग करणे** तर्क करणे **मजूर** कामकरी

## टीपा

**मोहनास्त्र:** पूर्वी मंत्र म्हणून आयुध चालवत असत, असे पुराणकथांमध्ये म्हटले आहे. या आयुधांना अस्त्र किंवा अभिमंत्रित अस्त्र म्हटले जाते. भुरळ घालण्याचे अस्त्र मोहनास्त्र.

## वाक्प्रचार

**कष्टी होणे** खेद करणे, अत्यंत दु:खी होणे **साक्षात्कार** प्रत्यय अनुभव, दृष्टांत **खाना करणे** पाठविणे **पायउतारा होणे** पायी चालणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) औरंगजेबाने राजांवर चौकी देण्यासाठी कोणाला हुकूम केला?

(2) शिवाजीराजे का घाबरले?

(3) महाराजांना कोणत्या देवीने दर्शन दिले?

(4) राजांनी मेव्याचे पेटारे कोणाला पाठविले?

(5) आग्र्याहून जाण्यासाठी राजे व राजपुत्र कशात बसले?

(6) राजांच्याऐवजी कोण निजले होते?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) राजांनी आग्र्याहून पळून जाण्यासाठी कोणती युक्ति योजली?

(2) राजे पेटाऱ्यात बसून गेल्यावर हिरोजीने काय केले?

(3) राजांनी कोठे जाण्याचे ठरविले? का?

(4) भवानी देवीने राजांना कोणता उपदेश केला?

(5) राजांच्या बरोबर कोणकोण होते?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) राजांना कोणते स्वप्न पडले?

(2) राजांनी औरंगजेबाच्या कैदेतून सुटका करून घेण्यासाठी कोणती योजना बनविली?

(3) हिरोजीने कशा प्रकारचे वेषांतर केले?

(4) राजांनी महाराष्ट्रात न जाण्याचे का ठरविले?

**4. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

(1) बादशहा = ________ (2)नातेवाईक = ________(3)कामकरी = ________(4)साक्षात्कार = ________

**5. खालील शब्दांचे विरोधी शब्द लिहा :**

(1) भय x________ (2)जागृत x ________(3)खरेदी x ________ (4)दिवस x ________

**6. खालील शब्दसमूहांसाठी एक शब्द लिहा :**

(1) शहराचा मुख्य संरक्षक अधिकारी

(2) थोड्या काळासाठीचे राहण्याचे ठिकाण

(3) संसाराचा त्याग करुन अंगाला राख फासणारा

(4) हिशोब लिहीण्याचे काम करणारा

**7. खालील विधाने कोण कोणास कोणत्या प्रसंगी म्हणाले ते लिहा :**

(1) 'पेटारे कोणाचे ? कोठे जातात ?'

(2) 'राजे यांनी चौघा वजिरांस मेवा पाठविला आहे.'

(3) 'दिल्लीपलीकडे जावे. वाराणशीकडे जावे.'

(4) 'तू राजांच्या डेऱ्याभोवती चौकी देऊन खबरदारीने राहाणे. '

**8. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) औरंगजेबाने राजांच्या चौकीसाठी किती स्वार नेमले?

(A) 5000 (B) 2000 (C) 500 (D) 100

(2) राजांनी कशाचे पेटारे मागविले?

(A) लोखंडी (B) पोलादी (C) वेळू (D) लाकडी

(3) राजांनी वजिरांना पेटाऱ्यात काय पाठविले?

(A) मिठाई (B) मेवा (C) पेढे (D) फळे

(4) राजांनी कोठे जाण्याचे ठरविले?

(A) सूरत (B) रायगड (C) दिल्ली (D) मथुरा

**शिक्षक-प्रवृत्ती**

- शिवछत्रपतींची एक्क्याण्णव कलमी बखर.
- भाऊसहेबांची बखर या बखरींची विद्यार्थ्यांना माहिती देणे.

**भाषासज्जता**

मराठीतील बखर वाङ्मय हा मध्ययुगीन कालखंडातील मराठी गद्यलेखनाचा उत्तम नमुना म्हणून महत्त्वाचा आहे. मराठेशाहीची स्वराज्याची स्थापना केल्यानंतर मराठी सरदारांनी आपल्या पराक्रमाने या राज्याच्या सीमा भारताच्या चारी दिशांना भिडवल्या शिवछत्रपतींच्या चरित्रावरील बखरींची संख्या मोठी आहे तरी पेशवेकालीन मराठी मंडळींच्या पराक्रमाच्या बखरीसुद्धा उपलब्ध आहेत. त्यात भाऊसाहेबांची बखर, पेशव्यांची बखर वाङ्मयीन दृष्ट्या महत्त्वाच्या बखरी आहेत.

5000 सैन्याचा पहारा असताना यातून उपाय कसा शोधायचा याचा विचार करणाऱ्या महाराजांचे धीरगंभीर, बुद्धिमान, राजकारणधुरंधर असे व्यक्तिमत्व तर दिसतेच. राजांसाठी स्वत:चा जीव पणाला लावणाऱ्या हिरोजी फरजंदसारख्या इमानी सेवकांची स्वामीभक्ती बखकाराने वर्णन केलेली आहे. तसेच शिवाजीने स्वत: पळण्याआधी आपल्या सेवकांना पळून जाण्यास सांगून त्यांचा जीव वाचविला. एका लोककल्याणकारी राजाचे गुण त्यातून दिसतात.

●

# 3 पत्रावळ

– **पांडुरंग सदाशिव साने**

(जन्म : 1899, मृत्यू : 1950)

पूज्य साने गुरूजी या नावाने उभ्या महाराष्ट्राने ज्यांचा आदराने उल्लेख केला त्यांच्या 'श्यामची आई' या आत्मकथनात्मक कादंबरीतून हा भाग घेतलेला आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या लढयात भाग घेणारे साने गुरूजी एक दृढ निश्चयी स्वातंत्र्य सैनिक होते तसेच उत्तम लेखक होते. मुलांवर त्यांचे खूप प्रेम होते. मुलांवर संस्कार व्हावे या हेतूने त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. 'भारतीय संस्कृति', 'सुधेस पत्रे', 'तीन मुले' इ. त्यांची पुस्तके आहेत. त्यांनी कविता–लेखनही केलेले आहे. 'पत्री' हा त्यांचा काव्यसंग्रह आहे.

या पाठात त्यांच्या आई वडिलांनी लहानग्या श्यामवर सहजपणाने आणि स्वतःच्या उदाहरणांने शिकण्याचे, उद्योगीपणाचे संस्कार कसे केले होते ते रसाळ भाषेत सांगितलेले आहे.

---

''कोकणात पुष्कळशा घरी पत्रावळीवर जेवण्याची पद्धत आहे. साधेपणात किती सुंदरता व स्वच्छता असते. ताटांना ती कल्हई लावा व ती पोटात दवडा घाण सारी. माझ्या वडिलांना पत्रावळीवर जेवणे फार आवडे. बायकांनासुद्धा त्रास कमी. ताटे घासावयास नकोत. वडील सकाळी शेतावर जावयाचे. इकडे तिकडे फिरून कामधाम करून ते दहाच्या सुमारास परत घरी येत असत. येताना फुले, पत्रावळीसाठी पाने, कोणा कुणब्याने दिली असली किंवा शेताच्या बांधावर केलेली असली तर भाजी असे घेऊन घरी यावयाचे. वडील मग स्नान करून संध्या, पूजा वगैरे करावयास बसत. आम्ही शाळेतून आलेली मुले पत्रावळी लावावयास बसत असू. ताज्या पानांची हिरवीगार पत्रावळ व त्याच पानांचा द्रोण.

मला प्रथम पत्रावळ लावता येत नसे. द्रोण तर अगदी साधत नसे. आमच्या कोकणात एक म्हण आहे, ''पत्रावळी आधी द्रोणा ! तो जावई शहाणा ॥'' पत्रावळ लावण्यापूर्वी ज्याला तिच्याहून कठीण असा द्रोण लावता येईल तो जावई शहाणाच असला पाहिजे.

घरातील मंडळी पत्रावळी लावीत बसत. कधी कधी प्रत्येकाने पाच–पाच पत्रावळी लावाव्या, असे आजी ठरवून टाकी व प्रत्येकास पाने वाटून देई. नाना प्रकारच्या पानांच्या पत्रावळी लावतात. वडाची पाने, पळसाची पाने, कुड्याची पाने, धामणीची पाने, भोकरीची वाटोळी पाने, पांढ्या चाफ्याची पाने, सर्वांच्या पत्रावळी लावतात. श्राद्धाला मोहाच्या पानांचीही पत्रावळ कोणी मुद्दाम लावतात. चातुर्मासात बायका आंब्याच्या पानांच्या किंवा फणसाच्या पानांच्या पत्रावळीवर जेवण्याचे व्रत घेतात. कोकणात पत्रावळीस धार्मिक संस्कृतीत स्थान दिले गेले आहे. झाडांची व त्यांच्या पाानांची ही केवढी थोरवी आहे ! ''श्याम ! तू पत्रावळ लावावयास शीक. नाही तर आज जेवावयास मिळणार नाही.'' असे आईने मला बजावले.

''मला लावायला येत नाही, मी काही लावणार नाही,'' मीही रागानेच म्हटले.

माझी बहीण माहेरी आलेली होती, ती मला म्हणाली, ''श्याम ! ये तुला मी शिकविते. कठीण काय आहे त्यात काही?''

''मला नको तू शिकवायला जा.'' मी उर्मटपणे त्या प्रेमळ बहिणीस उत्तर दिले. माझी अक्का फारच सुंदर पत्रावळ लावीत असे. माझे वडीलही पत्रावळ व द्रोण लावण्यासाठी गावात प्रसिद्ध होते. आमच्या गावात रामभटजी म्हणून एक होते. त्यांची तर आख्यायिकाच झाली होती. जे पान हातास लागेल ते घेऊन रामभटजी टोचीत जावयाचे. चांगलेच पान पाहिजे, हे येथे नीट बसणार नाही वगैरे विचार त्यांच्या मनात येत नसत. कसेही पान असो, रामभटजींच्या पत्रावळीत त्याला स्थान आहेच. कोणाकडे लग्नमुंज असली, प्रयोजन वगैरे असले की, गावातील मंडळी त्यांच्याकडे जमावयाची व पत्रावळी लावीत बसावयाची. गप्पागोष्टी करीत सहकार्याने काम करावयाची. अलीकडे ती पद्धत जात चालली आहे. अशी ही पत्रावळीची परंपरा मला शिकणे भाग पडले, परंतु मी पडलो हट्टी. मी काही त्या दिवशी पत्रावळ लावली नाही.

मी पत्रावळ लावली नाही व आईने माझे पान मांडले नाही. 'ज्याने त्याने आपापली पत्रावळ घेऊन बसावे,' असे ठरले होते. माझी पत्रावळ नाही. सारीजणे हसू लागली. माझ्यासाठी माझी अक्का रदबदली करून लागली. ''उद्या लावशील ना श्याम पत्रावळ? उद्या शीक हो माझ्याजवळ. आई, उद्या तो लावील हो. वाढ आज त्याला,'' असे अक्का म्हणू लागली, परंतु आम्ही एरंडासारखे फुगलो होतो.

''मी नाहीच लावणार जा. नका वाढू मला जेवायला. माझे अडले आहे खेटर . मी तस्सा उपाशी राहीन.'' असे रागाने म्हणत

मी ओसरीवर गेलो. पोटात तर भूक लागली होती. कोणी आणखी समजूत घालावयाला येते का, याची वाट मी पाहत होतो.

शेवटी माझी थोर निरभिमानी अक्का, तीच पुन्हा मजजवळ आली. ती म्हणाली, ''श्याम! चल रे जेवावयास. मी उद्या सासरी गेल्ये म्हणजे थोडीच येणार आहे समजवावयास! ऊठ, चल, लहानसे ठिकोळे लाव व त्यावर बस जेवावयास,'' तीन पानांच्या लहान पत्रावळीस ठिकोळे म्हणतात. चार पानांच्या पत्रावळीस चौफुल म्हणतात. पळसाचे मोठे पान असले तर एकाच पानावर आम्ही मुले जेवत असू. एकच पान पुरे होत असे. वाटोळी मोठी पत्रावळ तिला घेरेदार पत्रावळ म्हणतात. माझ्या वडिलांना लहान पत्रावळ आवडत नसे. चांगली मोठी गोलदार आवडत असे. रानात भरपूर पाने असतात, त्यात काटकसर कशाला? 'विस्तीर्णपात्र भोजनम्' ''जेवावयास मोठे पान घ्यावे'' असे ते म्हणत.

अक्काच्या शब्दांनी मी विरघळलो. सासरी गेल्यावर ती थोडीच रुसणाऱ्या भावाजवळ आली असती! दोन दिवस ती आली होती; तरी मी तिच्याशी नीट वागलो, नाही. मला वाईट वाटले व डोळयांत पाणी आले. अक्काने माझ्या हातात पान दिले. ''हे खाली आधाराला लाव,'' असे ती म्हणाली. मी हातात एक चोय घेतली व टाका लावला; परंतु चोय फार लोचट होती व टाका तुटेना. ''श्याम! ही दुसरी घे चोय. ही चांगली आहे.'' असे म्हणून अक्काने दुसरी चोय जुडीतून काढून दिली. कसे तरी मोठेमोठे टाके घालून मी ठिकोळे तयार केले व घरात नेले.

''ही माझी पत्रावळ, वाढ मला.'' मी आईला म्हटले.

''हातपाय धुऊन आलास का पण?'' आईने विचारले.

''हो, केव्हाच हातपाय धुतले. मी काही घाणेरडा नाही.'' मी म्हटले.

''घाणेरडा, नाहीस, परंतु सू सू तर करतो आहेस. नाक नीट शिंकरून ये, तो मी इकडे वाढते.'' आई म्हणाली.

मी नाक स्वच्छ करून आलो व जेवावयास बसलो.

''पोटभर जेव चांगला. उगीच हट्ट करतोस. तो शेजारचा वासू एवढासा आहे; पण कशी छान लावतो पत्रावळ. '' आई बोलत होती.

मी रागाने भराभर जेवत होतो, पत्रावळ कशीतरी लावलेली होती. तिचा एक टाका निघाला व माझ्या घशात अडकला. मी घाबरलो. शेवटी निघाला एकदाचा. ''टाके जातात घशात तरी म्हणे तूच पत्रावळ लाव. मला लावायला येत नाही तरी म्हणे लाव.'' मी रागाने म्हटले.

''आमच्या घशात नाही जात ते? तू निष्काळजीपणाने लावलीस याचे हे प्रायश्चित्त. जोपर्यंत तू चांगली पत्रावळ लावण्यास शिकणार नाहीस तोपर्यंत तुझीच पत्रावळ तुला ठेवण्यात येईल.'' आई म्हणाली.

मी दुसऱ्या दिवसापासून चांगल्या पत्रावळी लावण्याचा निश्चय केला. अक्का पत्रावळ कशी लावते, दुमड कशी घालते, ते पाहू लागलो. काही पानांना दुमड घालावयाची असते. ज्याला आपणापेक्षा एखादी गोष्ट चांगली करता येत असेल त्याच्याजवळ जाऊन शिकले पाहिजे. त्यात गर्व कशाला? प्रत्येक गोष्ट चांगली करता आली पाहिजे. 'जे जे करीन ते उत्कृष्ट करीन असे माणासाचे ध्येय असावे. पत्रावळ लावणे असो वा ग्रंथ लावणे असो, शेण लावणे असो वा शेला विणणे असो, माझ्या वडीलांचा हा गुण होता. ते धुणी दांडीवर वाळत घालीत तर कशी सारखी घालीत; टोकाला टोक मिळालेले. आमच्या गावात एक गरीब गृहस्थ होते. ते गोंधळकरांकडे धुणी वाळत घालण्याचे काम करीत. ते इतकी छान धुणी वाळत घालीत की, पाहत बसावे. माझे वडील भाजीच्या दळ्यांना पाणी शिंपीत. त्या वेळेस किती बारीक धारेने शिंपीत, हाताने धार धरून शिंपीत; परंतु ते काळजी घेत. प्रत्येक गोष्टीत नीटनेटकेपणा असला पाहिजे. सौंदर्य असले पाहिजे.

माझ्या आईने मला प्रत्येक गोष्ट मनापासून करावयास शिकविले. प्रत्येक गोष्ट चांगली करावयास लावले. आपण लावलेली पत्रावळ कोणालाही मांडतील. जर ती नीट नसेल तर जेवणाराच्या घशात टाका जावयाचा! पत्रावळ लावताना मनात म्हटले पाहिजे, ''कोणीही हिच्यावर जेवो नीट जेवता येईल. घशात टाका जाणार नाही. फटीतून अन्न खाली जाणार नाही.'' मी चांगली पत्रावळ लावण्यास शिकलो.

एक दिवस माझ्या हातची पत्रावळ मुद्दाम वडिलांसाठी मांडली, वडीलांनी विचारले, ''चंद्र्ये! तुझी का ग पत्रावळ?''

अक्का म्हणाली, ''नाही. ती श्यामने लावलेली आहे.''

वडील म्हणाले, ''इतकी चांगली केव्हापासून यावयास लागली?''

आई म्हणाली, ''त्या दिवशी जेवायला घातले नाही व तू चांगली पत्रावळ लावीपर्यंत तुझी तुलाच घ्यावी लागेल, असे सांगितले म्हणून नीट शिकला लावायला.''

मी आईला म्हटले, ''आता मागचे कशाला सांगतेस? भाऊ !'' आता चांगली येते की नाही मला?''

''आता काय सुंदरच लावता येते; पण द्रोण कुठे लावता येतो?'' वडील म्हणाले. ''द्रोणही मी लावून ठेवला आहे. विहिरीवर अक्काने लावलेला एक द्रोण मी घेऊन आलो व त्याच्यासारखा लावीत बसलो. शेवटी साधला, मी तुम्हाला जेवण झाल्यावर दाखवीन.'' मी सांगितले.

माझ्या पत्रावळीचे गुणगान झाल्यामुळे मी जरा फुशारून गेलो होतो. जेवण झाल्यावर मी द्रोण वडीलांस दाखविला. ''चांगला आहे; परंतु येथे चुकला. समोरासमोरचे कोपरे सारख्या दुमडीचे हवेत.'' असे म्हणून त्यांनी सुधारून दिला. मी तो सुधारलेला द्रोण आईला नेऊन दाखविला.

''आता कोण रागे भरेल?'' उगीच हट्ट करतो व मला हे येणार नाही ते येणार नाही म्हणतोस. देवाने ज्याला हातपाय दिले त्याला सारे काही करता येते. मनात मात्र हवे. चंद्रचे, याला एक जर्दाळू दे. शिकल्याबदल खाऊ.'' आईने सांगितल्याप्रमाणे अक्काने फडताळातून एक जर्दाळू मला दिला. तो किती गोड लागला! समुद्रमंथनानंतर देवांना अमृतही तितके गोड लागले नसेल. गोडी वस्तूत नसून वस्तूसाठी केलेल्या श्रमात आहे, कर्मातच आनंद आहे.''

## शब्दार्थ

**प्रायश्चित** दंड, शिक्षा, परिमार्जन **पत्रावळ** पानांनी बनविलेले ताट **स्नान** आंघोळ **द्रोण** पानांनी बनविलेले वाटी सारखे भांडे **व्रत** नियम, नेम **थोरवी** महत्ता, महत्त्व **उर्मटपणे** उद्धटपणे **आख्यायिका** दंतकथा **घेरेदार** मोठी **विस्तीर्ण** विशाल **लोपट** लगट करणारा **जुडी** गड्डी **निष्काळजी** चिंतामुक्त **सहकार्य** मदत **दुमड** घडी **गर्व** अभिमान **उत्कृष्ट** श्रेष्ठ **श्रम** कष्ट, महेनत **निराभिमानी** गर्व न करणारी

## वाक्प्रचार

**फुशारून जाणे** शेफारून जाणे **प्रायश्चित करणे** पश्चाताप करणे **गर्व करणे** अभिमान बाळगणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) कोकणात कशावर जेवण्याची पद्धत आहे?

(2) श्यामचे वडील रोज कुठे जात असत?

(3) पत्रावळी बद्दल कोकणात कोणती म्हण म्हटली जाते?

(4) श्राद्धाला कोणत्या पानांची पत्रावळ लावतात?

(5) चातुर्मासात बायका कोणत्या पानांच्या पत्रावळीवर जेवायचे व्रत करतात?

(6) श्यामचे वडील गावात कशासाठी प्रसिद्ध होते?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) कोण कोणत्या पानांच्या पत्रावळी लावतात?

(2) श्यामच्या आईने श्यामला काय बजावले?

(3) गावातले रामभटजी काय काय करीत असत?

(4) श्यामचे वडील मोठ्या पत्रावळीसाठी काय म्हणत असत?

(5) आईने जेवणा आधी श्यामला काय सूचना दिल्या?

(6) श्यामला जर्दाळू खातांना काय वाटले?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) श्यामने पत्रावळी लावली नाही म्हणून आई काय म्हणाली?

(2) अक्काने श्यामची समजूत कशी काढली?

(3) श्यामच्या वडिलांच्या गुणांचे वर्णन करा.

(4) पत्रावळ लावतांना कोणकोणती काळजी घेतली पाहिजे?

(5) अक्काने जर्दाळू दिल्यानंतर श्यामच्या मनात कोणत्या भावना दाटल्या?

(6) शेतावरुन घरी येताना श्यामचे वडील कोण–कोणती कमे करीत असत?

(7) अक्काशी वाईट वागल्याबद्दल श्यामला दु:ख का वाटले?

**4. खालील शब्दांचे विरोधी शब्द लिहा :**

(1) कठीण = ________ (2)प्रश्न = ________ (3)उपाशी= ________ (4)अभिमानी = ________

(5) विस्तीर्ण = ________ (6)अमृत= ________ (7)आनंद = ________

**5. 'नि' उपसर्ग लावून उदाहरणाप्रमाणे दुसरे शब्द शोधून लिहा :**

**उदा.** निरुपयोगी

निरुत्तर

**6. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) कोकणात जेवण्यासाठी काय घेण्याची पद्धत आहे?

(A) ताट (B) थाळी (C) पत्रावळ (D) ताटली

(2) चातुर्मासात कोणत्या पानांची पत्रावळ बायका वापरतात?

(A) आंब्याची पाने (B) केळीची (C) धामणीची (D) पळसाची

(3) ठिकोळे या पत्रावळीत किती पाने असतात?

(A) दोन (B) तीन (C) पांच (D) आठ

(4) चार पानांच्या पत्रावळीस काय म्हणतात?

(A) चौफूल (B) तिवई (C) पंचपाळे (D) सट

**विद्यार्थी–प्रवृत्ती**

- 'श्यामची आई' हे पुस्तक ग्रंथालयातून मिळवून वाचणे.
- विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील बालपणाचे दोन–तीन प्रसंग लिहिणे.

**शिक्षक–प्रवृत्ती**

- साने गुरुजींच्या इतर पुस्तकां विषयी माहिती द्यावी.

**भाषासज्जता**

साने गुरुजीची साधीसुधी रसाळ भाषा शैली त्यातील सहजता ही त्यांच्या अनुभवाची त्यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्वाची देणगी आहे. जुन्या काळच्या कोकणातील घरातले एकत्र कुंटुबांचे निर्मळ वातावरण त्यांनी आपल्या शब्दांतून व्यक्त केले आहे. त्यातील आई, आक्का यांच्या भाषेतून कोकणातील स्त्रियांच्या भाषेची गोडी दिसते. उदा. ''उद्या शीक हो''. ''उद्या तो लावील हो.'' अशा वाक्यातून एक मधुर लय दिसते.

●

# 4 कुब्जा

**– इंदिरा संत**

(जन्म : 1914 , मृत्यू : 2000)

इंदिरा नारायण संत ह्या कवी ना.मा. संत ह्यांच्या पत्नी. कवयित्री इंदिरा संत या आपल्या सोज्वळ, शालीन व मधुर काव्यरचनेने जुन्या व नव्या रसिकांत सारखीच लोकप्रियता मिळालेल्या एक प्रमुख कवयित्री. 'सहवास' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह त्यांच्या काव्यात मानवी जीवनातील कोमल व आर्तभावनांचा आणि कौटुंबिक जीवनातील हृद्य अनुभवांचा जसा अविष्कार होता तसाच निसर्गातील रंगरेषांच्या सुक्ष्म सौंदर्याचाही विलास आढळतो. 'मेंदी', 'शेला', 'मृणमयी', 'मृगजळ', 'रंगबावरी', 'बाहुल्या' हे त्यांचे काव्यसंग्रह खूप गाजले.

कुब्जा ही कविता त्यांच्या 'मेंदी' काव्यसंग्रहातून घेतली आहे. त्यांच्या गाजलेल्या कवितांपैकी एक कविता! श्रीकृष्णावर मनोमन प्रीती करणाऱ्या आणि त्यासाठी तनमन हरवून गेलेल्या कुब्जेच्या द्वारा आत्मिक प्रीतीचा साक्षात्कार घडविणारी ही कविता आहे.

---

अजून नाही जागी राधा,
अजून नाही जागे गोकूळ;
अशा अवेळी पैलतिरावर
आज घुमे का पावा मंजुळ.
मावळतीवर चंद्र केशरी
पहाटवारा भवती भणभण;
अर्ध्या पाण्यामधे उभी ती
तिथेच टाकुन अपुले तनमन.
विश्वच अवघे ओठां लावुन
कुब्जा प्याली तो मुरलीरव;
डोळ्यांमधुनी थेंब सुखाचे
"हे माझ्यास्तव... हे माझ्यास्तव..."

## शब्दार्थ

**कुब्जा** कंसदासी (ती कुबडी होती, तिला कृष्णाने सरळ केले.) **पैलतीर** समोरचा किनारा, पलिकडिल किनारा **पावा** बासरी, मुरली **मंजुक** मधुर, गोड **विश्व** जग **रव** आवाज **माझ्यास्तव** माझ्यासाठी.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) या कवितेतील वर्णन कोणत्या वेळचे आहे?

(2) पैलतिरावरुन कसला आवाज येत आहे?

(3) अर्ध्या पाण्यामध्ये कोण उभे आहे?

(4) बासरीचा आवाज ऐकून कुब्जेची अवस्था कशी झाली आहे?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) कुब्जा 'हे माझ्यास्तव' असे का म्हणते?

(2) या कवितेच्या आधारे कुब्जेच्या कृष्णभक्तीचे वर्णन करा.

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- कृष्णभक्तीच्या अधिक कविता मिळवा आणि संग्रहित करा.

### भाषासज्जता

कृष्णाच्या आयुष्यातील स्त्रियांमध्ये प्रामुख्याने यशोदा. देवकी, राधा, रुक्मिणी यांचीच नावे घेतली जातात. पण कुब्जेचे नाव कोणालाच माहीत नाही. कारण तिची भक्ती, तिचे प्रेम अज्ञात आहे. कंसवधासाठी गोकुळातून मथुरेत आलेल्या कृष्णाला भेटण्यासाठी धडपडणाऱ्या कुब्जेची अबोल भक्ती त्याला समजली आणि त्याने तिच्या कुबड आलेल्या पाठीवरुन प्रेमाने हात फिरवल्यावर तिची पाठ ताठ झाली. कृष्णाच्या या भक्ताविषयीच्या प्रेमाने कुब्जा धन्य झाली. तिला कृष्णाच्या प्रेमभावाचा हा एवढा थेंब पुरेसा आहे. तिने गोपींसारखा कृष्णाबरोबर बासरीवर रास खेळला नसेल पण अर्ध्यारात्री वाजणाऱ्या कृष्णाच्या बासरीचा स्वर फक्त आपल्या एकनिष्ठ प्रेमासाठीच आहे. याचा विश्वास तिला वाटतो. म्हणून गोकुळ, राधा, गोपी साऱ्या निद्रिस्त असताना कुब्जा मात्र यमुनेच्या पाण्यात उभी राहून कृष्णाची मनोभावे आराधना करते आहे.

गोकुळातून मथुरेत येऊन कृष्णाने फक्त कुब्जेसाठीच बासरी वाजवली आहे, त्यामुळे हे स्वर तिच्यासाठीच आहे.

●

# 5 कहाणी आदित्य राणूबाईची

कहाण्या या मराठी लोकसाहित्यातील मौलिक स्वरूपाचा ठेवा आहेत. कारण त्यामधून आपल्या पूर्वजांचा वारसा पुढील पिढयांपर्यंत पोचविला जातो. या कहाण्या केवळ अडाणी, देवभोळया अशा तत्कालीन समाजाचे जीवन कसे होते हे सांगणाऱ्या नसतात तर त्यांच्या अनुभवातून, निरीक्षणातून त्यांना जे शिकता आले ते पुढील पिढीला उपयोगी व्हावे यासाठी सांगितल्या जातात. लोककथा, कहाण्या, गीते आपले मनोरंजन तर करतातच, त्याबरोबर त्या ज्ञान देतात, बोध देतात. पशु, पक्षी निसर्गातील इतर घटक आणि माणूस यांचे नाते या कहाण्यांमधून उलगडले जाते.

**अमृतमंथन :** ही एक पुराण कथा आहे. अमृत मिळविण्यासाठी देव आणि दानव यांचे युद्ध सुरू होते. समुद्रातील 14 रत्नांपैली अमृत हे एक रत्न होते. मेरू पर्वताला वासुकी या सर्पाची दोरी. गुंडाळून देव दानवांनी समुद्राचे मंथन केले. त्यावेळी शेवटचे 14 वे रत्न म्हणजेच अमृत बाहेर आले.

---

एक होतं सरोवर कमळं फुलती भाराभर. सरोवराची महती आटपाट नगरात होती. सरोवराच्या काठी देवकन्यांची दाटी, साती आसरांचा दर्वळ, रानफुलांचा परिमळ. पाखरही गाती गोड गोड गाणी जशी आदित्यराणूबाईची कहाणी. ती कथा तुम्ही ऐकाल तर मनानं संतुष्ट व्हाल. आटपाट नगरातील एक ब्राह्मण मोठा कष्टाळू आणि धर्मासाठी श्रद्धाळू, सरोवराच्या काठी रानफुलांचा खच. दुर्वा भरगच्च. एका पहाटे दुर्वा, फुले आणि यज्ञासाठी समिधा आणायला गेला तर तेथील नवल पाहून थक झाला.

सरोवरातील नागकन्या... आभाळातील देवकन्या यांचा मेळा जमला. त्यांनी वसा घेतला. आदित्यराणूबाईची कहाणी ऐकू लागल्या साऱ्याजणी, ब्राह्मण हळू हळू गेला, त्यांना म्हणाला, 'हे देवतांनो, तुम्ही कोण?'

'आम्ही देवकन्या... नागकन्या!'

'तुम्ही कसला वसा वसता तो मलाही सांगता?' ब्राह्मण हात जोडून म्हणाला.

'नको रे बाबा, तू उतशील, मातशील घेतला वसा टाकून देशील. तू वसा घेवू नको. व्रताची नाचक्की करु नको.' देवता म्हणाल्यात.

'नाही माऊल्यांनो!, असे कधी होणार नाही आणि घेतला वसा टाकणार नाही.' असे वचन ब्राह्मणाने दिले तेंव्हा एका देवतेने व्रत सांगितले. म्हणाली, 'येत्या श्रावणात प्रत्येक आदितवारी पहाटे उठावे. नदीवर नाहीतर विहीरीवर जाऊन सचैल स्नान करावे. विडयाच्या पानावर चंदनाची राणूबाई काढावी. सहा रेघांचे मंडळ... सहा सुतांचा तातू करुन विधीवत पूजा करावी. नैवेद्य दाखवून यथाशक्ति दानधर्म करावा. रथसप्तमीस व्रताची सांगता करावी. मनाची निर्मळता हवी. शुद्धता पाळावी, अशी सहा महिन्यांची दक्षता घ्यावी!'

ब्राह्मण होता निष्ठावान. वसा बरोबर पाळला. सूर्यदेव प्रसन्न संतुष्ट झाला, नारायणाच्या कृपेनं त्याच्या चिंता दूर झाल्या. त्याचं काय झालं? ब्राह्मणाच्या दोन मुली उपवर होत्या. एक गोदावरी नि धाकटी कावेरी. दिसायला सुरेख. योगायोगाने राजपूत्र – प्रधानपुत्राच्या नजरेत पडल्या. मनांत भरल्या.

राजाकडून... प्रधानाकडून मुलींना मागणी आली. ब्राह्मण चक्रावला. गरीब ब्राह्मणाच्या मुली राजा प्रधाना घरी. राजा प्रधान आपले व्याही. आपल्या लेकी राजा प्रधानाच्या सूना. बाप रे ऽ विश्वास बसत नाही पण आहे सत्य. सूर्यनारायणाचीच कृपा.

ब्राह्मणाच्या पोरींना तर वाटले आपल्या पदरात सूर्यचन्द्र देवांनी टाकले. लोकानी गुढ्या उभारल्या. पताका फडकल्या. चौघडा वाजला... मंगलकार्य पार पडले. ब्राह्मणाचे ह्रदय भरूल आले. सोन्याच्या पायघड्या लेकींच्या पायाखाली. सूर्यदेवच त्यांचा वाली.

काही दिवसांनी ब्राह्मणास मुलींची याद आली. त्यांच्या महाली त्यांना डोळे भरून पहावे असे त्यास वाटले. मुली तर आपल्या वैभवता सर्व काही विसरल्या... नवऱ्यांच्या प्रिय झाल्या. सर्वप्रथम ब्राह्मण थोरल्या मुलीच्या घरी... राजपुत्राच्या महाली गेला.

द्वारपालांनी वर्दी दिली. मोठी लेक धावत आली. सेवकांनी पाणी दिलं. ब्राह्मणाने पाय धुतले. लेकीनं गुळपाणी आणले. 'बाबा ऽ बाबा ऽ, थोडा गुळ खावा... पाणी प्यावं!'

‘ पोरी माझा आहे वसा. गुळ खात नाही... पाणी पित नाही. तू माझी मुलगी गुणी आधी ऐक बाई ऽ कहाणी.’ ब्राह्मण पाटावर बसतांना म्हणाला.

‘ काळ नाही वेळ नाही कहाणी ऐकायला आता मला फुरसत नाही. नगारा वाजला राजा मोहिमेवर निघाला. माझ्यामागे गडबड, सांगा कशी ऐकू तुमची बडबड?’ मोठी मोठ्या तोऱ्याने म्हणाली.

ब्राह्मण संतापला तडकाफडकी पाटावरून उठला. ‘ धाकटीच्या घरी जातो घेतला वसा पूर्ण करतो. आदित्य नारायणाची कृपा झाली. तुम्हास छत्रं चामरं भेटली पण तुम्ही कदर नाही केली.’ तो लेकीस म्हणाला.

‘जाताऽ तर जा ऽ, सवडीनं या!’ थोरली... गोदावरी उत्तरली.

राज्याच्या बंदोबस्तासाठी राजा निघाला. ब्राह्मण धाकटीच्या महाली गेला. सेवकांनी सेवा केली. कावेरीनं गुळ पाणी आणलं. म्हणाली, ‘बाबाऽ तुम्ही थकेले ऽ ! थोडा गुळ खावा... पाणी पिऊन आराम करावा आणि निवांतपणे मग भोजन करा.’ ‘पोरी ऽ, माझा आहे वसा. आधी कथा ऐक !’ ब्राह्मण म्हणला.

‘ बाबा ऽ, तुम्ही सांगा. देवाची कथा नाही. ऐकायची तर कुणाची? तेवढच पुण्य माझ्या पदरी पडेल.’ धाकटी म्हणाली. घरात गेली आणि पूजा साहित्य घेवून आली. रांगोळी काढली. पाट मांडला, फुलवात लावली आणि मनोभावे कथा ऐकू लागली.

बाप सुखावला... दोन दिवस राहिला. अर्धा सुखी अर्धा कष्टी असा घराकडे निघाला. घरी आल्यावर मुलींच्या आईनं मुलींची चौकशी केली, म्हणाला, ‘ माझा वसा नेमाचा सर्वांच्या सुखाचा. पण गोदावरीनं कथा नाही ऐकली. राजाची राणी ती कशाला ऐकते आदित्य राणूबाईची कहाणी. राजा मोहिमेवर गेला... त्याचा राजपट उलटला. गोदाचं वैभव गेलं पण कावेरीनं अैकली तिची समृद्धी राहिली.’

गोदावरी राणी रांजणात भरी पाणी अशी स्थिती. भूकेनं मुलं व्याकुळ होत तेव्हा ती त्यांना कावेरीकडे पाठवी. देव देई पण कर्म नेई त्यामुळे गोदा फार गांजली. आपली चूक झाली म्हणून खूप खूप रडली. पाचव्या आदित्यवारी ती स्वत: कावेरीच्या महाली गेली. कावेरीनं तिची उत्तम बडदास्त ठेवली. कपडे दिले. आपणही पैठणी नेसून कहाणी सांगायला बसली.

गोदावरीनं कहाणी अैकली. अंत: करणापासून सूर्यनारायणाची पूजा केली. आणि तिकडे राजानं चढाई केली... लढाई जिंकली. छत्रं चामरं परत मिळाली. लोकांनी गुढ्या उभारल्या... राजाचं स्वागत केलं. आटपाटनगर सुखी झालं.

गोदावरी आता खूप बदलली. गेलं वैभव परत आलं म्हणून तिनं दानधर्म पार पाडला. सर्व उपाशी लोकांना पोटभर खावू घातलं. नागड्यांना कापड दिले, ब्राह्मणांना दक्षिणा दिल्या... आणि वसा घेतला.

जो कुणी कष्टी आला त्याला राणीनं वसा सांगितला. त्यांना वसा वसला ग्रहांचा फेरा चुकविला. सूर्य नारायणाचा कोप नष्ट करून सुखाचा मार्ग दाखविला.

गोदावरीवर सूर्यनारायणानं अवकृपा केली होती तशी अवकृपा कुणावरही त्यानं करू नये म्हणून घेतला वसा सोडू नये.

ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

## शब्दार्थ

**वाली** रक्षणकर्ता, तारक **कहाणी** कथा, गोष्ट **परिमळ** सुगंध, सुवास **कष्टाळू** कष्ट करणारा, श्रम करणारा **दुर्वा** एक प्रकारचे गवत **समिधा** यज्ञ कार्यात लागणारे विविध प्रकारच्या वृक्षांचे छोटे–छोटे तुकडे **मेळा** जमाव **वसा** नियम **आदितवार** रविवार **दक्षता** काळजी **वैभव** सुख समृद्धी **महाल** राजवाडा **तो–रा** अभिमान **फुरसत** रिकामावेळ **रांजण** डेरा **कोप** राग **सुफळ** परिणामकारक, फायदेशीर

## वाक्प्रचार

**नाचक्की करणे** अप्रतिष्ठा करणे / अपमान करणे / मानहानी **वर्दी देणे** समाचार देणे **तडका फडकी निघणे** घाई – घाई ने निघून जाणे **चढाई करणे** हल्ला करणे **डोळे भरुन पहाणे** मनाचे समाधान होई तो बघणे **मोहिमेवर जाणे** लढाईवर जाणे **बडदास्त ठेवणे** चांगले स्वागत करणे.

## म्हणी

**देव देई कर्म नेई** आपल्या करणीनेच स्वत:चे नुकसान करणे.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) गोदावरीचे लग्न कोणाशी झाले?

(2) कावेरीचा नवरा कोण होता?

(3) ब्राह्मणाच्या मुलींची नावें लिहा.

(4) देवकन्या आणि नागकन्या कोणाची कहाणी ऐकत होत्या?

(5) कहाणीतील व्रत कोणत्या वारी करावे?

(6) वसा पाळल्यावर ब्राह्मणाला कोण प्रसन्न झाले?

(7) ब्राह्मणाची कहाणी कोणत्या मुलीने ऐकली?

(8) भूक लागल्यावर गोदावरी मुलांना कोणाकडे पाठवित असे?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) नागकन्या आणि देवकन्यांनी ब्राह्मणास कोणते व्रत सांगितले?

(२) ब्राह्मण मोठ्या मुलीच्या घरी गेल्यावर तिने काय सांगितले?

(3) धाकटया मुलीने ब्राह्मणाचे कसे स्वागत केले?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) सरोवर काठाचे वर्णन करा.

(2) आदित्य राणूबाईचे व्रत कसे करावे ते सांगा.

(3) ब्राह्मणाच्या मुलींच्या लग्नानंतर लोकांनी त्यांचे कसे स्वागत केले?

(4) व्रताचा वसा मोडल्यामुळे गोदावरीस कोणेत कष्ट सहन करावे लागले?

(5) गेलेले वैभव परत मिळाल्यावर गोदावरीने काय - काय केले?

**4. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) कोणत्या पानांवर चंदनाची राणूबाई काढावी?

(A) विडयाच्या पानांवर (B) केळीच्या पानांवर

(C) केवड्यांच्या पानांवर (D) आंब्यांच्या पानांवर

(2) ब्राह्मणाला मुलींनी काय दिले?

(A) साखरपाणी (B) गुळपाणी (C) नारळपाणी (D) चहापाणी

(3) ब्राह्मणाच्या लेकींच्या पायाखाली कसल्या पायघड्या घातल्या?

(A) फुलांच्या (B) मोत्यांच्या (C) सोन्याच्या (D) रेशमाच्या

(4) ब्राह्मण कसा होता?

(A) निष्ठावान (B) पुण्यवान (C) कर्तृत्ववान (D) धनवान

**5. वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

(1) नाचक्की करणे : ......................................................................................

(2) वर्दी देणे : ......................................................................................

(3) तडका-फडकी निघून जाणे : ......................................................................................

(4) चढाई करणे : ......................................................................................

**6. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :**

(1) सूर्य x________ (2)संतुष्ट x________(3)सुगंध x________

**7. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

(1) सुगंध = ________ (2) लेक = ________(3)राजा = ________

(4) वैभव = ________ (5) वसा = ________(6) तोरा = ________

## विद्यार्थी-प्रवृत्ती

- अशा कथांचा संग्रह करा आणि प्रोजेक्ट बनवा.
- तुमच्या कुटुंबात किंवा शेजारी असा वसा कोणी घेतला आहे का त्याची माहिती मिळवा.

## शिक्षक-प्रवृत्ती

- अशा पांच कथा मिळवून विद्यार्थ्यांना सांगणे.

## भाषासज्जता

धार्मिक विधींशी सबंधित असणाऱ्या लोककथा म्हणजेच कहाण्या त्यामध्ये असणारे व्रताचे विधि फार धार्मिकपणाने आणि श्रद्धेने पाळले जातात. सोळा सोमवार, हरतालिका, महालक्ष्मी, मंगळागौर ही काही लोकप्रिय व्रते फक्त स्त्रियाच करतात.तर काही व्रते स्त्री – पुरूष करतात. त्या व्रताचे पालन नेमकेपणाने केले नाही तर नुकसान कसे होते याबद्दलची भीती सुद्धा निर्माण केली जाते. या कहाण्यांची रचना त्यांची भाषा, वाक्याची लयबद्धता गेयता असणारी लहान लहान वाक्ये ही यांची वैशिष्टये असतात. कहाण्यांमधील भाषा आणि तिची लयबद्धता खूप लोभस आहे. ''एक होते सरोवर – कमळं फुलवी भाराभर'' किंवा ''सरोवराच्या काठी रानफुलांचा खच, दुर्वा भरगच्च.''

●

# 6 कंदिलाच्या प्रकाशात

**– वामन चोरघडे**

(जन्म : 1914 , मृत्यू : 1995 )

प्रा. वामन कृष्ण चोरघडे हे वऱ्हाडी लोकजीवनाशी व लोकसाहित्याशी एकरूप झालेले कथाकार आहेत. 'हवन', 'प्रस्थान', 'सुषमा', 'संस्कार' हे त्यांचे प्रसिद्ध कथासंग्रह आहेत. सामान्य माणसाच्या अंत:करणचे पापुद्रे हलक्या हातांनी उकलून कथा खुलविण्याची व ग्रामीण वातावरण निर्माण करण्याची त्यांची हातोटी अतिशय विलोभनीय आहे. त्यांनी आपल्या लघुकथांतून त्यागी, दु:खी, कष्टी, सेवाभावी जीवनाची काव्यमय चित्रे रेखाटली आहेत.

'कंदिलाच्या प्रकाशात' या पाठात लेखक वामन चोरघडे यांनी साठ-सत्तर वर्षापूर्वी आपल्या देशात कशी तेव्हा स्थिती होती ते सांगितले आहे. विजेचे दिवे नव्हते कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास करावा लागत असे. कंदिलाची काच फुटली तरी वडील रागावले नाहीत. अशा प्रसंगांनी लेखकावर चांगले संस्कार घडले. चांगल्या संस्कारांमुळे लेखकाला शाळेच्या वसतीगृहात प्रवेश मिळाला. त्याचे वर्णन तसेच झोपेत चालणारा विठ्ठल यांच्या मैत्रीच वर्णन लेखकाने साध्या सरळ व रसाळ भाषेत केलेले आहे.

---

सत्तर वर्षापूर्वी विशेषत: खेडेगावात कुमार, तरुण, वृद्ध आशा अवस्था नव्हत्याच! मूल चार-पाच वर्षे चालायला – धावायला लागले म्हणजे ते एकदम तरुण होत असे. मुलाचे लग्न बारा-तेराव्या वर्षी, मुलीचे नवव्या-दहाव्या वर्षी व्हायचे! सुदैवाने माझे असे काही झाले नव्हते.

दहाव्या वर्षी मी माझ्या खेड्यातून शिकण्यासाठी म्हणून बाहेर पडलो, घरा-दाराला, आप्तेष्टांना आचवलो! शिक्षणात जम बसेपर्यंत इथे-तिथे भटकत राहिलो. घराबाहेरच्या जीवनाशी एकदम संबंध आल्यामुळे घर-घराण्याच्या संस्कारांचा मला अतिशय उपयोग झाला.

माझ्या आई-वडीलांनी मुद्दाम असे कोणतेही संस्कार माझ्यावर केले नव्हते. हे कर, ते कर, असे बोलावे, तसे बोलू नये असा उपदेश ऐकायची सवय मला कधीच नव्हती. आई-वडीलांच्या कृतीतून, बोलण्यातून थोडेफार ध्यानी धरले जात असे आणि आपसुक आमच्या वागण्यावर बंधन लागत असे. उदाहरणार्थ, पहाटे उठणे. मला कधी 'ऊठ' म्हणून कुणीच जागे केले नाही. मलाच जाग यायची – अगदी पहाटे झुंजुरक्याला! कारण त्याही अगोदर आई-वडील, बहीण-भाऊ उठायचे अन् त्यांची कामे सुरू व्हायची.

एकदा असाच एक प्रसंग अजून आठवतो. कारण त्यातून शिकलो ते आजवर माझ्या कामात उपयोगी ठरले आहे, तसा स्वभावच बनून गेला आहे! हा स्वभाव कसा बनला हा विचार आज येतो तेव्हा तो प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतो.

साठ वर्षापूर्वी विजेचे दिवे नव्हते. खेड्यात नाही की शहरात नाही. प्रायमरीपासून कॉलेजपर्यंतचा सर्व अभ्यास रॉकेलच्या चिमण्या किंवा नंतर नंतर कंदिलावरच आम्हाला करावा लागला. गंमत म्हणजे त्यावेळचा सगळीकडचा अंधार कसा छान दिसायचा. अंधार पडला रे पडला की नीज भरलेले डोळे मिटून जात. अन् पहाटे चारला जाग येऊनही झोप पूर्ण झाल्यासारखे ताजेतवाने वाटायचें. मी कॉलेजात गेल्यावर रस्त्यापुरती वीज आली. थोरामोठ्यांच्या घरात आली. पण माझ्या दरमहा रु. तीनचे खोलीत कंदील एके कंदिलच राहिला!

या कंदिलावरूनच आठवण झाली. त्यावेळी मी काटोलला आजच्या सहावीच्या वर्गात शिकायला आलो. सुट्टीत किंवा सणावाराला वीस-पंचवीस कि. मी. असलेल्या माझ्या नरखेड गावी आईला भेटायला म्हणून जात असे. घरी-दारी कार्यक्रम ठरला असे. पहाटे उठायचे, छोटेसे अंगण झाडायचे! पंधरा-वीस मोगरीची झाडे अंगणाच्या काठोकाठी लावली होती. ती खुरपायची, अंगणातल्या विहिरीतले पाणी त्यांना घालायचे आणि मग घरचे दिवे पुसायला समोर घेऊन अंगणात बसायचे. घरी त्यावेळेला एक पितळी चिमणी, दोन दिवालगिऱ्या आणि दोन कंदील होते. हे सगळे दिवे चक्क करण्यात एक तास आनंदात जायचा! दिवे, काचा, अगदी लख्ख! त्यामुळे दिवसभर बरे वाटायचे. दिवेलागण होईपर्यंत दोन-तीन वेळा तरी आढ्याला टांगलेल्या दिव्यांकडे मी बघून घ्यायचो. मनात वाटायचे, की अल्लाउद्दिनने दिवा घासला म्हणजे त्याला धन मिळायचे. हे रूपक आहे! ते आज कळते! 'दिवे घासणे' म्हणजे स्वच्छ करणे. त्यामुळे प्रकाश छान येतो. रात्री अधिक वेळ काम करता येते व त्या कामातून अधिक धन कमावता येते. हे आताचे विचार. त्या वेळी नुसताच आनंद व्हायचा.

एकदा दोनपैकी एका कंदिलाची काच (या काचेला आम्ही पायली म्हणत असू आणि मी अजून म्हणतो.) राखेने स्वच्छ करीत होतो. आमच्या वेळी मनाचे श्लोक तोंडी घोळवायची रीत होती. 'समर्थांचिया सेवका वक्र पाहे...' या श्लोकाने सामर्थ्य आले की काय न कळे पण ती काच माझ्याने फुटली. श्लोक बंद झाला आणि आता काय होणार असे वाटू लागले. वडील जवळच होते. येऊन ते बघू लागले. त्यांनी काय म्हणावे? ते म्हणाले, ''हातबीत कापला नाही ना? गंमतच झाली. हा कंदील केव्हा घेतला होता सांगू? अस्सल जर्मन कंदील आहे. सौंसरहून आणला होता. तुझा जन्म झाला त्याच्या दुसऱ्या की तिसऱ्या दिवशी हा घेतला. आजवर त्यानं काम दिलं आणि आता तेरा वर्षांनंतर तूच त्याची पायली फोडलीस. आता काचा जपून उचल अन् उकिरड्यावर टाकून ये.''

विचित्र वाक्य नाही का? कशी फुटली, का फुटली, वेंधळेपणा, बावळटपणा, काही म्हणता काही नाही! मी त्या काचा उकिरड्यावर फेकल्या नाहीत. एका फडक्यात बांधून अभ्यासाच्या पुस्तकाजवळ ठेवून दिल्या. तडकलेली काच बरेच बरेच शिकवून गेली.

दुसरी जर्मन पायली मिळेपर्यंत एकाच कंदिलावर काम भागवायचे. दोन खोल्यांत प्रकाश पडावा म्हणून एकच कंदील दारात टांगून ठेवणे आले आणि तिथेच संघर्षाला सुरुवात झाली. वाचायला मी 'अरबी भाषेतील गोष्टी' हे पुस्तक आणले होते. आई-वडील झोपल्यानंतरच ते वाचायला मिळायचे. अर्थात त्याच कंदिलाच्या प्रकाशात दाराजवळ बसून मी वाचत असे. एक गोष्ट वाचता वाचताच मला झोप आली. उठून बघतो तर कंदील विझलेला. किती वाजले हे कळायला मार्ग नव्हता. पुन्हा लावायचा तर आगपेटी हवी. आणि आगपेटी आईच्या उशीखाली! चिडत चरफडत झोपलो एकदाचा!

दोन दिवस असेच झाले. मग सकाळी आईवर तडकलो 'हे काय गे? मी वाचत असतानाच तू दिवा का विझवलास?'

'अरे तू झोपला होतास. बसल्याबसल्याच तुला झोप लागली होती.'

'छट्! मी विचार करत होतो आणि तेवढ्यात कंदील बघतो तर विझलेला! आगपेटी तुझ्या उशीखाली. आम्ही करायंचे काय? तुला वाटलं असेल, उगीच तेल जळतंय. पण दुसरा कंदील तर आता नाही? त्यामुळे तेल वाचलंच की! आता असं होता कामा नये. जळलं थोडं तेल तर जळू दे. अगे तेल जळे, पिडा टळे!'

'अरे, तेल जळे पिडा टळे हे तुझं अगदी खरं आहे. पण ज्यांच जळे त्यास कळे, हे त्याहून खरं आहे की, नाही बोल.'

संवाद संपला पण 'ज्यांच जळे त्यास कळे' हे आईचे बोल जे आत-आत घुसले, ते आजवर! आता तर इतरांचे जळले, तरी मला कळते अशी अवस्था झाली आहे अन् माझ्या व्यवस्थितपणाचे सारे श्रेय या तेराव्या वर्षाच्या म्हणीला मी दिले आहे.

या कंदिलाचीच पुन्हा एक किमया! माझ्या जन्माच्या वेळी घेतलेल्या कंदिलाला काच आली आणि मी तो कंदिलचा काटोलला घेऊन गेलो. सहावी-सातवीतला तो अभ्यास. मोजून चार-पाच विषय, त्यामुळे अभ्यासात, व्यायामात, खेळण्यात मी चांगला म्हणून शिक्षकांची समजूत होती. शिवाय माझे वागणे, बोलणे बरे होते. काटोलच्या माझ्या त्या मिड्लस्कूलचा मी कप्तान होतो. त्यावेळचे आजवर मनात घर करून बसलेले माझे विद्यादाते म्हणजे हेडमास्तर एन्. डी. कोतवालीवाले, वर्गशिक्षक श्री. देशपांडे आणि नुकतेच आलेले श्री. ना.रा.बोपर्डीकर, श्री. अस्वले! सतत आठ वर्षे या मंडळींची आठवण राहावी म्हणजे नवलच! पैकी श्री.ना.रा.बोपर्डीकर आणि श्री. अस्वले हे दोघे नुकतेच आले होते. त्यांच्यामुळे आमचा क्रिकेट, फुटबॉलचा खेळ अगदी रंगभरा व्हायचा! श्री.बोपर्डीकर शाळेच्या होस्टेलचे वॉर्डन होते. त्यांची शिस्त आणि संस्कार अजून आठवतात. त्यांच्या घरी फक्त आईच असल्यामुळे ते सारा दिवस आम्हा मुलांमधेच असत.

त्यावेळी मला आखाड्याचे वेड लागले होते आणि महिन्या दोन महिन्यानंतर दंगतील आमच्या जोड्या जमल्या होत्या. आखाडयातले श्री. पांडुरंग मास्तर त्यांना फावेल आणि मनात येईल, अशा वेळी कुस्तीचे डावपेच शिकवीत! जावे लागे! श्री. बोपर्डीकरांच्या तासाला मी हजर नव्हतो. सायंकाळी क्रिकेटच्या वेळी हजर झालो. खरे खरे त्यांना सांगितले! त्यांनी मत दिले नाही. एकदम म्हणाले, 'तू उद्यापासून होस्टेलवर राहायला ये!'

'पण सर...'

'काय?'

'होस्टेलची फी, जेवणखाणं म्हणजे महिना सहा रुपये! मला घरून पैसेच येत नाहीत.'

'ते मी बघेन. आज सायंकाळच्या आत तुझं सामान होस्टेलवर आलंच पाहिजे. सामान ठेवून सरळ माझ्या घरी ये. मी नसलो तर आईला भेट!'

गुरूची आज्ञा! त्याच दिवशी रात्री मी होस्टेलचा विद्यार्थी झालो. धास्तावलो होतो. कारण मुले सांगू लागली, की वॉर्डन येवढेसे काही चुकले, तर छडीने फोडून काढतात!

सरांच्या मनात काय होते मला ठाऊक नाही, पण दुसऱ्या दिवशी त्यांनी मला होस्टेलचा प्रिफेक्ट करून टाकले अन् मी अडकलो. माझ्यापेक्षा वयाने मोठी मुले होस्टेलमध्ये होती. माझे बाहेरचे पुष्कळच कार्यक्रम बंद झाले. श्री. बोपर्डीकर रात्री साडेनऊला छडी घेऊनच फेरी मारायला येत आणि मला सर्व हाल-हवाल विचारीत. एक उगीच झेंगट माझे मागे लागले, ही माझ्या मनाची भावना! त्यात आणखी एक भानगड! जेवढी दांडगी मुले होती, त्याना दादा-बाबा करीत मी सांभाळायचा. माझ्या शेजारी विठ्ठल नावाचा एक विद्यार्थी (आडनाव आठवत नही. त्याची जात आठवते तो सोनार होता.) झोपत असे. मजजवळ झोपायला गादीबिदी नव्हती. त्याच्याजवळही नव्हती. परंतु त्यामुळे झोप सुखाने लागायची! सकाळी उठल्याबरोबर वळकट्या व्यवस्थित ठेवल्या की नाही, हे बघायला वॉर्डन येत असत. विठ्ठलची वळकटी माझ्या शेजारी मी ठेवायचो!

विठ्ठल तसा गरीब, सालस पण काहीसा बुजरा-बुजरा मुलगा होता. त्याच्या घरची परिस्थिती मला ठाऊक नव्हती. माझ्या घरच्यापेक्षा बरी असेल हा अंदाज! त्याला माझा आधार वाटायचा, मला त्याची जबाबदारी वाटायची.

एकदा आम्ही दोघेही एकाच वेळी माझा कंदील विझवून झोपलो. दीड-दोन तासानंतर कंदील पुरता विझवला की नाही अशा काहीशा संभ्रमात मी जागा झालो. बघतो तो शेजारी विठ्ठल नाही अन् त्याची वळकटीही नाही मी घाबरलो. त्याला शोध-शोध शोधले आणि जिना उतरून खाली आलो. काय करू काय नाही असे झाले! तारबाजाराला फेरी मारली आणि परत झोपी गेलो. सकाळी बघतो तो विठ्ठल आणि त्याची वळकटी दोन्ही माझ्या शेजारी! हे गौडबंगाल काय? हे त्याला न विचारता न विचारता मी शोधून काढायचे ठरविले!

दुसऱ्या दिवसाची रात्र. दहाच्या सुमाराला दोघेही झोपलो. विठ्ठल घोरायला लागला. मी जागाच होतो, झोपेचे सोंग घेऊन! तास-दीड तासात विठ्ठल उठून बसला. आपली वळकटी त्याने गुंडाळली. खांद्यावर घेतली, आणि शांतपणे जिना उतरून बाहेर! काटोलच्या संपूर्ण तारबाजाराला चक्कर घालून विठ्ठल सरस्वती कुंडाकडे जायला निघाला. योग्य ते अंतर ठेवून मी त्याच्या मागावरच होतो. कुंडापर्यंत तो गेला नाही. मधूनच परतला आणि आल्यावाटेने परत जिना चढून, वळकटी अंथरून झोपून गेला. ते त्याचे चालणे झोपेतलेच असावे. कारण मी माझ्या वळकटीवर नाही, हे त्याच्या लक्षातच आले नाही. असे तीन-चार दिवस गेले. विठ्ठलचा झोपेत चालण्याचा नियम चुकला नाही आणि मी देखील त्याचा पाठपुरावा करता चुकलो नाही. जागरण घडत होते, ते मला! त्याच्या झोपेत खंड पडला नाही!

पाच दिवस गेले. रात्री विठ्ठल नेमाने उठला आणि सरस्वती कुंडाकडे जरा पुढे गेला. मला राहवले नाही. मी धावत जाऊन त्याचा हात पकडला. तसा तो जागा झाला. भीतीने ओरडला आणि रडू लागला.

'विठ्ठल रडू नकोस. तुझा हा रोजचाच नियम आहे, आज थोडा पुढे गेलास म्हणून तुला अडवलं! भीती वाटली मला की तू कुंडात उडीबिडी घेशील की काय ! चल परत! आता उद्यापासून माझ्याबरोबर आखाड्यात चल. सगळं पळून जाईल.'

विठ्ठल मनापासून रडू लागला. माझ्या खांद्यावर मान ठेवून, मला बिलगून काकुळतीने म्हणाला, 'बापू, तू वॉर्डनसरांना सांगू नकोस. ते मला छडीने फोडून काढतील.'

'अरे, या सरस्वती कुंडाची शपथ, मी काही सांगणार नाही. कुणालाही सांगणार नाही. अन् तुझ्यावरही पाळी यायची नाही. कारण उद्यापासून आपण तलावमारुतीचे दर्शन घेऊन मस्त दंडबैठका मारू. फुटबॉल खेळू. रात्री झोपलो की वॉर्डनने छडी मारली तरी आपल्याला जाग येणार नाही! चलो दोस्त! परत जाऊन झोप काढू. माझा एक हात मी तुझ्या छातीवर ठेवीन. म्हणजे तुला उठवायची कोणाची छातीच नाही!'

असे हे प्रसंग! केव्हाचे?

मी तुमच्याएवढा होतो, तेव्हाचे!

## शब्दार्थ

**आचवणे** दुरावणे **आपसुक** आपोआप **नीज** झोप **नीजणे** झोपणे **दिवळगिऱ्या** भिंतीला टांगावयाचे छोटे दिवे / चिमण्या **दिवेलागण** संध्याकाळ **उकिरडा** केरकचरा टाकण्याची जागा **आखाडा** कुस्ती खेळण्याची जागा **दंगल** कुस्ती **प्रिफेक्ट** प्रमुख **झेंगट** त्रास **सालस** चांगला **बुजरा** लाजाळू **वळकटी** अंथरूण

## टीप

**जर्मन कंदील** त्योवळी जर्मनीत तयार झालेली कोणतीही वस्तू अत्यंत टिकाऊ अशी अनुभवी समजूत होती.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) सत्तर वर्षांपूर्वी खेडेगावात कोणत्या अवस्था नव्हत्या असे लेखक म्हणतात?

(2) घराबाहेरच्या जीवनाशी एकदम संबंध आल्यामुळे लेखकाला कशाचा उपयोग झाला?

(3) साठ वर्षांपूर्वी खेड्यात किंवा शहरात कोणत्या सोयी नव्हत्या?

(4) लेखक काटोलला कोणत्या वर्गात शिकायला आले होते?

(5) शाळेच्या होस्टेलचे वॉर्डन कोण होते?

(6) होस्टेलात लेखकावर कोणती जवाबदारी देण्यात आली होती?

(7) लेखकाच्या शेजारी कोण झोपत असे? त्याला कोणता आजार होता?

**2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) लेखक व विठ्ठल यांच्या मैत्रीचे वर्णन करा.

(2) आई-वडिलांनी लेखकाचे संगोपन कसे केले त्याचे वर्णन करा.

(3) लेखकाच्या हातून कंदिलाची काच फुटली तेव्हा त्यांच्या वडिलांनी काय सांगितले?

(4) लेखक आईवर का तडकले? ते सांगा.

(5) लेखकाने फुटलेल्या कंदिलाच्या काचा जपून का ठेवल्या?

(6) पाठाच्या आधारे या कंदिलाची पुन्हा एक किमया समजवा.

**3. खालील वाक्य कोण-कोणास सांगतो ते लिहा :**

(1) ते म्हणाले, ''हातबीत कापला नाही ना?''

(2) ''मी वाचत असतानाच तू दिवा का विझवलास?''

(3) ''पण ज्यांच जळे त्यास कळे, हे त्याहून खंर आहे की, नाही बोल.''

(4) ''विठ्ठल, रडू नकोस. तुझा हा रोजचाच नियम आहे.''

(5) ''तू उद्यापासून होस्टेलवर रहायला ये!''

**4. संदर्भसह स्पष्टीकरण करा :**

(1) 'अरे, या सरस्वती कुंडाची शपथ, मी काही सांगणार नाही.'

(2) 'असे हे प्रसंग! केव्हाचे? मी तुमच्या एवढा होतो, तेव्हाचे!'

(3) 'अरे, तेल जळे पिडा टळे हे तुझं अगदी खरे आहे.'

**5. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) लेखक कंदिलाच्या काचेला काय म्हणत होते?

(A) पायली (B) काच (C) अधली (D) शेर

(2) अस्सल जर्मन कंदील कोठून आनला होता?

(A) सौंसर (B) नाशिक (C) पुणे (D) मुंबई

(3) लेखक कोणत्या भाषेतील गोष्टीचे पुस्तक वाचत होता?

(A) जर्मन (B) अरबी (C) चिनी (D) हिन्दी

(4) फाटोलच्या शाळेचे हेडमास्तर कोण होते?

(A) एन. डी. कोतवालीवाले (B) श्री देशपांडे

(C) श्री अस्वले (D) श्री ना. रा. बोपर्डीकर

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- तुम्ही परगावी शिक्षणानिमित्त राहात आहात, अशी कल्पना करून आईला पत्र लिहा.
- जवळच्या छात्रालयाची भेट द्या. व छात्रालयाचे जीवन समजून द्या.

## भाषासज्जता

लेखक वामन चोरघडे लिखित 'कंदिलाच्या प्रकाशात' हा पाठ वाचताना वाचकाच्या मनात साठ-सत्तर वर्षांपूर्वी आपल्या भारत देशाची परिस्थिती देशाची प्रगती व आजच्या विद्यार्थ्यास मिळणाऱ्या सुख-सुविधा यांच्यातील फरक साध्या व सरळ भाषेत त्यांनी वाचकांसमोर मांडलेला आहे. कंदिल व चिमणी यांच्या प्रकाशात अभ्यास करणे व तेल जास्त वाया जावू नये म्हणून आई लवकरच कंदिल विझवीते तो प्रसंग व त्यातून लेखकाने वापरलेल्या म्हणी.

'अरे, तेल जळे पिडा टळे ' हे तुंझं अगदी खंर आहे 'पण ज्याचं जळे त्यास कळे, हे त्याहून खंर आहे की ' या वाक्यांचा लेखकाच्या जीवनावर मोठा परिणाम झाला. व आई-वडिलांनी त्यांना वर्तणुकीद्वारा संस्काराचे धडे दिले भाषण किंवा उपदेश करण्यापेक्षा आपल्या वर्तनातूनच मुलावर चांगले संस्कार होतील ही त्यांच्या आई वडिलांची विचारसरणी होती. अनुकरण करून लेखकांवर चांगले संस्कार झाले. याचे अनुकरण आपण केले पाहिजे.

●

# 7 ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे

**– ना. धो. महानोर**

(जन्म : 1943)

नामदेव धोंडो महानोर हे स्वत: शेतकरी आहेत प्रेम आणि निसर्ग यांच्या एकरूपतेची भावचित्रे त्यांच्या कवितेत रेखाटलेली आढळतात. त्यांचे 'रानातल्या कविता', 'अजिंठा', 'तिची कहाणी', 'पळसखेडची गाणी', 'पावसाळी कविता', 'प्रार्थना–दयाघना', 'वही', 'पक्ष्यांचे लक्ष येथे' हे ग्रंथ व 'जैत रे जैत' सारख्या चित्रपटासाठी लिहिलेली गीते खूपच गाजली.

त्यांच्या 'पानझड' या काव्यसंग्रहाला तर साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला आहे. शेतात रबणाऱ्या या कवीने महाराष्ट्राची अस्मिता जोपासणारे काव्य निर्माण केले.

प्रस्तुत काव्यातून कवीने शेती व शेतकऱ्याचे जीवन या नात्याचे सुंदर वर्णन केलेले आहे. ग्रामीण भागात शेतीवर उपजीविका करणाऱ्या शेतकऱ्यासाठी त्याची काळी आई व पाऊस याचे महत्त्व किती आहे? हे या काव्यातून कवीने सूचित केलेले आहे. शेतात डोलणाऱ्या कणसामध्ये भरलेले पांढरेशुभ्र ज्वारीचे दाणे पाहून कवीला खूप आनंद होतो आणि हे ज्वारीचे दाणे म्हणजे कणसात भरलेले चांदणेच असावे अशी ते कल्पना करतात.

---

ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि ह्या मातीतुनी चैतन्य गावे
कोणती पुण्ये अशी येती फळाला
जोंधळ्याला चांदणे लखडून जावे

ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि माझ्या पापणीला पूर यावे
पाहता ऋतुगंध कांती सांडलेली
पाखरांशी खेळ मी मांडून गावे

गुंतलेले प्राण ह्या रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदुनी बेहोष होता
शब्दगंधे, तू मला बाहूंत घ्यावे!

### शब्दार्थ

**नभ** आकाश **भूई** जमीन **चैतन्य** जोम, उत्साह, जिवंतपणा **जोंधळे** ज्वारी **कांती** तेज **लखडणे** चिकटणे, **ऋतुगंध** विविध मोसमातील पिकांचा सुवास

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) नभाने भूईला कोणते दान द्यावे असे कवी म्हणतो?

(2) कविचे प्राण कशात गुंतलेले आहेत?

(3) नभाने दिलेल्या दानामुळे कोणते बदल होणार आहेत?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) ''कोणती पुण्ये अशी येती फळाला जोंधळयाला चांदणे लखडून जावे'' या ओळीचा भावार्थ स्पष्ट करा.

(2) कवी आनंदाने बेहोष का होतो?

**3. खालील काव्यपंक्तींचा आशय स्पष्ट करा :**

(1) ''पाहता ऋतुगंध कांती सांडलेली पाखरांशी खेळ मी मांडून गावे.''

(2) ''कोणती पुण्ये अशी येती फळाला जोंधळयाला चांदणे लखडून जावे.''

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- विद्यार्थ्यांनी जवळपासचा परिसर पाहून पावसाळ्यात उगवणाऱ्या वनस्पतींचे निरीक्षण करावे. व त्यांच्या नावाची यादी बनवावी.

### शिक्षक-प्रवृत्ती

- पावसाळयात विद्यार्थ्यांसाठी वर्षासहलीचे (वनभोजनाचे) आयोजन करावे.

### भाषासज्जता

कवी ना. धो. महानोर 'ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे' या काव्यात साधी, सरळ व रसाळा भाषाशैलीचा उपयोग केलेला असून आकाश व पृथ्वी यांचे संबंध सरळ भाषेतून वाचकापर्यंत पोहचवले आहेत. भारता सारख्या शेतीप्रधान देशासाठी येथील शेतकऱ्याच्या जीवनासाठी पावसाचे महत्त्व व त्यामुळे शेतात येणारे उत्पन्न याचे वर्णन साध्या भाषेत केलेले आहे.

शेतकऱ्याच्या आयुष्यात असणारे पावसाचे महत्त्व या कवितेत किती सुंदर पद्धतीने आलेले आहे हे पाहा. हे एखाद्या जातिवंत शेतकऱ्यालाच समजू शकते. वेळेवर पाऊस आल्यामुळे शेतकऱ्याची सगळी मेहनत कामाला आली असे त्याला वाटते आणि म्हणून त्याने आभाळाचे, त्यातून पडणाऱ्या पावसाचे आभार मानले आहेत. आकाशाच्या या दानामुळे, पावसामुळे सुखावलेला शेतकरी कृतज्ञ भाव व्यक्त करतो. कारण या बहरलेल्या रानातच त्याचे प्राण गुंतलेले आहेत म्हणून आभाळाच्या या कृपाप्रसादाने त्याचे डोळे भरून येतात. आणि त्याच्या आनंदातून कविता जन्माला येते असे जमिनीशी त्याच्या शब्दांचे नाते जुळलेले आहे.

●

# 8 बाबू पैलवानाचे उपोषण

**– द. मा. मिरासदार**

बाबू पैलवानाचे उपोषण ही विनोदी व ग्रामीण कथा आहे. शहरात एका शिक्षकावर अन्याय झाला तर त्या शिक्षकाने आपल्याला न्याय मिळावा म्हणून उपोषण केले व दोन – तीन दिवसात त्याचे उपोषण मोसंबीच्या रसाने सोडविण्यात आले याचा ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या बाबू पैलवानाच्या मनावर प्रभाव पडला. व त्यानेही उपोषण करण्याचे ठरविले. त्याच्या उपोषणाची बातमी गावात पसरल्यानंतर गावकऱ्यांनी त्याला खाण्यासाठी विविध खाद्यपदार्थ आणले व त्याच्यातून जो विनोद निर्माण झाला त्याची रंगत या पाठात दिसते. ग्रामीण भागाच्या वातावरणाचा वेगळेपणा आणि त्यातील माणसांच्या स्वभावातील विविध बारकावे लेखकाने कसे दाखवले आहेत ते पाहा.

---

बाबू पैलवान उद्यापासून उपोषणाला बसणार आहे, ही बातमी वाऱ्याच्या वेगाने पसरली आणि संबंध भोकरवाडीत फार मोठी खळबळ उडाली.

भोकरवाडीत खळबळ उडायला तसे फार मोठे कारण लागायचे नाही. मागे गोपाळ रेडे डोक्याला बँडेज बांधून कुणाच्या तरी मोटरसायकलीवर बसून गावात आला होता आणि मागच्या मागे उशी खाऊन पुन्हा जोरात आदळला होता, तेव्हाही गावात खळबळ माजली होती. खुद्द बाबू पैलवान एका फडात कुस्ती जिंकून कुणाच्या तरी खांद्यावर बसून गावात घुसला होता, त्या वेळीही अशीच खळबळ माजली होती. एकदा खाकी ड्रेसातील एक – दोघे पोलीस कसल्यातरी चौकशीसाठी गावात येऊन गेले होते. त्या वेळी सगळे गाव कुतूहलाने चावडीपाशी गोळा झाले होते. सारांश काय, भोकरवाडी जागी व्हायला अगदी लहानसहान गोष्टसुद्धा चालते. मग आज समजलेली गोष्ट तर फार मोठी होती. बाबू म्हणजे पैलवानगडी. दिवसभर चरणारा उमेदवारगडी. तो उपोषण करील, ही गोष्ट कुणाच्या स्वप्नातही येणे शक्य नव्हते. तो उद्यापासून उपोषणाला बसणार आहे, ही गोष्ट एकली आणि सगळे गाव खडबडून जागे झाले.

गणामास्तरला ही गोष्ट समजली तेव्हा तो जेवत होता. निम्मे जेवण झाले होते. ठरलेल्या एक – दीड भाकरीचा मुरगळा करून गणामास्तराने त्याचा एकच कुस्करा केला होता आणि गरमगरम आमटी कुस्कऱ्यात ओतली होती. आता तो कुस्करा कालवायचा आणि त्यावर ताव मारयचा, अशा बेतात तो होता. पहिला घास त्याने हातात घेतला... एवढ्यात बाहेरून खणखणीत सुरात हाक ऐकू आली.

''गणामास्तरऽऽ ओऽ गणामास्तर...''

गणामास्तराने आवाज ओळखला. तरीपण त्याने उगीचच विचारले, ''कोन हाय ?''

गणामास्तराची बायको त्याच्या समोरच फतकल मारून बसली होती. नवरा नीट जेवतो की नाही, हे अगदी काटेकोर पतिव्रताधर्माने ती पाहत होती. गणामास्तर दरवाजाला पाठमोरा होता. पण तिचे तोंड दरवाजाकडेच होते. ती एकदम तोंड वाकडे करून बोलली,

''दुसरे कोन ? त्योच त्यो मुडदा...''

''आगं, पण कोन ?''

''दुसरं कोन ?... जेवायच्या टायमाला नेमकं धसकटावानी येनार आन् कुणीतरी मेलंय, काईतरी झालंय... आसलं येडवाकडं सांगून जानार. जेवूबी देनार न्हाई. त्योच भाड्या!''

बायको फारच चिडल्यासारखी दिसली तेव्हा गणामास्तर म्हणाला,

''म्हंजे... नाना चेंगट म्हनतीस काय ?''

''दुसरं कोन ? त्योच मुडदा. एन सांजच्या वक्ताला वाईटवकत् काईतरी घिऊन आला असंल.''

''आसं ?''

''मग सांगती काय ?... शंभर हिश्श्यानी सांगते मी. कुनीतरी गचकलं आन् बोलवायला आला. तुमी आधी जेवून घ्या बगू.''

गणामास्तरालाही तिचे बोलणे एकदम पटले. नाना चेंगटाला अजिबात डोके नव्हते. एकदम भस्सदिशी घरात येऊन कसलीतरी बातमी सांगयची त्याला सवयच होती. कुणी तरी मेले असेल तर त्याचा उत्साह अवर्णनीय असे. भराभर प्रत्येकाच्या घरात घुसून तो

तत्परतेने ती वार्ता सांगत असे आणि एकेकाला जेवणाच्या ताटावरून उठवत असे. गणामास्तराला ही गोष्ट काही नवीन नव्हती. त्यामुळे आज दुपारी एक दोनचाच चेंगट हाका मारीत आला, त्या अर्थी गावात कुणीतरी गचकले खास. असो आपण आपले जेवण करून घ्यावे, मग चौकशा कराव्यात.

''तू त्याला भाईर बशीव – ''

असे म्हणून गणामास्तराने भराभरा जेवण उरकले आणि धोतराला हात पुशीत तो बाहेर आला. नाना चेंगट न बोलता कान पाडून गरीब कुत्र्यागत बाहेर दाराशी बसून राहिला होता. याचे कारण मधल्या काळात गणामास्तराची बायको बाहेर येऊन जळजळीत नजरेने त्याच्याकडे बघून गेली होती. त्याने 'वैनी –' असे म्हणून बोलण्याचा प्रयत्न केला होता. पण गणामास्तराची बायको एकदम कडाडली होती –

''कुनी मेलंबिलं आसलं तर खबर्दार सांगून ठिवते.''

''अहो पन्–''

''खबर्दार म्हंते ना ? जेवन चाललंय. दातखीळ बसवायची आन् गुमान गप व्हायचं तंवर.''

''न्हाई, मेलं न्हाई –'' चेंगटाने खुलासा करण्याचा प्रयत्न केला.

''मेलं नसलं तर मराया लागलं असंल. जीव घाबरा झाला असंल. जे काय आसंल, ते जेवान झाल्यावर. ऊ... दोडा...''

इतके बोलून गणामास्तराची बायको झटक्यात आत निघून गेली होती. नाना मग घटकाभर गप्पच होता. गणामास्तर बाहेर आल्यावर मात्र त्याला एकदम हायसे वाटले. तोंड हसरे करून तो म्हणाला, ''गणामास्तर, तुला कळलं का ?''

खाली सतरंजीवर बसत आणि तिथल्या अडकित्त्याने सुपारी फोडीत गणामास्तराने एक जबरदस्त ढेकर दिली.

''कोन खलास झालं ?''

''खलास ? न्हाई बा.''

''तू हा टैमाला बोंबलत आलास, म्हंजे कुनीतरी गेलं –''

''ह्यँ, ह्यँ ...'' नाना ओशाळून हसला. ''त्याला अजून अवकाश हाय्. केऱ्या गवळ्याली म्हातारी आलीय म्हणा त्या रंगाला. पण उद्याचा दिस घील. मी आजच बगून आलो. झालंच तर आपलं –''

''मग आता का आला हैस ?''

नानाला एकदम आठवण झाली. अरेच्या ! मुख्य राहिलाच की बाजूला या घोळात.

''बाबू आपला –''

''त्याला काय झालं ?'' गणामास्तर एकदम दचकला. हातातली तोडलेली विड्याच्या पानाची देठे आपोआपच खाली गळून पडली.

''लै मज्जा झाली.''

''काय झालं ?''

''मघाशी मी बाबूच्या घरी गेलतो का – तर पठ्ठा जेवनखान करून बसलेला. तोंड कसनुसं. म्या म्हनलं, का रं बाबू ? तर म्हनाला – काई न्हाई, उगीच. मी म्हनलं, तरी पण ? तर म्हनला, काई न्हाई म्हणून सांगितलं ना एकदा. मी पुन्यांदा इचारलं, तरी पण ?''

गणामास्तर भडकला.

''आता सांग की लवकर. किती पाघूळ लावाय लागला हैस –''

चिडलेल्या गणामास्तरने हातातला अडकित्ता आपल्या दिशेने उगारलेला पाहून चेंगटाने एकदम खालती घेतले. तोंड चिंताक्रांत करून बोलला.

''बाबू उद्यापास्नं ऊपोशन करनार हाय.''

''आं ! कोन म्हनतं ?''

''त्यो बोलला.''

''पन काय कारन हाय ?''

''काय गावात कुस्त्याचा फड करायचा म्हनला. कुनी आपरेशन करायला तैयार न्हई. जे – ते न्हाईच म्हणतंय...''

''आपरेनश न्हवं लेका, काप्रेशन.''

''ते काय असंल ते! '' म्हनला, मी उपोशनच करणार. काय वाट्टेल ते हूंदे. आता मी ऐकणार न्हाई. मी लई मिनत्या केल्या. समजावून सांगितलं. निदान दोन टैम जेऊन उपोशन कर म्हनलं, तर माज्यावरच भडकला. एकदम मांडीवर गुद्दा हाणला.

''कुठाय बगू ? गणामास्तराने साशंक मुद्रेने विचारले. कारण बाबूचा गुद्दा चेंगटाच्या मांडीवर खरोखरच बसला असता, तर त्या दिवशी तरी चेंगट घराबाहेर पडणे शक्य नव्हते.''

''मी चुकीवला. गुद्दा एकदम खाली भुईवरच बसला. भुई काळवळली. मी तसाच धूम –''

नाना चेंगटाने सांगितलेली बातमी फार महत्त्वाची होती. बाबू पैलवान उपोषण करणार, ही वार्ता सगळ्या गावाला संकटात टाकणारी होती. एक तर भरल्या पोटी एरवीही बाबू गावातून दंगा करीत फिरत असे. कुणाशीही मस्ती करीत असे. उपाशी पोटी बाबू म्हणजे तर फारच हिंस्त्र प्रकरण. गडी भलताच खवळेल! समोर येणाऱ्याचं काही खरं नाही. किंबहुना, त्याच्या घरासमोरून जाणेही धोक्याचे. आजच्या आज त्याला भेटले पाहिजे. या उपोषणापासून त्याला परावृत केले पाहिजे.

घाईघाईने उठून कपडे घालीत आणि आत जाऊन पिशवीत काहीतरी कोंबीत गणामास्तर गडबडीने म्हणाला, ''चल... चल... काय म्हणतोय बगू या तर खरं.''

दोघेही बाबूच्या ओसरीवर दाखल झाले तेव्हा बाबू मांडी घालून, डोळे ताठ ठेवून एखाद्या योगिपुरुषाच्या गांभीर्याने बसलेला दिसला. त्याची ती मुद्रा आणि अवतार पाहून कुणालाही वाटले असते की, बाबूने उपोषणाला प्रारंभ केलेलाच आहे. गणामास्तराचीही तशीच कल्पना झाली. पण आजूबाजूला शेंगांची बरीच फोलपटे पडली होती. केळ्याच्या सालीही डझनभर दिसल्या. बाबूचे तोंडही अजून हलत होतं. शिवाय उद्यापासून बाबूचे उपोषण सुरू होणार, हे नाना बोलल्याचे त्याला पक्के आठवत होते. त्यावरून उपोषणपूर्व अखेरचे खाणे चालले असावे, असा त्याने तर्क केला.

गणामास्तराने बाबूकडे पाहिले. गंभीर आवाजात विचारले, ''बाबू, हा चेंगट काय म्हणतोय, खरं का ?''

बाबू एकदम चेंदटाकडे वळला, तरी चेंगट वेळप्रसंग ओळखून गणामास्तरचा पाठीमागे अंतर राखून सावधपणे बसला होता. वेळ आली तर दरवाजा गाठण्यासाठी आपल्याला किती सेकंदं लागतील याचाही हिशेब त्याने मनात मांडला होता. तरीपण बाबूचा त्याच्याकडे नुसता मोहरा वळल्याबरोबर त्याची बोबडी वळली.

''काय रे चेंगूट, ल्येका काय सांगितलंस ?''

''कुंठ... काई न्हाई.'' चेंगट घाबरला.

''मी उपोशनाला बसनार, म्हणून सांगितलंस का ?''

''व्हय, सांगितलं की.''

''पर आज नव्हं, उद्यापास्नं – हे बोललास का ? हे नसशील बोललास ?''

''तर! समदं धडाधडा बोललो.''

''धडाधडा कशाला बोललास ? हळूहळू सांगायचं एवढी आक्कल आसू ने तुला ?''

बाबूने हात उगारला. तेव्हा चेंगटाने पुन्हा एकदा दरवाजाकडे पाहिले. एक पाऊल त्याने ओसरीच्या खाली टाकलेही. तेवढ्यात गणामास्तर मधे पडला.

''बाबू, तुझं उपोशन उद्यापास्नं सुरू हाय ना ?''

''हा –'' बाबू गुरगुरला, ''खबरदार जर कुनी उपोशन सोडा म्हनायला आला असशील तर! अजाबात सोडनार न्हाई, सांगून ठिवतो.''

''पन उपोशन कसं ? प्राणांतिक का लिमिटेड ?''

बाबू गोंधळला. मग स्वत:ला सावरून म्हणाला.

''पयल्यांदा दोन – चार दिवसांचं प्राणांतिक करणार. काई उपयोग झाला, तर बरं. न्हाईतर मग लिमिटेड करनार.''

खरे म्हणजे बाबूला गणामास्तराचा हा प्रश्न नीट समजलेला नव्हता. त्याने हा प्रकार तालुक्याच्या गावी नुकताच पाहिला होता. तेथील एका गुरुजींनी आपल्यावरील अन्याय दूर व्हावा, म्हणून प्राणांतिक उपोषण सुरू केले होते. ते बघायला योगायोगाने बाबू चार लोकांबरोबर गेला होता. गुरुजींची गुटगुटीत, तेज:पुंज मुद्रा बघून बाबूचे उपोषण या प्रकाराबद्‌ल फार अनुकूल मत झाले होते. आपल्या गावी आपणही हा प्रयोग करून पाहावा, असे त्याच्या मनाने घेतले होते. तीन – चार दिवसांच्या आतच गुरूजींचे हे प्राणांतिक उपोषण संपले होते. मुसंब्याचा रस पिऊन त्यानी ते संपविले होते. त्यामुळे त्यांची मुद्रा जास्तच टवटवीत बनली होती, हेही बाबूच्या कानावर आले होते. या भानगडीत प्राणांतिक म्हणजे नेमके काय अन् लिमिटेड म्हंजे कुठपर्यंत याचा खुलासा विचारण्याचे राहूनच गेले होते. गणामास्तराने या बाबतीत आपले अज्ञान बाहेर काढणे, हे त्याला आवडण्यासारखे नव्हते. त्यापेक्षा असे चाणाक्षपणाने उत्तर देणं केव्हाही शहाणपणाचे.

गणामास्तराने मग पिशवीतून भाजलेली पाच–सहा कणसे बाहेर काढली. बाबूसमोर ठेवली. बाबूने एक कणीस हातात घेऊन त्याचा वास घेतला. मग साशंक मुद्रेने गणामास्तरकडे बघितले. कणीस खाली ठेवले.

''हे कशापाई आनलंस ?''

''उद्यापास्नं तुजं उपोशन सुरू ना ?''

''बरं, मग ?''

''मग आज ही कनसं खायला काय हरकत ? आजच मळ्यातनं आनली. म्हनलं, पुन्हा तुला खायला मिळायची न्हाईत; म्हणून आणली. हं, घे. न्हायली म्हणजे न्हाऊनच जातील.''

बाबूने पुन्हा एकदा कणसाकडे पाहिले. गणामास्तरकडे नीट निरखून पाहिले. त्याची गंभीर मुद्रा पाहून बाबूच्या मनातील शंका दूर झाली.

''हां, आज तसा मी मोकळा हाय –''

असे म्हणून त्याने पहिले कणीस उचलले. भराभर खाऊन टाकले. मग एकामागोमाग बाकीची कणसेही त्याने उचलली. एकामागोमाग एक रिकामी केली. एक बुडूख चेंगटाच्या दिशेने फेकून तो ओरडला, ''बघ, गणामास्तराची माया. न्हाईतर तू ! काईतरी आनलंस का ? निस्तं हात हालवीत बोंबलत हिंडत आसतूस गावातनं... आं ? जा, काई लाज वाटत आसलं तर काईतरी घिऊन ये. ऊठ हितनं.''

आणि बाबूने अशा नजरेने नानाकडे पाहिजे की चेंगट उठलाच. एका क्षणात दरवाजा बाहेर गडप झाला. एक मोठी ठेकर देत बाबू काष्टी आवाजात म्हणाला, ''लई लुसलुशीत कनसं हुती रं गणामास्तर. कशी गेली पोटात, कळलंसुदिक न्हाई. उद्यापास्नं मातुर समदं बंद हां. उद्या पुन्हा आनलीस तर तुझी–माझी तकरार हुईल.''

''न्हाई आनत बाबा.''

''माजं पोटंच भरलं.''

एवढ्यात रामा खरात आत आला. ओसरीवर बसून घाईघाईने त्याने प्रथम बिडी ओढली. मग बाबूकडे न्याहाळून पाहत त्यानं विचारलं.

''काय एकलं ते खरं का ?''

''काय ऐकलांस?''

''तू उपोशन करनार हैस म्हनं ?''

''उद्यापास्नं.''

''आत्ता माज्या जिवात जीव आला.''

''का बरं ?''

''अरे, चिलाच्या वाडीस्नं मी शेंदाडं आनली आजच. म्हनलं, तुलाबी द्यावीत दोन... पन आता म्हणलं, खानार कसा ?''

''कुठाहैत शेंदाडं ?'' बाबूने उत्सुकतेने चौकशी केली.

''ही काय –''

रामा खराताने धोतराच्या घोळातून दोन पिकलेली पिवळीजर्द शेंदाडं त्याच्यासमोर ठेवली. ठेवल्या – ठेवल्या पिकलेल्या शेंदाडाचा मस्त वास बाबूच्या नाकापर्यंत आला. बाबूने शेंदाड उचललं. ''नुस्ता नमुना बगतो. आता उपोशन म्हनल्यावर शेंदाड काय आन् कलिंगड काय –'' असे म्हणत ते फस्त केले. मग दुसरेही उचलले.

''घ्या की रं तुमी. काय मी एकल्यानंच समदं खायचा मक्ता घेतलाय का ?'' असे म्हणून त्याने गणामास्तर आणि रामा खरात यांच्या तोंडाकडे पाहिलं, पण दोघांनीही मान नकारार्थी हलवली. तेव्हा तेही शेंदाड खाण्यावाचून त्याला मार्गच उरला नाही.

''आता मात्र बास गड्या हां... आता अमृत आनून दिलं तरी घेनार न्हाई. उपोशन म्हनायचं आन् खान्यावर दणका ठिवायचा, हे बरं तरी दिसतं का ?'' असे म्हणून बाबू पैलवानाने आपली मुद्रा पुन्हा धीरगंभीर केली. तो स्वस्थ बसून राहिला. त्यानंतर गणामास्तर आणि रामा खरात यांनी बाबूने उपोषणाचा बेत सोडून द्यावा म्हणून त्याची खूप मनधरणी केली. पण बाबू बधला नाही. जोपर्यंत गावचे लोक कुस्तीचा फड भरवण्यासाठी सहकार्य देणार नाहीत, तोपर्यंत आपला उपोषणाचा बेत कायमचा राहणार, हे त्याने अत्यंत गांभीर्याने जाहीर केले.

एवढ्यात शेजारची भागू गवळण दुधाची चरवी घेऊन आत आली. आल्या–आल्या तिने चरवी बाबूपुढे ठेवली.

''हं, बाबूराव, हाना –''

बाबूने मोठ्या निश्चयी मुद्रेने मान हलवली.

''छ्या!''

''का रं बाबा ?''

''उद्यापास्नं माजं उपोशन हाय.''

''मग आज घे की.''

''तसं बरं दिसत न्हाई.''

''आरं, रोज घेतोस बाबा आन् आज तुला काय झालं एकदम ? रागावलास का ?''

''तसं न्हवं भागूमावशी –''

''मग कसं ?''

''लोक काय म्हनतील ?''

''लोकांचा बशीव मुडदा. आरं, जानी म्हशीचं दूध हाय बाबा. इकता येत न्हाई, म्हणून तर तुला देते ना ?... तू न्हाई पेलासतर ऐन टैमाला आता कुनाला देऊ ?'' भागू गवळणीचा सवाल बिनतोड होता. प्रत्येक गवळ्याकडे एक जानी म्हैस असते.

तिचे दूध विकायचे नसते आणि त्यात पाणीही घालायचे नसते. इतके दिवस बाबू ती चरवी रिकामी करीत होता. आता तो नाही म्हटल्यावर ऐन वेळेला हे दूध तिने द्यायचे तरी कुणाला ? तिचे गरिबाचे का उगीच नुकसान ? दूध वाया घालवायचे म्हणजे काय? बाबूने क्षणभर असा विचार केला. मग एकदम त्याने चरवी उचलली आणि तोंडाला लावली. पाच मिनिटांत रिकामी करूनच खाली ठेवली. मग ओठांच्या कडेला साचलेला फेस त्याने निःस्पृहपणे पुसून काढला. गणामास्तराकडे पाहिले.

''काय करनार ? त्या मावलीचं नुकसान होत हुतं –''

''खरं हाय – गणामास्तराने मान होकारार्थी हलवली.''

''पेलास ? झकास झालं. दूध कारणी लागलं.'' रामा बिडी फुंकत बोलला. त्यानंतर मात्र बाबूने काही खाल्ले नाही. फक्त शिवा जमदाडे कुठल्यातरी जत्रेहून भेंडबत्तासे, चिरमुरे घेऊन आला होता आणि तो प्रसाद घरी नेण्याचा त्याचा विचार होता. जाता–जाता सहज त्याने बाबूच्या घरात डोकावून पाहिले, पण प्रसाद म्हटल्यावर बाबू ऐकेचना. निम्मी पिशवी त्याने तिथेच रिकामी केली. त्यानंतर

गोपाळ रेडे ताजी पेंड घेऊन घरी चालाला होता. शेंगदाण्याची ताजी पेंड फारच खुसखुशीत लागते, हे सगळ्यांनाच ठाऊक होते. त्यामुळे बाबूने थोडी पेंडही चाखून बघितली. अशा चार–दोन गोष्टी सोडल्या तर बाबूने दुसरं काही खाल्लं नाही. उपोषण करण्याचा त्याचा निर्धार दृढ होत गेला.

बराच वेळ गेला. आता सगळी मंडळी उठणार तेवढ्यात नाना चेंगट घाईघाईने आत आला. आल्या–आल्या त्याने दोन वाळलेली मुसुंबी जमिनीवर ठेवली. त्यातले एक सोलून देत तो म्हणाला,

''हं.... घ्या बाबूराव –''

बाबू रागावला. जळजळीत दृष्टीने त्याने नानाकडे पाहिले.

''हे काय रं चेंगट्या? मुसुंबी ? अजून उपोशनाचा पत्ता न्हाई आन् एवढ्यात मुसुंबी ?''

गणामास्तर समजुतीच्या स्वरात म्हणाला.

''आरं खुळ्या, उपोशन सोडायच्या टैमला मुसुंबी आनत्यात; तू आधीच देतोस व्हय ? काई लाजबीज ?''

''मुद्दाम आनलीत.''

''आं ?''

''मुंडळी समदी फड भरवायला कबूल हैत. मी तिकडनंच आलोय ना ? त्यांनी माझ्याबरोबर निरूप पन धाडलाय. तवा ही मुसुंबी हाना आन् सोडा उपोशन.''

अखेर बाबूचे म्हणणे गावकऱ्यांनी ऐकले होते. ते कुस्त्यांचा फड भरवायला कबूल झाले होते. म्हणजे आपल्यावरील अन्याय दूर झाला आहे तर! ... मग मोसंबी खायला हरकत कसली ? ती खाऊनच उद्यापासून सुरू होणारे उपोषण सोडावे, हे बरे. मोसंब्याच्या फोडी गटागट तोंडात टाकीत बाबू खुशीत येऊन हसला. रस गिळून त्याने जीभ पुसली. मग बायकोला हाक मारून तो म्हणाला.''

''अगं, आता उपोशन न्हाई बरं का. ते म्हायेरचे आनलेले पेढे आन भाईर. आता खायला हरकत न्हाई. जेवायचं हूस्तंवर काय तरी तोंडात टाकायला हुईल.''

## शब्दार्थ

**चावडी** पूर्वी न्याय देण्याची जागा **उपोषण** उपवास, उदासीन **गचकणे** मृत्यू पावणे **साशंक** संशयी, खात्री नसणारा **निःस्पृह** विरक्त

## वाक्प्रचार

**बोबडी वळणे** घाबरून जाणे **मोहरा वळणे** तोंड वळणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) बाबू पैलवान उद्यापासून काय करणार होता ?

(2) बाबू पैलवानाच्या गावाचे नाव काय ?

(3) या पाठतील मास्तराचे नाव काय आहे ?

(4) नाना चेंगट नेहमी कसली बातमी सांगत होता ?

(5) गणामास्तराने बाबूला उपोषणा विषयी काय विचारले ?

**2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन–तीन वाक्यात लिहा :**

(1) बाबू पैलवानाच्या उपोषणाच्या बातमीचा गावात काय परिणाम झाला ते सांगा.

(2) गणामास्तरचे स्वभावचित्र रेखाटा.

(3) गणामास्तरच्या बायकोच्या स्वभावातील तीन गुण उदाहरणासह सांगा.

(4) बाबू पैलवानाचे उपोषण कसे झाले व ते कोणी सोडवले त्याचे वर्णन करा.

(5) बाबू पैलवानार कोणाच्या उपोषणाचा प्रभाव पडला आहे ?

**3. खालील वाक्य कोण-कोणास सांगतो ते लिहा :**

(1) ''आपरेशन न्हवं लेका, काप्रेशन.''

(2) ''बाबू, तुझ उपोशन उद्यापासून सुरू हाय ना ?''

(3) ''कुठाहैत शेंदाडं ?'' बाबूने उत्सुकतेने चौकशी केली.

(4) ''तू न्हाई पेलातर ऐन टैमाला आता कुनाला देऊ ?''

(5) ''आरं खुळया उपोशन सोडायच्या टैमाला मुसुंबी आनत्यात, तू आधीच देतोस व्हय ? काई लाजबीज ?''

**4. खालील प्रश्नांची उत्तरे सहसंदर्भ स्पष्टीकरण लिहा.**

(1) ''आता सांग की लवकर किती पाघूळ लावाय लागला हैस.''

(2) ''काय रे चेंगटू, ल्येका काय सांगितलंस ?''

(3) ''आता मात्र बास गड्या हां... आता अमृत आनून दिल तरी घेनार न्हाई.''

(4) ''काय करनार ? त्या मावलीच नुकसान होत हुतं.''

**5. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) बाबू पैलवान उद्यापासून काय करणार आहे ?

(A) उपोषण (B) कुस्ती (C) गावी जाणार (D) शेतात जाणार

(2) गणामास्तरला ही गोष्ट समजली तेव्हा तो काय करत होता ?

(A) जेवत होता (B) झोपला होता (C) मंदिरात होता (D) उपोषण करित होता

(3) भागूमावशीने बाबू पैलवानासाठी काय आणले होते ?

(A) चहा (B) दूध (C) रस (D) दही

## विद्यार्थी-प्रवृत्ती

- विद्यार्थ्यांनी वाचनालयातून विनोदी कथा मिळवून वाचणे.
- विद्यार्थ्यांनी आपल्या जवळल्या ग्रामीण भागात जावून तेथील जीवन समजण्याचा प्रयत्न करावा.
- 'गांधीजीचे विचार गावाकडे चला' या विषयवार निबंध लिहा.

## विद्यार्थी-प्रवृत्ती

- विद्यार्थ्यांना ग्रामीण भागात घेवून जाण्यासाठी सहलीचे आयोजन करा.

## भाषासज्जता

ग्रामीण भाषेचे स्वत:चे एक सौंदर्य असते सगळया भाव-भावना व्यक्त करताना माणसांची किती रूपे या भाषेतून दिसतात ते पाहण्यासारखे आहे. ''दातखीळ बसवायची आन गुमान गप ऱ्हायचं तंवर'' असं करड्या आवाजात नाना चैंगटाला बोलणारी गणामास्तरांची पत्नी पाहिली की. आपल्या नवऱ्याला नीट जेवायाला देण्यासाठीची तियी धडपड कळते. ''लोकांचा बशीव मुडंदा'' असं ठसक्यात बोलणारी भागूमावशी किती प्रेमळ आहे हे तिच्या शिव्यांच्या पलीकडे जाऊनंच समजते. ''या टैमाला बोंबलत आलस या वाक्यातला ''टैम'' म्हणेज इंग्रजीतील 'Time' या शब्दांच ग्रामीण रूप आहे. 'लिमिटेड उपोषण' ही कल्पनाच किती गंमतीशीर आहे. तसेच. लै, पाघूळ, पुन्यांदा, हैस, कळलसुदिक इ. शब्दांचा वापर केल्यामुळे गावातील वातावरण उभे झाले आहे. अशा शब्दांचा पाठातून शोधून अभ्यास करा.

●

# 9 हुजूरपागा

– **सुमा करंदीकर**

सुप्रसिद्ध कवी गो.वि.करंदीकर (विंदा. करंदीकर) यांच्या पत्नी सुमा करंदीकर उत्तम लेखन करीत. 'रास' या त्यांच्या आत्म चरित्रात्मक आठवणींच्या पुस्तकातून हा पाठ संकलित केला आहे. सुमा करंदीकर यांनी त्यांच्या बाळपणापासून त्यांच्या करंदीकरांच्या बरोबर दीर्घकाळ व्यतीत केलेल्या सहजीवनाचे चित्रण यात केले आहे. या पाठात त्यांच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिलेला आहे.

हुजूरपागा नावाची शाळा ही मुलींची शाळा व त्या शाळेची शिस्त व वेगवेगळे विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचा स्वभाव त्यांची अध्यापनाची पकड तसेच छात्रालयात रहाणाऱ्या व घरून येणाऱ्या मुली यांच्या जीवनातील फरक व मुलींची शाळा असल्यामुळे होमसायन्स सारखे विषय खास सुरू करणे आणि शिक्षणा बरोबर जीवन मूल्य कुटुंबव्यवस्था यांचा सुद्धा धडा देणे हा शिक्षणाचा उद्देश असला पाहिजे असे या पाठातून सूचित केलेले आहे.

---

'हुजूरपागा' ही माझी शाळा. साठ वर्षापूर्वीची. त्या वेळी शाळेची ख्याती आणि नाव सर्वत्र दुमदुमत होते. प्रत्यक्ष पंडित नेहरूंनीसुद्धा इंदिरेला ह्या शाळेत घातले होते. हे बोर्डिंग स्कूल होते. आमच्यासारख्या घरी राहून येणाऱ्या विद्यार्थिनीही होत्या. हुजूरपागेत प्रवेश मिळणे फार कठीण होते व म्हणूनच फार मानाचेही. शाळेत प्रवेश देताना प्रथम इंग्रजी, गणित वगैरेची कडक परीक्षा घेतली जात असे आणि नंतरच प्रवेश दिला जात असे. मी इंग्रजी चौथीत शाळेत प्रवेश घेतला. माझे मामा मला परीक्षेसाठी सोडायला आले होते. तेव्हाच त्यांनी हुजूरपागेत प्रवेश न मिळाल्यास वाटेत 'सेवासदन' शाळा होती, तेथे जावे लागेल, असे सांगितले होते. 'सेवासदन' ला अभ्यासाच्या दृष्टीने फारशी प्रतिष्ठा नव्हती. इंग्रजी चौथीच्या प्रवेश-परीक्षेसाठी आम्ही पाचसहा मुली होतो. त्यांपैकी दोघीनां प्रवेश मिळाला. त्यांत नशिबाने अगर परीक्षेतल्या अकलेने माझा नंबर लागला व मी हुजूरपागेची विद्यार्थिनी झाले.

हुजूरपागेत शिस्त अत्यंत कडक. तेव्हा शाळेचा प्रवेश-दरवाजा 'नूतन मराठी विद्यालया' कडे होता. प्रंचड दिंडी-दरवाजा, आत पटांगण व नंतर आतमध्ये शाळेची इमारत. शाळेची 10.45 ते 4.30 बरोबर 10.40 ला दिंडी -दरवाजा बंद व्हायचा तो 4.35 ला उघडायचा. एकदा आत गेले, की शाळा सुटेपर्यंत बाहेरचा दरवाजा बंद.

बोर्डिंगच्या मुली म्हणजे तर जवळजवळ कैदीच असत. जेवणखाण उत्तम; मधल्या वेळी पण खायला देत. जेवणात वाढलेले असेल ते खाल्लेच पाहिजे. घरून खाऊचा डबा वगैरे आल्यास प्रथम बोर्डिंग सुपरिटेंडंट तो उघडून पाहत व पास झाल्यास मुलींना दिला जाई. शाळेच्या पंटागणात, आंब्याची व चिंचेची झाडे होती. झाडाला हात लावण्याची कोणाची छातीच नव्हती, पण खाली पडलेली कैरी अगर चिंचाही शाळेच्या जेवणघरात द्याव्या लागत. कोणी पटकन तोंडात तुकडा टाकला आणि बाईंच्या लक्षात आले अगर कोणी चुगली केली तर खाणारणीला एरंडेल घ्यायची शिक्षा! बोर्डिंगमधल्या मुलींना घरून आलेली पत्रे आधी मुख्याध्यापिकेच्या कचेरीत जात. तेथे पत्रे वाचली जात व नंतरच मुलीना दिली जात. मुलीनी घरी लिहिलेली पत्रे पण आधी वाचून नंतर पोस्टात टाकली जात. मग कधीकधी बोर्डिंगच्या मुली डे-स्कॉलरकडे-म्हणजे घरी राहून शाळेत येणाऱ्या मैत्रिणींकडे-वशिला लावून आपली खाजगी पत्रे त्यांच्या पत्त्यांवर मागवत आणि आपली पत्रे त्यांच्याकडे टाकायला देत. पण ही पळवाटही फार कठीण होती. चुकून लक्षात आल्यास शाळेतून हकालपट्टी होण्याची जबरदस्त भीती असल्यामुळे ह्या वाटेला सहसा कोणी जात नसे.

शाळेच्या वर्गांच्या इमारतीपासून थोडी दूर शाळेची प्ले-शेड होती. वरून ऊन-पावसापासून संरक्षण करील असे छत व खाली फरशी. प्रार्थनेला व शारीरिक शिक्षाणाच्या तासाला रोज तेथे जायचे. प्रार्थनेला वर्गाप्रमाणे नेमून दिलेल्या जागी सर्व वर्गांनी शिस्तीने जाऊन उभे राहायचे. सर्व शिक्षक, मुख्याध्यापिका समोर उभ्या असत. पेटीवर आमचे गायनमास्तर तांबेगुरुजी स्वत: प्रार्थना म्हणत. प्रार्थना तांबेगुरुजीनी स्वत: रचलेल्या असत. रोज नवी प्रार्थना. तांबेगुरुजी कवी पण होते. अतिशय रसिक. प्रसिद्ध गायिका कमल तांबे यांचे हे वडील. या प्ले-शेडमधेच शाळेचा रिझल्ट पण जाहीर व्हायचा. सर्व शाळेच्या समोर. ज्या वर्गाचा निकाल वाचून दाखवत असतील तो सबंध वर्ग प्रथम उभा राहायचा. प्रत्येक वर्गाच्या वर्गशिक्षिका उत्तीर्ण मुलींची नावे वाचून दाखवत. नाव वाचले की ती मुलगी खाली बसे, अनुत्तीर्ण विद्यार्थींनी उभ्या. सगळ्या शाळेचा इंग्रेजी पहिलीपासून इंग्रजी सहावीपर्यंतचा (आजादी 5 वी ते 10 वी) निकाल वाचून होईपर्यंत सर्वांच्या समोर अनुत्तीर्ण विद्यार्थीनी उभ्या असत. निकाल वाचताना आपले नाव येईपर्यंत छातीचा ठोका चुकत असे. सर्व निकाल

संपल्यानंतर मुख्याध्यापिका प्रत्येक इयत्तेतील पहिल्या व दुसऱ्या क्रमांकांचे कौतुक करत. सर्वांनी टाळ्या वाजवायच्या. हे सर्व होत असताना नापास विद्यार्थिनी मुसमुसत खाली मान घालून उभ्या असत.

ह्याच प्ले-शेडमधे आमचे शारीरिक शिक्षण, ड्रिल वगैरे असे. मिसइराणी म्हणून ड्रिलच्या अत्यंत कडक शिक्षिका होत्या. त्यांनी ''अटेन्शन'' म्हटले की ताठ उभे राहावे लागे. मला नेहमी अटेन्शन म्हटले की नेमकी पायाला खाज सुटे. पण मॅडमची भीती इतकी की खाजवणे अशक्यच. त्या वेळेपासून ''अटेन्शन'' या शब्दाचा मी धसका घेतला आहे.

शिवण, ड्रॉइंग, संगीत ह्यांचे स्वतंत्र वर्ग असत व तासांना तेथे जायला लागे. आमच्या वेळी प्रथम काही दिवस मिस बापट मुख्याध्यापिका होत्या व नंतर वेणूताई पानसे ह्या आल्या. त्याआधी ख्रिश्चन मुख्याध्यापिका असत. बापटबाई पहिल्या देशी मुख्याध्यापिका. मिस अ‍ॅझक्स-आम्हांला इंग्रीज शिकवायला होत्या. अतिशय प्रेमळ. त्यांच्या तोंडून-कधी कुणाला जोरात बोललेसुद्धा जायचे नाही. पण इंग्रजीमधे जवळजवळ निम्माअधिक वर्ग नापास असे. सायन्स आणि गणिताला देशमुख सर. त्यांची शिस्त फार कडक. फार उत्तम शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. इंदूताई पानसे (मुख्याध्यापिका बाईंची धाकटी बहीण) मराठी शिकवायच्या आणि तासाला नेहमी ''ह्या सगळ्या पोरी पुढे शिकणार नाहीत. शाळेत असतानाच लग्न होऊन जाणार...'' वगैरे बोलायच्या.

हुजूरपागा मुलींची शाळा, म्हणून खास 'होम सायन्स' हा विषय सुरू केला होता. त्यात बाळाची निगा, बाळाची आंघोळ थोडासा स्वैपाक, असे विषय असत. परीक्षेसाठी कचकड्याच्या भावल्याला चोळूनमोळून, पायांवर पालथे घालून आंघोळ घालायला लागे. नशीब, खरोखरचे तान्हे पोर देत नसत! स्वैपाकाची परीक्षा असे. शेगडी पेटवण्यापासून सुरुवात आणि एक भाकरी आणि भाजी करणे- बापरे ! ह्या पन्नास भाकरी-भाजीची चव पाहणे म्हणजे परीक्षा घेणाऱ्याचीच परीक्षा असेल ! त्या वेळी मुलींच्या लग्नाचे वय साधारणत: सतरा-अठरा असे आणि त्यामुळे हीही परीक्षा फारशी चुकीची नव्हती. तेव्हासुद्धा प्रतिभा जोगळेकर (ग.व. जोगळेकरांची मुलगी) इतकी उत्तम भाकरी करायची, की अजूनही तितकी चांगली भाकरी माझी होत असेल असे मला खात्रीलायक सांगता येत नाही.

अशी ही आमची 'हुजूरपागा'.

## शब्दार्थ

**बोर्डिंग** वसतिगृह **सुपरिटेंडंट** व्यवस्थापक **अटेन्शन** सावधान

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) 'हुजूरपागा' काय आहे ?

(2) शाळेत प्रवेश देताना कोण-कोणत्या विषयांची परीक्षा घेतली जात असे ?

(3) 'लेखिकेला हुजूरपागा' शाळेत प्रवेश मिळाला नसता तर कोणत्या शाळेत जावे लागले असते ?

(4) 'हुजूरपागा' शाळेत प्रार्थना कोण गात असे ?

(5) 'हुजूरपागा' शाळेचा रिझ टल्ट कुठे जाहीर केला जात होता ?

(6) कोण-कोणत्या विषयांचे स्वतंत्र वर्ग होते ?

**2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा :**

(1) 'हुजूरपागा' शाळेच्या शिस्तीची माहिती सांगा.

(2) 'हुजूरपागा' शाळेतील बोर्डिंगच्या मुलीच्या जीवना विषयी लेखिकेने काय सांगितले आहे ?

(3) लेखिकेला 'अटेन्शन' म्हटले की काय होत असे ?

(4) 'हुजूरपागा' शाळेतील मुली प्रार्थना व खेळण्यासाठी कुठे जात होत्या ?

(5) सायन्स व गणिताला कोणते शिक्षक होते ? त्यांच्या स्वभावाविषयी माहिती लिहा.

(6) 'हुजूरपागा' शाळेच्या इमारतीचे वर्णन करा.

(7) शाळेतील प्रार्थना कशी म्हटली जात होती ते सविस्तर लिहा.

(8) 'होम सायन्स' या विषयामध्ये कोण–कोणत्या प्रकारचे शिक्षण दिले जात होते ?

**3. खालील वाक्य कोण–कोणास सांगतो ते लिहा :**

(1) ''ह्या सगळया पोरी पुढे शिकणार नाहीत. शाळेत असतानाच लग्न होऊन जाणार...''

(2) हुजूरपागेत प्रवेश न मिळाल्यास वाटते 'सेवासदन' शाळा होती, तेथे जावे लागेल, असे सांगितले होते.

**4. खालील वाक्य सहसंदर्भ स्पष्टीकरण करा :**

(1) बोर्डिंगच्या मुली म्हणजे तर जवळ–जवळ कैदीच असत.

(2) ज्या वर्गाचा निकाल वाचून दाखवत असतील तो सबंध वर्ग प्रथम उभा राहयचा.

(3) हुजूरपागा मुलींची शाळा, म्हणून खास 'होम सायन्स' हा विषय सुरू केला होता.

**5. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) मिस इराणी कोणत्या विषयाच्या अत्यंत कडक शिक्षिका होत्या ?

(A) ड्रिल (B) गणित (C) सायन्स (D) चित्रकला

(2) मिस अ‍ॅझक्स आम्हांला शिकवायला होत्या.

(A) इतिहास (B) इग्रजी (C) भूगोल (D) खेळ

(3) फार उत्तम शिक्षक म्हणून कोणाची ख्याती होती.

(A) देशमुखसर (B) देशपांडेसर (C) पांडेसर (D) देवरेसर

## विद्यार्थी–प्रवृत्ती

- शाळेतील मुला मुलींनी वसतिगृहांत राहून अभ्यास करणाऱ्या मुलामुलींची मैत्री करून त्यांच्या वसतिगृहाला भेट द्यावी.
- वसतिगृहातील विद्यार्थी व घरून येणारे विद्यार्थी यांच्या जीवनातील फरक आपल्या वहीत नोंदा.

## शिक्षक–प्रवृत्ती

- शाळेतील विद्यार्थ्यांना वसतिगृहतील गृहमाता व गृहपिता यांची भेट करून त्यांच्या बरोबर चर्चा करा.

## भाषासज्जता

'हुजूरपागा' नावाची एक शाळा असून त्या शाळेतील शिस्त, नीटनेटके पणा, नियम, शारीरिक शिक्षण व खेळचे महत्त्व याबद्दल लेखिकेने माहिती दिली आहे. भारतीय संस्कृतीत कुटुंब व्यवस्थेला महत्त्व असल्याने हुजूरपागा ही शाळा वेगवेगळे शैक्षणिक प्रयोग कसे करत होती ह्याची माहिती मिळते. म्हणजे कुटुंब व्यवस्थेचाही अभ्यास शालेय जीवनात होणे आवश्यक आहे हे लक्षात घेवून होमसायन्स सारखे विषय खास सुरू करणे व शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकास ही कल्पना प्रत्यक्ष अमलात आणली हे लक्षात येते सरळ व साध्या भाषेत विद्यार्थ्यांच्या समोर मांडण्याचा सुंदर प्रयत्न केलेला आहे.

●

# 10 हे राष्ट्र देवतांचे

**– ग. दि. माडगूळकर**

(जन्म : 1919, मृत्यू : 1977)

गजानन दिगंबर माडगूळकर हे मराठी, हिन्दी, चित्रपट सृष्टितील प्रसिद्ध पटकथाकार, गीतकार, 'चैत्रवन', जोगिया 'काव्यकथा इत्यादी कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. मराठीतील 'गीत रामायण' मुळे त्यांना महाराष्ट्रचे वाल्मीकी म्हणतात. भारत सरकारने 'पद्मश्री' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला.

'हे राष्ट्र देवतांचे' या काव्यात कवी ग.दि.माडगूळकर सांगतात की भारता सारखे संत महंताचे श्रेष्ठ राष्ट्र महान देश जगात दुसरा नाही. आपल्या राष्ट्राचे महत्त्व सांगताना ते म्हणतात की भारतीय स्वातंत्र्य सूर्य चंद्राइतके चिरकाल राहूदे कारण ह्याच भूमीवर रामकृष्णांसारखे महात्मे जन्मले, सत्य, अहिसेचा मंत्र देणाऱ्या राष्ट्र पुरुषांचे कार्य घडले. अनेक ग्रंथाचे लेखन झाले त्यातील गीतेसारखा ग्रंथ आजही मानवाच्या कल्याणाचा विचार करतो.

---

हे राष्ट्र देवतांचे

हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे  
आ-चंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे  
    कर्तव्य भूमी सीता-रघुत्तमाची  
    रामायणे घडावी येथे पराक्रमांची  
    शिर उंच उंच व्हावे हिमवंत पर्वताचे  
येथो नसो निराशा थोड्या पराभवाने  
पार्थास बोध केला येथेच माधवाने  
हा देश स्तन्य प्याला गीताख्य अमृताचे  
    येथे परंपरांचा सन्मान नित्य आहे  
    जनशासनातळीचा पायाच 'सत्य' आहे  
    येथे सदा निनादो जयगीत जागृताचे

## शब्दार्थ

**राष्ट्र** देश **नांदणे** वास्तव्य करणे **भूमी** जमीन **पार्थ** अर्जुन **माधव** श्रीकृष्ण **नभ** आकाश **स्तन्य** मातेचे दूध

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) हे राष्ट्र कोणा-कोणाचे आहे ?

(2) भारत भूमी कशी आहे ?

**2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा :**

(1) ''पार्थास बोध केला येथेच माधवाने'' या काव्यपंक्तीचा भावार्थ स्पष्ट करा.

(2) ''भारत देशाचे महत्त्व कोणकोणत्या उदाहरणातून स्पष्ट केले आहे?''

**3. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(1) 'हे राष्ट्र देवतांचे' या कवितेची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करा.

**4. खालील काव्यपंक्तींचा आशय स्पष्ट करा :**

(1) ''कर्तव्यदक्ष भूमी सीता-रघुत्तमाची रामायणे घडावी येथे पराक्रमांची.''

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- विद्यार्थ्यांनी 'कारगील युद्धातील' शहीद झालेल्या देशभंक्तांच्या नावाची यादी बनवावी.
- विद्यार्थ्यांनी देशभक्तांचे फोटो व माहिती जमा करून त्याचा संग्रह करावा.

### भाषासज्जता

भारत देश अनेक वर्षांच्या गुलामगिरीनंतर स्वतंत्र झाला. 15 ऑगस्ट, 1947 ही तारीख भारतीय माणसाच्या मनात महत्त्वपूर्ण ठरते. पण हे स्वातंत्र्य अनेक राष्ट्रपुरुष, हुतात्मे आणि जनतेच्या प्रयत्नांनंतर प्राप्त झालेले आहे. हे चिरकाल टिकून राहावे आणि भारताचे नाव जगात दुमदुमावे असे कवीला वाटते कारण थोरस्त्रीपुरूषांची ही जन्मभूमी आहे, श्रेष्ठ व्यक्तींच्या कतृत्वाची भारताला परंपरा आहे. वडिलांच्या इच्छेसाठी क्षणात राज्यत्याग करून वनवासाला जाणारा राम, आणि त्याला साथ देणारी पत्नी सीता व भाऊ लक्ष्मण यांचा आदर्श आजही सर्वांसमोर आहे. स्वत:च्या आप्तांना युद्धात समोर ठाकलेले पाहून दु:खी झालेल्या अर्जुनाला श्रीकृष्णाने गीतेमधून केलेला उपदेश आजही प्रत्येकाला कर्तव्याची जाणीव करून देतो. अशा तऱ्हेचे बाळकडू असे संस्कार भारतीय माणसांवर अनेक शतकांपासून झालेले आहेत. आज स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाहीचा पायाच सत्यनिष्ठेवर उभारलेला आहे. ''सत्यमेव जयते'' हे आपले ब्रीदवाक्य आहे असे कवी म्हणतात आणि भारतीय स्वातंत्र्याला चिरंजीवित्व मिळावे अशी प्रार्थना करतात.

●

# 11 अमंगलाचा पहारा

**– वि.वा, शिरवाडकर**

(जन्म : 1912, मृत्यू : 1999)

विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्यासारखा प्रतिभावंत लेखक शतकातून एकदाच जन्माला येतो. हे कवी नाटककार, समीक्षक म्हणून अतिशय प्रसिद्ध आहेत. कविता, कांदबरी, नाटक, पत्रकारिता, ललितलेखन इ. क्षेत्रात त्याचे कर्तृत्व अफाट आहे. 'विशाखा', 'समिधा', 'स्वगत', 'हिमरेषा', 'मारवा', 'हे कवितासंग्रह', 'विरामचिन्हे', 'सारखा लेखसंग्रह', 'आमचं नाव बाबूराव', 'कौंतेय', 'वीज म्हणाली धरतीला', 'चंद्र जिथे उगवत नाही', 'ययाती आणि देवयानी, 'नटसम्राट' ही प्रसिद्ध नाटके आहेत. या त्यांच्या सगळ्या साहित्यसेवेबद्दल ज्ञानपीठ पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला गेला.

शिरवाडकरांनी अनेक ऐतिहासिक नाटके लिहली. त्यांना भव्यतेचे तेजाचे आकर्षण होते. आणि अशा भव्य स्वभावाची, कर्तृत्वाची माणसे त्यांनी आपल्या नाटकात रेखाटली. 'अमंगलाचा पहारा' हे नाटक त्यांच्या 'कैकयी' या नाटकातून घेतला आहे. अयोध्येतील राजा दशरथाचे पुत्र भरत आणि शत्रुघ्न दोन वर्षे अयोध्येच्या बाहेर त्यांच्या आजोळी होते. त्याच्या पश्चात अयोध्येत घडलेल्या घडामोडीविषयी ते देवळातील पुजारी आणि सुमंत यांच्याकडून जाणून घेण्याचा प्रयत्न करतात परंतु राणी कैकयीच्या आदेशावरून त्यांना काही सांगितले जात नाही हे लक्षात येते. राजा दशरथाकडून दोन वर मागून घेवून रामाला कैकयीने चौदा वर्षे वनवासाला पाठवले. सीता आणि लक्ष्मण यांच्यासह राम वनवासाला गेल्यानंतर त्याचा विरह सहन न झाल्यामुळे दशरथाचा मृत्यू झाला. पण ही करुण वार्ता भरत आणि शत्रुघ्न यांना माहीत नव्हती. त्यामुळे आजोळहून परततांना त्यांना अयोध्येत सारे काही विचित्र दिसू लागले आहे. एखादी अमंगल घटना घडली असावी असे त्यांना जाणवत होते.

---

अयोध्येच्या शिवेवर असलेल्या देवालयाचे प्रांगण. मागील बाजूला उंचावर असलेले देवळाचे प्रवेशद्वार आणि तेथपर्यंत जाणाऱ्या पायऱ्या. वेळ सायंकाळची.

एक परिचारक पायऱ्यांच्या खाली उभा आहे.

शत्रुघ्न देवालयातून बाहरे येतो.

**शत्रुघ्न :** (पायऱ्या उतरत) अजून कोणीच आलं नाही ?

**परिचारक :** नाही, महाराज. कोणीही आलेलं नाही, शिंगतुताऱ्यांचे ऐकू आले नाहीत.

**शत्रुघ्न :** (खाली येऊन) आश्चर्य आहे. आमच्या आगमनाची वार्ता देणारे अग्रदूत केव्हाच राजधानीला पोचले असणार. माझी कल्पना होती, अयोध्येच्या शिवेवर असलेलं हे शिवालय, भरताचं स्वागत करण्यासाठी आतुर झालेल्या संमर्दानं गजबजून गेलेलं असेल. पिताजी इतक्या दूरवर येतील अशी अपेक्षाच नाही. वात्सल्य कितीही गाढ असलं तरी त्याला वार्धक्याचा पायबंद असतो. पण राम लक्ष्मण, सुमंत ? आमचे मानकरी, आमचे महाजन, आमचे सचीव – कोणीच कस नाही ? की वार्ताच पोचली नाही ?

**परिचारक :** शत्रुघ्न महाराज, तीच शक्यता मला वाटते. स्वार अयोध्येला उशिरा पोचले असतील किंवा अद्याप पोचलेही नसतील.

**शत्रुघ्न :** अशक्य ! सर्वस्वी अशक्य ! मागच्या तळावरूनच आमचे दूत मार्गस्थ झाले. वाऱ्याशी स्पर्धा करणाऱ्या अश्वांवर स्वार झालेले. एवढ्या अवधीत अयोध्येला चारदा जाऊन ते परत आले असते. आणि तसं अंतर तरी किती ! अवघ्या तीन कोसांचं–देवळाचा वहिवाटदारही देवळात नाही. मी दर्शनाला गेलो तेव्हा आत कोणीही नव्हतं. कोठे दिसला तो ?

**परिचारक :** होय, महाराज. देवळाच्या मागच्या ओवरीत भेटला मला तो.

**शत्रुघ्न :** काय म्हणाला ? काही निरोप आल्याचं सांगितलं त्यानं ?

**परिचारक :** मी त्याला अनेकदा विचारले. पण तो काहीच बोलला नाही. पुतळ्या सारखा नि:शब्द होता. काही विचारलं की फक्त कपाळाला हात लावतो आणि आकाशाकडे पाहून नमस्कार करतो.

**शत्रुघ्न** : ही लक्षणं काही बरी दिसत नाहीत. ठीक – तू जा आता, सारं काही शुभ आणि मंगल असेल. मंगलाच्या दारावर पुष्कळदा अमंगलाचेच पहारे असतात. (स्मित करून) सारे मनाचे खेळ. तू जा आणि भरतमहाराजांना माझा सांगावा दे. म्हणावं, अयोध्येहून अद्याप कोणी आलेलं नाही. पण पूर्वप्रथेनुसार या दैवतांच दर्शन घेतल्याशिवाय आपल्याला पुढे जाता यायचं नाही. सहचरांना रथ सिद्ध करायला सांगा, आपण मात्र स्वत: इकडे या आणि महेश्वरांच दर्शन घ्या. थोडा वेळ वाट पाहू. कोणीच आलं नाही तर पुढे मार्गक्रमण करू. जा – सांग त्यांना.

**परिचारक:** आज्ञा महाराज. (जातो.)

**शत्रुघ्न** : बहुधा असंच असावं. आमच्या दूतांनाच अयोध्येला पोचायला उशीर झाला असेल. पुढे जाणाऱ्यांना मार्गाची कल्पना मागे राहणाऱ्यांना कधीच येत नाही. मागे राहणाऱ्यांना पुढे जाणाऱ्यांच्या वाटा नेहमी निर्वेध वाटत असतात. हा देवळाचा पुजारी – (पायऱ्यांकडे जाऊन हाक मारतो.) वहिवाटदार ! देवळाचे पुजारी – मी शत्रुघ्न बोलावतो आहे तुम्हाला – (वरच्या बाजूला पुजारी – घाबरलेला – येऊन उभा राहतो – नमस्कार करतो.)

**शत्रुघ्न** : तुम्ही पुजारी आहात ?

**पुजारी** : (हाकारार्थी मान हलवतो.)

**शत्रुघ्न** : मी शत्रुघ्न आहे. राजपुत्र. आणि माझे थोरले बंधू भरतमहाराजही इथे आलेले आहेत.

**पुजारी** : (पुन्हा मस्तक वाकवून नमस्कार करतो.)

**शत्रुघ्न** : तुम्ही देऊळ सोडून बाहेर का राहता ? देवळात उपस्थित राहणं तुमचं काम नाही ?

**पुजारी** : (मान खाली घालतो.)

**शत्रुघ्न** : ठीक आहे. दोन वर्षे आम्ही दोघेही अयोध्येच्या बाहेर, आजोळी होतो. नगरातली वार्ता काय आहे ?

**पुजारी** : (मान नकारार्थी हलवतो.)

**शत्रुघ्न** : तुम्हाला माहीत नाही ?

**पुजारी** : (मानेने नाही सांगतो.)

**शत्रुघ्न** : तुम्ही नगरात कधी जात नाही ? इथेच राहता ?

**पुजारी** : (होकारार्थी मान हलवतो.)

**शत्रुघ्न** : तुम्ही जात नसाल, पण राजधानीतील वार्ता तर येथपर्यंत येत असतील ? राजधानीत, राजवाड्यात सर्व काही कुशल आहे ना ? तुम्ही बोलत नाही ? बोलता येत नाही तुम्हाला ?

**पुजारी** : (नकारार्थी मान हलवतो.)

**शत्रुघ्न** : मुके आहात ?

**पुजारी** : (मानेने होय सांगतो.)

**शत्रुघ्न** : वाहवा ! देवाच्या नावाचा ज्याला उच्चार करता येत नाही, त्याला आमच्या मंत्र्यांनी पुजारी नेमलंय. पण तुम्हाला ऐकू येतंय्?

**पुजारी** : (खुणेने हो सांगतो.)

**शत्रुघ्न** : मग मान हलवून उत्तर द्या. अयोध्येत सर्व काही क्षेम आहे ना ? हे पाहा. भरतमहाराज स्वत: इकडे येताहेत. त्यांनाही कळायला हवं. आमचे परमपूज्य पिताजी राजाधिराज दशरथ महाराज, आमचे बंधू राम, लक्ष्मण, आमच्या माता – सर्वांचं कुशल आहे ना ?

(पुजारी किंकाळी फोडतो आणि मागील बाजूला धावत निघून जातो.)

**शत्रुघ्न** : पुजारी ! (भरत येतो.)

**भरत** : अजून कोणी आलं नाही ?

**शत्रुघ्न** : कोणीही नाही.

**भरत** : आता ओरडलं कोण ? कोणीतरी भयभीत होऊन ओरडल्याचा आवाज ऐकला मी.

**शत्रुघ्न** : देवळाचा पुजारी. मुकी माणसंसुद्धा इतकी आकाशभेदी किंकाळी फोडू शकतात हे आजच कळलं मला.

**भरत** : मुका आहे तो ?

**शत्रुघ्न** : असं म्हणतोय् तो, निदान दाखवतोय्.

**भरत** : तो तसं दाखवीत असला तर आपणही खरं मानायला हवं ते.

**शत्रुघ्न** : पण माझा प्रश्न ऐकून तो किंचाळला. मान हलवीत होता तेव्हादेखील त्याचे ओठ थरथरत होते. जिभेवर आलेले शब्द तो सायासानं गिळून टाकीत होता असं वाटत होतं.

**भरत** : जाऊ दे. अयोध्येत गेल्यावर त्याच्या किंकाळीचं संशोधन करायला आपण राजवैद्यानां सांगू. पण अद्याप कोणीही आलं नाही याचं नवल वाटतं मला. याच देवळाच्या प्रांगणात येणाऱ्याची भेट घ्यावी असा प्रघात आहे आपला. मला वाटतं शत्रुघ्ना, आपण आता अधिक वाट न पाहता मार्गक्रमण कराव. आपले सहकारीही आता अधीर झाले आहेत. गाव दूर असतं तेव्हा माणसं शांत असतात, जवळ आलं की अशांत होतात. खरं सांगायचं तर मीही अधीर झालो आहे. आई वडीलांच्या पायांवर आणि भावांच्या छातीवर हे डोकं केव्हा टेकेन असं झालंय मला. आई तर डोळ्यांचे दिवे करून माझी वाट पाहात असेल. मी शिवाचं दर्शन घेऊन येतो.

**शत्रुघ्न** : मी पुजाऱ्याला देवळात जायला सांगतो. (वरती जातो) भरता, रथाचा आवाज येतीय. (पायऱ्या चढून बाहेर बघत) होय – एक रथ वादळाच्या वेगानं या प्रांगणाकडे येतो आहे – कोणीतरी आलं आहे – पण फक्त एकच रथ – (भरत वरती येतो.) महाजन नाहीत, मानकरी नाहीत, तुताऱ्या – भेरीही नाहीत–

**भरत** : रथ आपला आहे यात शंकाच नाही. राघवांचं निशाण त्याच्या अग्रावर फडकत आहे. प्रांगणापाशी थांबला तो – कोणीतरी उतरतंय.

**शत्रुघ्न** : आपले प्रधान सुमंत आहेत ते – एकटेच सुमंत – दोन वर्षांत आपलं बरंच अवमूल्यन झालेलं दिसतं – आत येताहेत ते– (सुमंत – येतो. दोघे खाली येतात.)

**सुमंत** : राजपुत्रांना माझे प्रणाम. देवाच्या दयेनं आपला प्रवास सुखाचा झाला असेल.

**भरत** : होय, सुमंत, प्रवास सुखाचा झाला.

**शत्रुघ्न** : इथे येईपर्यंत. देवळात आल्यावर मात्र देवाची दया संपली आणि सुखाचं रूपांतर चिंतेत झालं.

**सुमंत** : चिंता ? कशाबद्दल ?

**भरत** : आपल्याला यायला इतका उशीर झाला म्हणून. आमचे दूत वेळेवर पोचले नाहीत ?

**सुमंत** : पोचले.

**भरत** : आणि तरीही–

**सुमंत** : उशीर झाला. कारण इथे सांगायला मी असमर्थ आहे. पण विलंबाबद्दल मी आपली क्षमा मागतो.

**भरत** : क्षमा मागायची गरज नाही. तसंच काही कारण असल्याशिवाय आपल्याला उशीर झाला नसेल, हे मी जाणतो. पण आपण एकटेच कसे आलात ? आपल्या–बरोबर कोणीच नाही.

**शत्रुघ्न** : ना मानकरी, ना महाजन, ना सचीव, असं स्वागत आम्हाला अपेक्षित नव्हतं–सुतकातून बाहेर ओढल्यासारखं.

**सुमंत** : त्याबद्दलही मी अधिक बोलू शकत नाही.

**भरत** : सुमंत, राजधानीत आणि राजवाड्यात सर्वांचं कुशल आहे ना ?

**सुमंत** : होय महाराज, सर्वांचं कुशल आहे. आपण आता निघायला हवं–मी आपल्य शिबिराला सिद्ध व्हायला सांगतो –

**भरत** : सर्वजण प्रयाणाला सिद्ध आहेत. आपण बरोबरच जाऊ. पण आम्ही नगरशिवेत प्रवेश करताना, आमच्या मातापित्यांनी, आमच्या बंधूनी, निदान आपले आशीर्वाद आमच्यासाठी पाठविले असतील.

**सुमंत** : होय, पाठविले आहेत. आपण दर्शन घेऊन आलात ?

**भरत** : नाही – मी देवालयात जाऊन येतो – नंतर आपण ताबडतोब निघू–इथेच थांबा तुम्ही.

**सुमंत** : आपली इच्छा.

(भरत देवळात जातो.)

**शत्रुघ्न** : (क्षणभरानंतर) सुमंत महाशय, राजकारणात शत्रूंशी वेळीप्रसंगी खोटं बोलाचं लागते. पण इथे राजकारण नाही आणि शत्रूही नाहीत. सम्राटांच्या पुत्रांशी तुम्ही बोलता आहात –

**सुमंत** : महाराज –

**शत्रुघ्न** : तुम्ही वडिलधारे आहात. तुमच्याशी कठोरपणानं बोलायला मला भाग पाडू नका. (तीव्र स्वरात) खरं सांगा. राजधानीत काय घडलंय् ते ?

**सुमंत** : काहीही घडलं नाही.

**शत्रुघ्न** : (कठोरपणानं) साफ खोटं. तुमच्या वडिलकीची बूज मी आता ठेवणार नाही. तुम्ही खोटं बोलता आहात. आम्हाला पाहिल्याबरोबर पुजाऱ्याची वाणी हरवते आणि राजवाड्यातील कुशल विचारल्यावर तो भ्रमिष्टासारख्या किंकाळ्या फोडीत पळून जातो. आणि तुम्हीही – भरताला उत्तर देते असताना तुमच्याही मुद्रेवर असत्याचा काळाकुट्ट अंधार पसरलेला मला दिसत होता. भरताला कळलं नसेल, तो महात्मा आहे. पण तुमचा प्रत्येक शब्द खोटेपणानं माखलेला होता. (ओरडतो) सांगा, काय घडलंय् अयोध्येत ?

**सुमंत** : काहीही नाही.

**शत्रुघ्न** : (क्रोधाने) पुन्हा खोटं. आम्ही दोन वर्षे दूर राहिलो म्हणून हा अधिक्षेप! वृद्धा, काय घडलंय् ते सांग–नाहीतर दशराथाच्या मुलांशी खोटं बोलणाऱ्याची जीभ.....

(त्याचा हात ओढतो).

**सुमंत** : (पायावर कोसळतो) खूप काही घडलंय् – पण मला आदेश आहे कैकयीमातेचा – मी आता काही सांगू शकत नाही – मला क्षमा करा –

## शब्दार्थ

**प्रांगण** मैदान, पटांगण **परिचारक** सेवक **शिंगतुताऱ्या** एक प्रकारचे वाद्य **वार्ता** बातमी **अग्रदूत** पुढे पाठवलेले दूत **वार्धक्य** म्हातारपण **मानकरी** राजदरबारातील विविध दर्जाचे लोक **अवधी** काळ, वेळ **वहीवाटदार** देखभाल करणारा, कारभारी **ओवरी** ओसरी, पडवी, ओटी **प्रभा** रीत, चाल **सहचर** साथीदार, मित्र **निर्वेध** कोणतीही अडचणशिवाय, मोकळे **आजोळ** आईचें माहेर, मामाचे घर **क्षेम** चांगले, कुशल **आकाशभेदी** आकाशाला भेदणारी तीव्र **राजवैद्य** राजाच्या दरबारातील वैद्य **अवमूल्यन** कमीपणा, घट, अधोगती **असमर्थ** अशक्त, अपात्र **प्रयाण** जाणे, गमन, निघणे **बूज ठेवणे** मानराखणे, आदर ठेवणे **भ्रमिष्ट** गोंधळलेला, बावरलेला, साशंक **मुद्रा** चेहरा **अधिक्षेप** अपमान **आदेश** आज्ञा **विलंब** उशीर

## वाक्प्रचार

**वाऱ्याशी स्पर्धा करणे** खूप जोरणे पळणे **कपाळाला हात लावणे** नशिबाला दोष देणे **डोळ्यांचे दिवे करणे** आतुरतेने वाट पहाणे **मार्गक्रमणा करणे** पुढे जाणे, निघणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) देवालयातून बाहेर कोण येतो ?

(2) मंगलाच्या दारावर कशाचे पहारे असतात ?

(3) भरत व शत्रुघ्न दोन वर्ष कुणाकडे होते?

(4) शत्रुघ्नाने कोणाला देवळात जायला सांगितले?

(5) भरताने सुमंताला कोणता प्रश्न केला ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) देवळात आल्यावर परिचारकाने शत्रुघ्नाला कोणती माहिती पुरवली ?

(2) पुजाऱ्याच्या किंकाळीचे संशोधन करावेसे भरताला का वाटले?

**3. खालील प्रश्नांची सविस्तार उत्तरे लिहा :**

(1) शत्रुघ्नाने पुजाऱ्याला कोणाता प्रश्न विचारला ? त्यानंतर पुजऱ्याने किंकाळी का फोडली ?

(2) शत्रुघ्न आणि भरत यांच्या स्वभावातील तीन-तीन गुणदोष लिहा ?

(3) अयोध्येवर कोणत्या अमंगलाचा पहारा होता ?

**4. खालील विधाने कोण-कोणास कोणत्या प्रसंगी म्हणाले ते सांगा :**

(1) ''अशक्य! सर्वस्वी अशक्य! मागच्या तळावरुन आमचे दूत मार्गस्थ झाले.''

(2) ''तुम्ही देऊळ सोडून बोहर का राहता ? देवळात उपस्थित राहणं तुमच काम नाही ?''

(3) ''अयोध्येत गेल्यावर त्यांच्या किंकाळीच संशोधन करायला आपण राजवैद्यांना सांगू.''

(4) ''उशीर झाला कारण इथे सांगायला मी असमर्थ आहे पण विलंबाबद्दल मी आपली क्षमा मागतो ?''

**5. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) शिंगतुताऱ्यांचे आवाज कोणाला ऐकू आले नाहीत ?

(A) शत्रुघ्नाला (B) भरताला (C) परिचारकाला (D) पुजाऱ्याला

(2) सुमंतला काहीही न सांगण्याचा आदेश कुणाचा असतो ?

(A) सुमित्रा (B) कैकयी (C) जानकी (D) कौसल्या

(3) शत्रुघ्न व भरत किती वर्षे अयोध्येच्या बाहेर राहीले ?

(A) एक वर्ष (B) दोन वर्षे (C) तीन वर्षे (D) चार वर्षे

(4) आम्ही दोन वर्षे दूर राहिलो म्हणून हा....?

(A) खटाटोप (B) कमीपणा (C) अवमूल्यन (D) अधिक्षेप

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- हा नाट्यांश वर्गात सादर करा.

### शिक्षक-प्रवृत्ती

- रामायणातल्या विविध कथा मुलांना सांगा. या कथाकथनाची स्पर्धा ठेवा.

# 12 मोट

– द. ता. भोसले

(जन्म : 1935)

लोकसाहित्याचे मराठीतले नामवंत अभ्यासक. त्यांचे बालपण महाराष्ट्रातल्या खेडयात व्यतीत झाले. त्यामुळे त्यांनी ग्रामसंस्कृतीचा जवळून अनुभव घेतलेला आहे. पुढे त्यांनी अध्यापनाचे कार्य सुद्धा महाराष्ट्रातील ग्रामीण भागातच केले. त्यामुळे मराठी लोकसंस्कृतीच्या सर्व अंगाचे निरीक्षण त्यांना करता आले. 'संस्कृतीच्या पाऊखुणा.' 'चावडीवरचा दिवा' या त्यांच्या पुस्तकांतून त्यांनी या सगळ्या घटकांचे सखोल वर्णन केले आहे. त्यांच्या ग्रंथाना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. भारतातील प्राचीन काळापासून शेती हाच प्रमुख व्यवसाय राहिला आहे. आणि शेतीशी संबंधित अनेक घटकांचे (जसे नांगर, बैल, मडके, जाते इ) त्यांनी शेतकऱ्याशी असणारे नाते सांगितले आहे या पाठात शेतीला पाणी–पुरवठा करणाऱ्या मोटेचे वर्णन आहे.

---

कृषी संस्कृतीमध्ये तीन गोष्टींना विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्या तीन गोष्टी म्हणजे भूमी, जल आणि माणसाला उपयोगी पडणाऱ्या वनस्पती. या वनस्पतींमध्येच भूमिपुत्राने विकसित केलेली अन्नधान्याची पिके समाविष्ट होतात. भूमी तर शेतकऱ्याची आई. तिच्या आशीर्वादने तो मूठभर बी पेरून ढीगभर धान्य निर्माण करतो. या भूमीचा तो आपल्या जीवनासाठी नाना प्रकारे उपयोग करून घेतो. मानवी जीवनात जलाला असणारे महत्त्व तर नव्याने सांगायला नकोच. पाण्याला 'जीवन' हा पर्यायी शब्द आपण वापरतो; तो यथार्थच आहे. पाणी कुणाला लागत नाही ? कीटकांपासून तो छोट्यामोठ्या पशुपक्ष्यांपर्यंत आणि वनस्पतींपासून माणसाच्या हर एक गोष्टीसाठी पाणी लागते. कृषी संस्कृतीमध्ये तर पाण्याला विशेष महत्त्व. रानात पाणी खेळले, तरच शेतकऱ्यांच्या अंगात पाणी संचारते. फळांच्या चार बिया टोचायच्या असोत, मूठभर भाजीपाला निर्माण करावयाचा असो, अथवा स्वत:बरोबर इतरांना जगविण्यासाठी धनधान्य पिकवायचे असो, पाणी हे लागतेच लागते. माणूस उगवून येईल अशी नुसती सुपीक भूमी जवळ असून चालत नाही किंवा भागत नाही. या भूमीची तृप्ती करणारे हुकमी पाणी असेल, तर बियांना अंकुर फुटतील, कष्टाला कृतार्थता लाभेल, नि भूमीच्या सर्जनशीलतेचा चमत्कारही अनुभवाला येऊ शकेल. यासाठी तर शेतकरी जलदेवतेची निष्ठेने पूजा करतो. आपल्या पूर्वजांनी पर्जन्यदेवतेची सूक्ते गायली ती याच कारणाने. पण ही देवता भूमीची तृष्णा नि पिकांची आस यांचा विचार करून प्रसन्न होईलच असे नाही. ती तिच्या लहरीप्रमाणे भूमीला तृप्त करणार. अनेकदा तृप्तकरील, असेही म्हणता येत नाही. निसर्गामधील कमालीचा बेभरववाशाचा घटक म्हणजे सर्व सृष्टींचा जीवनाधार असलेला हा पाऊस. म्हणून पाण्यासाठी शेतकरीगडी डोळ्यांत पाणी आणून पावसाची वाट पाहत असतो. शेतकऱ्यांच्या जीवनाशी लपंडाव खेळण्यात त्याला कमालीचा आनंद होत असावा.

त्यातूनच मग कृषी संस्कृतीने हुकमी व हक्काच्या पाण्यासाठी शोधाशोध सुरू केली. नदीच्या पात्रात खूप दिवस टिकून राहिलेले पाणी शेती युगातल्या मानवाने पाहिले असावे. एखाद्या खोल अशा विवरात साचलेले पाणी आटत नाही, हेही त्याच्या दृष्टीस पडले असावे. अथवा नदी वा तळ्यांच्या काठी आपल्या घरासाठी पाया खोदताना अथवा एखादे मोठे झाड तोडण्यासाठी जमीन खोलवर उकरताना भूमीच्या पोटात असलेल्या पाण्याचा शोध लागला असावा. त्यातूनच त्याला विहिरीची कल्पना सुचली. अनुभवातून त्यात सुधारणा होत गेल्या पण या विहिरीची कल्पना सुचली. अनुभवातून त्यात सुधारणा होत गेल्या. पण या विहिरीत भरपूर पाणी असले तरी काठावर असलेल्या आपल्या पिकाला ते उपसून कसे द्यावे याची त्याला सुरवातीच्या काळात उपाययोजना सुचणे शक्य नव्हते. मात्र निसर्गाच्या निरीक्षणातून आणि अनुभवांतून आलेल्या शहाणपणातून त्याला मोटेचा शोध लागला असावा. एखाद्या डबक्यातले पाणी ओल्या नि मोठ्या पानांचा द्रोण करून जर आपणाला काढून घेता येत असेल, हातांची ओंजळ करून जर पाणी मुखापर्यंत न सांडता नेता येत असेल, मातीच्या खोलगट भांड्याचा वापर जर द्रव पदार्थ साठविण्यासाठी व इकडून तिकडे नेण्यासाठी करता येत असेल, तर भूमीतले पाणीही आपल्या तहानलेल्या पिकांना अशाच एखाद्या उपायाने का देता येऊ नये, हा विचार त्याच्या मनात रूजला असणार. अन् त्यातून जनावरांच्या कातडीचा वापर करून त्याला मोट तयार करता आली असावी. मोटेचा माणसाला लागलेला शोध म्हणजे त्याच्या उपासमारीवरचा महत्त्वाच विजय म्हणावा लागेल. कृषी संस्कृतीच्या समृद्धीचा प्रारंभकाल म्हणावा लागेल.

विहिरीच्या तोंडावर उभी केलेली मोटेची रचना मोठी चातुर्यपूर्ण अशी म्हणावी लागेल. विहिरीच्या तोंडाजवळ पाणी जाण्यासाठी एक छोटासा हौद बांधलेला असतो. त्याला ग्रामीण भाषेत डोणी असे म्हणतात. या डोणीला विहिरीकडील बाजूला पाच–सहा फूट लांबीची एक जाडजूड शिळा आडवी बसविलेली असते. ही शिळा व डोणी चांगल्या चुन्याने पक्की बांधून घेतलेली असते. या शिळेच्या दोन्ही टोकांना पाच–सहा इंच व्यासाची दोन मोठी भोके खोदून घेतलेली असतात. त्यामध्ये लवकर न कुजणाऱ्या चांगल्या पिंडरीएवढ्या जाड अशा मेढी घट्ट रोवलेल्या असतात. त्याना आधार म्हणून धावेच्या बाजूने दोन मेडक्या लावलेल्या असतात. यांची वरच्या बाजूंची टोके मध्यभागी लाकडी चाक बसविलेल्या चाकपट्टीत घट्ट बसविलेली असतात. या पट्टीतले चाक साधारणत: एक फूट व्यासाचे असते. चाकाच्या बाहेरील बाजूला मनगटपेक्षा जरासा लहान आकाराचा पिळदार दोर बसेल अशी खाच सुताराने तयार केलेली असते. ही चाकपट्टी चाक बसविलेल्या ठिकाणी बांबूच्या आकाराच्या गोल गुळगुळीत दांड्यासारखी तयार केलेली असते. डोणीच्या जवळही ढोलकीच्या आकाराचे, पण लांबीला जरासे अधिक लांब असलेले एक चाक बसविलेले असते. म्हणजे खालच्या बाजूला मोठे लांब चाक असते. वरती तव्याच्या आकाराचे चाक बसविलेले असते. त्यांना तेल घालून गुळगुळीत केलेले असते. या दोन्ही चाकांवरून मोटेला बांधलेले सोंदूर आणि नाडा वर खाली जात असतो. या साऱ्या लवाजम्याला आम्ही 'मचाड' किंवा माचाड असे म्हणतो. खेड्यातली तरावट अन् निर्भय बनलेली पोरे या माचाडावर चढून खाली विहिरीच्या काळ्याकरंद पाण्यात उड्या मारतात. हातापायाची घडी घालून मारलेल्या उडीला 'मुटका'असे म्हणतात. सूर मारताना अंदाज चुकला तर खाली खडकावर आदळून कपाळमोक्ष होण्याची शक्यता असते. अनेकदा विहिरीत पोहणारी पोरे पाण्याने भरलेल्या मोटेला लोंबकळून अर्ध्याअधिक उंचीवर जाऊन तेथून खाली उड्या घेतात. काही मुले मोटेतून विहिरीत गळणाऱ्या पाण्याखाली धबधब्याच्या धारेखाली उभे राहावे, तशी थांबलेली असतात.

पूर्वी खेड्यांमध्ये पाटाच्या पाण्यासाठी सर्रास चामड्याची मोट वापरली जाई. ही चामड्याची मोट गावातलाच एखादा कसबी चर्मकार तयार करत असे. सुताराने माचाड व चोक चयार करून द्यायची. मांगाने सोंदूर व नाडा तयार करून द्यायचा. वडाराने डोणीजवळची पाषाणशिळा घडवून द्यायची. गवंड्याने डोणी व त्यापुढे धुण्या–पाण्यासाठी असणारा मोठा हौद बांधून द्यायचा. सुताराने मोट ओढण्यासाठी विशिष्ट पद्धतीने तयार केलेले जू बनवून द्यायचे, असा ग्रामीण संकेत प्रचलित होता. त्यासाठी लागणारा माल शेतकरी देत असे. त्याला पोटाला व वरखर्चाचा लागणारा पैसाही तो देत आहे. बलुते व मधून–मधून मिळणारा भाजीपाला वेगळाच.

या चामडी मोटेचा वरचा निम्मा आकार गोल असतो. काठाला कातड्याचा गोठ मारून त्यात कड्या अडकवलेल्या असतात. खालचा निम्मा आकार निमुळता होत गेलेला असतो. त्याच्या तोंडालाही कड्या अडकवलेल्या असतात. चामड्याच्या वाद्या बांधलेल्या असतात. या मोटेला सोंदूर आणि नाडा घट्ट बांधलेला असतो. त्यासाठी चामड्याच्या वाद्या म्हणजे करंगळीपेक्षा जरासे लहान आकाराचे चामड्याचे चिवट दोर वापरलेले असतात. या मोटेचा आकार साधारणपणे रजपूत लोक गुडघ्यापर्यंत येणारा चोळणा घालतात तसा वाटतो किंवा आपल्याकडचा पायजमाच, पण गुडघ्यापर्यंत असलेला व गुडघ्याजवळ निमुळता झालेला असावा, तसा असतो. ही मोट जाडजूड अन लांबरुंद अशा चामड्याच्या सळाने म्हणजे चामड्याच्याच सुतळीने शिवून तयार केलेली असते.

मोटेचा मालक नव्याने मोट तयार झाल्यावर तिला तेल आणि हळद लावून मऊशार बनवितो. त्यामुळे तिची छानपैकी घडीही घालता येते. हे चामडेही मोठ्या जनावराचे, चांगले कमावलेल्या कातड्याचे नि जाड असे घ्यावे लागते. त्याच्याच वाद्या आणि लागण, पागण कराव्या लागतात. सळही करावे लागतात. गोठ शिवण्यासाठीही तेच वापरतात. धावेची पूजा करून शेतकरी ही मोट वापरतो. सुरवातीला व्यवस्थित शिवलेली असल्याने तिच्यातले पाणी वर येताना बिलकूल गळत नाही. कालांतराने मात्र साऱ्या बाजूंनी तिला गळती लागते. तिच्या चामडीला नरमपणा येतो. उन्हात मोट सुकवल्यावर तिला पांढरट रंग चढतो. मग तिचा वापर करणे शक्य होत नाही.

चामड्याच्या मोटेनंतर लोखंडी पत्र्यापासून तयार केलेली मोट वापरात आली. ती एखादा रुंद तोंडाचा चौकोनी डबा असावा, तशी असते. मात्र तळाकडील भाग जरासा निमुळता असतो. म्हणजे तळात तयार झालेला चौकोनी आकार वरच्या चौकोनापेक्षा लहान असतो. तळाला पाण्याच्या दाबाने आपोआप आतील बाजूला उघडणारी एक झडप असते. ती वर उचलली गेली की, खालून पाण्याचा लोळच्या लोळ आत येतो. पण चामड्याच्या मोटा काय किंवा लोखंडी मोट काय, मोटक्याने दोराला एक हिसका

दिल्याशिवाय मोट काठोकाठ कधीच भरत नाही. शिवाय मोट भरताना माचाडाजवळच्या चाकाजवळ असलेल्या नाड्यावर मोटक्या पाय देतो. म्हणजे चामड्याची मोट पाण्यात भरताना पृष्ठभागाशी समांतर होऊ शकते. ती काठोकाठ भरू शकते. ही लोखंडी पत्र्याची मोट वापरण्यापूर्वी डांबर लावून व्यवस्थित केली जाते. सुरुवातीला चांगल्या प्रकारे पाणी ओतणारी ही मोटदेखील चारही कोपऱ्यांतून गळायला लागते. काही दिवसांनी ती जागोजागी गंजायला लागते. तिची पाण्याचे ओझे वाहण्याची क्षमता कमी होते. मग ही मोटही वापरातून बाद करतात. वस्तीसमोर ठेवून तिच्यात कोंबड्या कोंडल्या जातात.

ही मोट मारणे तसे श्रमाचे काम असते. मोटक्यापेक्षाही बैलांना अधिक कष्ट पडतात. त्यातच विहिरीला पाणी खोल असेल, अन् मोटेचा आकार मोठा असेल, तर ही मोट ओढून बैलांच्या तोंडाला फेस येतो, मधूनमधून त्यांना विसावा द्यावा लागतो.

श्रमपरिहार होण्यासाठी हा मोटकरी मोटेवरची सुरेल गाणी म्हणतो. कृषीसंस्कृतीचा अविभाज्य घटक असलेली अशी ही मोट. एखाद्या शेतकऱ्याची सामाजिक प्रतिष्ठा सांगताना 'दोन मोटां' ची विहीर, 'चार मोटां' ची विहीर अशी परिभाषा पूर्वी वापरली जात होती.

आता हे सारे संपले आहे. चामड्याची मोट केव्हाच मागे पडली. नंतर आलेली लोखंडी मोटही दिसत नाही. त्या जागी मग क्रूड तेलावर चालणारी इंजिने आली. या इंजिनांनी काही दिवस भक्‌भक् आवाज करीत विहिरीतले पाणी खेचले. आता त्या जागी विजेवरील मोटारी पाणी खेचण्यासाठी वापल्या जाऊ लागल्या आहेत. मोट कुठेही दिसत नाही. त्यामुळेच मराठी चित्रपट तयार करणाऱ्या एका दिग्दर्शकाला मोटेवर गाणे म्हणणाऱ्या नायकावर चित्रीकरण करायचे होते. त्यासाठी त्याने मोट असलेली विहीर शोध-शोधली. कुठेही अशी विहीर सापडली नाही. यास्तव त्याने ते दृश्यच आपल्या चित्रपटातून काढून टाकले.

विहीर, मळा, मोट, पिके आणि बैलबारदाना हा एक ग्रामीण संस्कृतीचा हिरवा पदर आहे. नव्हे, ही एक संस्कृतीच आहे. या संस्कृतीतली मोट फक्त गळू लागल्याने बाद झालेली आहे. नव्हे, बहिष्कृत झालेली आहे.

## शब्दार्थ

**कृषी** शेती **भूमिपूत्र** शेतकरी **कृतार्थता** धन्यता **पर्जन्यदेवता** पावासाचा देव वरूण **तृष्णा** तहान **मोट** विहिरीतून पाणी काढण्यासाठी तयार केलेले साधन **पृष्ठभाग** पाठीमागच्या भाग **समांतर** सारख्या अंतरावर **विसावा** विश्रांती **अविभाज्य** वेगळी नसलेली **प्रतिष्ठा** मोठेपणा **दिग्दर्शक** दिशा दाखवणारा **मेढी** दुबेळके लाकूड / आधाराचा खांब

## वाक्प्रचार

**कपाळमोक्ष होणे** डोके फुटणे **श्रमपरिहार होणे** थकवा कमी होणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) कृषिसंस्कृति मध्ये कोणत्या तीन गोष्टींना महत्त्व आहे?

(2) निसर्गातील बेभरवशाचा घटक कोणता ?

(3) शेतकऱ्याला पाण्यासाठी कोणती कल्पना सुचली ?

(4) भूमीला लेखकाने काय म्हटले आहे?

(5) कृषिसंस्कृतीचा प्रारंभकाळ कोणत्या शोधाला म्हणतात ?

(6) डोणी म्हणजे काय ?

(7) मुटका म्हणजे काय ?

(8) पूर्वी मोट कशाची बनविलेली असे ?

(9) श्रमपरिहारासाठी मोटकरी काय करतो ?

(10) हल्लीच्या काळात मोटे ऐवजी काय आहे ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) शेतकरी कशा प्रकारे जलदेवतेची पूजा करीत असत ?

(2) पूर्वी खेड्यामध्ये कशाची मोट वापरली जाई?

(3) सुताराला शेतकऱ्याकडून काय देण्यात येई ?

(4) लोखंडाच्या मोटेचे दोन गैरफायदे लिहा.

(5) शेतकऱ्याची सामाजिक प्रतिष्ठा सांगताना मोटेसाठी कोणती परिभाषा वापरती जात असे ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) कृषिसंस्कृती साठी असणारे पाण्याचे महत्त्व समजवा.

(2) मोटेची कल्पना कशी सुचली असावी.

(3) मोटेची रचना सविस्तर समजवा.

(4) खेड्यातली निर्भय पोरे काय करतांना आढळतात.

(5) गावातील कोणकोणते कामगार मोट तयार करण्यासाठी काय-काय करीत असत ?

(6) पावसाला बेभरवशाचा घटक असे का म्हटले आहे ?

(7) नवीन मोट तयार झाल्यावर मालक काय-काय करतो?

(8) लोखंडी पत्र्यांच्या मोटेविषयी माहिती लिहा ?

(9) मोटे मुळे बैलांची परिस्थिती कशी होते ?

(10) चित्रपट दिग्दर्शकाला मोटेचे दृश्य का काढून टाकावे लागले ?

**4. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) शेतकरी कोणाची पूजा करतात ?

(A) वनदेवता (B) वायूदेवता (C) जलदेवता (D) अग्निदेवता

(2) ग्रामीण भाषेत कशास डोणी म्हणतात ?

(A) हौद (B) विहिर (C) तलाव (D) नदी

(3) सोंदूर आणि नाडा कोण करून देतो ?

(A) मांग (B) सुतार (C) शेतकरी (D) वडांर

(4) नव्या मोटेला मालक काय लावतो?

(A) तेल आणि हळद (B) मीठ आणि हळद

(C) दूध आणि हळद (D) तूप आणि हळद

## भाषासज्जता

आता शहरीकरणा मुळे गावाची संस्कृती विस्कटून गेली आहे. या हळू-हळू हरवून जाणाऱ्या संस्कृतीचे वेगवेगळे पैलू त्यांनी आपल्या लेखनातून वाचकांच्या समोर मांडले. त्यात दीपावली, पोळा सारखे सण, पखाल, सूप, जाते मोट सारख्या वस्तू, पोतराज, बहुरूपी, मुरळी सारखे लोककलाकार यांचे स्वरूप समजावून दिले आहे. या लोकसंस्कृतीच्या घटकांमुळे आपल्या संस्कृतीच्या खुणा समजतात. ही लोकसंस्कृती जन्माला आली, वाढली, ती शेतीच्या बरोबरीने ग्रामजीवनातल्या सण-उत्सवांचे आणि श्रद्धाचे शेतकऱ्यांच्या रीती रिवाजांमधून कृषि संस्कृतीच्या सहाय्याने पोषण झालेले आहे पण आता मात्र एकेक घटक यांतून निघून जात आहे.

# 13 कंसवध

**– चक्रधरस्वामी**

(जन्म : 1213, मृत्यू : 1272)

प्राचीन मराठी वाङ्मयामध्ये महानुभाव संप्रदायातील गद्यचरित्रांचे महत्त्व खूप मोठे आहे. कारण प्राचीन मराठीत पद्यलेखनाचे प्रमाण विपुल असले तरी गद्यलेखन मात्र अल्प आहे. मराठी भाषेत चरित्रलेखन करण्याच्या परंपरेस महानुभव संप्रदायाने प्रारंभ केला ज्ञानेश्वरीच्या पूर्वीच ही चरित्रलेखने झालेली आहते. आपल्या वंशातील आदरणीय अवतारी पुरुषांची चरित्रे आठवणे, सांगणे, एकणे व लिहून काढणे ही आपली ईश्वरभक्ती आहे असे समजून 'लिळाचरित्र' स्मृतिस्थळ गोविंदप्रभुचरित्र अशी चरित्रे लिहीली गेली.

हा प्रसंग 'श्रीकृष्णचरित्र' या महानुभाव संप्रदायच्या चरित्रग्रंथापैकी एका ग्रंथातील आहे पण ह्याचे एक वेगळेपण आहे श्री चक्रधरस्वामींना संप्रदायातील मंडळी परमेश्वराचा अवतार मानत मुळात स्वामीनी आपल्या शिष्यांना साध्यासुबोध आणि सौंदर्यपूर्ण रीतीने हे कृष्णचरित्र सांगितले असल्यामुळे भाषेत कुठेही कृत्रिमपणा येत नाही. चक्रधरस्वामीनी कृष्णाचे व्यक्तिचित्र आपल्या निरुपणाद्वारे उभे केले आहे.

या श्रीकृष्णचरित्राचे निवेदक श्रीचक्रधरस्वामी आहेत. आणि त्यांनी श्रीकृष्णच्या आयुष्यातील महत्त्वाचा प्रसंग येथे वर्णन केले आहे. महानुभाव संप्रदायमध्ये श्रीचक्रधरस्वामींना श्रीकृष्णाचा अवतार समजले जाते. त्यामुळे त्यांची शिष्या महदाइसा हिच्या प्रश्नांना, शंकांना उत्तरे देतांना त्यांनी खुलासेवार या प्रसंगांचे वर्णन केलेले आहे हा मूलत: स्वतंत्र ग्रंथ नसून लिळा चरित्राचाच भाग होता पुढे त्यामध्ये पंथांच्या आयार्चांनी भर धालून ग्रंथ स्वतंत्र ग्रंथाचे रुपं दिले.

---

मग श्रीकृष्णचक्रवर्ती कुवलआपीडु हस्तीचां कुंभस्थळीं मुष्टिधातु दिन्हला: इतुकेनि तो हस्ति पडिला : मग श्रीकृष्णचक्रवर्ती आन बळभद्रदेवी गजदंत तेथ वीरु मारीले : मग स्नान करूनि मालखंडेआ माजिं प्रवेशले : तवं मध्यान्हकाळु जाला : मग श्रीकृष्णचक्रवर्ती सुपरिवारी रंगणामाजि उभे ठाकले।

ठेले : तेथ जआंसि जैसा भाओ तैसे देखिनले : जआंसि जैसी मति तआं तैसे प्रकाशले : मग श्रीकृष्णचक्रवर्ती दुर्गा एउतें वरौतें पाहिलें : तवं दुर्गाचेआ हुडेआवरि कंसु बैसलासे : पुढें वाद्यंत्रे वाजताति : कंसे मालांते खुणाविलें : मग चाणौर मुष्टिक तोबळ सिसळ हे चौघे मल्ल मुख्यकरौनि सहस्रसंख्या मल्ल श्रीकृष्णचक्रवर्तीवरि चालिले : चाणौर मुष्टिक श्रीकृष्णचक्रवर्तीते नोकुं लागिनले : मग ते दोधे भिडले : मग एरां मालांचे उभयथा कदन केलें : मग श्रीकृष्णचक्रवर्ती कंसावरि चाली केली : लागवेगी कंसु केशी धरोनि उपटिला : आन तेआचे प्राण विसर्जिले : देवता जयजयकारु केला : पुष्पवर्खाव जाला : आकाशीं दुंदुभि वाजिनली : ऋषिमुनी हरखेंले ''

''कंसु वधिलेआ नंतरे : शीघ्र वंदीराळ वीजें केलें : बंदीशाळा''

देवकीवसुदेवमोचनोद्धवप्रेमदान (आणि) राज्यव्यवस्थाकथन

फोडिली : वसुदेवदेवकीउग्रसेनाची शांखळाबंधने तोडिली : मग देवकीवसुदेवासि क्षेमालिंगने दिन्हलीं : बळिभद्रदेवें वसुदेवदेवकीउग्रसेनासि नमस्कारु केला : देवकीदेवी आर्ति पांचा वाती उजळिली ।

## शब्दार्थ

**कुवलआपीडु** एका हत्तीचे नाव (कंसाच्या हत्तीचे नाव) **हस्ती** हत्ती **कुंभस्थळ** गंडस्थळ **मुष्टीघातु** मुठीचा प्रहार **दिन्हला** दिला **गजदंते** हत्तीचे दात **मालखंड** तालीम खाणा, कुस्तीचा हौदा **माजि** मध्ये **जआसि** जयासि, ज्याला **देखिनले** पाहिले **प्रकाशले** चमकले **हुडे आवरि** बुरुजावर **खुणाविले** इशारा केला **मल्ल** पहेलवान **सहस्त्र** हजार **नोकंणे** रोखून पहाणे **माल** मल्ल, पैलवान **उभयथा** उभयता, दोघे **केशी** केस **प्राण विसर्जिले** प्राण सोडणे **दुंदुभि** नगारा, डंका **हरखेले** आनंदीत झाले **बंदीशाळा** कैद, तुरंग **क्षेमालिंग** मिठी **आर्ति** आरती **शांखला** साखळी

## वाक्‌प्रचार

**कदन करणे** वध करणे **पांचा वाती उजळणे** पंचारती करणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) श्रीकृष्णाने हत्तीला कशाने मारले ?

(2) श्रीकृष्णाबरोबर कोण आले होते ?

(3) कंसाच्या चार मल्लांची नावे सांगे ?

(4) कंसाच्या हत्तीचे नाव काय होते ?

(5) श्रीकृष्णाने बंदीशाळेतून कोणाकोणाला मुक्त केले ?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तर लिहा :**

(1) श्रीकृष्णाने केलेल्या कंस वधाचे सविस्तर वर्णन करा ?

**3. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) हत्तीला कोणी मारले ?

(A) कंसाने (B) श्रीकृष्णाने (C) बलरामाने (D) सिसळने

(2) कंसाने कोणाला इशारा केला ?

(A) मल्लांना (B) वसुदेवाला (C) श्रीकृष्णाला (D) बलभद्राला

(3) आकाशतून कशाचा आवाज झाला ?

(A) बासरीचा (B) नगाऱ्याचा (C) डमरुचा (D) डबक्याचा

(4) वसुदेव व देवकी यांना कुठे ठेवले होते ?

(A) तुरुंगात (B) घरात (C) महालात (D) देवळात

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- स्मृतिस्थळ, लिळाचरित्र या प्राचीन गद्यग्रंथाची माहिती शिक्षकांकडून करुन घ्या.

# 14 ऐसे केले या गोपाळे

**– शेख महंमद**

(जन्म : इ.स. 1560, मृत्यू : इ.स. 1650)

शेख महंमद यांची कादिरी पंथाची गुरुपरंपरा होती त्यांनी ''योगसंग्राम'' हा ग्रंथ रचला.

संतांची अभंगवाणी हे मराठी भाषेचे आगळे लेणे आहे ज्ञानदेवांपासून तुकोबा, निळोबाराय यांनी जसे हे वाङ्मय समृद्ध केले आहे, तसेच शेख महंमदासारख्या परधर्मियालासुद्धा अभंगरचना करावीशी वाटली .

ऐसें केलें या गोपाळें । नाहीं सोंवळेंओवळें ॥
कांटे केतकीच्या झाडा । आंत जन्मला केवडा ॥
फणसाअंगीं कांटे । आंत अमृताचे सांठे ॥
नारळ वरुता कठिण । परी अंतरी जीवन ॥
शेख महंमद अविंध । त्याचे हृदयीं गोविंद ॥

## शब्दार्थ

**सोवळेओवळे** सोवळे पवित्र, ओवळे – अपवित्र. येथे भेदभाव हा अर्थ आहे शोवळे ओवळे हा शब्द वस्त्रसाठी वापरला जातो उदाहरण **सोवळे वस्त्र** पवित्र वापरले जाणारे रेशमी वस्त्र **केतकी** केवडा – सुगंधी पान **अमृताचे साठे** गोड गरे **वरुता** बाहेरुन **अंतरी** आत, मनात **जीवन** पाणी **अविंध** मुसलमान लोकांमध्ये कान टोचत नाही म्हणून त्यांना अविंध म्हणतात

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) फणसाचे वर्णन करा

(2) नारळाचे बाह्य रूप कसे आहे ?

(3) केवडा कोठे जन्मतो ?

**2. खालील ओळीचा आशय स्पष्ट करा :**

- कांटे केतकीच्या झाडा । आत जन्मला केवडा ॥

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) यातील तिन्ही दृष्टांतां मधून कवीने कोणता उपदेश केला आहे ?

(2) गोपाळाने सोवळया–ओवळयाचा भेद केला नाही, असे शेख महंमद का म्हणतो ?

**4. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) शेख महंमद यांच्या हृदयात काय आहे ?

(A) आनंद (B) गोविंद (C) शंकर (D) ब्रह्मा

(2) नाराळाच्या आत काय असते ?

(A) दूध (B) जीवन (C) पाने (D) रंग

## विद्यार्थी–प्रवृत्ती

- 'सोवळे ओवळे' सारखे विरोधी अर्थ असूनही एकत्र वापरले जाणारे पाच जोडशब्द लिहा
  उदाहरण : कडूगोड, बरेवाईट, थोडेफार
- संत चोखामेळा यांचा "काय भुललासी वरालिया रंगा" हा अभंग वाचा.

## भाषासज्जता

कृष्णगोपाळावर भक्ती असणाऱ्या शेख महंमद या संतकवीने हिंदु मुस्लिम असा भेदभाव कधी केला नाही कृष्णभक्त शेख महंमदाने वेगवेगळ्या उदाहरणांमधून असे पटवून दिले आहे की बाहेरून रुप कसेही असले तरी ह्रदयातील भक्तिभाव हाच महत्त्वाचा ठरतो तो कोणत्याही कर्मकांड, रुढीपरंपरा यांच्यापेक्षा मनाच्या शुद्ध भावाला श्रेष्ठ मानतो, म्हणूनच सोवळया–ओवळ्याच्या कल्पना सोडून देऊन केवळ मनोभावे केलेल्या भक्तीचा तो अंगीकार करतो. हे शेख महंमदाने केवडा, फणस, नारळ अशा उदाहरणांनी पटवून दिले आहे.

शेख मंहमद यांचा हा अभंग भावभक्तीचे महत्त्व पटवून देणारा अभंग आहे. मराठीतील संतसाहित्य हे अतिशय समृद्ध आहे संतांनी त्यामध्ये जातीधर्माच्या पलिकडे जाऊन ईश्वराचे रुप उलगडून सांगितले आहे.

लोकांच्या कल्याणाची तळमळ संतमंडळीच्या मनात होती, त्यामुळे फक्त स्वत:च्याच उद्धाराचा विचार त्यांनी केला नाही. सर्वांना समजणारी, रोजच्या जीवनातील उदाहरणे देऊन त्यांनी लोकांना स्वत: च्या आचारविचारामध्ये कोणते परिवर्तन आणायला हवे, याचा जिव्हाळ्याने उपदेश केला आहे. सदाचार, सद्‌गुणांच्या वाटेवर जाणारे संतांचे जीवन हे आदर्श जीवन असते त्यामुळे कर्मठपणापेक्षा नीती आणि भक्तीमध्ये जे सामर्थ्य आहे. त्याचा प्रसार त्यांच्या अभंगांमधून होतो.

●

# 15 अन्योक्ति

– **कृष्णशास्त्री चिपळूणकर**

(जन्म : इ.स. 1824, मृत्यू : इ.स. 1878)

19 व्या शतकातील श्रेष्ठ भाषांतरकार असणाऱ्या कृष्णशास्त्रींनी मराठी भाषते आपल्या लेखकाने अनमोल योगदान दिलेले आहे. अतिशय विद्वान अशा कष्णाशास्त्री यांनी 'पद्यरत्नावलि', 'अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी' ग्रंथरचना केलेली आहे. संस्कृत, मराठी, इंग्रजी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते.

यामध्ये 'अन्योक्ति ' या अलंकाराद्वारे पक्ष्यांच्या उदाहरणांतून त्यांनी मानवी स्वभावाचे दर्शन घडवले आहे.

---

**मयूरान्योक्ति**

**[ शार्दूलविक्रीडीत ]**

रत्नांचा जणुं ताटवा झळकतो, मोरा, पिसारा तुझा,
हर्षे नाचशि तैं गमे त्रिभुवनी पक्षी न ऐसा दुजा,
मोठा सुंदर तूं खरा परि दया नाहींच भिल्लांस या,
हे घेतील तुझ्या जिवा, झडकरी सोडीं अरण्यास या.

**बकान्योक्ति**

**[ शिखरिणी ]**

उभा राहे एके चरणिं धरणीते धरुनियां
तपश्चर्या वाटे करित जणुं डोळे मिटुनियां,
बका ऐशा ढोंगें तव अमति मासेच ठकती,
परि ज्ञाते तूझें कपट लवलाहीं उमजती.

**कोकिलान्योक्ति**

**[ वसंततिलका ]**

येथें समस्त बहिरे वसताति लोक,
कां भाषणें मधुर तूं करिशी अनेक.
हे मूर्ख यांस किमपीहि नसे विवेक,
वर्णावरून तुजला गणतील काक. ॥ 1 ॥

**[ शार्दूलविक्रीडित ]**

या माळावरि वृक्ष एकहि नसे, बाळा खुळया कोकिला,
येथें मंजुळ शब्द काढुनि गळा कां शोषिशी आपुला ?
जेथें बोल अमोल वाटति तुझे, तो देश, बा, वेगळा;
तेथें आम्र फुलोनि गंध विखरे चोहींकडे आगळा. ॥ 2 ॥

**[ पृथ्वी ]**

वसंतसमयीं फुले, परिमळें दिशा व्यापि जो,
जयास अवलोकुनी सुरतरुहि चित्तीं थिजो,
तया सतत सेविती विहग आम्रवृक्षा किती;
परी पिकचि एकला मधुर वाणि लाधे कृती. ॥ 3 ॥

**[ शार्दूलविक्रीडित ]**

कां, बा, सुस्वर शब्द काढिशि पिका? राहें उगा; काळ हा
लोटेतों तरुकोटरीं लपुनियां कोठे तरीही रहा.
पानें तीव्र हिमें गळोनि दिसती झाडें जळाल्यापरी,
गर्जेकर्कश शब्द थोर करुनी काकावली त्यांवरी. ॥ 4 ॥

## शब्दार्थ

**मयूर** मोर **ताटवा** समूह **हर्ष** आनंद **त्रिभुवनी** तीन भुवनांचा समूह (स्वर्ग, पृथ्वी, पाताळ) **दुजा** दुसरा **झडकरी** ताबडतोब लगेच **गमणे** आवडणे **तैं** त्यावेळी, तेव्हा **अरण्य** वन, रान

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) कवीने मोराच्या सौंदर्याचे कसे वर्णन केले आहे ?

(2) मोराला पाहून भिल्ल काय करतील ?

(3) कवी मोराला कोणता सल्ला देतो ?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

- मयूरान्योक्तिचा आशय स्पष्ट करा.

**3. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

(1) हर्ष = ________ (2) ताबडतोब = ________

**4.** ''हे घेतील तुझ्या जिवा, झडकरी सोडी अरण्यास या'' या ओळीचा अर्थ समजवा.

**5. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) मयूरासारखा सुंदर पक्षी कोठे नाही ?

(A) पृथ्वी (B) त्रिभुवन (C) पाताळ (D) स्वर्ग

(2) मोर पिसारा उघडून केव्हा नाचतो ?

(A) आनंदाने (B) दुःखाने (C) अतिरेकाने (D) परिचयाने

(3) मोराचे सौंदर्य पाहून कोणाला दया येणार नाही ?

(A) लोक (B) चित्रकार (C) मुले (D) भिल्ल

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- 'मोर' या पक्ष्याचा प्रोजेक्ट बनवा.

### शिक्षक-प्रवृत्ती

- या व्यतिरिक्त 'अन्योक्ति' मिळवा व त्याचे वाचन करा.

### शब्दार्थ

**बक** बगळा **अमति** मूर्ख **चरणिं** पायावर **धरणी** जमीन **ज्ञाते** ज्ञानी **लवलाही** ताबडतोब **उमजणे** कळणे **ठकणे** फसणे

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) बगळा डोळे मिटून काय करतो ?

(2) बगळयाचे ढोंग लगेच कोण ओळखतात ?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

- ज्ञानी आणि मूर्ख यांच्यातील फरक सांगा.

**3. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

(1) हर्ष = ________ (2) ताबडतोब = ________

4. 'बका ऐशा ढोंगे तव अमति मासेच ठकती' या ओळीचा अर्थ समजून सांगा.

**5. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) बगळा एका पायावर उभे राहून काय करतो ?

(A) चमत्कार (B) नाच (C) तपश्चर्या (D) व्यायाम

(2) जमिनीवर उभा राहून तपश्चर्या कोण करतो ?

(A) मोर (B) कावळा (C) कोकिळा (D) बगळा

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- 'बगळा' या पक्ष्याचा प्रोजेक्ट बनवा.

### शब्दार्थ

**वसणे** राहणे **समस्त** सर्व **काक** कावळा **माळ** मैदान **खुळा** वेडा **आम्र** आंबा **विखरणे** पसरणे **परिमळ** सुगंध **अवलोकणे** पाहणे **सुरतरु** देववृक्ष **विहग** पक्षी **पिक** कोकिळ **लाधे** युक्त, असणे **सुस्वर** चांगला आवाज **कोटर** घरटे **काकावली** कावळयाचे सतत ओरडणे **सेविती** वापरणे **आगळा** वेगळा **निराळा किमपीहि** किंचितही **हिम** बर्फ **काकावली** कावकाव

### टीपा

**विवेक करणे :** चांगले आणि वाईट यातील फरक ओळखून चांगल्याचा स्वीकार करणे.

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) बहिऱ्या लोकांसमोर कोकिळाने काय करु नये, असे कवी म्हणतो ?

(2) कोकिळेचा रंग पाहून लोक तिला काय म्हणतील ?

(3) कोकिळेने माळावर गायन करु नये, असे कवीला वाटते ?

(4) थंडीमध्ये कोकिळेने काय करावे, असे कवी म्हणतो ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) कवीने लोकांना मूर्ख का म्हटले आहे ?

(2) कोकिळचे गायन अमोल कोठे वाटेल ?

(3) वसंतऋतूतील आम्रवृक्षाचे वर्णन करा.

(4) थंडीच्या दिवसातील निसर्गाचे चित्रण करा.

**3. खालील ओळींया आशय स्पष्ट करा :**

(1) ''वर्णावरुन तुजला गणतील काक ''

(2) ''परी पिकचि एकला मधुर वाणि लाधे कृती''

**4. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) कवी लोकांना मूर्ख म्हणतो कारण त्यांना काय नाही ?

(A) समाधान (B) विवेक (C) गर्व (D) अभिमान

(2) कोकिळेन कोठे गाऊ नये, असे कवीला वाटते ?

(A) माळावर (B) घरात (C) जंगलात (D) शाळेत

(3) कोणत्या ऋतूमध्ये वातावरण सुगंधी असते ?

(A) शिशिर (B) हेमंत (C) वसंत (D)वर्षा

(4) कवी कोकिळेला कोठे लपण्यास सांगत आहे ?

(A) वनात (B) डोंगरात (C) गावात (D) घरट्यात

(5) काकावली म्हणजे काय ?

(A) कावळ्याचे ओरडणे (B) कोकिळेचे गाणे

(C) मोराचा आवाज (D) बुलबुलाचा आवाज

**5. खालील शब्दाचे समानार्थी शब्द लिहा :**

(1) कोकिळ = ________(2) कावळा = ________(3) गोड = ________(4) सुगंध = ________

**6. खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा :**

(1) सुस्वर x________ (2) मूर्ख x________ (3) सुगंध x________(4) विवेकी x________

**7. खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा :**

- कवीने कोकिलान्योक्ति मधून माणसांच्या स्वभावाचे कोणकोणते विशेष सांगितले आहेत ?

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- 'कोकिळ' आणि 'कावळा' या पक्ष्यांचा सचित्र प्रोजेक्ट वैशिष्ट्यांसह तयार करा.

# भाषासज्जता

**अन्योक्ति :**

अन्य – उक्ति म्हणजे दुसऱ्यास उद्देशून बोलणे. हा अलंकार आहे. यामध्ये एकाला उद्देशून बोललेले असले, तरी त्या बोलण्याचा रोख दुसऱ्याकडे असतो. या अलंकारात ज्यास उद्देशून बोलायचे त्याच्याबद्दल न बोलता दुसऱ्या कोणबद्दल बोलून आपले मनोगत प्रकट केले जाते.

यात कोकिळा, बगळा आणि मोर यांना उद्देशून कवीने मानवी स्वभावातील नमुने दाखवलेले आहते.

**मयूरान्योक्ति :**

या अन्योक्तिमध्ये कवीने अरसिक माणसांविषयी आपले मत व्यक्त केले आहे. काहीजण प्रत्येक गोष्टीतील सौंदर्य पाहण्याऐवजी त्यातून काय लाभ मिळतो, त्याचा काय उपयोग होतो याचाच विचार करतात. अशा अरसिकांचा स्वभाव मोराचे सौंदर्य न पाहणाऱ्या शिकाऱ्यांच्या उदाहरणातून कवी दाखवून देतो.

**बकान्योक्ति :**

शांतपणे एका पायावर उभे राहून ध्यानस्थ असणारा बगळा अगदी नेमकेपणे पाण्यातला मासा चटकन पकडतो आणि गिळून टाकतो. त्याच्या या सवयीमुळे त्याला कपटीपणाचे प्रतीक मानले गेले आहे पण त्याचे हे ढोंग अज्ञानी माशांना कळले नाही तरी जाणकारांना कळते. तो तपश्चर्या करणारा साधू नसून संधी शोधणारा भोंदू आहे हे ज्ञानवंतांना लगेच कळते असे कवी सांगतात म्हणूनच खोटया ध्यानास 'बकध्यान' असे म्हटले जाते.

**कोकिलान्योक्ति :**

कवीने कोकिळेच्या निमित्ताने माणसाच्या स्वभावाचे वर्णन केले आहे. कोकिळेला त्यांनी केलेल्या सूचनांतून त्यांनी वास्तविक माणसाच्या वागणुकीतील विसंगतीवर आणि दोषांवर बोट ठेवले आहे.

(1) बुद्धी असूनही माणूस कधीकधी अडाण्याप्रमाणे वागतो, कारण चांगले वाईट यातील फरक तो ओळखू शकत नाही कोकिळा व कावळा दोघेही काळे असले तरी त्यांच्या गुणात खूप अंतर आहे. बाह्यस्वरुपाचे केलेले कौतुक करायला हवे हे सूचवले.

(2) कोकिळेचा स्वर मुधर असला तरी उघड्या–बोडक्या मैदानात त्याचा आनंद घेणारे रसिक नसतात;म्हणून कवी त्याला जेथे त्याच्या गुणांचे कौतुक आहे अशा ठिकाणी जाण्यास सूचवले अरसिक जगापुढे आपली कला सादर केल्यास काहीच लाभ होत नाही.

(3) डवरलेल्या आंब्याच्या झाडांवर अनेक पक्षी येऊन त्याच्या फळांचा आस्वाद घेतात पण एकटा कोकिळ मात्र त्याला आपल्या मधुर गीतांची परतभेट देत असतो.

(4) कडाक्याच्या थंडीच्या पानगळतीच्या काळात निष्पर्ण झाडांवर फक्त कावळयांची कावकावच ऐकू येते अशावेळी कोकिळाचे मधुर गायन कसे काय कानी पडेल ? म्हणून कोकिळाने अशा ऋतूत गाऊ नये, असे कवी म्हणाले. बुद्धिमान लोकांनी योग्य संधीची वाट पाहूनच आपल्या कार्यास प्रारंभ करवा, अन्यथा ते यशस्वी होत नाही, असे यात सूचवले.

●

| 16 | # जगावेगळा न्याय |
|---|---|

**– बाबा भांड**

(जन्म : 1949)

बाबा भांड बालवीर चळवळीत राष्ट्रपती पदकाचा सन्मान मिळालेल्या बाबा भांडांनी प्रौढ शिक्षणाच्या क्षेत्रातही वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केली. त्यांच्या एकूण सहा कांदबऱ्या, एक कथासंग्रह, बारा प्रवासवर्णने, बारा किशोर कादंबऱ्या, नऊ बालकथासंग्रह, दोन एकांकिका प्रसिद्ध झाल्या आहेत. 'जरंगा', 'धर्मा', 'काजोळ दशक्रिया', 'पांढऱ्या हत्तीची गोष्ट', 'तंट्या' या कादंबऱ्या खूपच गाजल्या. तसेच 'कायापालट' कथासंग्रह 'लागेबांधे' 'पांगोरे आणि पारंब्या' ही प्रवासवर्णनही अतिशय गाजली या शिवाय त्यांनी प्रकाशन, संपादन क्षेत्रातही भरीव स्वरुपाची कार्य केली आहे. त्यांच्या या विपुल व कसदार साहित्यनिर्मिती बद्दल महाराष्ट्र शासनाचे सात पुरस्कार राष्ट्रीय स्तरावरील महाराष्ट्र फाँडेशनचा व इतर अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. त्यांना बालकुमार आणि युवक साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचाही बहुमान मिळाला आहे.

''जगावेगळा न्याय'' हा पाठ 'तंट्या' कादंबरीतून घेण्यात आला आहे. प्रस्तुत पाठात लेखकाने एक दरोडेखोर तंट्या ब्रिटिश सरकारचा वैरी आणि गावकऱ्यांचा रक्षक असतो. तंट्या हा भिल्ल जमातीतला दरोडेखोर होता. ब्रिटिश सरकारने त्याला पकडण्यासाठी इनाम ठेवले होते. पण तो गरीब लोकांना छळत नव्हता फक्त जुलमी लोकांना लुटत होता. गरीबांचा रक्षक होता. आणि ब्रिटिश सरकारचा विरोध करणारा होता.

---

वाजविणाऱ्यानं दुडक्या चालीनं ढोल बडवायला सुरुवात केली. टेंभे घेऊन आलेल्या तिघांनी ठेक्यात मोकळया जागी फेर मारला.

'पकडो – धरो – भाग जायेंगा साला ! टुम भाग गया, तो हमारी नोकरी चली जायेगी. वो बडा साब हमारी खाल निकाल देगा.'

काळया डगल्यांतले दोन पोलिस एका धिप्पाड माणसाला ओढीत आणत होते. त्या माणसाच्या दोन्हीं दंडांना दोर बांधलेले होते. कमरेला फक्त धोती गुंडाळलेल्या माणसाच्या गळयात मोठमोठे ताईत आणि दंडात कडे होते. झुपकेदार मिश्या, लाल आणि गरगरणारे डोळे.

त्यां माणसानां दोन्ही हातांनी दोराला झटका दिला. काळया डगल्यांतली माणसं धडपडून एकावर एक पडली आणि उठण्यासाठी धुडपडू लागली.

'अरे, साला तंट्या, तू सैतान हे क्या हैवान है?' म्हणत जमिनीवर गडबडा लोळू लागली.

त्यां कैद्यानं झटका देऊन काळया डगल्यांवाल्यांच्या हातून दोरखंड हिसकावून घेतला. दंडाचा दोर सोडला. एका काळया डगल्यावाल्याचे त्या दोरखंडान पाठीमांग हात बांधले. त्यांचे कपडे काढले. दुसऱ्याचे हातही पाठीमागं आवळले. दोघांना कोलदांडा घालून लबंडून दिलं. पोलिसांचा काळा डगला अंगावर चढविला आणि खुरमुंडी घालून बोंबालणाऱ्या पोलिसांना म्हणाला,

'पुना कदी येनार ह्या तंट्याले पकडायले?' आणि तो गर्जना करीत झेप टाकून निघून गेला. गर्दीत तंट्यामामा की जय असा आवाज घुमला.

कोपऱ्यातल्या अंधारात उभा राहून तंट्या वरातीसमोरचं सोंग पाहत होता. तंट्याचं सोंग निघून गेलं आणि गर्दीच्या जय आवाजानं त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले होते.

तंट्या अंधारात दोन पावलं मागं सरकला. जावं, की जाऊ नये लोकांसमोर! त्याच्या मनाचा झगडा सुरू झाला.

'उंकार; तू जा माली पटलाकडं. म्हनावं – तंट्या आलाय. नवरा – नवरीये बगायचं हाय आन् आशीरवाद द्यायचा त्येला.' तंट्यानं उंकारला सांगितलं.

उंकारनं गर्दीतल्या एकाला मालीपाटील कुठं म्हणून विचारलं. चावडीच्या ओट्यावर मालो पाटील मांडी घालून बसले होते. त्यांच्या एका बाजूला पटवारी आणि दुसऱ्या बाजूला लहान भाऊ बसले होते आणि वरातीसमोरचं सोंग बघण्यात ते तल्लीन झाले होते.

'राम राम भाऊ, म्या तंट्याचा मानूस हाय. तंट्यामामा आलाय्. त्येला नवरा-नवरीला मामेजा द्यायचा हाय.'

एकदम समोर वाघ दिसल्यासारखे माली पाटील दचकले. नुकतेच तंट्याचं वरातीसमोरचं सोंग त्यांनी पाहिलं होतं. तंट्याच्या बहादुरीनं ते भारावले होते मनानं अजून त्या प्रसंगातून बाहेरे आले नव्हते. आणि नेमका तंट्या आलाय्, ह्या खबरीनं ते भाबावून गेले.

क्षणभर त्यांना काही सुचलं नाही.

'तुमची इच्छा नसली, तर नही येनार त्यो, मामा म्हनाला.' उंकार पुन्हा बोलला.

उंकारचं बोलणं एकलं आजूबाजूच्या एक दोघांनी आणि तंट्या आल्याची बातमी झाली सगळीकडं.

माली पाटील मणामणाचं डोक्यावर ओझं असल्यासारखे उठले.

'चल बाबा, तंट्यामामाला नाही कोण म्हणणार?'

तंट्याला घेऊन माली पाटील नवरा-नवरीच्या गाडीसमोर आले. सगळे तंट्याकडं विस्फारलेल्या नजरेनं बघत होते. नवऱ्या मुलान बाशिंग बांधलेलं होतं आणि नवरी मुलीनं ओढणीचा घुंगट घेतला होता.

'पाटील. नशीबवान हाव तुमी, शंकर-पारबतीचा जोडा दिसतुया ह्यो तंट्यामामाचा आशीरवाद हाय दोघांस्नी. ह्या तंट्याले भयीन नहीं पाटील. तुमची ही सून बयीन झाली आज तंट्याची. भयनीचं तोंड बगायची इच्छा हाय माजी.'

'मामांजी, त्येला सांगा, म्या तोंड नही दावणार.'

आवाज ऐकला माली पटलांनी आणि ते नवरीच्या धिटाईनं चरकलेच. लागलीच स्वत:ला सावरलं त्यांनी.

नवरीचे शब्द ऐकून तंट्या चरकलाच.

'पोरी तंट्यामामानं तुला बहीन मानलं. चांगला माणूस आहे तो.'

'त्येला इचारा मामानी, तंट्याची बहादुरी आमी ऐकून हाव. आई-भयनीची कदर करत्यु यो. पर जामली गावात त्येनं सावकाराच्या पोरीले छेडलं. असा मानूस कसा भाऊ व्हईल माजा ?'

चटका बसला तंट्याच्या सरळ मनाला.

'ताई, तंट्यानं एकदा भयीन मानले तुले. म्या डाकू हाय, दरोडेखोर हाय. सरकारशी माजी दुश्मनी हाय. पर ह्यो तंटा खोटा नहीं. बदमाश नहीं.' भावल्याकडं वळून तंट्यान विचारलं, 'कोन गेल व्हतं त्या गावच्या सावकराकंड?'

क्षणभर जीवघेणी शांतता परसली. खाली मान घातलेला लछमन पुढं आला.

'लछमन, तु व्हता. ह्या तंट्याच्या तोंडाले काळं फासलं त्वा. ही खबर आमले कशी नहीं कळली आता पस्तुर.' तंट्या संतापानं ओरडला. 'कोनत्या हातानं छेडलं त्वा?'

'मामा, मुद्दाम नहीं झालं ते. सावकाराला म्या बायेर वडत असताना ती पोरगी मदी आली. तिचा हात धरून बायेर वडलं तिले.'

'त्यो हात पुडं कर.' तंट्या गरजला.

लछमननं निर्धारानं उजवा हात पुढं केला. कमरेच्या तंग्यानं मनगटावर वार केला तंट्यानं. मनगट तुटून रक्ताची चिळकांडी उडाली. लछमननं दाताखाली ओठ दाबून डोळे बंद केले.

'उंकार, लछमनला गाडीत घालून घिऊन जा खंडव्याले. डॉ. सदाशिव राऊतना सांग, तंट्याचा मानूस हाय.'

तंट्याच्या जगावेगळया न्यायानं सगळे हादरून गेले होते.

'ताई, माफ कर या तंट्याले. माज्या मानसानं गलती केली. त्येची शिक्शा देली तुमच्या समूर. ह्यो तंट्याचा न्याय हाय. येतू म्या.' तंट्या जायला निघाला.

'तंट्यादादा, भयीन मानली, तिचं तोंड न बगता तसाच जानार का?' आवाज ऐकून तंट्याची पावलं अडखळली. खडकाला पाझर फुटल्यासारखे दोन्ही डोळयांतून आसवं गालावरून अघळू लागली.

'ताई, ह्यो तंट्याबी मानूस हाय. मले सगळं भेटत हाय. पर एक दुख आत काळजाला डागण्या देतंय् लयी दिसापासून. माय लवकर गेली सोडून मले. पाटची भयीन डोळयांम्होर तडफडून मेली. तवापासून वरातीत नवरी दिसली, की भयीन दिसती डोळयांम्होरं; पण ह्यो तंट्या पडला डाकू लोकाच्या नजरेम्होर. म्हून म्या हिंमत करत नव्हतू वरातीत यायला. आज मन म्हनत व्हतं, चाल व्हय पुडं आन् आलू हिथं. म्या आता भयीन मानलं तुले. पुनवंला राकी बांदायला यीन.' तंट्यानं डोळे पुसले. नवऱ्या मुलाकडं बघून हसून म्हणाला, 'तुमी आमचं दाजी हाय आता. देवीसारकी बायकू भेटली तुमाले. तिले जपा दाजी. कायी येळ परसंग आला, तर हुकूम करा. ह्यो तंट्या, जिथं आसंन, तितून धावत यील.'

तंट्यानं खिशात हात घातला. ओंजळभर पैसे नवरीच्या ओटीत टाकले.

'पाटील, माज्यामुळं खोळंबा नकू वरातीचा. वाजवा, रे बँडवाले.' तंट्या म्हणाला. बँड वाजू लागला. वरात निघाली. आजूबाजूला पोंर तंट्याचा जयजयकार करत नाचू लागली आणि तंट्या समाधानात बँडमागून चालु लागला.

मि. नेलर साहेबांनी तंट्याच्या नातवाईकातील निवडक वीस माणसांची एक तुकडी बनवली होती. सुरुवातीला धाक – दडपशाहीनं त्यांना ह्या कामाला जुंपलं. यातील काहींनी पोलिसांना सहकार्य करण्याची तयारी दाखवताच सरकारी नोकरींच आणि घसघशीत बक्षिसाचं गाजर त्यांच्यापुढं धरलं होतं.

डोंगरातील पायवाट, दऱ्याखोऱ्या आणि तंट्याच्या संभाव्य निवाऱ्याच्या जागा शोधण्याची धडक मोहीम पोलिसांनी सुरू ठेवली होती. आडरानाच्या पायपिटीशिवाय पोलिसांना फारसं हाती काही आलं नव्हतं.

उलट तंट्यानं थोड्या दिवासंच्या अंतरानं मालगुजार, सावकारान धडा शिकविण्याचं काम सुरूच ठेवलं होतं आणि यामुळं पोलिसांची कार्यवाही निष्फळ ठरत होती.

आज हिरापूरचा बाजार होता. डिसेंबरचा महिना असल्यानं बाजारात मालाची आवक वाढली होती. बाजारात माल जास्त येणार, ह्या कल्पनेनं बाजारातील व्यापाऱ्यांनी गेल्या बाजारापासून मालांचे एकदम भाव कमी केले होते.

बाजारासाठी आजूबाजूच्या गावांवरून माणसं येऊ लागली होती. काहीजण डोक्यांवर माल घेऊन येत होते, तर जास्त माल असणारे बैलगाड्यांनी येत होते.

हिरापूरच्या चारही रस्त्यांवर गावाबाहेर तंट्याच्या सांगण्यावरून ठाकूर नारायणनं आपली माणसं उभी केली होती. समोरून दोन बैलगाड्या येताना दिसल्या. बळवंत काळे चटकन गाडीच्या जवळ आला.

'राम राम काका, काय आणला माल विकायला?' बळवंतनं विचारलं.

## शब्दार्थ

**ठेक्यात** तोऱ्यात **कोलदांडा** अटकाव, अडवणूक **खुरमांडी घालणे** बसणे, बैठक मारणे **चावडी** गावातील मुख्य जागा, चव्हाटा, ठिकाण **काळीज** मन **खोळंवा** विलंब, खोटी, उशीर, अडवणूक **निष्फळ** असफल

## वाक्प्रचार

**खाल निकाल देना** कातडी सोलणे (भयंकर शिक्षा) **अंगावर रोमांच उभे राहणे** अंगावर काटे येणे **तल्लीन होणे** मग्न होणे, गुंग होणे **मामिजा देणे** नवरीला लग्नात मामाकडून येणारा आहेर **हादरून जाणे** थक्क होणे, घाबरून जाणे **बक्षिसाचे गाजर धरणे** बक्षिसाची लालूच दाखवणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) पोलिस कोणाला ओढीत आणत होते ?

(2) चावडीच्या ओट्यावर मांडी घालून कोण बसले होते ?

(3) तंट्याने कुणाला बहीण मानले होते ?

(4) तंट्याने कुणाचे मनगट तोडले होते ?

(5) तंट्याने नवरीच्या ओटीत काय टाकले होते ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) तंट्यानं उंकारला काय सांगितले ?

(2) तंट्या कोण होता ? त्याची दुश्मनी कोणा बरोबर होती ?

(3) तंट्याला पाहताच माली पाटील का दचकली ?

(4) तंट्या दाजीला काय म्हणाला ?

(5) तंट्याने पोलिसांना कसे मारले ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) नवरीने तंट्याकडे कोणती तक्रार केली ?

(2) तंट्याचे विस्तृत स्वभावचित्र रेखाटा ?

(3) तंट्याने लछमनला शिक्षा का केली ?

(4) तंट्याने कोणता न्याय केला ?

**4. खालील विधाने कोण - कोणस कोणत्या प्रसंगी म्हणाले ते सांगा :**

(1) 'पकडो - धरो - भाग जायेगा साला ? टुम भाग गया तो हमारी नोकरी चली जायगी.

(2) 'पुना कदी येणार हया तंट्याले पकडायले'?

(3) 'राम राम भाऊ म्या तंट्याचा मानूस हाय, तंट्यामामा आलाय. त्येला नवरा-नवरीला मामेजा द्यायचा हाय.'

(4) 'मामंजी', त्येला सांगा, म्या तोंड नाही दावणार.

(5) 'राम राम काका, काय आणला माल विकायला' ?

**5. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) तंट्या कोण होता ?

(A) पोलिस (B) पाटील (C) पटवारी (D) दरोडेखोर

(2) कुणाच्या मुलाचे लग्न होते ?

(A) तंट्याच्या (B) पाटलाच्या (C) लछमनच्या (D) उंकारच्या

(3) तंट्याची कोणाशी दुष्मनी होती ?

(A) सरकारशी (B) पोलिसांशी (C) पाटलाशी (D) लछमनशी

(4) तंट्या कुणाला आशिर्वाद द्यायला जाणार होता ?

(A) बहिणीला (B) उंकारला (C) नवरा-नवरीला (D) यापैकी एकही नाही

(5) हिरापूरचा बाजार कोणत्या महिन्यात असतो ?

(A) जानेवारी (B) फेब्रुवारी (C) मार्च (D) डिसेंबर

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- आण्णाभाऊ साठे यांची 'वारणेचा वाघ' ही कादंबरी वाचा.

**शिक्षक-प्रवृत्ती**

- ही कथा नाट्यरुपाने लिहून विद्यार्थ्यांनकडून सादर करून घ्यावी.

●

# 17 किल्ला

**– अनिल अवचट**

(जन्म : 1944)

डॉ. अवचट यांनी वैद्यकीय शिक्षण घेऊनही आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी अर्पण केले समाजातील शोषित, दलित उपेक्षित आणि वंचिताचे दु:ख त्यांनी अभ्यासले आणि आपल्या लेखनातून या दु:खाला वाचा फोडली. प्रत्यक्ष पाहिलेल्या समाजातील वास्तवाचे त्यांनी चिंतन केले आणि स्वत: काही संस्था उभारुन त्याद्वारे सामाजकि प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला कारण प्रत्यक्ष कार्य करण्यावर त्यांचा भर आहे. एका सामाजिक मेळाव्याच्या वेळी त्यांनी या लेखामध्ये त्यांच्या निरीक्षणातून फक्त किल्ल्यांचें वर्णन केलेले नाही तर भोवती असणाऱ्या इतिहासाचे सुद्धा वर्णन केले आहे. त्यांनी पूर्णिया, वेध–आप्त, छंदाविषयी मोर इ. पुस्तके लिहिली आहेत.

---

परांड्याला न्हावी आणि चांभार याचा मेळावा होता. या गावाचं नाव कधीतरी उडत ऐकलं असेल तेवढंच. चौकशी केली तेव्हा समजलं, बार्शीहून गाडी बदलून जावं लागतं. उन्हाळयाचे दिवस. सगळा भाग उजाड, सपाट, शेतं नसलेली, मैलोगणती पसरलेली रेताड जमीन. अधूनमधून बाभळीची झाडं.

परांडं जवळ आलं. तसा एक मोठा दगडी कोट दिसू लागला. त्यावर तटावर असतात तशी वर निमुळती होत गेलेली दगडांची टोकं दिसली. जवळ आलो तसा दुहेरी तट दिसला. एक खालच्या पातळीवर, एक आतल्या बाजूला जराशा उंच पातळीवर. कडेला मोठेमोठे दगडी बरूजच चाकणचा भुईकोट किल्ला ओतूरला जातांना नेहमी पाहतो. तो अर्धा मातीचा. सगळीकडं खिंडारं, पडझड झालेली. त्यापेक्षा हा फारच सुस्थितीतला दिसला.

एस.टी.त शेजारी पायजमा–शर्टातला एक बोलका माणूस होता. त्याची ओळख आधी करून घेतली होती. तो रेव्हिन्यू क्लार्क होता. त्याला विचारलं, ''हा किल्ला कसला हो ?''

त्यानां माझ्या सन्मानार्थ इंग्रजी–कम–मराठीत उत्तर दिलं, ''ग्रेट शहाजीज फोर्ट. हिअर हिज फिफ्थ मॅरेज झालं.'' हसला.

स्टँड किल्ल्याजवळच होता. उतरलो. परांडं भलतंच लहान होतं. वास्तविक हे तालुक्याचं गाव. रामभाऊ यादवांचा पत्ता विचारला. एका पोरानं एक सलून दाखवलं. एका टपरीत दोन खुर्च्या आणि मागं दोनचार बाकडी. फाटक्या मळक्या शर्ट–पायजम्यांतले दोनचार कार्यकर्ते वाटच पाहत होते. मेळाव्यासाठी आलेले चारसहा पागोटेवाले बलुतेदारही आले होते. त्या भागातली दुष्काळीं परिस्थिती, बलुतेदारांची होणारी पिळवणूक यांच्या कथा ऐकल्या. संभाषणातून आता नवीन काही मिळेनासं झाल्यावर मी किल्ल्याचा विषय काढला.कबीर शिंदे नावाचा दलित कार्यकर्ता म्हणाला, ''आत खूप भुयारं आहेत. फार पाहण्यासारखा आहे आतून.''

तिथं बसलेला म्हातारा म्हणाला, ''एक्कावन सालाला स्फोट झाला व्हता तवा एका बाजूचा भाग उडालाय.''

कबीरनं सांगितलं, ''किल्ल्यात मागं मुन्सफ ऑफिस होतं. तिथ बंदोबस्ताला दोन पोलीस होते. एकानं विंडी टाकली ती भुयारातल्या दारूगोळयावर पडली. पोलीस जे उंच उडाले, त्यांचे तुकडेही हाती लागले नाहीत. त्यानंतर मग सरकारनं ती उरलेली सगळी दारू विहिरीत बुडवली. भुयारांचे रस्तेही बंद केले. आता एकदोन ठिकाणीच खाली जाता येतं.''

''बघायला मिळेला का किल्ला आतंन?''

''जाऊ की. चला. आत जाऊ.''

कबीर आणि एक म्हातारा सिंधूराव बरोबर निघाले.

जीर्ण तट्टयाची रसाची गुऱ्हाळं, बर्फाचे गोळे विकणाऱ्या दोनतीन मोडकळीस आलेल्या गाड्या ओलांडत आम्ही एक पूल ओलांडला आणि किल्ल्यासमोरच उभे राहिलो.

पुलाच्या खाली किल्ल्याभोवती सगळीकडून खोल गेलेली जागा होती. तिथं एक तट. दुसरा पुलाच्या टोकाशी मोठा दरवाजा होता. त्यालगत कोपऱ्या कोपऱ्यावर मोठे दगडी प्रचंड बुरूज होते.

दरवाजा अर्धाअधिक झिजून नष्ट झाला होता. उरलेल्या दरवाज्यात आत वाळवीचं लाकूड आणि बाहेरून गंजलेला पत्रा. त्यावर चारपाच इंच पुढे आलेले खिळे होते. कबीर म्हणाला, ''हत्तीला धडका मारता येऊ नयेत म्हणून हे खिळे.'' दरवाजा तीसेक फूट उंच असेल. झिजून मोडलेल्या भागात सध्याच्या काळात बसवलेल एक इंची फळीचं दार होतं. दारात वॉचमन होता. मळक्या पायजमा शर्टातला. तोही आमच्याबरोबर आत आला.

आत समोर चिंचोळा रस्ता होता. तो पन्नाससाठ फूट उंचीच्या शेदीडशे फूट व्यासाच्या दोन बुरूजांमधून जात होता. बुरुजांचे दगड रेखीव चौकोनी. मी विचारलं. ''हे आत बुरूज कशासाठी ? आणि याच्या आत काय आहे ?''

कबीर म्हणला, ''याच्या आत खाली भुयारं. या किल्ल्यात वर फारसं नाही; सगळं आहे ते खाली''

असं म्हणून त्यानं बुरुजाच्या पायापाशी रस्त्याच्या कडेला एक मोठं भोक होतं त्यात बाकून बाघायला सांगितलं. खाली चांगली शंभर फूट पोकळी होती. त्याखाली पाण्याचा प्रवाहही दिसला. आश्चर्यच वाटलं.

दोन बुरुजांमधून चालताना चित्रात पाहिलेल्या सुमेरियन संस्कृतीतल्या किल्ल्यांची आठवण झाली. बुरुजाला वेढा घालून आत आलो आणि दगडी पायऱ्यांवरून वर चढू लागलो. तो रस्ता त्या बुरुजावर जात होता.

बुरुजाच्या मधोमध आडवी तोफ पडलेली होती. वीस फूट लांबीची, तीनचार फूट व्यासाची. काळपट पिवळा धातू असावा. इतरत्र गंजलेल्या तोफा पाहायची सवय. ही चकचकीत होती. मागं नक्षी होती. अंगावरही नक्षीदार पट्टे होते. त्यावर लपेटदार उर्दू अक्षरांत काहीतरी लिहिलेलं. मधे दोन वर आलेले छोटे कुत्रे किंवा सिंह असे प्राणी दिसत होते. दुपारचं उन्ह. म्हणून म्हटलं, ''चांगलीच तापली असणार तोफ.''

सिंधूराव म्हणाले, ''हीच तर गंमत आहे. तोफ पंचधातूत ओतलेली आहे. हा धातू तापचत नाहीं.''

मी जरा जपून हात लावला. तोफ अगदी गार नसली तरी बरीच कोमट होती. उन्हाच्या मानानं तर काहीच तापलेली नव्हती.

मी भोकाकडून पाहिलं. वीत-दीड वीत व्यासाच्या भोकात पोरांनी दगडधोडे टाकून ठेवलेले दिसत होते. मागं रुंद होत गेलेल्या भागावर एक छोटं भोक होतं. मी म्हटलं. ''ही बत्ती द्यायची जागा का ?''

सिंधूराव म्हणाले, ''हो. तोफेत पुढून दारू शेवटपर्यंत ठासून भरत. शेवटी तोंडापाशी गोळा भरत. आणि इथून बत्ती लावत.''

एवढी तोफभर दारु भरल्यावर कसला प्रचंड स्फोट होत असणार याची कल्पना करू लागलो.

बरुजावर फिरताना कडेला एक चौकोनी भोक होतं आणि खाली अडीच-तीन फुटांची पोकळी दिसत होती. ''हे काय ?'' असं विचारल्यावर वॉचमन म्हणाला, ''तोफेला बत्ती दिली की लगेच इथं येऊन खाली जाऊन बसायचं. कानाचं पडदं फाटू नाही म्हणून.''

कबीर म्हणाला, ''ह्या तोफेचा गोळा खर्ड्यापर्यंत जायचा. त्या बुरुजावरचा बार्शीपंर्यत. तिकडला माथ्यापर्यंत आणि त्या बाजूचा करमाळयापर्यंत. अशी संरक्षणाची व्यवस्था होती.''

बुरुजावरनं परांडं दिसत होतं. आसपासचं माळरान बघगं डोळयांना त्रासदायक होत होतं. परत पायऱ्या उतरून खाली आलो.

मधे एक बांधीव इमारत होती. तिच्या एका भिंतीवर लिहिलेलं होतं. :'पेशाब करना मना है.' कबीर म्हणाला, ''ही मशीद. खरं म्हणजे मशिदीसारखं आत काही नाहीं.'' सिंधूराव म्हणाले, ''ते पूर्वीचं देऊळ असणार. मुसलमानांनी मशीद केलीय.'' कबीर उत्साहानं म्हणाला, ''तुम्ही सगळीकडे बघा, अशोकचक्राचं डिझाइन आहे. अशोकाच्या वंशजांनी बांधलेला किल्ला असेल हा.''

कबीर नवबौद्धा असल्याचं आठवलं नि हसू आलं. कबीर ज्याला अशोकचक्र म्हणत होता ते देवळांवर नेहमी दिसणारं, गोलात कोरलेलं कमळ होतं !

घडीव दगडांनी बांधलेलं ते भव्य दालन होतं. बाजूला पायऱ्यापायऱ्या आणि वर दगडांत कोरलेलं छोटं सिंहासन होतं. समोर चटई अंथरलेली होती. स्थानिक मुसलमान रोज तिथं नमाजाला येत असावेत.

जाता जाता कबीर दाखवत होता, ''इथं भुयाराचं तोंड होतं. इथून थेट तिकडं जाता येत होतं. पण आता बुजवलं.'' एका ठिकाणी जरा उतरून खाली गेलो. जमिनीपासून सातआठ फूट खालच्या पातळीवर असलेल्या दालनात जमिनीवर कलिंगडाच्या आकाराचे मातट रंगाचे शे-दीडशे गोळे मांडून ठेवलेले होते. काही चेंडूच्या आकाराचेही होते. हे तोफेचे गोळे. छोटा गोळा उचलून पाहिला. बराच जड होता. सिधूराव म्हणाले, ''यात लोखंड आणि शिसं असतं. स्फोटामुळं गोळा बाहेर फेकला गेला की आदळेपर्यंत त्याचे छर्रे बनतात.'' भिंतीला बंदुकीपेक्षा दुप्पट आकाराच्या छोट्या पंचवीस-तीस तोफा उभ्या करून ठेवलेल्या होत्या. त्या पूर्ण गंजलेल्या होत्या.

वर आलो. कबीरनं मोकळ्या मैदानात आणलं. मधे मुगल चित्रांत पाहतो तसा छोटा बांधीव मंडप होता. त्याला चुन्याचा गिलावा होता. त्या रणरणत्या उन्हातही दृष्टीला थोडं बरं वाटलं. मंडप ओलांडून विटांच्या पडक्या बांधकामातल्या एका भगदाडापाशी कबीर गेला आणि म्हणाला, ''इथं बसून खाली बघा. अंधारामुळं पहिलं काहीच दिसणार नाही; पण नंतर दिसतं.''

मी. बसलो; आत डोकावलो. खरोखरच काही दिसत नव्हतं. मग कमानीचा आकार दिसला आणि नंतर साठ-सत्तर फूट खोलीचं कमानीकमानींच प्रचंड दालन दिसलं. कबीर म्हणत होता, ''मागं भुयारं खुली होती तेव्हा आम्ही खाली गेलेलो आहे. खाली सगळा कचरा होता. कुबट वास येत होता.''

डोळ्याच्या पातळीवर दालनाचं छत होतं. काळपट रंगाची वटवाघळं इकडून तिकडं भराभ्भर जात होती. काही छताला उलटी लटकलेली होती. माझ्या बाजुला उजेडाच्या दिशेंन जरा यायची आणि लगेच बाजूला फिरायची. त्यांच्या पोटाकडील गुलाबीसर, ठिपक्यांचा भाग दिसून जायचा. एक तर माझ्या डोळ्यांवर आल्यावर मी घाबरून मागं सरलो. बाहेरच्या प्रकाशानं परत डोळे दिपले.

कबीरनं एका विहिरीपाशी आणलं. खाली वाकून पाहिलं. खूप खोलवर हिरवट रंगाचं पाणी दिसलं. वेगळेपण म्हणजे विहिरीच्या गोल भिंतींऐवजी तिच्यात कमानीकमानी असलेली दालनं दिसली. बाजूनं उतरून आत गेलो. विहिरीचं पाणी अधिक जवळ आलं होतं. त्या विहिरीभोवती एक व्हरांडाटाइप गोलाकार दालन होतं. त्या दालनातून त्रिज्येसारखे दूर जाणरे अंधारे, बांधीव प्रशस्त रस्ते होते. कबीर म्हणाला, ''मघा आपण ती जागा वरून पाहिली ना, तिला इथून रस्ता आहे. पण आता तो बुजलाय.''

मी म्हटलं, ''पण एवढं जमिनीखाली बांधयचं काय कारण ?''

तो म्हणाला, ''शत्रू आला की इकडून तिकडं पळता यावं, निसटून जाता यावं...''

सिंधूराव जरा हसून म्हणाले, ''मुख्य म्हणजे त्यांच्या बायकामाणसांना लपवता यावं. त्यां काळात ते महत्त्वाचं होतं! ''आम्ही हसलो.

दुसऱ्या बाजूचा दरवाजा पाहिला. वरच्या नगारखान्यात गार वारं येत होतं. कोणीतरी माणूस निवान्त झोपला होता. कबीर म्हणाला, ''उन्हाळा आला की परांड्यातले बरचे लोक दुपारी किल्ल्यात झोपायला येतात. इथल्यासारखा गारवा कुठंच नाही.''

त्या बाजूच्या बुरुजावर मघा पाहिली तसलीच पंचधातूची तोफ होती. कबीर म्हणाला, ''ही तोफ म्हणजे एकदम बाँब.''

मी चमकून म्हटलं, ''काय, बाँबेपर्यंत गोळा जायचा ?''

तो खजील होऊन म्हणाला, ''म्हणजे दिशा तिकडं.''

खाली तटबंदी, नंतर दुसरी तटंबंदी. त्यानंतर कोरडा खंदक होता. कोरडा खंदक वरून पाहिल्यानं प्रथमच लक्षात येत होता. त्याच्या कडेला एक उंच कमानी घर होतं. सिंधूराव म्हणाले, ''तो दरवाजा आहे ना, तिथून सीना नदीपर्येत भुयार आहे. शत्रू आला की तिथली दारं उघडली की खंदक भरून जायची सोय होती.'' मग त्यांनी लांबवर एक तळं दाखवलं. ते पुढं म्हणाले, ''त्यां तळयातूनही खंदक भरायची सोय आहे.''

शेवटी 'करमाळा तोफ' पाहिली. ती लोखंडाची व तांब्याची आहे. काळपट लालसर रंग आहे. वर मोठमोठ्या कड्या आहेत. खाली उतरलो. वॉचमनचा निरोप घेऊन परतलो.

कबीर म्हणत होता, ''या किल्ल्याशिवाय परांड्यात काही नाही बघा. किल्ला आहे म्हणून परांडा आहे. बाहेरगावचे लोक 'किल्ल्याचं परांड' म्हणूनच गावला ओळखतात. या गावाचं कधी पेपरात नाव छापून येत नाही. सगळा दुष्काळी भाग. हां परवा जवळच्या कुकडगावला दलितांवर अत्याचार झाला. बाबा आढावना बोलवलं. त्यांनी महाराष्ट्रभरच काय पण गुजरातपर्यंत परांड्याचं नाव पोचवलं बाकी.''

किल्ल्याच्या जवळच सापवाल्या मदाऱ्यांची पालं उतरलेली होती. हिरवेतांबडे झेंडे लावल्यावरून लग्न लागल्याचा अंदाज मघा जाता नाच केला होता. आता तिथं गावकऱ्यांची गर्दी जमलेली होती. आरडाओरडा चाललेला होता. डोकावून पाहिलं, लग्नातल्या कुठल्यातरी भांडणावरून सगळया जमातीत आपसात मारामारी जुंपली होती. बायकापोरं, पुरुष रक्तबंबाळ झाले होते.

मठात मेळावा झाला. गुलाबी आणि पिवळया पागोट्यांनी जागा गच्च भरली होती. भाषणं झाली. पण डोक्यातून किल्ला जात नव्हता.

मेळाव्यात न्हावी समाजातले परांड्याचे मोरे वकील बोलले होते. त्यांनी नंतर घरी चहाला बोलवलं. त्यांना मी किल्ल्याचा इतिहास विचारला. ते म्हणाले, ''नक्की इतिहास अजून तरी कुणाला ठाऊक नाही. पण बहामनी काळातला हा किल्ला असावा, असं म्हणतात.'' थांबून ते म्हणाले, ''काय सुरेख बांधकाम आहे, वास्तुशास्त्र आहे. मी महाराष्ट्र–गुजरातमधले सगळे किल्ले पाहिलेत, पण इतका सुस्थितीत असलेला किल्ला माझ्या तरी पाहण्यात नाही. इतक्या सुरेख तोफा पाहायला मिळायच्या नाहीत.''

मी मान डोलावली. ते म्हणाले, ''तुम्हांला हे माहीत आहे का, याला 'रंडका किल्ला' म्हणतात.''

''नाही बुवा. का म्हणतात ?''

''कारण याच्यावर एकही लढाई लढली गेली नाही. एरवी हा इतका इन्टॅक्ट राहिलाच नसता. एका बाजूची पडझड ही एक्कावन्नच्या स्फोटातली. अक्षरश: रंडका किल्ला आहे हा.''

माझ्या डोळ्यासमोर ती भुयारं आली, तो खंदक आला, ते गुप्त रस्ते आले. या सगळयांचा एकदाही उपयोग झाला नाही ? मी म्हणालो, ''तोफा तरी उडवल्या गेल्या असतील.''

मोरे हसले नि म्हणाले, ''किल्लेदाराला मुलगा झाल्यावर उडवली असली तर असेल, पण लढाईत तर नक्कीच उडवली गेली नसणार.''

परततांना एस.टी. त बसलो होतो. समोरच किल्ला होता. माझ्या डोळयासमोर सिंहगडचे पडके तट, दरवाजे आले. मला ते नेहमी दीनवाणे उभे राहिलेले वाटतात. पण आता ते कृतार्थतेनं उभे असल्याचं जाणवून गेलं.

संध्याकाळ दाटली होती. परांड्याच्या किल्ल्याची फक्त काळी आकृती दिसत होती. गोठ्यात रात्री अंधारात म्हैस बसून राहाते, तसा तो किल्ला वाटला.

## शब्दार्थ

**जीर्ण** जुने **भुयार** जमिनी खालील लपण्यासाठी किंवा सामान ठेवण्यासाठी तयार केलेली जागा **चिंचोळा** अरूंद **पंचधातू** सोने, चांदी, तांबे, कासे, पितळ **गारवा** खूपच थंड वारा **रक्तबंबाळ** रक्ताने माखलेले **मारामारी** लढाई, तंटा **मेळावा** लोकांचा जमाव **इन्टॅक्ट** चांगल्या स्थितीत असलेला **दीनवाणे** गरीबासारखे दिसणारे.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) अवचटाच्या बरोबर काम करणाऱ्या त्या दलित कार्यकर्ताचे नाव काय आहे ?

(2) कोणत्या साली किल्लयात स्फोट झाला होता.

(3) किल्ल्याच्या मागच्या बाजूस काय आहे ?

(4) सरकारने उरलेल्या दारूगोळ्याचे काय केले ?

(5) सिंधूरावा बरोबर कोण निघाले ?

(6) बुरुजातून चालतांना कोणत्या संस्कृतिची आठवण झाली ?

(7) तोफ कशातून बनविलेली होती ?

(8) किल्ला कोणाच्या वशंजानी बांधलेला असावा असे कबीर म्हणाला ?

(9) किल्ल्याला काय नावाने ओळखले जाई ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) किल्ल्यापर्यंत पोचण्याआधी सिंधूरावांना काय - काय नजरेस पडले ?

(2) किल्ल्याच्या दाराशी खिळे का लावलेले होते ?

(3) तोफेचे वर्णन करा.

(4) बाहेरगांवचे लोक किल्ल्याला कोणते गांव म्हणून ओळखतात ?

(5) संध्याकाळी किल्ला कसा दिसत असे ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) परांडयाच्या किल्ल्याचे तुमच्या भाषेत वर्णन करा.

(2) दालनात सिंधूरावांना काय - काय दिसले ?

(3) कबीराने पाहिलेल्या खंदका विषयी सविस्तर माहिती लिहा.

(4) लेखकाला सिंहगडाचे दरवाजे कृतार्थ आहेत असे का वाटते

**4. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) कबीर शिंदे कोणता कार्यकर्ता होता ?

(A) रजपूत (B) ठाकुर (C) दलित (D) ब्राह्मण

(2) किल्ल्यात स्फोट किती साली झाला होता ?

(A) 49 (B) 50 (C) 51 (D) 52

(3) बुरुजाचे चित्र पाहून कोणत्या संस्कृतीची आठवण झाली ?

(A) मोगल संस्कृती (B) सुमेरियन संस्कृती

(C) इजिप्तची संस्कृती (D) अमेरिकन संस्कृती

(4) तोफ कोणत्या धातुंतून ओतलेली होती ?

(A) पंचधातू (B) जस्त (C) लोखंड (D) पितळ

(5) कबीर कशाला अशोकचक्र समजत होता ?

(A) गोलातल्या गुलाबाला (B) गोलातल्या कमळाला

(C) गोलातल्या सूर्याला (D) गोलातल्या चक्राला

(6) परांडयाच्या किल्ल्याला कोणत्या नावाने ओळखतात ?

(A) निद्रिस्त किल्ला (B) मोडका किल्ला (C) रंडका किल्ला (D) जागता किल्ला

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- शिक्षकांनी अन्य किल्ल्यांच्या माहितीसाठी प्रवास आयोजित करावा.
- विद्यार्थ्यांनी इतर किल्ल्यांची माहिती संग्रह करून प्रोजेक्ट बनविणे.
- किल्ल्यांची चित्रे मिळवून वहीत चिटकवा.

**शिक्षक-प्रवृत्ती**

- ग्रंथालयातून अशी प्रवासवर्णन मिळवून वाचणे.

●

# 18 रिकामे मधुघट

**– भा. रा. तांबे**

(जन्म : 1874, मृत्यू : 1941)

भास्कर रामचंद्र तांबे यांचे वास्तव्य मध्यभारतातील ग्वाल्हेर, इंदूर अशा संस्थानी भागात होते. त्यांच्या कविता संग्रह 1920 मध्ये वा.गो. मायदेव यांच्या प्रयत्नांमुळे छापला गेला आणि या आगळ्यावेगळया कवितांची ओळख मराठी रसिकाला आली. त्यांच्या कवितेतून प्रेमभावना, तत्वज्ञानवर विचार, आध्यात्मिक चिंतन व्यक्त झाले आहे. त्यांना संगीताचे उत्तम ज्ञान असल्यामुळे त्यांच्या कवितेला गेयता, नादमयता असे गुणही प्राप्त झाले आहेत.

कवितेतील भावना आणि कवीने केलेली शब्दांची सुंदर योजना यामुळे ही कविता आजही रसिकांच्या मनाला भिडते.

'रिकामे मधुघट' या कवितेत तांबे यांनी एक रुपक मांडलेले आहे. त्यांनी सुंदर प्रेमकविता लिहाव्या अशी एका रासिकाने त्यांना विनंती केल्यानंतर ही कविता. भा. रा. तांबे यांनी लिहीली. त्यांत त्यांनी वयाच्या उतरत्या टप्प्यामध्ये, प्रतिभेचा भर ओसरल्यानंतर कलावंताला जाणवणाऱ्या भावनांचे चित्र रेखाटले आहे; कारण वृद्धत्वाच्या काळात जशी शारीरिक ताकद कमी होते तशी मानसिक उभारीसुद्धा उणावत जाते. त्यामुळे 'रिकामे मधुघट' या शीर्षकाद्वारे कवीने आपल्या संपत प्रतिभेची सूचना केली आंहे मधुघट म्हणजे काव्य निर्माण करणारी प्रतिभा असे हे रुपक आहे.

---

मधु मागशि मझ्या सख्या, परी
मधुघटचि रिकामे पडति घरीं ! ध्रु.

आजवरी कमळाच्या द्रोणीं
मधू पाजिला तुला भरोनी,
सेवा ही पूर्विची स्मरोनी
करिं रोष न सखया, दया करीं. 1

नैवेद्याची एकच वाटी
अता दुधाची माझ्या गाठीं;
देवपुजेस्तव ही कोराण्टी
बाळगीं अङ्गणीं कशी तरी. 2

तरुण–तरुणिंची सलज्ज कुजबुज,
वृक्षझंऱ्यांचें गूढ मधुर गुज,
संसाराचें मर्म हवें तुज,
मधु पिळण्या परि रे बळ न करीं ! 3

ढळला रे ढळला दिन सखया !
सन्ध्याछाया भिवविति हृदया,
अता मधूचें नांव कासया ?
लागले नेत्र रे पैलतिरीं. 4

**( लश्कर – ग्वाल्हेर, 1933 )**

## शब्दार्थ

**मधु** मध, प्रेमकविता **सखया** मित्रा **मधुघट** मधाने भरलेला घडा, येथे (कवितेत) प्रेमकविता रचण्याची शक्ती **रोष** राग, **माझ्यागाठी** माझ्याकडे **ढळणे** संपणे **सन्ध्याछाया** संध्याकाळच्या सावल्या, येथे मृत्यूची चाहूल **पैलतिरी** संसाराच्या पलिकडे, परलोक **मर्म** रहस्य, गुपित, खूण **कासया** कशासाठी **गुज** गप्पा संभाषण

## टीपा

**करोण्टी** कोरांटी हे पिवळया रंगाचे नाजूक फूल. काटेरी झाडावर सुंदर दिसणारे पण सुवास नसेलले फूल

**कमकोच द्रोण** कवीने भरभरून केलेल्या कविता, त्यातील रंग आणि भावना यांना कमळाचे द्रोण कवीने म्हटले आहे.

**नैवेद्याची वाटी** लहानशा वाटीतले दूध

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) रसिक कवीकडे कोणती मागणी करतो ?

(2) कवी रसिकाला रागावू नको, असे का सांगतो ?

(3) कवीने कोणाच्या संभाषणाबद्दल सांगितले आहे ?

(4) आता कवीचे नेत्र कोठे लागले आहेत ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) कवीने रसिकांची कोणती सेवा केली आहे ?

(2) देवाच्या पूजेसाठी कवीकडे काय राहिले आहे ?

(3) कवी रसिकाला जगाविषीयीचे रहस्य का सांगू शकत नाही ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) कवीची पूर्वीची आणि आत्ताची अवस्था वर्णन करा.

(2) या कवितेचा आशय स्पष्ट करा.

**4. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) कवीचे मधुघट कसे आहेत ?

(A) भरलेले (B) रिकामे (C) अर्धे (D) ओसंडून वाहणारे

(2) कवीने कोणत्या द्रोणाने रसिकाला मधू पाजला ?

(A) कमक (B) पळस (C) आंबा (D) फणस

(3) कवीकडे आता कोणती वाटी आहे ?

(A) सोन्याची (B) चांदीची (C) खाऊची (D) नैवेद्याची

(4) रसिकाला संसाराचे काय हवे आहे ?

(A) एकता (B) विविधता (C) मर्म (D) प्रेम

(5) कवीला कशाची भीती वाटते ?

(A) संध्याछाया (B) प्रकाश (C) परीक्षा (D) हल्ला

**5. खालील काव्यपंक्तींचा अर्थ समजवा :**

(1) मधुघटचि रिकामे पडति घरी।

(2) लागले नेत्र रे पैलतिरी।

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- 'झाशीवाली' किंवा 'नववधू प्रिया मी' या कविता वाचा.

### शिक्षक-प्रवृत्ती

- भा.रा. तांबे यांच्या काव्यांचा अभ्यास करा.

## भाषासज्जता

कवी भा.रा.तांबे याच्याकडे एका रसिकाने प्रेमकविता लिहाव्या अशी विनंती केल्यानंतर ते स्वत:ची अवस्था या कवितेद्वारे व्यक्त करतात. पाहिल्या कडव्यातील 'कमळाचे द्रोण' या शब्दांमधून कवीने भरभरून केलेल्या कविता, त्यातील रंग आणि भावना यांचा उल्लेख केला आहे; पण आता मात्र कवीच्या जवळ ''नैवद्याची वाटी'' आणि 'कोरांटी' सारखी बिनवासाची फूलेच शिल्लक राहिली आहेत. म्हणजेच लहानशा वाटीतले दूध (मधाऐवजी) आणि साधीशी फूले या गोष्टीच आता राहिलेल्या आहेत. त्यामधून संपत आलेल्या प्रतिभेचे चित्र कवीने रेखाटले आहे.

'संध्याछाया' हे रुपकसुद्धा किती योग्य आहे ! आयुष्याची संध्याकाळ म्हणजेच वृद्धत्व, असे यातून कवीने सुचवलेले आहे. 'पैलतीर' म्हणजे पृथ्वीलोकाच्या पलिकडे असणारा मृत्यूलोक होय.

●

# 19 कन्यादान

– **महादेवशास्त्री जोशी**

(जन्म : 1906, मृत्यू : 1992)

गोव्यासारख्या निसर्गरम्य प्रांतमध्ये महादेवशास्त्रीचे बालपण आणि नंतरची काही वर्ष व्यतीत झाली. संस्कृत वेद, शास्त्रे, पुराणे यांचा अभ्यास करुन ते काही काळ गोव्यातच स्थानिक झाले. पुढे गोवामुक्ति संग्रामामध्ये त्यांनी मोलाची कामगिरी बजावली, भारतीय जीवनमूल्ये, सुसंस्कृतता, मानवता क्षमाशीलता यांच्यावर त्यांचा दृढ विश्वास होता. त्याची भाषाशैली प्रौढ आणि रससिद्ध आहे. प्रापंचीक जीवनातील लहानमोठ्या अनुभवांचे समरसून केलेले चित्रण ही त्यांच्या कथालेखनाची प्रमुख उपलब्धी आहे. या चित्रणामुळे त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा जिवंत होतात. त्यांच्या कथेतील वातावरण त्यातील निसर्गाच आणि माणसांचे वर्णन फार स्वाभाविक आणि समर्थ आहे. माणसांचे परस्परांमधील संबंध, त्यातील ओळवा त्यांना मोलाचा वाटतो. त्यामुळे त्यांचे कथाविश्व भावपूर्ण झाले आहे, 'भावबळ', 'कन्यादान', 'खडकातले पाझर' हे त्यांचे कथासंग्रह आहेत. 'महाराष्ट्रची धारातीर्थे', 'तीर्थरुप' महाराष्ट्र ही त्यांची स्थलवर्णनही प्रसिद्ध आहेत. संस्कृतिकोशाचे त्यांनी केलेले संपादन व लेखन हे त्यांच्या विद्वतेचे प्रमाण आहे. 'कन्यादान' या त्यांच्या कथासंग्रहातून पुढील कथा घेतली आहे.

या कथेमध्ये शास्त्रीजीनी एका वेगळया प्रकारच्या पितापुत्री संबंधावर प्रकाश टाकला आहे. लग्नासंबंधी घडलेल्या घटना, प्रसंग या पाठात लेखकाने रंगवले आहेत.

---

त्यां दिवशी मी टपालवाल्याची आतुरतेनं वाट पाहात होतो. रीतीप्रमाणं तो आला अन त्यानं एक जाडजूड लखोटा माझ्या हाती दिला. नानांचं पत्र हे मी अक्षरावरून ओळखलं; तेच मला हवं होतं. मी त्याची पट्टी टरकावली आणि आतून एक चौघडी कागद बाहेर काढला. एकता त्यावर धावती नजर टाकली. मग बायको घरात भाजी फोडणीला टाकीत होती तिच्याकडे वळून म्हटलं.

''एकलंस का ग ? नानांच पत्र आलं आहे.''

''आलं ? काय म्हणतायत् ?''

''मी कुठं वाचलं आहे अजून ?''

''मग वाचा ना ?''

तिनं लगेच उठून सैपाकघरातच मला पाट मांडला. मी बसून ने समग्र पत्र मोठ्यानं वाचालं. नानांनी आपल्या बारीक पण सुवाच्य अक्षरांत लिहिलेल्या त्या पत्रात बऱ्याच गोष्टी मला कळवल्या होत्या. पण माझ्या दृष्टीने तूर्त महत्त्वाचा असलेला भाग पुढीलप्रमाणं होता –

''... तुम्ही स्थळासंबंधी लिहिलेत ते कळले. चि. प्रतिभेला तिथे दाखवलीत हे बरे केलेत. मुलगा गोरा आहे, देखणा आहे, उंच आहे – या सर्व गोष्टी अनुकूलच आहेत; पण त्याहीपेक्षा त्याच्या स्वभावाचा अंदाज घेऊन तुम्ही ज्या चार ओळी लिहिल्यात, त्या मला महत्त्वाच्या वाटल्या. तो विनयशील आहे, हसतमुख आहे, उमदा आहे, हे मुलीच्या बापाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे. खरे सांगयचे तर माणसाचा स्वभाव असा अर्ध्या तासाच्या बैठकीत कळणे कठीणच आहे. त्याची कसोटी लागते ती प्रत्यक्ष प्रसंगाच्या वेळी. नुसत्या गप्पा वायफळ.''

''पण लग्नाच्या बाबतीत जे दर्शनी दिसेल, तेवढ्यावरच अनुमानधपका बांधून पुढे पाऊल टाकावे लागते. पुढे हरीवर हवाला ! त्या दृष्टीने तुम्ही केलेत तेच योग्य. तुम्हांला मी काही सांगावे असे नाही. मुलगी त्यांना पसंत पडली आणि हो, – मुलीला मुलगा पसंत पडला तर पुढची सगळी बोलणीही तुम्हीच करा. माझी अर्थशक्ती तुम्हांला ठाऊकच आहे. त्या धोरणावर काय ते ठरवा. गोवे ते पुणे हा प्रवास काही सोपा नाही. वारंवार येणेजाणे दुर्घट. तशात रजा मिळण्याचाही प्रश्न आहेच. तेव्हा मुहूर्तनिश्चय करून तुम्ही मला कळवलेत की आम्ही एकदाच अन् ती म्हणजे लग्नाला तेवढी येऊ. 'हूं तर कथा कर तूं.' असा हा प्रकार होतो आहे; पण मित्रकार्य म्हणून तुम्ही या गोष्टीला आता माथे मारलेच आहे. चि. प्रतिभा गेले चार महिने तुमच्याकडेच आहे. तिथूनच तिची पाठवणी होऊ द्या. तुमच्या दोन मुली तशी ही तिसरी. त्यामुळे सर्व जोजार तुम्हांलाचा आम्ही फक्त कन्यादानाला पुढे होऊ... ''

मी थांबलो अन् पत्राची घडी केली. ते पाहून बायको म्हणाली,

''संपलं ? एवढंच पत्र ?''

''प्रतिभेच्या लग्नासंबंधी मजकूर एवढाच; बाकी इकडचंतिकडचं–''

''असू दे. सगळं पत्र कडेपत्तर वाचा.''

''बरं, ऐक.''

''... तूर्त गोमंतकाची स्थिती ठीक नाही. फिरंगी सरकारचे दडपण चहूबाजूंनी वाढते आहे. सामाजिक जीवनातली अशी एकही कक्षा नाही, की जिच्यावर कापितांव रोंब या पोलीस–प्रमुखचा डोळा रोखलेला नाही. सार्वजनिक जीवन तर संपलेच आहे. जिकडेतिकडे निग्रो लोकांचे लष्करी तळ पडले आहेत. जिवंत मने आतून सळसळत आहेत. केव्हा कुठे ठिणगी पडेल अन कसा स्फोट होईल ते सांगता येत नाही ! 1946 साल पुनश्च क्षितिजावर दिसत आहे. माझ्याच शाळेत असे काही विद्यार्थी आहेत. की ज्यांना सबूर म्हणतांना माझ्या नाकी नव येत आहेत. आजवर त्यांना स्वाभिमानाचे धडे मीच शिकवले, मीच त्यांच्या आत्म्याचा अंगार फुलवला अन् आता ते काहीतरी साक्षात्कार दाखवायला फुरफुरले असता मीच त्यांना कोणत्या हातांनी आवरू ? बरे झाले, या वेळी प्रतिभा तिकडे आहे. नपेक्षा...''

मी पाहिलं, प्रतिभा बाहेरून ऐकते की काय ! पण ती तिथे नव्हतीच. आमच्या बेताला अनुकूल असं नानाचं उत्तर आल्यामुळे आमचा पुढचा मार्ग मोकळा झाला. नानांच्याच आग्रहावरून गेलं एक वर्ष आम्ही तिच्यासाठी वरसंशोधन चालवलं होतं. जिथं जावं तिथं आम्हाला विचारीत, 'मुलगी मॅट्रीक झाली आहे का ?' आम्ही म्हणत होतो, 'होय, झाली आहे.' 'उंचीला किती?' 'पाच फूट अडीच इंच.', 'गोरी आहे का ?' 'नाही. सावळीच आहे; पण नाकडोळे ठळक.' 'मंगळ आहे का ?' 'हे टिपण बघा.' 'फोटो आहे का ?' 'हा द्या.' पण त्यावर सगळयाचं उत्तर ठरलेलं. 'फोटो फसवे असतात;' तुम्ही मुलीला समक्ष दाखवायला आणा.'

इथे आमचा पुढचा मार्ग खुंटे. मुलगी गोव्यात अन् आम्ही पुण्यात. मग मी एक दिवस नानां लिहिलं, 'तुम्ही मुलीला पुण्याला धाडून द्या. लग्नाचा एक पुरता मोसम संपेपर्यंत तिला इथे राहू दे. मग जेहेते चिमणराव लग्नाची मोहीम सुरू करतील. तसा काही संकोच मानायचं कारण नाही. आमच्याबरोबर चार घास ती खाईल. भरल्या गाड्याला सुपाचं ओझं होत नाही.' त्यावर नानांनी सोबत पाहून प्रतिभेला पाठवून दिलं होतं अन् त्याचबरोबर लग्नाबाबतची सर्व अधिकारपत्रंही माझ्या स्वाधीन केली होती.

ज्या स्थळाबद्दल मी नानांना कळवलं होतं, तो मुलगा मला आवडला होता. मलाच नव्हे तर प्रतिभेलाही. त्यापूर्वी ज्या दोन मुलांच्या पुढं आम्ही तिला उभी केली होती, त्यांपैकी जर कुणाचं जमलं असतं तर ती त्याला माळ घालणार होती; पण ती स्वेच्छेनं नव्हे, तर वडिलधाऱ्यांनी जे ठरवलं त्याला मान तुकवण्यासाठी. पण या मुलाला ती खुषीनं वरणार होती. तिचा हा मनोभाव मी तिच्या डोळयावरूनच ताडला होता.

म्हणून नानांची संमती येताच आम्ही दोघं त्याच दिवशी संध्याकाळी त्या मुलाच्या घरी गेलो. नवरा मुलगा म्हणजे प्रभाकर समोरच होता. आम्हांला पाहून त्यानं प्रसन्न स्मित केलं. मी मनात म्हटलं, की प्रतिभा भाळली असेल ती याच स्मिताला. 'या बसा' झाल्यावर आम्ही सागितलं, की 'पुढची बोलणी करायला आलो आहो.'

प्रभाकराचे वडील बंधू हे घरातले मोठे. ते मला म्हणाले, 'मुलीचे वडील का नाही आले?'

त्यावर मी त्यांना ठासून सांगितलं, की ते एकदम लग्नालाच येणार आहेत. बाकीचे सगळे अधिकार आमच्याकडे. त्यांनी ते मान्य केलं. स्त्री–पुरुषांची एकत्र बैठक बसली. एका तासात सगळी बोलणी, याद्या अन् मुहूर्त निश्चय करून आम्ही उठलो. घरी येऊन प्रतिभेला सांगितलं, की 'गड सर करून आलो' त्यावर तिनं माझ्याकडे कमळांच्या डोळ्यांनी पाहिलं.

मला थट्टा करण्याची लहर आली. 'तुझे डोळे फार मोठे आहेत बुवा. नवरा घाबरेल तुझ्या अशा पाहण्यानं. बघ हो, त्याचा ओठांवरचं स्मित मावळलं, तर मला खपायचं नाही.'

त्यासरशी प्रतिभा हसली अन् पुढून चालती झाली. मी लगेच नानांना पत्र लिहायला बसलो –

''प्रिय नाना,

आताच सगळया गोष्टी पक्क्या करून आलो. आठशे रूपये हुंडा अन् दोनशे रुपये पोषाखाचे असे एकूण हजार रुपये उचलून द्यायचे आहेत. मग मानापानाची अट नाही. मांडव खर्च दोघांनी मिळून करायचा. २२ जूनचा मुहूर्त निश्चित केला आहे. त्याप्रमाणे

पत्रिका छापायला देतो. पोषाखाचे पैसे त्यांना आधी द्यायचे आहेत ते मी एकदोन दिवसांत पुढे करीन. सामानसुमानासाठी आणखी दोन अडीचशे रुपये लागतील. आमची बायको उद्यापासून तयारीला लागणर आहे. दिवस तसे फार नाहीत.

मुलगा स्वतंत्र व्यवसाय करणार आहे. महिना दोनअडीचशे रुपये मिळवणारा आहे; त्या अर्थी त्याने आठशे रूपये मागितले तर त्यात काही गैर नाही. म्हणून मी ते कबूल केले आहेत. 'सगळी सोंगं आली तरी पैशाचं सोंग येत नाही' हे जाणत असूनही मला त्यांच्याकडे मंडईतल्या सौदागरांप्रमाणे घासाघीस करावीशी वाटली नाही. एवंच, तुम्हांला हे लग्न दीड हजाराच्या घरात जाणार...''

याही पत्राला नानांच ताबडतोब उत्तर आलं –

''तुमच्या पत्रावरून सर्व गोष्टीचा उलगडा झाला. तुम्ही जे ठरवलेत ते मीच ठरवले असे समजा. मी सर्व तयारी करून १९ जूनला इथून निघतो आणि २० तारखेच्या जनतेला पुण्यास दाखल होतो. तुम्हांला अर्धीमुर्धी रक्कम आधी धाडायला हवी होती; पण गोव्यातून मनीऑर्डर वेळेवर जाईकल की नाही याची शंका आहे. एखादे वेळी मध्येच कुठे तरी अडकून पडायची तेव्हा प्राथमिक खर्चाला लागतील तेवढे रुपये तूर्त तुम्ही खर्च करा.

हा तुमच्यावर आणखी बोजा. पण त्याबद्दल शब्दांनी कितीही लिहिले तरी ते अपुरेच पडणार. मित्रऋण फिटले नाही तरी ते जड होत नाही. दैवयोगाने तुमच्यासारखा सन्मित्र मी जोडला; आता कशाला काळजी करू?...''

नानांच्या या पत्रानं माझ्या अंगावर मूठभर मांस चढलं. लग्न जुळवणं अन् ते पार पाडणं ही काय सोपी गोष्ट आहे ? पुष्कळदा अशा वेळी मध्यस्थाचा मृदंग होतो. बरं झालं तर नवरानवरीचं अन् वाईट झालं तर मात्र मध्यस्थाच्या डोक्यावर खापर ! पण या लग्नात मला तशी धास्ती नव्हती. एक तर प्रतिभेबद्दल माझ्याही मनात माया निर्माण झाली होती अन् नानांच्या हृदयात मजविषयी विश्वास होता. हे जणू माझ्याच घरचं, माझ्याच मुलीचं मंगलकार्य होत.

आणि त्याच आत्मीयतेनं आम्ही दोघं कामाला लागलो. 'आम्ही' म्हणणं हे आपलं उगाच मला मोठेपण. वस्तुत: पदर बांधला तो माझ्या बायकोनं. तिनं प्रथम आधी सांडगे–पापड घालून टाकले. वाण्याकडे पाठवायच्या यादीतला एकेक जिन्नस सुचेल तसतसा ती मला सांगू लागली.

आणि इथेच भांडणं सुरू झाली ! अन्य कुणाशी नव्हे, तर आम्हा दोघांतच. तिनं 'एक तोळा केशर' म्हणताच मी म्हणावं, 'एक तोळा कशाला ? पाव तोळा रगड झालं ! अग, मोठेमोठ्या श्रीमंतांच्या घरीसुद्धा जिलबीला पिवळा रंग वापरतात!' त्यावर तिने मला हात ओवाळावे.

तिनं 'वीस शेर साखर' म्हणताच मी हळूच सुचवावं, 'तूर्त बारा शेरच पुरे.' तिच्या प्रत्येक वस्तूच्या परिमाणाला मी अशा रीतीनं 'कपात–सूचना' आणू लागलो. ती माझ्यावर चिडू लागली. मीही माझा आग्रह कायम ठेवला.

''हे पाहा, माझं अंदाजपत्रक ठरलेलं आहे – पंधराशे रूपये. मी तसं नानांना कळवलं आहे. एक पैही त्याबाहेर जाता कामा नये. माझ्या शब्दाला बाध येता कामा नये. पंधराशेत काय ते बसव हे अंदाजपत्रक–''

''पूजा करून पेटीत ठेवा ते. मी अंदाजपत्रक जाणत नाही. सगळं व्यवस्थित व्हायला हवं. नाही तर व्याहीमंडळी लाज काढतील माझी. सगळया बाबतींत पुढं व्हायचं आहे मला. तुम्ही आपले बसाल माडीवर चंची सोडून. तुम्हांला काय वाटलं, की हे तुमच्या लघुकथेतलं लग्न आहे ? – बोलाचीच कढी बोलाचाची भात ? वाटलं तर चार उपमा, उत्प्रेक्षा अधिक. इथे व्यवहाराशी गाठ आहे. म्हणे, 'बारा शेर साखर पुरे !' या निमित्तानं चार माणसं घरी येणार–जाणार, त्यांना काय चहाच्याऐवजी तुमचं अंदाजपत्रक कोळून पाजू ?''

''अग ए ! चूप. बघ, जावईबुवा आले; पायऱ्या उतरून अंगणात पोचले. त्यांच्यादेखत तुझी–माझी लठ्ठालठ्ठी नको. हे बये. खाली जा अन् चहा ठेव त्यांना. नुसता चहा नव्हे हं ऽ ! बरोबर फराळाचं काही तरी...''

''फराळाचं ना ? आहेच की तुमचं अंदाजपत्रक...''

ती मिस्किलपणे हसली अन् मानेला झटका देऊन खाली चालती झाली. मी जावईबुवांच्या स्वागतासाठी चार पावलं पुढं झालो. पुन्हा तेच स्मित, चीत प्रसन्नपणा. त्यांना लग्नाच्या निमंत्रणपत्रिका छापायच्या होत्या. त्यासाठी तो मुलीच्या वडिलांचं संपूर्ण नाव आणि पत्ता मला विचारायला आला होता. कदाचित ते निमित्त करून प्रतिभेशी थोडा अधिक परिचय झाला तर पाहावा म्हणूनही आला

असेल. या तरुण मुलांच्या पठाडी गोमी काय असतील त्या कोणाला कळयाच्या ! मी त्याला बसवून खाली गेलो. वर येताना त्याची अन् प्रतिभेची दृष्टादृष्ट झाली असावी. कारण तिच्या चर्येवर भर दिवसा अरुण–प्रभा आली होती. मी तिला हसून म्हटलं,

''चहा घेऊन तूच वर ये. चहापेक्षा तुझीच तहान आहे त्याला. आम्ही कुणी वर येत नाही. चार शब्द बोल त्याच्याशी. डोळे काय मोठे करतेस ? छे बुवा ! भलतेच मोठे आहेत डोळे तुझे. त्याच्या काळजाचं पाणी करणार तू...''

प्रभाकर त्यानंतर आणखी तीनचारदा आमच्याकडे आला. तास–तास बसून, बोलून गेला. आमचं घर भरलं होतं. एकापुढं एक तयारी चालू होती. तो आला की आमची ही नुकताच तळलेला एखादा गरम पदार्थ त्याच्यापुढं ठेवी. त्याला या सगळया गोष्टींचं कुतूहल वाटत असाव असं दिसलं. 'मुलीचे आईबाप गोव्यात अन् ही तिऱ्हाईत माणसं जसं काही आपाल्याच मुलीचं लग्न काढल्यागत सगळं करतात. हा काय चमत्कार आहे !'

तो येईल तेव्हा तेव्हा त्याचं आमच्याकडे हार्दिक स्वागत होई. त्याबद्दलही त्याला काही तरी वाटत असावं. आमच्या बायकोशीही संकोच सोडून तो बोलू लागला होता. त्याच्याजवळ आढ्यता नव्हती – निदान आमच्याकडे तरी ती त्यानं दाखवली नाही.

उभयपक्षी पत्रिका छापून रवाना झाल्या. लग्नाचा दिवस जवळजवळ येऊ लागला तसतशी घरातली गडबड नि धांदल वाढली. मी दिवस मोजू लागलो. 'आज 17 जून – उद्या 18 तारीख. 19 ला नाना गोव्याहून निघतील. 20 तारखेला पुण्यास पोचतील.'

अखेर ती तारीख उजाडली. मी स्टेशनवर गेलो. पण जनतेला नाना उतरले नाहीत. पाठमागच्या मेललाही आले नाहीत. मी. संत्रस्त झालो. निराश मनानं घरी परतलो. मला या घटनेचा अर्थच कळेना. टपालवाला येऊन गेला; पण दोन ओळींचं पत्रही नाही. नाना आले नाहीत म्हणजे माझ्या दृष्टीनं विधिलिखित चुकलं. 'येतो म्हणजे आले, करतो म्हणजे केलं.' असा नानांचा बाणा होता. मी त्यांना गेली वीस वर्षं ओळखत होतो. अन् आज ते आले नाहीत म्हणजे...

माझ्याइतकीच बायकोही अस्वस्थ झाली. प्रतिभा कानकोंडी बनली. ती. आपल्या 'काकू' ला भरपूर हातभार लावीत होती; पण आपल्या आईनं येऊन काकूच्या खांद्याला खांदा भिडवावा, दोघींनी मिळून दुप्पट उत्साहानं आपलं कौतुक कारवं, अशी तिची आकांक्षा असणारच. मला तिचीच अधिक करूणा आली.

एवढ्यात व्याह्यांकडची मंडळी आली. उद्या नाना–वहिनींना व्याहीभोजनाचं निमंत्रण द्यायला ती आली होती. पण व्याहीच अद्याप उगवले नाहीत, हे पाहून त्यांचा हिरमोड झाला. मला त्यांच्या येण्याविषयी काहीच ठाउक नव्हतं; पण काही तरी सांगणं मात्र भाग होतं. मी माझी निराशा जरा वेळ दूर ठेवली, ओढून–ताणून चंद्रबळ आणलं अन् म्हटलं.

''दुपारी निश्चित येतील. पावणेदोनच्या गाडीला ठेवलेली आहेत. जून महिना चालु आहे ना ? शाळाकॉलेजं नुकतीच सुरू झाली आहेत. त्यामुळं तिकडून येताना भयंकर गर्दी असते. एखादे वेळी कुळयाच्या स्टेशनवर माणसं दोनदोन दिवस अडकून पडतात!...''

माझं बोलणं त्यांना कितपत पटलं हरी जाणे ! ते परत जातांना तिऱ्हाईतपणाच्या स्वरात मला एवढंच म्हणाले, 'आल्याबरोबर कळवा.' त्यावर मी उत्तेजित होऊन म्हणालो, 'ताबडतोब कळवतो. त्यांचा टांगा दारात दिसला, की मुलाला सायकलवरून पिटाळलाच म्हणून समजा.'

पण दुपारीही नाना आले नाहीत. आमच्या निरोपाची वाट बघून मग खुद्द प्रभाकरच आमच्याकडे आला. त्याच्याहीपुढं मला नन्नाची बाराखडी वाचावी लागली. पण तरीही मी धीर करुन म्हटलंच. 'पाचाच्या सुमाराला आणखी एक गाडी आहे. तिला बहुधा येतीलच.' पण त्याही माझ्या आश्वासनाला हरताळ लागला ! शेवटी मीच उठून व्याह्यांच्याकडे गेलो.

''नाना अजून आले नाहीत. त्यांची तार नाही किंवा पत्रसुद्धा नाही. काय झालं आहे न कळे ! पण तुम्ही डगमगू नका. मुलगी आमच्या हाती आहे; लग्न ठरलेल्या मुहूर्तावर होईल. ठरलेल्या कराराप्रमाणं देण्याघेण्यासकट होईल. आता मुलीचे आईवडील आम्ही. कन्यादानाचं पुण्य जर आमच्याच नशिबात असेल, तर ते कोण चुकवणार ?''

त्यावर प्रभाकरचे ज्येष्ठ बंधू मला म्हणाले,

'' जे घडतं आहे ते काही समाधानकारक नाही. याचा अन्वयार्थ आम्हांला लागत नाही. पण काय करायचं ? आम्हीही आता या प्रकरणी गुंतून पडलो आहो. मणिमंगळसूत्रापासून सगळी तयारी झाली आहे. पत्रिका सगळीकडे गेल्या आहेत. नात्यागोत्याची

माणसं कालपासून येऊ लागली आहेत. उद्याला सगळं घर भरून जाईल... अशा स्थितीत माझी अवस्था चमत्कारिक झाली आहे. फक्त तुम्हीच सांगता म्हणून मी विश्वास ठेवतो.''

''माझ्यावर तुमचे अनंत उपकार आहेत. तुम्ही निश्चिंत असा. मी तुमच्या विश्वासाला पात्र ठरेन एवढंच तुम्हाला सांगतो.''

पुढं माझ्याच्यानं बोलवेना. मी भारावून उठलो. तसाच घरी आलो. रात्री मला झोप आली नाही. पण अजून माझा आशातंतू तुटला नव्हाता. नाना उद्या सकाळी तरी नक्की येतील. असं मी धरून चाललो होतो. पण देवही माझी कसोटीच पाहात होता ! कारण, दुसऱ्याही दिवशी नाना आले नाहीत. माझा जीव साकळून मुंगीएवढा झाला. बायकोची कंबर ढिली झाली. नाना येणार होते म्हणजे माझा जिवलग मित्र येणार होता. आणि तोही एका मंगलकार्यासाठी येणार होता. आम्ही सगळी मिळून हे कार्य हसतखेळत करणार होतो. आनंद देणार होतो, घेणार होतो. पण आता या समारंभातलं सत्त्वच निघून गेलं होतं. केलेली सगळी तयारी उदासवाणी दिसू लागली होती.

पण एवढ्यानं काय झालं होतं ? उद्या मुलीला लग्नाला उभी करायची तर त्याआधी आठशे रुपये हुंड्याची रक्कम उभी करावी लागणार होती. एवढी रक्कम आणायची कुठून मी ? आजवर जो खर्च झाला त्यासाठीच मजजवळची पुंजी संपली होती. अन् आता आणखी आठशे रुपये म्हणजे....

मग आम्ही दोघं एकत्र बसलो. या प्रश्नावर बरीच चर्चा केली. आता आमच्यामधलं भांडण संपलं होत. शिरावर ओढवून आणलेली ही जबाबदारी अब्रूनिशी कशी पार घालता येईल, एवढा एकच विचार आता आमच्यापुढं होता. लग्नात गोंधळ झाला असता तर नानांच्या आधी आमचं हसं होणार होतं. अन् त्यातही एका मुलीच्या भवितव्याचा प्रश्न... आम्ही खूप खल केला. काही निर्णयही घेतले.

आमची ही चर्चा प्रतिभा बाहेरून ऐकत होती. ती अधिकच गंभीर झाली. सावटातल्या कळीसारखी दुर्मुखली. कोणाच्या डोळयाला डोळा देईना; मान वर करून बोलेना. एका बाजूनं घरची काळजी अन् दुसऱ्या बाजूनं आमची ओढाताण, अशा कात्रीत ती सापडली. बायकोनं तिला म्हटलं,

'' हे बघ प्रतिभा, तू आता कसलीच चिंता करायची नाही. हसून खेळून राहायचं. सगळं चांगलं होईल. कळलं ? आज तुझं केळवण आहे; तेव्हा न्हाऊन धुऊन तयार हो नवी साडीचोळी नेस – ''

बायकोनं तिच्या केळवणाचा बेत केला. शेजारच्या चार मुली तिच्या पंक्तीला बोलवल्या. सैंपाकाच्या सगळया परवडी केल्या. तिला पाट मांडून केळीचं पान ठेवलं. सभोवती कुसरीची रांगोळी काढली. देवांशी समई लावली. पानाशी उदबत्तीचं घर ठेवलं. प्रतिभेची आई आली असती, तर तिनं लेकीच्या कौतकासाठी जे जे केलं असतं ते ते सगळं आमच्या बायकोनं केलं. अन् एवढं करून तिनं आरती ओवाळण्यासाठी प्रतिभेला हाक मारली.

पण प्रतिभा खाली नव्हती. ती होती माडीवर. तिथल्या उत्तरेच्या खिडकीत दोन्ही हात गजांना धरून ती पलीकडच्या बखळीतल्या झाडांकडे डोळे लावून उभी होती. मी वर गेलो तर मला ती पाठमोरीच दिसली. पण तेवढ्यावरूनच मी काय ते समजलो.

''प्रतिभा, अग रडतेस का तू ?'' या माझ्या प्रश्नासरशी ती गंगेसारखी खळाळली. मी जवळ जाऊन तिच्या पाठीवरून हात फिरवला. तेवढ्यात तिनं अश्रू पुसले.

''बाबा !''

''काय प्रतिभा ?''

''तुम्ही हे लग्न रहित करा.''

''का ग पोरी ?''

''नाना आले नाहीत. मला वाटतं. त्यांच्याकडे पैसे जमले नसावे. तुम्ही किती खर्च कराल ? आतापर्यंतचं किती तरी केलात; अन् आता... माझ्यासाठी काकूला मोकळी करू नका !''

मी चकित झालो. मनात म्हटलं, 'आहे; पोरीला काही अंत:करण म्हणतात ते आहे.' एकापरी मी खूष झालो तिच्यावर. एवढी जाणीव असणं म्हणजे काही सामान्य गोष्ट नव्हती.

''पोरी ! पैशांच्या व्यवहाराशी तुला काही कर्तव्य नाही. तुझ्याहून मी नानांना अधिक ओळखतो. तुझ्या जन्माच्या आधीपासून त्यांचा माझा स्नेह आहे. नाना पैशांसाठी अडले नाहीत, अडणार नाहीत, जीव गहाण ठेवतील ते अशा वेळी. मला निराळीच शंका येऊ लागली आहे. पण त्याबद्दल या वेळी चर्चा नको. तू खाली जा. तुझं पान वाढलं आहे. पोटभर जेव. ओल्या नारळाच्या करंज्या केल्या आहेत; ठाऊक आहे ना ? त्या तुपाशी खायच्या बरं का ! डोळयांतल्या पाण्याशी नव्हे, – जा.''

पण ज्या शंकेची चर्चा नको म्हणून मी प्रतिभेला खाली दवडली, तिच्याबद्दल माझं मन मात्र सारखं भवति न भवति करू लागलं होतं. गेले दोन दिवस गोव्याच्या बातम्या सारख्या येत होत्या. वृत्तपत्रांनी जाडजाड मथळे देऊन त्या छापल्या होत्या. 18 जून हा गोंततकाच्या स्वातंत्र्य–संग्रामाचा वर्षदिन. चालू वर्षी याच दिवशी गोव्यातल्या राष्ट्रवाद्यांनी पुनश्च उठाव केला होता – मोठ्या प्रमाणावर आणि सार्वत्रिक. जिकडे–तिकडे तिरंगी राष्ट्रध्वज फडफले. गावोगावी, शहरोशहरी फिरंग्यानां उद्देशून 'चले जाव' ची मोठमोठी भित्तिपत्रके लागली. खुद पणजीच्या सेक्रेटरीटवर भारताचा तिरंगी झेंडा फडकवण्याचं वीरकृत्य कुणा अज्ञात स्वयंसेवकानं पार पाडलं. पोर्तुगीजांच्या पोलिसांच थैमान सुरू झालं. त्यांनी शंभरांच्या वर स्वयंसेवक पकडले. दडपशाही उन्मत्तपणे नाचू लागली. वातावरण तंग झालं. आज अमकातमका गेला. उद्या कुणावर धाड येते, अशी भयाकुल उत्कंठा सर्वत्र पसरली...

अशा अर्थाच्या या सर्व बातम्या मी वाचल्या होत्या; अन् मला सारखं वाटू लागलं होतं, की नाना तर या सत्रात सापडले नाहीत ना ?.... होय, तसंच झालं होतं. दुपारी प्रतिभेच्या आईचं जे लांबलचक पत्र आलं, त्यावरून सगळया गोष्टींचा उलगडा झाला. नाना ज्या हायस्कूलमध्ये शिक्षक होते त्याच हायस्कूलच्या इमातीवर तिरंगी झेंडा लहरला होता आणि 'चले जाव' ची लाल, ठळक अक्षरांतली पत्रकंही चिकटवली होती. दुपारी तिथे पोलिसांची गाडी धडधडत आली होती. त्यांनी शाळेतल्या मुलांना घेरलं होतं. पोलिस त्यांना मारहाण करू लागले होते. पोलिसांचा तो बेशरम निर्दयपणा नानांना पाहवला नव्हता. 'खबरदार, मुलांना हात लावाल तर' म्हणून ते पुढे झाले होते. आणि या 'प्रचंड राजद्रोहा' बद्दल पोलिसांनी नानांना पकडलं होतं अन् कुठे तरी अज्ञात स्थळी नेलं होतं. त्यांचं पुढं काय झालं, त्याचा प्रतिमेच्या आईला पत्ता नव्हता. ती रडकुंडीला आली होती; हातपाय गाळून बसली होती. पुण्यात मुलीचं लग्न गोव्यात बाप तरुंगाच्या कोठडीत. तिची बिचारीची अवस्था अत्यंत शोचनीय झाली होती. तिनं. हे सगळं पत्रद्वारे मला कळवलं होतं, अन् शेवटी लिहिलं होतं –

''आता प्रतिभेच्या लग्नाचं काय ?... केवढा प्रसंग ओढवला हा ! मी काय सांगू आता ? तुम्हांला योग्य वाटले ते करा – एवढींच विनंती.''

प्रतिभेला एक आशीर्वाद लिहण्यिाइतकंसुद्धा तिचं मन ताळयावर नाही, हे मी ओळखलं. खरं म्हणजे प्रतिमेचं लग्न आता थांबायला हवं होतं; पण आम्ही दोन्ही पक्ष आता इतके पुढं गेलो होतो, की आता आम्हांला थांबणंच शक्य नव्हतं. व्याह्यांनाही ते पटलं. मुलीचे आईवडील येत नाहीत, येऊ शकत नाहीत, यामुळं त्यांची निराशा झाली; पण परिस्थितीनंच खोडा घातला तिथ कोण काय करणार !

लग्नाचा दिवस उजाडला. सगळे सामान कार्यालयात पोचले. पाठीमागून आम्ही सर्वांनी जायचं; पण त्याच वेळी प्रतिभा अनावरपणे स्फुंदून रडू लागली. तिचं दु:ख मला कळत होतं. – नव्हे, ते माझे काळीज कापीत होतं. ज्यानं तिचं कन्यादान कराचं तो बाप स्वत: चतुर्भुज होऊन कुठे तरी कोंडला गेला होता. जिनं मायेचा हात पाठीवरून फिरवून पाठवणी करायची, ती तिची जन्मदात्री माउली तोच हात स्वत:च्या कपाळावर मारून घरी बसली होती. मुलीचं मंगल अन् आईचा शोक ! अन् आम्ही तिऱ्हाईत माणसं तिला लोटून द्यायला निघालेलो – तिनं अशा वेळी रडू नये तर काय करावं ?

पण तिचं अश्रूंचं कौतुक करीत बसायला या वेळी आम्हांला सवड नव्हती. अन् तिचं रडणं तर थांबायला हवं होतं. म्हणून मग मी निराळाच मंत्र जपला.

''प्रतिभा, असं मुळूमुळू रडणं तुला शोभत नाही. शेचाळीस साली डॉ. लोहियांनी गोव्यात सत्याग्रहाचं रणशिंग फुंकलं, तेव्हा बरोबरीच्या मुलींना घेऊन प्रभातफेरी काढणारी ती तूच ना ? तुझ्या हातातला तिरंगी झेंडा गोरा सार्जट हिसकावून घेऊ लागला तेव्हा बेशुद्धपडेपर्यंत आपली मूठ ढिली होऊ न देणारी ती तूच ना ? त्या वेळेस एवढा धीर दाखवलास अन् आता नानांना पकडलं म्हणून

रडतेस ? अग, पकडलं तर सोडतील. आहे काय त्यात ? अन् हे बघ, या लग्नात आता माझ्याबरोबरच तुझ्या नानांचीही अब्रू गुंतली आहे. तू आता आम्हांला सहकार्य द्यायला हवंस. कोरड्या डोळयांनी अन् हसतमुखानं बोहल्यावर उभं रहायला हवंस !''

आणि एकदम जादूची कांडी फिरली. प्रतिमेनं डोळे कोरडे केले. तिला घेऊन आम्ही कार्यालयात आलो. लग्न वैदिक पद्धतीनं व्हायचं होतं. त्यामुळं सीमांतपूजन इत्यादी फालतू सोपस्कारांना फाटा मिळाला होता. मुहूर्ताला अजून अर्धा तास अवकाश होता. कार्यालयाच्या एका भागात वरपक्षाचा जानोस पडला होता. तिथे नवरदेव सजत होता.

मी विचार केला की, हुंड्याची रक्कम त्यांच्या पदरात घालून मोकळं व्हावं. म्हणजे आपला भार मोकळा होईल अन् त्यांनाही विश्वास वाटेल. त्या तयारीनं मी व्याह्याच्या खोलीत गेलो. प्रभाकरच्या बंधूंच्यापुढं बसलो अन् पिशवी बाहेर काढली. त्या नोटांच्या घडीवर एक नारळ ठेवला अन् ती वरदक्षिणा दोन्ही हातांनी त्यांच्यापुढे केली. त्यांनी हात पुढे न करताच विचारलं,

''हे काय ?''

मी म्हटलं, ''हुंड्याची रक्कम.''

ते म्हणाले, ''ठेवा ती तुमच्याच पिशवीत.''

मी चपांपून म्हटलं, ''असं काय बोलता ? मोजून घ्या ना. करारात ठरले तेवढे आहेत.''

तरीही त्यांचा हात मागेच. ते म्हणाले, ''ठरल्या होत्या पुष्कळ गोष्टी; पण त्यां कुठं घडून आल्या आहेत ?''

''म्हणजे ? काही चुकलं का आमचं ?''

''तुमचं काहीच चुकलं नाही; पण जो हुंडा घ्यायचा ठरवला होता, तो मुलीच्या वडिलांकडून – तुमच्याकडून नव्हे.''

''अहो, पण... अहो...हे त्यांचेच पैसे आहेत. त्यांनी धाडले आहेत.''

माझ्या या बोलण्यावर प्रभाकरानं ते आपलं प्रसन्न स्मित केलं अन् म्हटलं ''बाबा, खोटं कशाला बोलता ? घडल्या गोष्टी काय आम्हांला ठाऊक नाहीत ?''

''अहो, नाही. हे खोटं नाही,'' मी अजीजीनं बोललो.

''जरा काकूंना हाक मारता का ?'' तो म्हणाला.

मी बायकोला बोलवायला पाठवलं. ती सैपाकाच्या खोलीत आचाऱ्यांना सगळया सूचना देत होती. ती माझ्या निरोपासरशी बाहेर आली. प्रभाकरनं एकदा तिच्याकडे पाहिलं अन् मला म्हटलं,

''काकूंच्या हातातल्या बिल्वरपाटल्या कुठं आहेत ? मी जितक्यांदा तुमच्याकडे आलो, तितक्यांदा त्या त्यांच्या हातांत पाहिल्या होत्या. मग आज कुठं गेल्या त्या ?''

''आता काय सांगावं ?... अहो – ''

''काही सांगयला नको. तुम्ही ही रक्कम परत करा अन् ते दागिने सोडवून आणा. आत्ताच्या आत्ता हे काम झालं पाहिजे. काकूंच्या ओक्या हातांनी मी. कन्यादान कसं घेऊ?'' आणि तो पुन्हा हसला.

मला वाटलं, की मी कुठल्या जगात वावरतो आहे ? ही माझ्या समोरची माणसं. काय बोलतात हे ? हे वळचणीचं पाणी आढ्याला कसं चढलं ? ह्या उलट्या गंगा कशा वाहिल्या ? मी जागा आहे का स्वप्नात आहे ? नवऱ्या-मुलानं हुंड्याचा लोभ सोडला म्हणजे वाघानं वासरू सोडलां म्हणण्यापैकीच प्रकार... मी थोडा वेळ घुमटळून म्हटलं,

''छे: ! तुम्ही लाजवलंत मला.''

''आम्ही नाही लाजवलं तुम्हांला; उलट तुम्हीच आम्हांला चकित केलंत ! आमचेही अनेक मित्र आहेत. आम्हीही अनेकांचे मित्र आहो. पण मैत्रीत हा जिव्हाळा मी आजवर पाहिला नाही. हा साक्षात्कार मला नवीन आहे. यातून मला काही तरी शिकू दे.'' हे बोलताना प्रभाकर आर्द्र झाला होता.

त्यावर मला बोलायला काही आवकाश नव्हता. तरी मी म्हणालो,

''बरं बुवा... पण आता मुहूर्ताची वेळ टळेल तेवढं करीपर्यंत.''

''टळू दे. काकू भरल्या हातांनी मुलीला घेऊन पुढे आल्या की -''

'' 'तदेव लग्नं सुदिनं तदेव' !''

## शब्दार्थ

**लखोटा** पाकीट **तूर्त** सध्या **अनुमानधपका** अंदाज **अर्थशक्ती** पैशाची ताकद, धनाची ताकद **दुर्घट** अशक्य **जोजार** जबाबदारी **बेताल** बेफास **वरसंशोधन करणे** मुलगीसाठी नवरा शोधणे **मॅट्रिक** पूर्वीची शालांत परीक्षा **जेहेत्ते** जेमतेम, जसेतसे **ताडणे** समजणे **भाळणे** भुलणे **घासाघीस** खळखळ, वाद, चिकित्सा **मनीऑर्डर** पोस्टाने पैसे पाठवणे **मित्रऋण** मित्रांचे उपकार **सन्मित्र** चांगला मित्र **आत्मीयता** आपुलकी, जिव्हाळा **जिन्नस** वस्तू, पदार्थ **लट्ठासट्ठी** वादावादी, वादविवाद, मारामारी **पठाडी गोमी** मनातले विचार **दृष्टादृष्ट** नजरानजर **तहान** तृषा, तृष्णा **आढयता** गर्व, घमेंड **बाणा** पण, निश्चय, निर्धार, जिद्द **केळवण** लग्नाआधी नवरा किंवा नवरीला जेवायला बोलवूण त्यांना आहेर देतात तो विधी **जानोसा** लग्नघर **ओक्या** रिकाम्या, रित्या **आर्द** ओला, भिजलेला

## वाक्प्रचार

**हरीवर हवाला ठेवणे** परमेश्वरावर विश्वास ठेवणे **हूं तर कथा कर तू** आपले कार्य दुसऱ्याने करणे **माथी मारणे** जबाबदारी घेणे **नाकी नव येणे** खूप कष्ट होणे, खूप त्रास होणे **मान तुकवणे** मान राखणे, ऐकणे **गड सर करणे** यशस्वी होणे **मूठ भर मांस चढणे** खूप आनंदीत होणे **मृदंग होणे** दोन्हीकडून त्रास होणे **कपात सूचना आणणे** कामाचे प्रमाण कमी करणे **काळजाचं पाणी होणे** खूप भीती वाटणे **हिरमोड होणे** निराश होणे **उत्तेजित होणे** आनंदीत होणे **जीव गहाण ठेवणे** प्राण पणाला लावणे **हातपाय गाळून बसणे** धीर खचणे **चंद्रबळ आणणे** शक्ती एकवटणे, धाडस करणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) नानांचे पत्र कशावरून ओळखता येते ?

(2) कुणासाठी वरसंशोधन चालू होते ?

(3) प्रतिभाचे लग्न कुणाबरोबर ठरले होते ?

(4) लग्नात हुंड्याची किती रक्कम ठरली होती ?

(5) लग्न कोणत्या तारखेला ठरले होते ?

(6) प्रतिभाचे कन्यादान कोणी केले ?

(7) नानांचा कोणता व्यवसाय होता ?

(8) गोव्यात सत्याग्रहाचे रणशिंगे कोणी फुंकली ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) प्रतिभाच्या वरसंशोधनाचा कार्यक्रम कसा पार पडला ?

(2) प्रतिभेला पुण्यात राहू देण्याचा निर्णय का घेण्यात आला ?

(3) नानांना अटक करून तुरुंगात का टाकण्यात आले ?

(4) प्रतिभेच्या लग्नाचा हुंडा वरपक्षाने का स्वीकारला नाही ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) नानांनी पत्राद्वारे स्थळासंबंधी काय कळवले होते ? ते सविस्तर सांगा ?

(2) नानांच्या मित्राने मैत्री कशा प्रकारे निभावली ?

(3) नाना मुलींच्या लग्नात का येऊ शकले नाहीत ?

**4. खालील विधाने कोण - कोणस कोणत्या प्रसंगी म्हणाले ते सांगा :**

(1) ''ऐकलंस का ग ? नानांच पत्र आलं आहे.''

(2) ''असू दे. सगळं पत्र कडेपत्तर वाया.''

(3) 'ते एकदम लग्नालाच येणार आहेत बाकीचे सगळे अधिकार आमच्याकडे :'

(4) ''जे घडतं आहे ते काही समाधानकारक नाही.''

(5) ''तुम्ही हे लग्न रहित करा.''

(6) 'खबरदार, मुलांना हात लावला तर'

**5. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) नाना कुठे राहत होते ?

(A) पुण्यात (B) गोव्यात (C) मुंबईत (D) सातार्‍यात

(2) जिलेबीला कोणता रंग वापरतात ?

(A) लाल (B) पिवळा (C)हिरवा (D) केसरी

(3) नवर्‍या मुलानं कसला लोभ सोडला होता ?

(A) दागीन्यांचा (B) हुंड्याचा (C) कपड्यांचा (D) यापैकी एकही नाही

(4) नानांना कोणत्या गुन्हयाबद्दल पकडले ?

(A) चोरी (B) खून (C) मारामारी (D) राजद्रोह

**6. खालील उदाहरणानुसार शब्दाची द्विसक्ती होणारे आणखी शब्द पाढातून शोधून लिहा :**

उदा : जाडजूड, वारंवार

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- कृष्ण - सुदामा यांच्या मित्रप्रेमाची गोष्ट तुमच्या शब्दात लिहा.

**शिक्षक-प्रवृत्ती**

- हुंडा घेणे आणि हुंडा देणे हा कायद्यानुसार गुन्हा आहे हे मुलांना समजावून सांगा.
- समाजात हुंड्यासारख्या वाईट प्रथा बंद करण्यासाठी विविध नाटकाद्वारे, भावनाद्वारे, विविध कार्यक्रमाद्वारे लोक जागृती आणण्याचा प्रयत्न करणे.

●

# 20 दाट रानात

– **रस्किन बाँड**

(जन्म : 19 मे, 1934)

**अनुवाद :** सुमती सरन

भारतीय नागरिकत्व असलेले हे लेखक भारतात कसौनी येथे राहिले आहेत. भारतीय जीवनाशी पूर्णपणे समरस झालेल्या तरल मनाच्या, कलावंत वृत्तीच्या रस्किन बाँड यांनी, भारतीय बाल साहित्यात मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव करण्यासाठी साहित्य अकादमीने त्यांना 1992 मध्ये पुरस्कार दिला आहे. 'जुनून' चित्रपटाची कथा त्यांनी लिहिली आहे. The blue umbrella our Trees still gorw in – इ. अनेक पुस्तके व चित्रपट कथा त्यांनी लिहील्या आहेत.

सुमती सरन यांनी 'वृक्षाच्या विश्वात' या त्यांच्या पुस्तकाचां सरस अनुवाद केला आहे. या निबंधात साल आणि मोह या वृक्षाचा परिचय व त्यांची वैशिष्टये अत्यंत रोचक पद्धतीने लेखकाने लिहिली आहेत.

---

कोणाही वृक्षप्रेमी माणसाला मग तो शहरात राहणारा असेना, का साल आणि मोह या दोन वृक्षांची अवहेलना करता येणार नाही. आपल्या रानातील सर्वात वैभवशाली आणि मौल्यावान वृक्षांमध्ये यांची गणना होते.

साल वृक्ष शहरातही लावता येतो. पण त्याला एकलेपणा आवडत नाही. तराईच्या रानांत किंवा उत्तर आणि मध्य भारतातील सपाट मैदानी प्रदेशात आपल्या जातभाईबरोबर रहायला मिळाले की तो खूष होतो. इमारती लाकूड म्हणून सालवृक्ष बहुमूल्य आहे. उत्तर भारतात इमारतीसाठी वापरण्यात येणाऱ्या लाकडापैकी बहुतेक लाकूड साल वृक्षाचे असते. पण फक्त लाकडासाठीच ते उपयुक्त आहे असे नव्हे. त्यापासून बऱ्याच मोठया प्रमाणावर राळ मिळते. ती हिंदूंच्या धार्मिक समारंभांत धूप म्हणून जाळण्यास उपयोगी पडते. गलबते व जहाजे यात पाणी जाऊ नये म्हणून भेगा बुजवण्याच्या कामीही तिचा उपयोग होतो. मोठ्या, रुंद चमकदार पानांचाही चांगल्या कामाकरिता वापर होतो. बिहारमधील संथाळ लोक साल वृक्षाची ताजी पाने रोज गोळा करून त्यापासून पत्रावळी द्रोण तयार करतात. पाने अगदी जवळजवळ आणि नीट सांधली असता वरणभातासकट सारे पदार्थ त्यावर नीट जेवता येतात. तसेच सालाचे एक मोठे पान घेऊन गोलसर वळवले म्हणजे त्याचा एक झक्कपैकी खोलगट आकार तयार होतो व त्यात पाणी न सांडता मावते.

पानांच बांधकामासाठीही उपयोग होतो – पण माणसांच्या नव्हे तर मुंगळ्यांच्या !

हे तांबडे मुंगळे हिरव्या वा सुकलल्या पानांच्या ढिगापासून आपले घर बनवतात. ही पाने डिंकासारख्या एक प्रकारच्या चिकट पदार्थांने एकमेकांना चिकटलेली असतात. या घरांपैकी एखादे घर जर तुम्ही तपासून बघितले (त्यास हात मात्र लावू नका हं) तर ते मुंगळयांनी गजवजलेले तुम्हाला दिसेल. पण त्या मुंगळयाना पाळण्याचा मात्र विचारसुद्धा मानत आणू नका. कारण मधमाशांसारखेच ते देखील आक्रमक वृत्तीचे असतात. आणि अगदी कडकडून चावा घेतात. एक शिकारी हत्तीवरून शिकार करीत असताना चुकून मुंगळयांच्या वारूळाशी त्याची टक्कर झाली. त्याबरोबर त्यांनी त्याची जी भंबेरी उडविली तो विचारू नका.

साल वृक्षावर तळ ठोखून राहणारा आणखी एक कीटक म्हणजे रातकिडा होय. उन्हाळ्यात आणि पावसाळ्यातही कदाचित तुम्ही त्याचे गुणगुणणे ऐकले असले. याचा आवाज मोठा तीव्र असतो आणि रानातले सर्व रातकिडे गुणगुणू लागले म्हणजे तार स्वरातील वृंदगानासारखे ते वाटते. मात्र त्यातील प्रत्येक संगीतकार आपल्या वेगळ्याच सुरात वाद्य वाजवीत असतो. या गोंगाटामुळे पक्षी देखील भिऊन स्तब्ध होतात. पण नर किडेच फक्त गातात. मादी मुकी असते.

मध्य भारतातील आदिवासींमध्ये पिंपळाची जागा साल वृक्षाने घेतली आहे. मार्चमध्ये जेव्हा हा वृक्ष फूलतो तेव्हा 'बाह बोंगा' नावाचा एक उत्सव ते साजरा करतात. लग्नाच्या वेळी त्यांच्याकडे मांडवात दोन खांब रोवतात. त्यापैकी एक बांबूचा असतो तर दुसरा

सालाच्या लाकडाचा. त्याला तेल हळद लावलेली असते. नवरा बायको पैकी कुणाला जर एकत्र रहायचे नसेल तर सालाचे एक पान घेऊन ते मधोमध चिरून त्यांना काडीमोड घेता येतो.

एक दंतकथा आहे की बुद्धाच्या जन्माच्या वेळी त्याच्या आईने साल वृक्षाची फांदी धरण्यासाठीच हात पुढे केला होता. आणि मुलाला जन्म दिला होता. बुद्धाच्या निर्वाणाच्या प्रसंगीदेखील साल वृक्षांनी त्याला निरोप दिला होता. मोसम नसूनदेखील आपल्या फुलांची पखरण त्यांनी त्याच्यावर केली होती आणि आपल्या फांद्या झुकवून त्याच्यावर सावली धरली होती.

आदिवासी लोकांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान असणारे, रानातले आणखी एक झाड म्हणजे मोहाचे डौलदार झाड होय.

मोहाची फूले कच्ची किंवा शिजवून खाता येतात. गोंड लोकांच्या आणि मध्य भारत व पश्चिम भारतातील इतर आदिवासी जमातींच्या आहारातील तो एक महत्त्वाचा पदार्थ आहे.

विशेषत : दुष्काळात ज्यावेळी तांदूळ मिळत नाही त्यावेळी ती खूपच उपयोगी पडतात. खरे सांगयचे तर गोरगरीब लोक बहूतेक मोहाच्या पिकावरच सर्वस्वी अवलंबून असतात.

मोहाच्या बियांपासून एकप्रकारचे तेल गाळतात. दिवाबत्तीसाठी ते वापरतात. तसेच खाण्यातही ते तुपाच्या ऐवजी वापरता येत. साबण तयार करण्यासाठीही या तेलाचा वापर होतो.

उन्हाळा सुरु होण्याच्या सुमारास मोहाला विलक्षण बहर येतो. त्यावेळी आदिवासी लोक बहुधा अडचणीत असतात. पेरण्या वगैर चालू नसल्याने सर्वांना फुरसत असते. त्यामुळे मोहाची फूले वेचायचे काम चांगले असते. गावातले सर्वजण फूले वेचायला लागतात. कधी कधी फुले सहजगोळा करता यावीत म्हणून झाडाखालचे गवत जाळून टाकतात. बायका एकावर एक टोपल्या रचून त्या डोक्यावरून घेऊन येतात तर मुले झाडू घेऊन येतात. सारी फुल वेचून झाल्यावर दुसऱ्यांदा होणाऱ्या पुष्पवर्षेसाठी खालची जमीन स्वच्छ करून ठेवता यावी म्हणून ही जय्यत तयारी असते.

मोहाची फुल पडतात त्या साधारणपणे पंधरा दिवसांच्या छोट्या अवधीत गावकरी बहुधा रानातच मुक्काम करतात. बायकापोरे फुले लगबगीने वेचत राहतात तर पुरुष मंडळी ती जलदीने वाहून नेण्याचे काम करतात.

एका मोकळ्या, समतल आणि अतिशय काळजीपूर्वक स्वच्छ करून तयार केलेल्या जागी ही फूले पसरतात. सुकून त्यांचा आकार निम्मा होतो. रंग देखील पांढऱ्याचा तपकिरी होतो. मोह बहुधा तसाच खाता. पण कधी कधी त्यास अधिक चवदार बनवण्यासाठी साल वृक्षाच्या बिया किंवा तांदूळ त्यात मिसळतात. अगोदर मोह उकडतात. मग त्यात अगोदरच उन्हात वाळवून व भाजून ठेवलेल्या सालाच्या बिया व थोडासा तांदूळ टाकतात.

रानटी प्राण्यांना, मुख्यत्वे अस्वलाला, मोहाची फूले फार आवडतात. पण ती गोळा करण्यासाठी माणूस काय नि प्राणी काय कुणाला कधी झाडवर चढावे लागत नाही. त्याची फूले रात्री फुलतात आणि पहाटे जमिनीवर त्यांचा सडा पडतो.

## शब्दार्थ

**वृक्षप्रेमी** वृक्षांवर प्रेम करणारा **अवहेलना** अपमान, दुर्लक्ष **वृंदगान** समूहगीत **अवधी** दिलेला वेळ **निम्मा** अर्धा **झक्कपैकी** छानदार, स्तब्ध **शांत** चूपचाप **दंतकथा** तोंडोतोंडी चालत आलेली कथा **निर्वाण** थोर व्यक्तीचा मृत्यू, उपयुक्त **गोंगाट** गलबला

## वाक्प्रचार

**काडीमोड घेणे** लग्नमोडणे, घरस्फोट घेणे **भंबेरी उडविणे** फजिती करणे, घाबरवणे **फुरसत नसणे** मोकळा वेळ नसणे **गणना होणे** मोजले जाणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची थोडाक्यात उत्तरे लिहा :**

(1) सालवृक्षाची वैशिष्ट्ये काय काय आहेत ?

(2) राळ हा पदार्थ कोणत्या वृक्षापासून मिळतो ? त्याचे उपयोग काय आहेत ?

(3) मोहाच्या वृक्षाचा थोडक्यात परिचय लिहा.

(4) मध्यभारतातील आदिवासींमध्ये साल वृक्षाचे काय महत्त्व आहे ?

(5) मोहाच्या बियांपासून काय बनवतात ? त्याचे विविध उपयोग कोणते ?

**2. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) साल वृक्षावर तळ ठोकून राहणारा कीटक ...................... होय.

(A) मुंगळा (B) अकी (C) रातकिडा (D) काजवा

(2) मोहाचे झाड ...................... असते.

(A) डौलदार (B) घनदाट (C) हिरवेगार (D) बहुमूल्य

(3) ...................... सुरु होण्याच्या सुमारास मोहवृक्षाला बहर येतो.

(A) वसंतऋतु (B) उन्हाळा (C) हिंवाळा (D) पावसाळा

(4) मोहाच्या ...................... पासून एक प्रकारचे तेल काढतात.

(A) फूलांपासून (B) लाकडापासून (C) मुळापासून (D) बियांपासून

(5) रानातले रातकिडे गुणगुणू लागले, म्हणजे तार स्वरातील ...................... ते वाटते.

(A) भावगीता सारखे (B) वृंदगानासारखे (C) वाद्यसंगीतासारखे (D) समूहगीतासारखे

**3. पुढील वाक्यप्रचारांचा अर्थ लिहा व वाक्प्रचाराचां वाक्यात उपयोग करा.**

गणना होणे, काडीमोड घेणे, भंबेरी उडवणे.

**4.** छान + दार = छानदार, मजा + दार = मजेदार, या प्रमाणे 'दार' प्रत्यय लावून विशेषण तयार करता येते. अशा प्रकारचे आणखी पाच शब्द शोधा व लिहा.

**5.** 'मानवाचा श्रेष्ठ मित्र – वृक्ष' – या विषयावर 10 ते 15 वाक्यात लेखन करा.

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- आपल्या आसपास आढळणाऱ्या वड, पिंपळ, कडुलिंब, अशोक (आसोपालव), आंबा या वृक्षांची पाने एकत्र करा. चार्ट पेपर पाने चिटकवून त्या वृक्षाचे नाव, उपयोग व इतर वैशिष्ट्ये यांचा तक्ता तयार करा.

### शिक्षक-प्रवृत्ती

- विद्यार्थ्यांना ग्रामीण भागात सहलीला नेऊन विविध प्रकारच्या वृक्षांचा सविस्तर परिचय द्या.

●

# 21 दिंडी

**– हिरा बनसोडे**

(इ.स. 1939)

सौ. हिरा गुलबराव बनसोडे – शतकानुशतके अस्पृश्यतेच्या जुलमी रुढीने पिचलेल्या दलित समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व मिळाले. या समाजात शिक्षणाचे वारे वाहू लागले. त्याला आपल्या अस्मितेची ओळख पटली आणि हा नवशिक्षित दलित आपल्या व्यथा, वेदना साहित्यातून व्यक्त करु लागला. धर्मपीडित आणि सन्मानखंडित दलित वर्गातील विद्रोहाची भावना त्याच्या कवितेतून उमटली. मराठी साहित्यात दलित साहित्याचे एक वेगळे विश्व निर्माण झाले. प्रस्तुत. कवितेच्या कवयित्री 'हिरा बनसोडे' यांचे बालवयातच लग्न झाले. शिक्षणाची कोणतीही परंपरा नसताना सुद्धा लग्नानंतर सगळया जबाबदाऱ्या संभाळून एम.ए.पर्यंत शिक्षण घेऊन आपली शिक्षणाची, काव्यलेखनाची आवड त्यांनी जोपासली आहे. 'पौर्णिमा; फिर्याद' हे त्यांचे काव्यसंग्रह आहेत.

त्यांच्या कवितेमधुन स्त्रीवर होणाच्या अन्यायचे, दलितांच्या शोषणाचे चित्रण केले जाते. अनेक संस्थांची पारितोषिके त्यांच्या ग्रंथांना मिळालेली आहेत. माणसाला अपमानित करुन, त्याला जनावरां पेक्षाही वाईट आयुष्य जगायला लावणाऱ्या जुनाट रुढीपंरपरांचा त्यांच्या लेखनात निषेध केला आहे.

गाडगे महाराजांना उद्देशून ही कविता आहे. त्यांनी समाजाला परिवर्तनाचा/स्वच्छतेचा मंत्र दिला होता. पण आज त्यांची शिकवण विसरली गेली आहे. रुढी, अंधविश्वासाच्या विरुद्ध त्यांनी दिलेला लढा परत सुरु करायला हवा असे कवयित्रीला वाटते.

---

**पूज्य गाडगेबाबा !**

तुझ्या नावाचा जयघोष करीत जेव्हा दिंडी चालते
तेव्हा तुझ्या आठवणीने मन भरून येते
सागर हेलावतो आणि आभाळ झुकून येते
हजारो ओठांवरून तुझी प्रार्थना गुणगुणली जाते
'गोपाला, गोपाला, देवकीनंदन गोपाला !'

भुकेल्यांना अन्न आणि तृषितांना पाणी पाजणारे
तुझे आईचे प्रेमळ हृदय तू कुठल्या मातेला दिलेस बाबा ?
अंधश्रद्धेच्या गर्तेतून ओढून सन्मार्गाचा प्रकाश देणारे
तुझे तेजस्वी सूर्यसंदेश कुठल्या शिल्पावर कोरले आहेस ?

दगडांच्या देवाची तू कधी पूजा केली नाहीस तर
माणसातल्या देवांना तू ललकारीत राहिलास
बळी जाणाच्या मुक्या जीवांना तू प्राणदान दिलेस
कणखरपणे खऱ्या मानवधर्माला तू आयुष्य वाहिलेस
गाव झाडता झाडता तू माणसांच्या मनावरली धूळ झटकलीस
त्या तुझ्या कष्टाळू हाताची पाखर, कुठल्या आडोशाला ठेवलीस ?
तुझ्या निरक्षर मुखातून झरणारा सरस्वतीचा दिव्य ज्ञानप्रवाह
कुठल्या कमळाच्या तळयात सोडलास ? ते तरी सांग...

कुठल्या वाटेने घरगळली तुझ्या जपांची माळ
तिचे मंगळ मणी शोधूनही सापडेनात आम्हाला
कुठल्या रानाला गेली तुझ्या श्वासाची सुगंधी फुले
खऱ्या भक्तीची दिशा दाखविणारी तुझी अगाध तपसाधना

कुठल्या मानवमुक्तीच्या मंदिरात तू दडवून ठेवलीस बाबा ?
हे सारे सारे स्मरतांना आज अपराध्यासारखे वाटते
कारण तुझ्यामागे आमच्या वाटाच हरवल्या आहेत
जगाला जगवता जगवता तू शिणून गेलास
पैलतीरीच्या धर्मशाळेत तुझा मुक्काम नेलास

चंद्र उशाला घेऊन शांत निजलेल्या तुझ्या मंगल समाधीवर
श्रद्धेची ही चार फुले ठेवतांना मन थरथरून येते
नि कानी निनादतात तुझ्या प्रार्थनेचे चिरंजीव स्वर
'गोपाला, गोपाला, देवकीनंदन गोपाला
गोपाला, गोपाला, देवकीनंदन गोपाला... !'

## शब्दार्थ

**जयघोष** जयजयकार **पूज्य** आदरणीय, पुजनीय **दिंडी** मिखणूक, भजनीमेळा **आभाळ** आकाश **तृषित** तहानलेले **शिल्प** प्रतिमा **अगाध** अपार **शिणणे** थकणे **चिरंजीव** अमर, कायम टिकणारा **निनादणे** घुमणे **ललकारणे** आव्हान करणे **कणखर** मजबूत, बळकट **गर्ता** खड्डा, खळगा, दरी **सन्मार्ग** सत्याचा मार्ग, शुद्ध मार्ग, सुमार्ग **निरक्षर** अडाणी, अक्षरओळख नसणारा, न शिकलेला

## स्पष्टीकरणात्मक टीपा

(1) **सरस्वतीचा ज्ञानप्रवाह :** सरस्वती ही बुद्धीची, ज्ञानाची, ज्ञानाची देवता मानली जाते. खरे पाहता गाडेगेबाबांनी, कोणतेही. शिक्षण घेतले नव्हते पण त्यांच्या अनुभवांतुन आणि निरिक्षणांतून, विचारांतून लोकांना शहाणे केले होते म्हणून त्यांच्या उपदेशालाही सरस्वतीचा स्पर्श होता असे कवयित्री म्हणते.

(2) **माणसातला देव :** देवाला सोने-नाणे देणे. देवाला हात जोडून मोठमोठ्या देणग्या देण्यापेक्षा आपल्या आसपास असणाऱ्या अडीअडचणीत सापडलेल्या गरीबांना, असहाय्यांना मदत करायला हवी. दगडातल्या देवापेक्षा हाडामांसाच्या माणसांच्या आनंदात आनंद मानावा.

(3) **पैलतीराची धर्मशाळा :** येथे परलोक, मृत्यू सुचवलेला आहे.

(4) **अंधश्रध्देची गर्ता :** जुन्यापुराण्या रुढी परंपरांच्या विचाराना सोडून आता नव्या विचारांचा, नव्या आचारांचा आपण स्विकार करायला हवा. तसे केले नाही तर अंधविश्वासाच्या दरीतून आपण बाहेर येऊ शकणार नाही. शिक्षण आणि नवे विचार यांची कास धरली पाहिजे. हे गाडगेबाबा सांगत होते. भोंदूगिरीचा त्यांनी विरोध केला.

(5) **सूर्यसंदेश :** प्रकाशाची वाट दाखवणे.

गाडगेबाबांनी आपल्या प्रवचनातुन, कीर्तनातुन समाज-सुधारणेचा मंत्र दिला दारू, मांसाहार, सोडून देण्याचा उपदेश केला. आणि अज्ञानी जनतेला ज्ञानाचा, प्रकाशाचा संदेश देऊन त्यांना अंधश्रध्देच्या अंधारातून बाहेर काढले. म्हणून त्याला सूर्यसंदेश म्हटले आहे (करुणा, आपुलकीचा पुरस्कारकेला.)

(6) **शिल्प :** पूर्वी राजे आपली आज्ञा शिकेवर लिहून ठेवत असत. त्यांना शिलालेख म्हणत होते. सर्वजण या आज्ञा पाळत असत. कवयित्रीने येथे गाडगेबाबांची शिकवण, त्यांचा उपदेश यांना 'शिल्पाची' उपमा दिली आहे. (लोकांना मदत करणे)

(7) **मंगलमणी :** जपाची माळ , म्हणजे नामस्मरण करण्याची माळ . बाबा नेहमी 'देवकी नंदन गोपाला' असा मंत्र म्हणत पण आज मात्र ही सुधारणेचा मंत्र देणारी माळ तुटून गेली. लोक परत चुकीच्या वाटेने जात आहेत.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तरे द्या :**

(1) कोणाचा जयघोष करीत दिंडी जात आहे ?

(2) दिंडी पाहून कवयित्रीला काय वाटते ?

(3) हजारो ओठ कोणती प्रार्थना गुणगुणतात ?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) संत गाडगेबाबांनी लोकसेवेची कोणकोणती कार्ये केली ते या कवितेच्या आधारे सांगा.

(2) आजच्या समाजस्थितीकडे पहातांना कवयित्रीच्या मनात कोणकोणते प्रश्न निर्माण होतात ?

(3) कवयित्रीला अपराध्या सारखे का वाटते ?

(4) गाडेगेबाबांनी कोणाची पूजा केली नाही ?

**3. खाली दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द द्या :**

सन्मार्ग, कणखर, निरक्षर, स्मरण

**4. संदर्भासहित स्पष्टिकरण द्या :**

''कुठल्या वाटेने घरंगळली................................

.................................. तुझी अगाध तपसाधना ।''

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- देवकीनंदन गोपाला - ही गो. नी दांडेकर यांची कादंबरी वाचा.
- समाजाला, लोकांना योग्य मार्ग दाखविणाऱ्या आणि समाजासाठी कार्य करणाऱ्या दुसऱ्या संतांची चरित्रे मिळवा आणि वाचा. जसे की, बाबा आमटे, प्रकाश आमटे, म.फुले, महर्षी कर्वे, आंबेडकर.

### भाषासज्जता

'संत गाडगेबाबा' म्हणजेच अमरावती जिल्ह्यातील 'डेबुजी झिंगराजी जानोरकर' एकही दिवस शाळेत न गेलेला महान विज्ञानवादी संत. ''वैज्ञानिक विचार करायला शिक्षण लागतेच अस नाही. तर आपल्या डोक्यातील मेंदु गहाण न ठेवता स्वतंत्र असावा लागतो. म्हणूनच म्हणतो दैववादी होण्यापेक्षा विज्ञानवादी व्हा. नाहीतर पुढच्या पिढया या कायमच गुलाम आणि दरिद्री राहतील.'' असे त्यांचे म्हणणे होते.

अशा त्यांच्या पुरोगामी विचारांचा आज मात्र पराभव झालेला दिसल्यामुळे व्यथित झालेल्या कवयित्रीची खंत यात दिसते.

●

# 22 सुंदर

**– श्री. दा. पानवलकर**

(जन्म : इ.स. 1928, मृत्यू : इ.स. 1985)

स्वातंत्र्योत्तर काळातील नामवंत कथाकार आणि कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध 'एका नृत्याचा जन्म', 'औदुंबर', 'गजगा', चिनाब. इ. कथासंग्रह तसेच 'जांभुळ' हा दीर्घकथासंग्रह ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.

त्यांच्या कथांमधील चित्रण शहरी आणि ग्रामीण जीवनाच्या सीमारेषेवरील समाजाचे दर्शन घडविते. 'औदुंबर', 'चिनाब', आणि 'सूर्य' या कथासंग्रहांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार मिळाले आहेत.

प्रस्तुत कथेत सुंदर नावाच्या हत्तीचे मनाला स्पर्श करणारे भावविश्व चित्रित केले आहे. या कथेत लेखकाने हुबेहुब संस्थानी वातावरण उभे केले आहे.

---

गणपतीच्या देवळाच्या नगारखान्यात चौघडा झणझणू लागला आणि सनईवर मंद गंभीर सूर घुमू लागला. कानाचा पंखा हलाला. दगडी चिरबंदी फरशीवर साखळदंडाचा खडखडाट झाला. सुंदरला जाग आली आणि तो उठून उभा राहिला.

सोंडेचा भाता मारून त्यानं रात्रीचा उष्टा घास उडवून लावला. ठाण्याच्या लोखंडी खांबावर सोंडेनं दोन दणके हाणून आळस झटकला. वरचा पत्रा दणदणला. त्यासरशी समोरच्या ढेलजेत कुंभकर्णासारखा पसरलेला बाळा महात दाढीचं जंजाळ खाजवत जागा झाला. एका कानात आख्खी करंगळी घालून त्यानं कान खाजवला आणि चौघड्यावरच्या टणक टिपरीचा ताल धरला. खांबावर आणखी आवाज खणखणला.

''अबेऽ ठैर'' माहुतानं जाळीदार जबऽयातून आवाज मारला. डाव्या सुळेदातावर सोंड लपेटून सुंदर नुसता झुलत राहिला. किलकिल्या नजरेनं त्यानं माहुताकडे पाहिलं. गळ्याची झोळी सैल सोडली. आणि आवाजाचा चौफेर फवारा सोडला.

''अबे...'' जिकिरीचा आवाज काढून माहुतानं आपली गुळगुळीत टाळू खाजवली. सनईच्या तानेला मुंडी झटकून दाद दिली. आणि मौल्याला हाक मारली.

मग त्यानं ढेलजेतल्या कोपत्यात ठेवलेल्या गवताच्या पेंडया घेतल्या आणि गचांडी दिल्यासारखा तो सुंदरकडं निघाला.

पेंड्या मोकळया करीपर्यंत त्याच्या खांदयावर लडिवाळपणं सोंड टाकून सुंदर म्हणाला, ''आज बुधवार. श्रीमंतांच्या दर्शनाला जायचं ना?''

'होय' म्हटल्यासारखं करून माहुतानं त्याची सोंड उचलून बाजूला केली. आणि पुन: दटावलं, ''पहिले नाष्टा करो.''

पेंडीतला एक-एक घास घेऊन सुंदर मोठ्या चवीनं रगडायला लागला.

मौल्या येताना दिसला. त्याला त्यानं वाट करून दिली. सुंदरच्या पायामागची सगळी घाण मौल्यानं खोऱ्यानं उपसली. तोवर मुसळधार पावसानं वळचणीची पन्हाळ ओसंडावी तसा फरशीवर आवाज पसरला मौल्या तीनताड बाजूला झाला. दगडी हौदावर पळत जाऊन त्यानं पाण्याची बादली आणली. फरशी साफ केली. आणखी चार बारड्या ओतल्या. एक सुंदरपुढं भरून ठेवली. सुंदरनं. बारडी रिकामी करून सर्रकन लांबसडक चूळ टाकली आणि शेपूट फटकावून तो ऐसपैस झुलत राहिला. आता त्याला प्रसन्न वाटू लागलं.

एरवी सुंदरला अवतीभवती बिलकूल घाण खपत नसे. ग्रेट ग्रँड सर्कशीत यासाठीच तो राहायला राजी नव्हता. रात्रभर डरकाळ्या आणि गर्जना यांमुळे त्याला तिथं नीटशी झोपही मिळत नसे. पिंऱ्यातल्या उष्टया मांसमच्छराचा उग्र घाण वास त्याला त्राही त्राही करून सोडी. समोर टाकलेल्या घासाला त्यामुळं रुची लागत नसे.

घरंदाज कुळातला असल्यानं त्यानं कधी काही वावगं सहन केलं नव्हतं. त्याचा मूळपुरूष चित्रकूट पर्वतावरच्या घनदाट जंगलात मोठा नावाजलेला. प्रचंड पहाडांना गंडस्थळानं प्रहार करून पर्वतांची दऱ्याखोरी घुमवत असे तो. कमळांच्या ताटव्यांनी

फुललेल्या विशाल सरोवरात जलक्रीडेचा मुक्त आनंद त्यानं यथेच्छ उपभोगला होता. त्या गजश्रेष्ठाचं फुळ सुंदर सांगत होता. सर्कशीतल्या या डुकरांना त्या ऐरावती उपभोगाची मिजास काय कळणार? मालकाच्या छडीच्या इशाऱ्यावर लाकडी गोल पिपं चालवायची. माकडाला पाठीवर घेऊन बँडच्या तालावर रिंगणात फिरायचं आणि तो सांगेल तेव्हा सोंड वर करायची. या सगळ्या प्रकाराची सुंदरला विलक्षण चीड येत असे. शिवाय त्यावेळी लहान म्हणून फारसं कुठं सोडत नसत. मेहनत फार करवून घेत. सोंडेनं नीट सलाम केला नाही तर पाठीवर बांबू फूटायचे. शेवटी वैतागून त्यानं ठरवंल आणि एका खास राजेशाही खेळात हैदोस मांडला.

त्या दिवशी खेळ एन रंगात आला होता. बँडवाले भलतेच तालात होते. रिंगणात दोन फेऱ्या झाल्या आणि तिसऱ्या फेरीला समोरच्या खुर्चीवरल्या माणसाला सुंदरनं कमळाचं फूल खुडावं तसं सोंडेन लीलया उचलून रिंगणातल्या गोल पिंपावर बसवलं. त्या माणसाची एकही बरगडी वाकडी झाली नाही. पण सबंध तंबू उठून उभा राहिला. हलकल्लोळ मांजला, ''हत्ती पिसाळला, हत्ती पिसाळला! '' म्हणून मालकाच्या डोक्यात मशाल पेटली. त्यानं त्याच्या पायाला लोखंडी चिमटे लावून साखळदंडात डांबलं आणि शिव्या घालून यथेच्छ बडवून काढल.

नरेंद्र आणि गजेंद्र नुसते पाहत झुलत होते. नाही म्हणायला आंबाली तेवढी निस्तब्धपणे टिपं गाळत होती. तिचा जीव कासावीस झाला होता. सगळया खेळात ती त्याच्या बरोबर काम करी.

.... आता केवढी तरी दिसायला लागली असेल. लाकडी पिपावरून कामं करताना टाळया घेत असेल...

खेळाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी राजघराण्यातली काही मंडळी त्याच्यापुढं येऊन उभी राहिली. मालक त्या मंडळीना काहीतरी सांगत होता. त्यांचं बोलणं त्याला नीटसं ऐकू आलं नाही. पण सर्कशीतून कुठंतरी रवानगी होणार याचा त्याला अंदाज आला.

आणि त्या दिवसापासून संस्थानचा हत्ती म्हणून सुंदर मोठ्या मानानं झुलत राहिला. गणरायाच्या उत्सवात चांदीची अंबारी घेऊन तो मिरवू लागला. दर बुधवारी श्रीमंतांच्या बंगल्यावर दर्शनाला जाऊ लागला. गणरायाच्या संस्थानचा छबिना निघाला म्हणजे सगळ्यांच्या आघाडीवर ऐरावतासारखा दिमाखाने चालायचा.

अंगावर कोवळी उन्हं पडू लागली. मौल्यानं आग्ऱ्याच्या संगमरवरानं त्याचं अंग घासून यथेच्छ आंघूळ घातली. काथ्याच्या वस्त्रानं पुसून काढलं. मग अंगावर रेशमी भगवी झूल चढवली. डोळयांत दोन वाट्या काजळ भरलं. गळ्याला लाल रेशमी गोफ घातला. त्याला मुंजळ घंटा लटकावून दिली. टाचेपर्यंत हिरव्या पटक्याचा शेमला सोडून माहूत सामोरा आला. सुंदरनं डाव्या पायाची खुर्ची केली आणि त्याला वर घेतलं. मौल्यानं साखळदंड मोकळा केला. तेव्हा सुंदरनं आवाजचा जोरदार फवारा सोडला. देवळाच्या महाद्वाराकंड तोंड फिरवून गणरायाला त्यानं वेलांटीदार नमस्कार केला.

''चल बेटा – सुंदर !''

वरून आवाज आल्याबरोबर त्यानं पाऊल उचललं. घंटेच्या तालात पावलं पडत होती रस्त्यावर धुरळा उठला. गल्लीबोळांतून चार पाच कुत्री भुंकत आली. कान फडकावून तो हसू लागला.

''सुंदर आला! सुंदर आला !'' रस्तोरस्ती पोरांच्या आरोळ्या उठल्या. त्याला वाटायचं, या पोरांच पाचुंदा करून वर उंच आभाळात फेकावा आणि वरच्यावर अलगद झेलावा. पण एकही पोरटं जवळ येत नव्हतं. गिल्ला करून घरात पळायची कार्टी. शरीर पर्वताएवढं असलं तरी मनही तेवढंच भरल्या आभाळाएवढं आहे. त्यांना सोंडेनं समजावून सांगितलं तरी कळायंच नाही. भाषा समजायची नाही. पटत नाही कुणाला.

तो मग नाकासमोर निघाला. इमानदारांच्या वाड्यापुढं आला. ''ठैरो बेटा सुंदर.''

तो थांबला. इनामदारसाहेबांनी टोपी सावरत त्याच्यापुढं नारळ केला. तो त्यानं पायाखाली घेतला, बरोबर दोन भकलं केली. एक भक्कल इनामदारांना दिलं आणि दुसरं कानामागं अडकवलेल्या पोत्यात टाकलं – ठरल्याप्रमाणं.

सुंदर तसाच पुढं निघाला. जाता जाता डोक्याला लागणारी लिंबाची डहाळी मुरगाळावी आणि एखादयाच्या गॅलरीत फेकावी, असं करत त्यानं गावातल्या बऱ्याच ठिकाणचा समाचार घेतला. तोपर्यंत कानामागचं पोतं नारळानं भरत आलं.

मामालेदारांच्या चुनेगच्ची वाड्यावर  आल्यावर त्याला थोडं थांबावं लागलं. माहुतानं तोपर्यंत त्याचा कान खाजवला. पायाच्या अंगठ्यानं त्याच्या गळयाची झोळी गोंजारली. नंतर मामलेदारीणबाई नथ सावरत आल्या. समजून तो देवासारखा राहिला. बाईनी त्याला हळदकुंकू लावलं. एक गरगरीत नारळ दिला. ओवाळलं. बाईच्या हातात कसला तरी मोठा पुडा दिसला. त्याचा स्वादिष्ट वास आला. त्याच्यापुढं केल्यावर त्यानं तो सोडून पाहिला. सोंडेच्या कटोऱ्यात हवे तेवढे पेढे घेतले. आणि बाकीचा पुडा मनात नसताना वर दिला. बाईनी त्याला नमस्कार केला. त्यानं सोंडभरून आशीर्वाद दिला.... 'तुझ्या दारी गजांतलक्ष्मी नांदत राहील.'

तोपर्यंत पोरांनी वेढा घालून गिल्ला केला. सुंदरनं एक गिरकी घेतली आणि सगळ्यांना दमात घेतल. असंच आणखी चार ठिकाणी नवसाचं मुखात पडलं मग त्यानं सरळ श्रीमंतांच्या बंगल्याचा झपाटा धरला. ऊन तापत होतं. वाट जरा लाबंची होती. कुठंही न थांबता सुंदर रस्ता दाबत निघला. त्याला दुरून कसलातरी आवाज ऐकू येऊ लागला. आवाजाचा ताल केव्हातरी कानात मुरलेला वाटला. त्याचा वेग मंदावला. पुढच्या चौकापर्यंत जाईतो आवाज जोरानं घुमू लागला. 'डिंग , डिंग, डिंगर, डिंगर, डिंग.' त्यात गावठी बँडचा आवाज घुमला.

सर्कसच्या जाहिरातीच्या मिरवणुकीत मित्र, दोस्त रांगेन निघाले होते. त्यांतल्या काहींना सुंदरनं ओळखंल, पण त्याला कुणीही ओळखलं नाही. पुन: त्यानं नजर टाकली आणि अचानक त्याच्या मनात आनंदाचा चित्रकूट सुळका काढून उभा राहिला.

तीची ती.... नक्की. आंबाली. आता मोठा दिसायला लागलीय. किती डौलात चालतेय. पण अंगानं नीटशी भरली नाही.... सर्कसचा मालक मारहाण करत असावा. राबवून घेत असावा. कशी अगदी एकटीच मागं राहिलीय.

त्यानं तिच्याकडं पाहिल आणि आवाजाचा भरदार फवारा सोडला. आंबाली मटकन पाहू लागली. बावरल्यासारखी.

''ए आंबाली, मी .... मी सुंदर, हिकडं बघ.''

आंबालीची नजर त्याच्याकडं गेली आणि तिनं सोंड उंचावून प्रतिसाद दिला. पाचदहा मिनिट त्यां दोघांनी आभाळाच्या कानठळ्या. रस्त्यावरचा गिल्ला त्यात मिसळला. बँड पुढं चालला होता. आंबालीचा पाय उचलेना. मगरीने पाय ओढल्यासारखी ती अडमडली. 'संध्याकाळी नदीवर भेट. मी तिथं आहे.' असं काहीतरी ती सांगत होती.

तोवर त्याच्या गंडस्थळात खसकन अंकुश बसला. मस्तकात कळ उतरली. तरीही तो रेंगाळला. पुन: अंकुश घुसला. अंगात फांद्या फोडत पसरला. वाटलं, तोंडावरची करडी दाढी धरून माहुताला पायाखाली घ्यावा. पण दोन गिरक्या घेतल्या आणि मन काबूत ठेवलं.

तोपर्यंत आंबाली लांब गेली होती.

अंकुशाची कळ अजूनही गंडस्थळ खात होती. तसाच तो भिरभिरत निघाला. रस्त्याची चढण आली. समोरून एक रिकामा टांगा भोंगा वाजवत दणादणा येत होता. त्याच्या आवाजानं सुंदरच्या कानात मुंग्यांच वारूळ झालं. टांगा समोर येऊन थोडा थांबला. सुंदरनं सोंड लांब केली. चाकाला विळखा घातला. वरून अंकुश घुसत होता. तिरमिरीनं मस्तक गरगरलं. रिकामा टांगा तसाच उचलला. अंत्राळीपंत्राळी केला. टांगेवाल्यानं उडी मारली. घोडं सापत्तीतून सुटलं. टांगा झाडाच्या  शेंड्यावरून पलीकडच्या माळावर चकणाचूर होऊन पडला.

''हरामखोर, बेवकूफ, कमीना ....'' अंकुशाच्या पराण्यावर पराण्या लावून माहूत ओरडत होता. त्याच तिरमिरीत सुंदर चढण ओलांडून झपाझपा निघाला. बंगल्याचे चौकीहारे टाकून तो सरळ आत घुसला. आभाळ टरकावल्यासारखा ओरडला. पाहाऱ्यावर धांदल उडाली. हुजऱ्यांची फेफे झाली. उपरणं सावरत खाजगी कारभारी सुंदरकडं पाहून आत धावले. वर्दी गेली तशी श्रीमंतांची स्वारी राणीसाहेबांबरोबर आली. पायघड्या पडल्या. कारभाऱ्यांच्या सूचनेचा इन्कार करून स्वाऱ्या सामोऱ्या आल्या. तरीही सुंदर धडरडत होता. हवेत सोंडेचे फटकारे मारत राहिला.

माहुतानं अंकुश लावून त्याच्या कानात सांगितलं. ''सरकारस्वारी को सलाम कर.'' त्यासरशी त्यानं सोंडेला हिसडा मारला आणि बाजूच्या झाडाची फांदी मुरगाळून टाकली. घंटेचा आवाज खळबळला.

स्वारीना सुंदरचा नूर आज वेगळाच वाटला. पूजेच साहित्य तटस्थ राहिलं. खाशा मंडळीत गडबड झाली. बंदुका सरसावून पहारेकऱ्यांनी श्रीमंतांभोवती कड केलं.

सुंदरनं पायाची खुर्ची केली नाही. माहुतानं वरून उडी टाकली आणि स्वारींना त्रिवार मुजरा घातला.

माहुतानं सुंदरला चुचकारलं. त्याच्या गळ्याची झोळी आपल्या अंकुशाच्या बोटांनी गोंजारली. सुंदरनं त्याचा हात फटकावून लावला. तशी श्रीमंत हत्यारबंद कड्यातून एकदम पुढं झाले. सुंदर चार पावलं मागं झाला.

''माहूत !''

''जी हुजूर !''

''सुंदर आमच्यावर आज रागवला आहे.''

''जनावर मस्तीला येणार असा नूर दिसतोय सरकार.''

श्रीमंतांनी सुंदरकडं पाहिलं आणि हाक दिली, ''सुंदर –, इकडे ये.''

सुंदर दोन पावलं पुढं झाला पण मान झुलवून त्यानं सपशेल नकार दाखवला.

''माहूत, तुम्ही याची नीट देखभाल ठेवत नाही का ?''

स्वारींच्या शब्दासरशी माहूत कारभाऱ्यांच्या बाजूला येऊन म्हणाला. ''हुजूर, येतांना मघाशी त्यानं सर्कसचा बँड ऐकला आणि शिकारखान्यातले हत्ती बघून पागल झाला. सडकेवर धूम मचवली. आवरता आवरेना. अंकुश लावून कसातरी इथपर्यंत आणला.''

श्रीमंत तसेच पुढे झाले. कारभारी एकदम ओरडले,

''श्रीमंत''

माहूत अंकुश घेऊन सरसावला. त्याला हातानं निवारून श्रीमंत सुंदरच्या जवळ जाऊन उभे राहिले. त्याच्या सोंडेवरून हात फिरवला. थोपटलं. त्या स्पर्शानं सुंदरला सरोवरातल्या शुभ्र कमळाची आठवण आली. मस्तकात प्रवाहचा थंडोसा आला. घंटा किणकिणली आणि तो देवासारखा उभा राहिला.

तोपर्यंत पूजासाहित्य आलं. राणीसाहेबांनी त्याला ओवळून प्रसादाचं ताट पुढं केलं. त्याचा घास करून सुंदरनं तो गोड करून घेतला.

श्रीमंतांनी त्याला आणखी थोपटलं आणि वळून फर्मावलं. ''माहूत सर्कसचे हत्ती नदीवर जातील तेव्हा आमच्या सुंदरला मोकळं सोडा. त्याला यथेच्छा क्रीडा करू द्या'' आणि कारभाऱ्याकडं वळून बजावलं, ''कारभारी, घाटावर चौफेर खास बंदोबस्त ठेवा.''

यावर श्रीमंतानी सुंदरच्या लुकलुकत्या डोळ्यांत पाहिल. सुंदरनं कानांचे पंखे ढाळले आणि आपल्या राजाला गगनभेदी मुजरा केला. आवाजाचे अस्मानापर्यंत फवारे सोडले आणि राजाला प्रदक्षिणा घातली.

पायाची खुर्ची करून त्यानं माहुताला वर घेतलं. स्वारीकडं पाहून राणीसाहेब गालात हसल्या. पायघडीवरून पावलं टाकताना श्रीमंतांनी वळून पाहिलं. कसल्यातरी ओढीनं सुंदर झपाट्यानं निघाला होता. तेव्हा घंटेचा किणाकिण ताल नदीच्या धारेत वाहात घुमत राहिला.

## शब्दार्थ

**चौधडा** नगारे, नौबती, सुर, सनई इत्यादी वाद्यांचा संच **चिरेबंदी** घडीव दगडाचे बांधकाम **ढेलजा** जुन्या वाड्यातील प्रवेशद्वारलगतच्या दोन्ही बाजुच्या ओसऱ्या **शेमला** फेट्याचे पाठीमागे सोडलेले टोक **गंडस्थळ** हत्तीचे मस्तक **सापत्ती** घोडा टांग्याला जुंपण्यासाठी वापरली जाणारी कातड्याची पट्टी **पराणी** बैलाला तसेच हत्तीला काबुत आणण्यासाठी वापरले जाणारे साधन, टोचणी **वर्दी** निरोप, **छबिना** देवाच्या पालखीची मिखणूक **गजांतलक्ष्मी** वैभव, समृद्धी

## वाक्‌प्रचार

**त्राही त्राही करुन सोडणे** खुप त्रास देणे **डोक्यात मशाल पेटणे** खूप राग येणे **पाचुंदा करणे** गवताच्या किंवा कडब्याच्या पाच पेंढया एकत्र बांधणे **कानात मुंग्यांच वारूळ होणे** अतिशय राग येणे **अंत्राळीपंत्राळी करणे** उलटे पालटे करणे **हैदोस मांडणे** गोंधळ करणे **चकणाचूर होणे** तुटून – फुटुन जाणे. भुगा होणे **कानठळया फोडणे** खूप मोठ्याने ओरडणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) सुंदरला सर्कशीत का चैन पडत नव्हते ?

(2) सर्कशीत हत्तींना कोण-कोणती कामे करावी लागत ?

(3) आंबालीला बघून सुंदरला काय वाटले ?

(4) संस्थानाचा हत्ती म्हणून सुंदरचा मान कसा वाढला ?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) श्रीमंतांच्या बंगल्यावर जाताना वाटेत सुंदरचे स्वागत कोणी व कसे केले ?

(2) श्रीमंतांच्या बंगल्यावर पोहोचल्यावर 'सुंदरला' कशी वागणूक मिळाली ?

**3. खालील वाक्याचा संदर्भ द्या :**

(1) ''तुझ्या दारी गजांतलक्ष्मी नांदत राहील.''

(2) ''माहूत, तुम्ही याची नीट देखभाल ठेवत नाही का ?''

(3) 'संध्याकाळी नदीवर भेट. मी तिथं आहे.'

**4. खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :**

(1) त्राही त्राही करून सोडणे (2) हैदोस मांडणे (3) डोक्यात मशाल पेटणे

**5. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) सुंदरचा मूळपुरुष कोठे राहत असे ?

(A) केरळच्या जंगलात (B) चित्रकुट पर्वतावरच्या

(C) अफ्रिकेच्या जंगलात (D) गीरच्या जंगलात

(2) सुंदरला रस्त्यात कोण भेटले?

(A) हितेन्द्र (B) गजेन्द्र (C) आंबाली (D) भूपेन्द्र

(3) आंबाली कोण होती ?

(A) मालकीण (B) आई (C) मैत्रीण (D) पत्नी

(4) सुंदर दर बुधवारी कोठे जात असे ?

(A) नदीवर (B) सर्कशीत (C) श्रीमंतांकडे (D) जंगलात

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- 'सुंदर' सारख्या तुमच्या सहवासात येणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचे भावविश्व आत्मचरित्राच्या स्वरूपात लिहा.

### शिक्षक-प्रवृत्ती

- या पाठातील विशेषणे ओळखायला सांगा आणि त्यावरून एखाद्या प्राण्याच्या हालचालीचे वर्णन करायला सांगा.

●

| 23 | सण |
|---|---|

– **अरुणा ढेरे**

(जन्म : इ.स. 1957)

अरूणा ढेरे यांचा जन्म 2 फेब्रुवारी 1957 साली पुणे येथे झाला. तेथेच त्यांचे एम.ए., पीएच.डी पर्यंत्तचे सर्व शिक्षण झाले साहित्य अकादमी पारितोषिक विजेते, भारतीय संस्कृती, प्राचीन साहित्य इत्यादीचे व्यासंग असलेले ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रा.चि. ठेरे यांच्या अरुणा ढेरे या कन्या होत. बालपणापासुन एका उच्च दर्जाच्या वाङ्मयीन वातावरणातच त्या मोठ्या झाल्या. अरुणा ढेरेंच्या घरात जमिनीपासून छतापर्यंत रचलेल्या पुस्तकांमुळे ग्रंथाच्या सहवासात आणि साहित्याने भारावलेल्या वातावरणात त्यांचे बालपण गेले.

लोकसंस्कृतिची रूपे, कृष्णकिनारा, काळोख आणि पाणी, शाश्वताची शिदोरी, कवितेच्या वाटेवर, नव्याजुन्या काठावरती, उर्वशी, मैत्रीयी ही पुस्तके तसेच निरंजन, प्रारंभ, मंत्राक्षर, यक्षरात्र इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत.

अरुणा ढेरे यांना आजवर तीसहून अधिक पुरस्कार मिळाले आहेत.

प्रस्तुत कविता त्यांच्या 'यक्षरात्र' या काव्यसंग्रहातून घेतली आहे. आश्विन आणि कार्तिक महिने म्हणजे नवरात्र, दिवाळी असे सणांचे महिने आहेत. त्यावेळी सगळेजण आनंदात असतात. कारण हे सण सगळया कुटुंबीयांसह साजरे केले जातात. रांगोळया, पणत्या व लोकांची लगबग, आवाज, आनंद यामुळे घरे शोभिवंत दिसतात. अशावेळी सगळी दु:खे, चिंता बाजूला ठेवून आनंद साजरा करणाऱ्या सखीचे चित्र यात आहे.

---

आता सखीच्या गावात
सोनकार्तिक असेल
रेंगाळल्या पाऊलांनी
जाता अश्विन हसेल

शुभ्र दंवाच्या श्वासात
एक उमलेल फूल
एका चांदणपाऊली
उभे आकाश झुलेल

किती घरापल्याडच्या
हाका घराशी येतील
आणि सखीच्या प्राणांचे
काठ दिगंत होतील

सखी सजवेल सण
सुख वेचेल दु:खात
चांदण्याने रंगतील
तिचे कमळाचे हात

मनथेंबांनी घालील
सखी दारात रांगोळी
थुईथुई नाचतील
फूलतोरणाच्या ओळी

आता दिवाळीचा दिवा
तिच्या लागेल दारात
आणि उजेड येईल
थोडा माझ्याही घरात

## शब्दार्थ

**रेंगाळणे** आळसावणे, मंद गतीने होणे **दिगंत** दिशा ओलांडून जाणारे

## स्पष्टीकरणात्मक टिपा

**प्राणांचे काठ दिगंत होणे :** हे कडवे विशेष महत्त्वाचे आहे. दिवाळीच्या दिवसात दूर परदेशात गेलेली माणसे सण साजरा करावा म्हणून घरी परत येतात. त्यांच्या येण्याच्या कल्पनेने सखी आनंदित झाली आहे. आता तिचे सुने घर मुलामाणसांनी भरून जाणार आहे. म्हणून तिला आता उसंत नाही. तिचेप्राण विस्तारले आहेत. मोठे झाले आहेत. आनंदाने तिचे मन आभाळापर्यंत भरून गेले आहेत.

**'आणि उजेड येईल थोडा माझ्याही घरात' :** आश्विन – कार्तिक माहिन्यात येणारे सण भारतभर मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. कारण हे वर्षभराच्या कष्टांनंतर मिळणारे आनंदाचे सण असतात. कवयित्रीच्या सखीचे घर असेच चैतन्याने, उल्हासाने भरून जाणार आहे. तिच्या आनंदात स्वत:चा आनंद मानणाऱ्या कवयित्रीला वाटते की हा आनंद मलाही थोडासा मिळेल. हे मैत्रिणींचे प्रेम यातून व्यक्त होते. प्रकाशाने उजळलेले घर सर्वांचेच उत्साहाने स्वागत करीत असते. आनंद हा दिल्यानेच वाढतो.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) प्रस्तुत कवितेत कोणत्या सणाचे वर्णन केले आहे ?

(2) कवयित्रीच्या मते सखीच्या गावात आत्ता काय असेल ?

(3) सखीचे प्राण केव्हा दिगंत होतील ?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) प्रस्तुत कवितेच्या आधारे 'सखीच्या गावातील सणाचे' वर्णन करा.

(2) 'आता दिवाळीचा दिवा, तिच्या लागेल दारात
आणि उजेड येईल, थोडा माझ्याही घरात'
या ओळींमधून कवयित्री काय सांगू इच्छित आहे ? ते समजवा.

**3. या कवितेत येणारी विशेषणे ओळखा व लिहा :**

उदाहरण : कमळाचे हात

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- अशा सणांवर आधारित कवितांचा संग्रह करा.

# 24 चिमण्या

**– राजन गवस**

(जन्म : इ.स. 1959)

राजन गवस यांनी विविध प्रकारचे साहित्य लेखन केले आहे. त्यांनी सामाजिकता जपणारे लेखन केले. 'भंडारभोग' या पुस्तकासाठी त्यांना 2012 साली साहित्य अकादमीचे बक्षीस मिळाले. त्यांनी भंडारभोग, कळप, तणकट, चौंडक हे कथासंग्रह लिहीले. 'रोडके पाझर' याता संतवाङ्मयावरील लेख लिहीले. 'रिवणावाचली मुंगी' हा कथासंग्रह आहे ज्यात शोषणाविरूद्ध बंड करणाऱ्या स्त्रियांची कहाणी आहे. 'चौंडक' या त्यांच्या पुस्तकात 'जोगवा' या सिनेमाच्या कथेचे बीज आहे.

---

'चिमणी चिमणी पाणी देऽऽ, कावळया कावळ्याऽऽ' ऊब देऽऽ म्हणत कोळशानं घासलेली पाटी हातांत हालवत वाळवायचो. चिमणी पाणी दयायची, कावळा ऊब द्यायचा आणि हळू–हळू अक्षरांशी मैत्री जमायची. सकाळी शाळेला चाललो, की गल्लीभर चिमण्या रस्त्यातल्या धुळीत काय काय वेचत बसलेल्या दिसायच्या. त्यांची क्षणात खाली–वर होणारी चोच, लुकलुकणारे डोळे, लुटू–लुटू हलणारी शेपूट, भुरळ घालणारे त्यांचे वावरणे! जवळ गेलं, की भुर्रऽऽकन उडून जायच्या चिमण्या. त्यांना भीती वाटत नसायची माणसांची. भुर्रऽऽकन उडताना हवेतली आवर्तन त्यांनाच भुरळ घालायची. मग 'चिवऽऽ चिवऽऽ' चा गल्ली भरून उरणारा आवाज.

आमची शाळा गावाच्या तळ्याजवळ, किर्रऽऽ झाडीत. आठ खोल्यांची सुंदर इमारत. लांबच्या लांब व्हरांडा. सागवानी छप्पर. सगळ्या शाळेच्या व्हरांडाभर चिमण्यांची घरटी. मधेच एखादया घरट्यातून नुकतंच जन्मलेलं (अंड्यातून बाहेर आलेलं) पिल्लू व्हरांड्यात पडायचं. त्याच्याभोवती आम्ही सगळी मुलं गोळा व्हायचो. डोळेही उघडलेले नसायचे त्याने. लालबुंद मांसाचा इवलासा गोळा. गलका बघून गुरुजी यायचे. मुलांना दटावून इकडं–तिकडं पाहायचे. चिमण्यांची नजर चुकवून पिलाला अगलद घरट्यात ठेवायचे.... आणि आम्हांला सांगायचे, 'पिलाला शिवाशीव केली तर चिमण्या त्याला बोचकारून मारतात.'

घरात आलं, की आईला आम्ही विचारायचो, 'आई, माणसानं शिवाशीव केल्यावर चिमण्या पिलांना बोचकारून का मारतात?' आई तिला सुचेल ते उत्तर दयायची. तांदूळ निवडायला आई बसली, की चिमण्या तिच्याभोवतीच वावरायच्या. सुपात उरलेलं मातेरं आई चिमण्यांना खाऊ घालायची. म्हणायची, 'चिमण्यांत परमेश्वर असतो.' तिचं हे बोलणं मात्र काही कळायचं नाही. ती चिमण्यांशी बोलायची. खूपखूप, कायकाय सांगायची. चिमण्या तिच्याशी बिनधास्त वागायच्या तिच्याच अंगाखांदयावर खेळायच्या. तिची शिवाशीव चिमण्यांना कशी काय चालायची, कुणास ठाऊक ?

जोंधळ्याच्या कणसांत दाणे भरू लागले की घरातली माणसं आम्हांला शेताकडं तिरपटायची. सकाळी–सकाळी बखोटीला पुस्तक मारून आम्ही शेतात जायचो. कणसांनी वाकलेलं जोंधळयाचं शेत बघणंही खूप सैरभैर करणारं असायचं, शेताच्या मध्यभागी घातलेल्या माचावर उभं राहून फक्त हाकारा घातला, तरी शंभरभर चिमण्या भुर्रऽऽकन उडायच्या, या कोपऱ्यातून त्या कोपऱ्यात. मग गोफण फिरवून नेम धरून दगड मारला की त्या पुन्हा जागा बदलायच्या. चिमण्यांच्या बरोबरच इतर पक्षी कधी कधी यायचे. पोपट थव्यानं जोंधळयात आले की कणसं पोपटी होऊन जायची. सगळं शेतच पोपटांनी झाकल्यागत वाटायचं. मग प्रचंड धावाधाव. दगड मारणं, डबा बडवणं, सगळं चाललं, तरी त्याला कोणीच दाद दयायचं नाही. चिमण्या तर आमची सत्त्वपरीक्षाच बघायच्या. रडकुंडीला आणायच्या. कितीही हाकलल्या तरी फिरून कणसावर. मग वडलांचं रागावणं.

यावर उपाय म्हणून आम्ही कावळा मारून आणून उंच काठीला टांगून जोंधळ्यात मध्यभागी लटकवायचो. चिमण्या ह्या मेलेल्या कावळयाला खूप घाबरायच्या, पण तेवढ्यापुरत्याच; नंतर त्या सरावायच्या. मग भलं मोठं बुजगावणं उभं करायचो. एक–दोन दिवस त्याला चिमण्या घाबरायच्या. पुन्हा त्याच्या टाळक्यावर बिनधास्त वावरायच्या. त्यांच्या त्रासानं जीव नकोसा व्हायचा. आणलेलं पुस्तक उघडूही द्यायच्या नाहीत चिमण्या.

चिमण्यांचं आणि आमच्या अभ्यासाचं जरा वाकडंच असायंच. अगदी शेवटपर्यंत. कॉलेजात आम्ही शेवटच्या वर्षाला. केसरकर नावाचे प्राध्यापक आम्हांला इंग्रजी शिकवायचे. लालबुंद चेहऱ्याचे. भुऱ्या केसांचे. आपले उच्चार थेट इंग्रजांसारखे

करण्यावर त्यांचा भरपूर भर. तन्मयतेने शिकवायचे. वर्गात आले की दार बंद. कोणालाही नंतर प्रवेश नाही. एखाद्या शिपायनं नोटीस घेऊन दार उघडलं, तर अधिक लालबुंद व्हायचे; फड्याच्या बोंडासारखे. त्यांच्या तासाला टाचणी पडली तरी आवाज व्हायचा. त्यांचा तास हवाहवासा वाटायचा. असेच सर एकदा तन्मयतेने, भान विसरून शिकवत होते. अशात चिमण्यांची एक जोडी आली.

बहुतेक दोघे पाठशिवणीचा खेळ खेळत असावेत. सगळ्या वर्गात चिवचिवाट. सर शिकवायचे थांबले. त्यांनी खडू मोडून बारीक तुकडे केले. एक-एक फेकून ते त्या जोडीला वर्गाबाहेर कढण्याचा प्रयत्न करू लागले; पण त्यांना बधल्या तर त्या चिमण्या कसल्या ? तो तास चिमण्यांना हाकलण्यातचं संपला. सगळ्या पोरांनी वर्ग डोक्यावर घेतला. नंतर काही दिवस केसरकर सर वर्गात आले की, चिमण्या घुसल्याच. बिचारे सर कंटाळायचे. म्हणायचे, ''कुठल्या काळच्या वैरिणी माझ्या'' हळूहळू तेच बदलले. चिमण्यांच्या आवाजाची त्यांना सवय होऊन गेली.

कॉलेज संपल्यानंतर हळूहळू आम्ही सारेच पाखरांसारखे भुर्रऽऽकन उडून गेलो. कोण कुठे, कोण कुठे. पोटासाठी दाही दिशा. कधीतरी सणावाराला गावची फेरी. तीही घाईघाईतच. कोण भेटलं, कोण नाही अशा स्थितीतच परतायचं. कधी रात्री पोहोचलं की उजाडायच्या आधी गावातून बाहेर पडायचं. गावाची शीव बदलल्याचं जाणवायचं. तिठ्यावर आता पानपट्टीचं दुकान. चहाचं हॉटेल. बरंच काय काय गावात नवं येत आहे, याचा सासूल लागायचा.

परवा सुट्टी काढून घराकडं गेलो होतो. आई तांदूळ निवडत बसलेली. आता खूप थकलेली. तिच्यासमोरच टेकलो. ती कायकाय सांगत होती मन लावून ऐकत होतो. एकदम मला जाणवलं, आई तांदूळ निवडते; पण आजूबाजूला एकही चिमणी नाही. आईला तसं म्हटलं, तर ती सांगायला लागली, ''आता पयल्यागत न्हाई ऱ्हायल्या चिमण्या. कुठं दिक्कोपाल झाल्या.'' उगाचच काहीतरी हरवल्यासारखं वाटायला लागलं. गल्लीत आलो तर औषधालाही चिमणी नाही. मन उगाचच भिरभिरायला लागलं. आईला सांगून तडक बाहेर पडलो. तळयाजवळच्या शाळेजवळ पोहोचलो. शाळेजवळची सगळी झाडं तोडलेली. उजाड शाळा. लांबलचक व्हरांड्यातून फिरताना चिमण्यांची घरटी शोधू लागलो. कुठंच घरटं नाही. चिमण्यांचं झालं काय, या प्रश्नानं मला पोखरायला सुरुवात केली. गल्लीतून परततांना लहानपणीचा सवंगडी भेटला. उत्तम बागायती शेती करतो तो सध्या. त्याला विचारलं, 'अरे, चिमण्या गेल्या कुठ सगळया ?' त्याला काहीच कळेना. मग समजून सांगितलं, तर म्हणाला, ''कशाला गाऽ ऱ्हातीला त्या गावात ? आता कोणी चिमण्यांना पसा मूठ सांडत नाही. त्यांनी शेतांत जावं तर सगळया पिकांवर नाना औषधं फवारलेली. पिकांवर रोग पडला-औषध. तण वाढलं-औषध. आताश्यात म्हणले औषधाच्या बाटल्या, तिथं जगतील कशा चिमण्या ?'' त्याच्या उलट्या प्रश्नानं भांबवलो. आम्ही प्रगती करायला निघालेल लोक, कोणत्या वाळवंटाच्या निर्मितीत गुंतलोय ? कशासाठी ? मित्राच्या बोलण्यानं डोक्यात नवंच काय काय सुरू झालेलं.

संध्याकाळी भाऊ शेतावरून आला. त्याचं सुरू होतं, 'आता गव्हाला पाणी पाजलं पाहिजे. लागवड टाकली पाहिजे.' असं बरंच काही. त्याला थांबवून म्हटलं. 'अरे, जुंधळयावर पाखरं बसतात आता ?' तो चक्रावलाच माझ्याकडं टाळा पगळून बघायला लागला. म्हणाला, 'आता पहिल्यासारख्या समंजस राहिल्या नाहीत चिमण्या. एकदम कावदारून येत्यात शेतात, हल्ला केल्यासारख्या.'

आई मध्येच तोंड घालत म्हणाली, ''येणारच, त्यास्नी कुठं जगायला जागा ठेवलीया कुणी ?''

आईचं म्हणणंच बरोबर होतं. चिमण्यांना जगायला जागचा ठेवली नाही शिल्लक. रासायनिक खतांचा मारा. निरनिराळ्या कीटकनाशकांचा मारा. त्यात भरीला भर म्हणजे आजूबाजूला झाडं शिल्लक उरणार नाहीत याची घेतलेली खबरदारी. चिमण्यांनी घरटं बांधायचं तरी कुठं ?

एकदम उदास वाटायला लागलं. माझ्या मुलाला पाटी कोळशानं घासून 'चिमणी चिमणीऽऽ पाणी देऽऽ' म्हणता आलं नाही; पण त्यानं चिमणी बघितली. पण त्याच्या मुलाला चिमण्या चित्रात तरी दाखवता येतील का ? या प्रश्नानं माझं डोकं गरगरू लागलं आणि एकटाक पुटपुटू लागलो:

'चिमणीऽऽ चिमणीऽऽ पाणी देऽऽ'

## शब्दार्थ

**वावरणे** फिरणे **आवर्तन** गोलगोल फिरणे **मोतरं** मातीमिश्रित लहान तांदूळ, **तिरपटणे** बळजबरीन पाठविणे **तन्मयतेने** भान विसरून **फड्याच्या बोंडासारखे** निवडुंग्या फड्यावर येणारी छोटी फळे **वैरिणी** शत्रू **चक्रावणे** गोंधळणे **पोखरणे** मनाला त्रास होणे **टाळा पगळून बघणे** आ वासून बघणे **कावदाऊन** संतापून **पुटपुटणे** हळू बोलणे.

## वाक्प्रचार

**भुरक घालणे** मोहात पाडणे **सैरभैर होणे** अस्वस्थ होणे **हाकार घालणे** औरइन हाका मारणे **जीव नकोसा होणे** अतिशय त्रासून जाणे **शिवाशीव करणे** स्पर्श करणे **वर्ग डोक्यावर घेणे** वर्गात खूप आवाज करणे **सासूल लागणे :** चाहूल लागणे

**म्हण :** पोटासाठी दाही दिशा. ''आम्हा फिरविसी जगदीशा'' पोटासाठी दाही दिशा ही अर्धी म्हण वापरली आहे. त्याचा अर्थ पोट भरण्यासाठी जगाच्या पाठीवर कोठेही जावे लागते.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) माणूस चिमणीच्या पिलाला शिवला तर चिमण्या काय करतात ?

(2) जोंधळयाच्या कणसावर पोपट आल्याने शेतात कोणता बदल होतो ?

(3) लेखकाला मोठे झाल्यावर गावात कोणता बदल दिसला ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन उत्तरे लिहा :**

(1) लेखकाला चिमण्यांचे वावरणे भुरळ घालणारे का वाटायचे ?

(2) चिमण्यांना माणसांच्या शिवाशिवीबद्दल काय वाटते ?

(3) केसरकर सरांना वर्गामध्ये चिमण्यांच्या कसा त्रास व्हायचा ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) चिमण्यांना जोंधळ्याच्या दाण्यांपासून दूर करण्यासाठी कोणकोणते उपाय केले जातात ?

(2) चिमण्यांचा गावाशी असलेला संबंध समजवा.

(3) केसरकर सरांना वर्गामध्ये चिमण्यांच्या कसा त्रास व्हायचा ?

**4. खालील विधाने कोण कोणस कोणत्या प्रसंगी म्हणाले ते लिहा :**

(1) चिमण्यांत परमेश्वर असतो.

(2) कुठल्या काळच्या वैरिणी माझ्या.

(3) आम्ही प्रगती करायला निघालेले लोक कोणत्या वाळवंटाच्या निर्मिती गुंतलोय ?

(4) आता पाहिल्यासारख्या समंजस राहिल्या नाहीत चिमण्या.

**5. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) चिमणीच्या पिलाला शिवाशीव केली तर त्या काय करतात ?

(A) आनंदी होतात (B) प्रेमाने राहतात

(C) बोचकारून मारतात (D) दु:खी होतात.

(2) पोपट थव्याने जोंधण्यात आले की कणसं कशी व्हायची ?

(A) पोपटी (B) काकी (C) हिरवी (D) लाल

(3) चिमण्या आईशी कशा वागायच्या ?

(A) वाईट (B) बिनघास्त (C) घाबरुन (D) आनंदाने

(4) लेखक माचावर उभे राहिल्यावर कशाने शंभर चिमण्या उडायच्या ?

(A) भीती दाखविणे (B) बुजगावणे (C) दगड मारणे (D) हाकारा घालणे

(5) शेतकऱ्यांची सत्वपरीक्षा कोण घेत आसे ?

(A) कावळे (B) घारी (C) साप (D) चिमण्यां

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- पुनरावृत्ती असणारे शब्द शोधा आणि लिहा. उदा. शिवाशीव
- चिमण्यांच्या अस्तित्वासाठी कोणकोणते उपाय केले पाहिजेत ?

**शिक्षक-प्रवृत्ती**

- लेखक, शेतात काम करणारा भाऊ आणि आई यांच्या शेवटच्या संवादाच्या आधारे पर्यावरणाविषयी चिंता विद्यार्थ्यांना समजावा.

**भाषासज्ज्ञता**

देशाची समृद्धी म्हणजे नेमके काय ? खूप वस्तू असणे, भरपूर पैसे खर्च करणे, लग्नसमारंभामध्ये झालेली उधळपट्टी म्हणजे समृद्धी नाही. देशातल्या प्रत्येक माणसाला पोटभर जेवण मिळाले, गरीबाच्या मुलांना शिक्षण घेता आले आणि सर्वांना मानाने माणसासारखे जगता आले म्हणजे देश समृद्ध झाला, असे म्हणता येईल. जुन्या काळच्या लोकांना झाडे, पाने, पशु, पक्षी या सर्वांनाच जगण्याचा हक्क असतो याचे भान होते. जमिनीने, निसर्गाने जी देणगी दिली आहे तिचा लाभ प्रत्येकाला मिळायला हवा, याची जाणीव होती. निसर्गाचा समतोल अन्नसाखळी यांची या लोकांनी जपणूक केली होती. लौकिक अर्थाने त्यांनी शाळा, कॉलेजातील शिक्षण घेतले नसले तरी ते अनुभवाच्या, संस्कारांच्या शाळेत शिकलेले होते. त्यामुळे आपल्या ताटातला थोडा घास चिमणीकावळ्यांसाठी काढून ठेवत होते पण आज भौतिक प्रगती खूप झाली असली. मोठे रस्ते, पूल, विजेच्या वेगाने जाणारी वाहने आहेत पण पशुपाखरे यांना राहण्यासाठी जागा राहिलेली नाही.

# व्याकरण

# 1 अव्यय आणि त्याचे प्रकार

वाक्यामध्ये शब्दांचा उपयोग करताना काही शब्दांची रूपे बदलतात तर काही शब्दांच्या रूपामध्ये कोणताही बदल किंवा फरक घडतच नाही. ते शब्द जसे आहेत तसेच राहातात. अशा शब्दांना आविकारी शब्द म्हणातात. याच शब्दांना अव्यय म्हणून ओळखले जाते. काही अव्यये क्रिया विशेषणे ही असतात, कारण ती क्रियेविषयी विशेष माहिती देतात.

अव्ययांचे विविध प्रकार आहेत. ते आपण पाहू.

(i) उभयान्वयी अव्यये (ii) शब्दयोगी अव्यये (iii) केवलप्रयोगी अव्यये (iv) क्रियाविशषण अव्यये

**(i) उभयान्वयी :** जेव्हा दोन किंवा त्याहून अधिक शब्द तसेच, दोन किंवा त्याहून वाक्यांना जोडणारे जे अविकारी शब्द असतात, त्यांना उभयान्वयी अव्यय असे म्हणतात. दोन शब्दांना किंवा वाक्यांना जोडणे एवढेच उभयान्वयी अव्ययाचे काम असते. या व्यतिरिक्त वाक्यरचनेत त्यांचे काहीही कार्य नसते.

उभयान्वयी अव्यये – व, आणि, परंतु, अथवा, किंवा, पण, परी, म्हणून, शिवाय हे शब्द दोन शब्दांना किंवा वाक्यांना जोडण्याचे कार्य करतात.

उभयान्वयी वाक्यात कसे योजले जातात ते पाहू :

(1) बाबांनी बाजारातून भाजी व फळे आणली.

(2) मी मित्राच्या घरी गेलो, पण तो भेटला नाही.

(3) सुभाष आळस करतो म्हणून त्याला यश मिळत नाही.

(4) तुम्ही सकाळी माझ्या घरी या किंवा मी तुमच्याकडे येईन.

(5) मनुष्य आपल्या वागण्यामुळे चांगला अथवा वाईट ठरतो.

**(ii) शब्दयोगी अव्यय :** वाक्यामध्ये दोन शब्दांमधील संबंध जोडून, अर्थ स्पष्ट करण्याचे काम जी अव्यये करतात, त्यांना शब्दयोगी अव्यये म्हणतात.

पुढील उदाहरणांतून हे संबंध जोडण्याचे कार्य आपल्या नीटपणे लक्षात येईल :

(1) सूर्य डोंगरामागे लपला आहे.

(2) झाडावर कितीतरी पक्षी आहेत.

(3) खुर्ची खाली मांजर बसले होते.

(4) माझ्या घरापासून शाळा बरीच दूर आहे.

वरील वाक्यात अधोरेखित केलेले शब्द दोन शब्दांमधला सबंध दर्शवितात.

वरील वाक्यातील अव्ययांना गाळून वाक्य वाचले तर वाक्याचा अर्थ नीटपणे लागत नाही. म्हणून त्यांचे काम महत्त्वाचे आहे. शब्दांच्या आठ जातींमध्ये म्हणूनच अव्ययाला महत्त्वाचे स्थान मिळाले आहे.

पुढे, आधी, नंतर, बाहेर, सुद्धा, करिता, सम, समान, प्रमाणे, विना, सह, समीप, जवळ, समोर, पेक्षा, असे कित्येक शब्द शब्दयोगी अव्यये आहेत.

**(iii) केवलप्रयोगी अव्यय :** काही उद्‌गारवाचक शब्द आपण लिहितो, बोलतो परंतु पूर्ण वाक्याशी, तसे पाहिल्यास त्यांचा काहीही संबंध नसतो. केवल उपयोग करायचा म्हणून यांचा प्रयोग वाक्यात केलेला असतो. त्यांना वगळले तरी वाक्याची काहीही हानी होत नाही. इतकेच की, या केवल प्रयोगी उद्‌गार शब्दांमुळे वाक्याचा भाव तीव्रतेने व्यक्त होतो. काही उदाहरणे केवलप्रयोगी अव्ययाची पाहू:

हर्षसूचक – वाहवा! अरे वा! ओहो!

शोकसूचक – अरेरे! अग आईग! हायहाय!

आश्चर्यसूचक – बापरे! अरेच्या! अबब!

प्रशंसासूचक – शाबास! छान! भले!

मस्त !तिरस्कारसूचक – छी! शी! हॅट्! छे! थु:!

संबोधन सूचक – अरे! अहो! अगा! अगं!

या प्रकारच्या केवलप्रयोगी अव्ययांनी वाक्याची सुरूवात होते.

**( iv ) क्रियाविशेषण अव्यय :** अव्ययाचा हा प्रकार तसा महत्त्वाचा आहे. कारण यात क्रियाविशेषण व क्रियाविशेषण अव्यय हे वेगळे असून त्यातला फरक लक्षात घेणे आवश्यक आहे.

क्रियाविशेषण क्रियेविषयी अधिक माहिती देते. परंतु ते अविकारी असेलच असे नाही. उदा. ही मुलगी चांगली खेळते. ह्या मुली चांगल्या खेळतात.

क्रियाविशेषण अव्ययांचे अनेक वेगवेगळे प्रकार आहेत.

(1) स्थलदर्शक अव्यये – इथे, तेथे, सर्वत्र, समोर इत्यादी.

(2) कालदर्शक – आत्ता, उद्या, नंतर, पूर्वी, काल, नेहमी इत्यादी.

(3) रीतिवाचक – हळू, मोठ्याने, जलद, सावकाश इत्यादी.

आणखी ही काही प्रकार अव्ययांचे आहेत. परंतु सध्या एवढा परिचय पुरेसा आहे.

●

# 2 विभक्ति - विचार

ज्या प्रमाणे नामाच्या रूपात लिंग आणि वचन भेदामुळे बदल होतो त्याचप्रमाणे विभक्तींच्या प्रत्ययांमुळे बदल होतो. विभक्ती म्हणजे काय व नामाबरोबर त्यांचा कसा संबंध हे समजून घेणे गरजेचे आहे.

कोणते ही आपण वाक्यात वापरताना ते केवळ त्याच्या मूळ रूपातच असेल, असे होत नाही. नामांचा व सर्वनामांचा इतर शब्दांची संबंध वाक्यात दर्शविला जातो. त्यासाठी जे प्रत्यय लावले जातात त्यांना विभक्ती असे म्हणतात.

उदा. मूळ शब्द घर आहे, तरी वाक्यात वापरतांना घराला, घरून, घरासाठी, घराचे, घरात अशा प्रकारे विविध प्रत्यय लागून इतर शब्दांशी संबंध दाखवलेला असतो. या प्रत्ययांनाच विभक्ती असे म्हणतात.

नामाच्या किंवा सर्वनामाच्या स्वरूपात जे बदल होतात, त्या बदललेल्या रूपाला 'सामान्यरूप' असे म्हणतात.

विभक्तींचे एकूण आठ प्रकार आहेत. पुढील तक्त्यात 'फूल' या नामाची रूपे

| **विभक्ती** | **एकवचन** | | **बहुवचन** | |
|---|---|---|---|---|
| प्रथमा | प्रत्यय कर्ता | फूल | कर्ता | फुले |
| द्वितीया | स, ला, ते | फूलास, फुलाला | स, ला, ना, ते | फुलास, फुलांना |
| तृतीया | ने, ए, शी | फुलाने, फुलाशी | नी, ई, शी | फुलांनी, फुलांशी |
| चतुर्थी | स, ला, ते | फुलास, फुलाला | स, ला, ना, ते | फुलांस, फुलांना |
| पंचमी | ऊन, हून | फुलाहून | ऊन, हून | फूलांहून |
| षष्ठी | चा, ची, चे | फुलाचा, फुलाची, फुलाचे | चा, ची, चे | फुलांचा, फुलांची, फुलांचे |
| सप्तमी | त, ई, आ | फुलात | त, ई, आ | फुलांत |
| संबोधन | – | रे फुला | – | फुला |

- यांतील काही प्रत्ययांचा उपयोग फक्त पद्यात होतो.

**सामान्यरूप**

कारक प्रत्यय लागल्यावर काही शब्दांची रूपे बदलतात या बदललेल्या रूपाला सामान्य रूप म्हणतात.

शब्दाच्या लिंग आणि वचनानुसार सामान्यरूपे बदलतात.

| **पुलिंग शब्द** | **सामान्यरूप** | **स्त्रीलिंगी शब्द** | **सामान्यरूप** |
|---|---|---|---|
| मुलगा | मुलास, मुलाला (आकारान्त) | मुलगी | मुलीला, मुलीने |
| बटाटा | बटाट्याचे, बटाट्यात | शाळ | शाळेत, शाळेने |
| घोडा | घोड्यास | स्त्री | स्त्रियांना (बहुवचन) |
| माळी | माळ्याला, माळ्याने | **नपुंसकलिंग** | **सामान्यरूप** |
| कवी | कवीला, कवींना (बदल नाही) | बाळ | बाळास, बाळाने |
| भाऊ | भावाचे, भावास | पाणी | पाण्यात, पाण्याने |
| | | तळे | तळ्यात, तळ्याचे |

वरील काही उदाहरणांवरून सामान्य रूपे कशी होतात हे तुमच्या लक्षात आले. असेल.

सामान्य रूपांची समज नसल्यास वाक्य रचनेच्या चुका होतात.

●

# 3 समास

बोली व्यवहारात, दोन वेगळ्या शब्दांमध्ये अर्थ दृष्टीचा असलेला संबंध थोडक्यात स्पष्ट करण्यासाठी, जोडशब्दांचा उपयोग केला जातो. दोन शब्दांच्या मध्ये असणारा संबंध नेहमी एकच प्रकारचा असेल असे नाही. अर्थदृष्ट्या एकत्र येईन, अर्थ सोपा करण्याच्या दृष्टीने तयार केलेल्या जोडशब्दाला **सामासिक** शब्द असे म्हणतात.

ज्या प्रकाराने अर्थ व्यक्त होत असतो, त्या अनुसार समासांचे वेगवेगळे प्रकार मानले जातात. ज्या प्रकारे सामासिक पदाची फोड करून अर्थ स्पष्ट केला जातो, त्याला 'विग्रह' असे म्हणतात. समासाचा विग्रह व्याकरणदृष्ट्या योग्य प्रकारे केला गेला तरच समासाचा प्रकार योग्य प्रकारे ठरवता येतो.

कृष्णबलराम, गुणदोष, बटाटेवडा, प्रतिदिन, देशसेवां, चक्रधर, कृष्णसर्प, गजानन, सहर्ष, हे सर्व शब्द विविध प्रकारचे समास / सामासिक शब्द आहेत.

समासांचे प्रमुख प्रकार असे आहेत : (1) द्वंद्व, (2) अव्ययीभाव, (3) तत्पुरुष, (4) बहुव्रीहि या पैकी द्वंद्व समासाचे तीन उपप्रकार आहेत.

**(1)** **द्वंद्व**

इतरेतर द्वंद्व — वैकल्पिक द्वंद्व — समाहार द्वंद्व

तसेच – तत्पुरष समासाचे प्रकार : (1) विभक्ति तत्पुरुष (2) उपपद तत्पुरूष (3) कर्मधारय (4) मध्यमपदलोपी (5) द्विगु.

प्रथम द्वंद्व समासाचे तीन प्रकार आपण पाहू व त्यांविषयी विस्तारपूर्वक अभ्यास करू. (1) या पाहिल्या प्रकाराला इतरेतर द्वंद्व असे म्हणतात. द्वंद्व या शब्दाचा अर्थच जोडी असा होतो. ज्या जोडशब्दांचा विग्रह करताना 'आणि', 'व' या उभयान्वयी अव्ययांचा उपयोग अपरिहार्य असतो, तेव्हा 'इतरेतर द्वंद्व' समास म्हणतात. दोन व्यक्ती, दोन वस्तू इ. एकत्र लिहून जेव्हा जोडशब्द केलेले असतात, तेव्हा 'इतरेतर द्वंद्व' समास असतो.

उदा. सीताराम, आईबाप, हरिहर

| **सामासिक शब्द** | **विग्रह** | **समासाचे नाव** |
|---|---|---|
| सीताराम | सीता आणि राम | इतरेतर द्वंद्व |
| आईबाप | आई आणि बाप | इतरेतर द्वंद्व |
| हरिहर | हरि आणि हर | इतरेतर द्वंद्व |

द्वंद्व समासचा दुसरा प्रकार – (2) **वैकल्पिक द्वंद्व** जेव्हा समासाचा विग्रह करताना दोन पदांच्या मध्ये 'किंवा', 'अथवा', 'वा' या विकल्प दर्शविणाऱ्या उभयान्वयी अव्ययांचा उपयोग केला जाते, तेव्हां वैकल्पिक द्वंद्व समास होतो. या प्रकारात दोन पैकी एकाच पदाची निवड अभिप्रेत असते. विरूद्ध अर्थाच्या जोड्या या प्रकारात मोडतात.

उदाहरणे –

| सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|
| भलेबुरे | भले किंवा बुरे | वैकल्पिक द्वंद्व |
| सत्यासत्य | सत्य किंवा असत्य | वैकल्पिक द्वंद्व |
| गुणावगुण | गुण किंवा अवगुण | वैकल्पिक द्वंद्व |

द्वंद्व समासचा तिसरा प्रकार – (3) **समाहार द्वंद्व** – ज्या समासामध्ये दोन पदांचा विग्रह करताना दोनाहून अधिक पदांचा अभिप्रेत असलेला अर्थ स्पष्ट करावा लागतो तेव्हा त्यास 'समाहार द्वंद्व' असे म्हणतात.

समासात उल्लेखलेली पदे दोनच असली तरी त्यात अधिक पदांच्या अर्थाचा समावेश म्हणजेच समाहार असतो. म्हणूनच याला 'समाहार द्वंद्व' असे म्हणतात.

**( 2 ) अव्ययीभाव :** जेव्हा समासातील दोन पदांपैकी एक, बहुधा पहिले पद अव्यय असते व ते महत्त्वाचे पद असते, तेव्हा अव्ययीभाव समास होतो. सामान्यपणे अव्ययीभाव समास एकवचनी च नपुंसकलिंगी क्रियाविशेषण असते.

अव्ययीभाव समासात आ, यथा, प्रति हे अव्ययरूप संस्कृताती उपसर्ग वापरलेले असतात. या व्यतिरिक्तही दर, हर, बिन, बे हे फारसी भाषेतील उपसर्ग मराठी भाषेत वापरले जातात. असे शब्दही 'अव्ययीभाव समास' म्हणून ओळखले जातात.

उदाहरणे –

| सामासिक शब्द | विग्रह | समासाचा प्रकार |
|---|---|---|
| यथाशक्ती | शक्ती प्रमाणे | अव्ययीभाव |
| आजन्म | जन्मा पासून | अव्ययीभाव |
| प्रतिक्षण | प्रत्येक क्षण | अव्ययीभाव |
| यथाक्रम | क्रमाच्या अनुसार | अव्ययीभाव |
| दररोज | रोज रोज | अव्ययीभाव |
| बरहुकूम | हुकमा प्रमाणे | अव्ययीभाव |

शब्दाची द्विरुक्ती होऊन बनणारे शब्द सुद्धा अव्ययीभाव समास असतात. उदा. देशोदेशी, गावोगावी, घरोघरी, पावलोपावली इ.

**( 3 ) तत्पुरुष समास :** ज्या समासात दुसरे पद महत्त्वाचे असते, व अर्थाच्या दृष्टीने महत्त्वाचा दुसरा शब्द विग्रह करतानां स्पष्ट करावा लागतो, तेव्हा त्यास तत्पुरुष समास म्हणतात.

तत्पुरुष समासाच्या अनेक प्रकारांपैकी आपण विभक्ती तत्पुरुष समासाचा प्रथम विचार करु.

**विभक्ति तत्पुरुष समास**

ज्या समासात द्वितीया ते सप्तमी विभक्तींपैकी कोणत्यातरी एका विभक्ति प्रत्ययाचा उपयोग केल्या शिवाय समासाचा विग्रह होऊ शक्त नाही, तेव्हा त्याला विभक्ति तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदाहरणे –

| सामासिक शब्द | विग्रह | समासाचा प्रकार |
|---|---|---|
| परदेशगमन | परदेशास गमन | द्वितीया तत्पुरुष |
| गुणविहीन | गुणांनी विहीन | तृतीया तत्पुरुष |

| | | |
|---|---|---|
| पुस्तकालय | पुस्तकांसाठी आलय | चतुर्थी तत्पुरुष |
| दोषमुक्त | दोषातून मुक्त | पंचमी तत्पुरुष |
| चोरभय | चोरापासून भय | पंचमी तत्पुरुष |
| राष्ट्रसेवा | राष्ट्राची सेवा | षष्ठी तत्पुरुष |
| राजपुत्र | राजाचा पुत्र | षष्ठी तत्पुरुष |
| वनवास | वनात वास | सप्तमी तत्पुरुष |
| कार्यकुशल | कार्यात कुशल | सप्तमी तत्पुरुष |

**कर्मधारय :** हा तत्पुरुष समासाचा प्रकार आहे. जेव्हा संपूर्ण सामासिक शब्द रुपात असतो व नामपद प्रधानरुप असते. कर्मधारय समास हा या दृष्टीने तत्पुरुष समासाचा प्रकार असला तरी एक स्वतंत्र समास–प्रकार म्हणून हा समास महत्त्वाचा आहे. कर्मधारय समास दोन प्रकारांनी होऊ शकतो.

(1) जेव्हा दोन पदांपैकी एक पद विशेषण व दुसरे पद नाम असते, तसेच नामपद महत्त्वाचे असते तेव्हा कर्मधारय समास होतो.

(2) जेव्हा दोन नाम पदांमध्ये तुलनेचा भाव असतो, तेव्हा कर्मधारय समास होतो.

(3) दोन्ही पदे विशेषण असल्यास कर्मधारय समास होतो.

कर्मधारय समासाची उदाहरणे –

महाकवी, कृष्णसर्प, हिरवेगार, पांढरे शुभ्र, ज्ञानसूर्य, नरकेसरी, ज्ञानसागर – इत्यादी ही सर्व कर्मधारय समासाची उदारहरणे आहेत.

## स्वाध्याय

**पुढील सामासिक शब्दांचे प्रकार ओळखा व लिहा :**

कृष्णमूर्ती, महाराज, धीरगंभीर, अमृतमंथन, देवदानव, पशुपक्षी, नागकन्या, मंगलकार्य, देवकन्या

●

# 4 अलंकार

आपण सुंदर दिसण्यासाठी चांगले कपडे, दागिने घालतो, त्याचप्रमाणे भाषेचे सौंदर्य वाढविण्यासाठी 'अलंकार' असतात. साध्या भाषेत जे सांगायचे तेच थोड्या वेगळ्या पद्धतीने सांगितले की भाषा 'अलंकृत' होते. मग आपण म्हणतो यांची भाषा किती सुंदर आहे.

विद्यार्थी मित्रहो आपण इ. 8 वी मध्ये भाषेच्या या अलंकारांपैकी मोजक्या अलंकारांचा परिचय करुन घेतला. आपण शिकलो की अलंकारांचे मुख्य प्रकार दोन – (1) शब्दालंकार (2) अर्थालंकार.

विशिष्ट शब्द विशिष्ट पद्धतीने वापरल्यामुळे जेव्हा भाषेचे सौंदर्य वाढते तेव्हा त्याला शब्दालंकार असे म्हणतात. शब्दालंकार तीन प्रकारचे असतात : (1) अनुप्रास (2) यमक (3) श्लेष.

या पैकी आपण अनुप्रास अलंकार इ. 8 वी मध्ये शिकलो. शब्दालंकार हे शब्दांच्या विशिष्ट रचनेमुळे होत असतात.

एखाद्या वाक्यात किंवा कवितेत एकाच अक्षराची अथवा शब्दाची पुनरावृत्ती होत असल्याने नाद सौंदर्य तेथे निर्माण होते, तेव्हा 'अनुप्रास' हा अलंकार होतो. हे तुम्ही शिकलात. अशा प्रकारचे आणखी एक उदाहरण पहा.

'सप्तपदें सहवासे सख्य साधुशी घडते.'

या चरणातली 'स' चा पुनरावृत्ती गोड नादरूपाचा अलंकार अनुप्रास निर्माण करते.

उरलेले दोन शब्दालंकार आता आपण पाहू. या ओळी वाचा :

या उठा करु हो शर्थ
संपादू दिव्य पुरुषार्थ
हे जीवन नातरी व्यर्थ

कवितेत चरणाच्या शेवटी, किंवा विशिष्ट स्थानी, एकच अक्षर विशिष्ट एक वेगळया अर्थांनी प्रत्येक ओळीत आले आहे. येथे 'यमक' अलंकार साधला आहे.

कोणत्याही कवितेत सामान्यपणे यमकाचा उपयोग केलेला असतो. त्यामुळे कविता वाचताना त्यात यमक, अनुप्रास आढळते का हे पहाण्याची सवय ठेवावी.

यमक अलंकाराचे आणखी एक उदाहरण बघू.

ॐ नमोजी आद्या / वेदप्रतिपाद्या / जय जय स्वसंवेद्या / आत्मरुपा ॥

तिसरा शब्दलंकार आहे **श्लेष**

''पार्वतीने शंकरास पूजिले सुमनाने।'' हे वाक्य नीट लक्ष देऊन वाचल्यास लक्षात येते की सुमनाने या शब्दाचे दोन अर्थ होऊ शकतात.

(1) सुमन–फूल (2) सुमन – चांगले मन

येथे सुमन हाच शब्द वापरल्यानेच दोन अर्थांची गंमत साधली आहे. जर पुष्प किंवा कुसुम शब्द वापरला तर हा भाषेचे अलंकार दिसणार नाही.

जेव्हा गद्यात किंवा पद्यात एकाच शब्दाचे दोन अर्थ निघत असल्यामुळे शब्द चमत्कृतीमुळे भाषा सौंदर्य वाढते, तेव्हा श्लेष अलंकार होतो.

या अलंकाराचे दुसरे उदाहरण –

हे मेघा, तू सर्वांना जीवन देतोस.

जीवन – पाणी, जीवन – आयुष्य

विशिष्ट शब्द योजनेमुळे श्लेष अलंकार होतो, म्हणून हा शब्दालंकार मानला जातो.

अर्थालंकारांपैकी आपण उपमा आणि रूपक हे दोन अलंकार इ. 8 वी मध्ये शिकलो. या दोन्ही अलंकारांमध्ये उपमेय व उपमान असते. उपमा अलंकारात जसे – जसे, जेवि, ज्या प्रमाणे, सम, सारखे इ. अलंकारात शब्द येतात. परंतु रूपक अलंकारात साधर्म्यदर्शक शब्द न घेता उपमेय हे उपमानच आहे. अशी कल्पना केलेली असते. दोन्ही एकरूप आहेत दाखविले जाते.

आता आपण **उत्प्रेक्षा** या अलंकाराचा परिचय करून घेऊ. उत्प्रेक्षा या शब्दाचा अर्थ 'कल्पना'.

उपमेय हे जणू कांही उपमान आहे, अशी कल्पना करून वर्णन केलेले असते तेव्हा उत्प्रेक्षा अलंकार होतो.

उदा. सांज ये गोकुळी, सावळी – सावळी,

सावळ्याची जणू साऊली ॥

या अलंकारात जणू, गमे, वाटे, भासे, की या सारखे साम्यवाचक शब्द असतात.

**अनन्वय –** जेव्हा तुलना करण्यासाठी योग्य उपमानच नाही, त्यामुळे उपमेय हे त्या उपमेयासारखेच आहे असे वर्णन केलेले असते, तेव्हा अनन्वय अलंकार होतो.

या अलंकाराचे उदा. :

आहे ताजमहाल एक जगती तो तोच त्याच्यापरी।

ताजमहाल सारखे सुंदर दुसरे काहीच नाही. म्हणून त्याची तुलना कोणाशी ही होऊ शकत नाही. ताजमहाल 'त्याच्यासारखा तोच' आहे.

●

# 5 वृत्ते

साहित्यात गद्यलेखन आणि पद्यलेखन (काव्य) असे दोन प्रमुख प्रकार मानले जातात. आपण जसे बोलतो तशीच वाक्ये लिहिणे म्हणजे गद्यलेखन आणि जे गाता येते किंवा लयबद्ध रीतीने बोलता येते त्याला पद्य असे म्हणतात. लययुक्त शब्दरचना म्हणजेच वृत्त. पण काव्यलेखनात एकच प्रकारची लय असते असे नाही. कवितेच्या चरणातील अक्षरांची संख्या व ऱ्हस्व, दीर्घ अक्षरांचा क्रम यां अनुसार ही लय बदलते. या अनुसार वृत्तांचे विविध प्रकार झाले आहेत. त्यांची नीट ओळख जाणण्यासाठी प्रत्येक वृत्ताला त्याच्या स्वभाव धर्माप्रमाणे छान नावे दिली आहेत.

ऱ्हस्व अक्षराला लघुवर्ण व दीर्घ अक्षराला गुरू असे म्हटले जाते. वृत्तांना समजण्यासाठी एक तांत्रिक पद्धती तयार केली आहे. त्याला अक्षरगण व्यवस्था म्हणता येईल. वृत्ते नीट समजण्यासाठी ही गणव्यवस्था समजून घेणे आवश्यक आहे.

कवितेच्या एका चरणातील एकूण अक्षरे तीन अक्षरांचा एक समूह या प्रमाणे विभागली जातात. या प्रत्येक समूहाला गण असे नाव आहे. लघु–गुरू क्रमानुसार प्रत्येक गणाला विशिष्ट ओळख आहे. पुढील तक्त्यामध्ये तुम्हाला ही व्यवस्था लक्षात येईल गण एकूण आठ आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (1) य गण | – | येमाता | – आद्यलघु | U – – |
| (2) म गण | – | मातारा / मानावा | – सर्वगुरू | – – – |
| (3) त गण | – | ताराज | – अंत्यलघु | – – U |
| (4) र गण | – | राजभा | – मध्यलघु | – U – |
| (5) ज गण | – | जभान | – मध्यगुरू | U – U |
| (6) भ गण | – | भानस | – आद्यगुरू | – UU |
| (7) न गण | – | नसल | – सर्वलघु | U U U |
| (8) स गण | – | सलगा | – अंत्यगुरू | U U – |

ल अक्षर – लघु U, ग अक्षर – गुरू

त्या गणाला विशिष्ट नाव दिले जाते. तीनाचे समूह होऊन काही. वरील तक्त्याला अनुसरून कवितेच्या एका चरणाचे तीन अक्षरांचा एक या प्रमाणे गण करायचे व त्यातील अक्षरांचा क्रम पाहून वेळा शेवटी एक किंवा दोन अक्षरे बाकी राहतात. त्यांना – लघु असल्यास ल आणि गुरू असल्यास ग असे म्हटले जाते.

लघुगुरु क्रम ठरविताना उच्चाराला महत्त्व असते. त्या द्रष्टीने दोन – तीने ध्यानात घ्यावेत.

(1) गणाच्या बाहेर उरलेले अंतिम अक्षर नेहमी गुरू असते. (–)

(2) ज्या जोडाक्षराचा उच्चार करताना आघात (जोर) द्यावा लागतो त्याच्या आधीचे अक्षर गुरु (–) होते. उदा. मस्तक: – U U

(3) अनुस्वाराचे अक्षर गुरु असते.

आता आपण वृत्तांच्या प्रत्यक्ष अभ्यास करु. प्रत्येक वृत्तांची ओळख आणि गणक्रम सांगणारी एक काव्यपंक्ती असते. तिला 'कारिका' असे म्हणतात.

**(1 ) भुजंगप्रयात :** या वृत्तामध्ये एका चरणामध्ये बारा अक्षरे असतात. म्हणून 3 x 4 = 12 या प्रमाणे प्रत्येकी तीन अक्षरांचे असे चार गण असतात. मनाचे श्लोक भुजंगप्रयात वृत्तामध्ये आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| U – – | U – – | U – – | U – – |
| मना स | ज्जना भ | क्ति पंथे | चिजावे |
| य | य | य | य |

वरील उदाहरण समजून घ्या. 'ज्ञ' या जोडाक्षराच्या व 'क्ति' या जोडाक्षराच्या आधीची अक्षरे स आणि भ ही गुरु (–) लिहिली आहेत. या वृत्तात चार वेळा य येतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कारिका– | U – – | U – – | U – – | U – – |
| | भुजंग | प्रयाती | ययेचा | रवेळा |
| | य | य | य | य |

कारिका तोंडपाठ केल्यास वृत्त लक्षात ठेवणे सोपे असते. मनांच्या श्लोकांची जी विशिष्ट चाल आपण म्हणतो, ती फक्त 'भुजंगप्रयात' वृत्तालाच लागू शकते.

अक्षरे – 12

गण – य – य – य – य

यती – 6 व्या अक्षरावर

**(2) मालिनी :** या वृत्तामध्ये एका चरणात पंधरा अक्षरे असतात. म्हणूनच एकूण पाच गण होऊ शकतात.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उदा.: | U U U | U U U | – – – | U – – | U – – |
| | पखर | णबघ | घाली भू | वरीपा | रिजात |
| | न | न | म | य | य |

अक्षरे – 15

यती – 8 व्या अक्षरावर

गण – न – न – म – य – य

**(3) शार्दूलविक्रीडित :** या वृत्तामध्ये 19 अक्षरे असतात.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उदा.: | U U U | U U – | U – U | U U – | – – U | – – U | – |
| | रत्नांचा | जणुता | टवाझ | ळकतो | मोरा पि | सारातु | झा |
| | हर्षे ना | चशीतैं | गमे त्रि | भुवनी | पक्षी न | ऐसा दु | जा |
| | म | स | ज | स | त | त | ग |

अक्षरे – 19

यती – 12 व्या अक्षरावर

गण – म – स – ज – स – त – त – ग

कारिका – मासाजासततागयेति गण हे शार्दूल विक्रीडिती.

## स्वाध्याय

**पुढील काव्यपंक्तीमधील वृत्त ओळखा व त्याचे गण लिहा :**

(1) या माळावरी वृक्ष एक हि नसे, बाळा खुळ्या कोकिला।

(2) दिसामाजी काहीतरी ते लिहावे ।
प्रसंगी अखंडित वाचीत जावे ॥

# 6 उपयोजित लेखन

मराठी भाषा अत्यंत समृद्ध आणि गौरवशाली परंपरा असलेली अशी. येणाऱ्या पिढीने म्हणजेच विद्यार्थी मित्रांनो, तुम्ही आपल्या या मातृभाषेची समृद्धी सौंदर्य, त्यातली थोर साहित्यिक परंपरा हे सर्व चांगल्या प्रकारे समजून घेतले पाहिजे व मराठी भाषा, भाषेतून कळणारी संस्कृती हे सारे जपायचे आहे आणि हा थोर वारसा पुढे न्यायचा आहे.

या करिता केवळ पाठ्यपुस्तक, त्यातले पाठ अभ्यासणे व परीक्षेत उत्तीर्ण होणे एवढेच पुरेसे नाही. आपण व्याकरणाचा उभ्यास करतो, कारण आपल्या मातृभाषेचे योग्य स्वरूप, बोलण्यातून, लिहिण्यात चांगल्या व नेमक्या स्वरूपात व्यक्त झाले पाहिजे. यासाठी मराठी भाषेतील उत्तम पुस्तके वाचणे आवश्यक आहे. पाठ्येतर, अन्य वाचन जितके अधिक होईल, तेवढे भाषेची विविध स्वरूपे सौंदर्य तुमच्या लक्षात येईल.

निबंध, कथा, कादंबरी, अनुवाद असे विविध प्रकारचे सुंदर साहित्य आपल्या भाषेत उपलब्ध आहेत. वाचनाने आपली भाषेविषयीची जाण, रूची अधिक वाढते. वाचन जितके अधिक कराल तेवढे परीक्षेत विचारलेले रसग्रहण, परिच्छेद लेखन, पत्रलेखन संवादलेखन हे सर्व लिहितांना तुम्हाला अवघड वाटणार नाही. कारण वाचनाने ज्ञानाच्या कक्षा रूंदावतात. चांगले काही वाचल्याने चांगल्या विचारांची प्रेरणा मिळत असते.

लेखनाविषयीच्या विविध प्रश्नांविषयी आपण चर्चा करू. यातून तुमच्या अडचणी व समस्यांची उत्तरे तुम्हाला मिळतील.

**(1) कल्पना विस्तार :** इ. 9 वीत येईपर्यंत तुम्ही कवितांतून, पाठातून म्हणी सुविचार इ. वाचले आहेत. एका वाक्यातून अनेकवेळा सुंदर व अनुभावाचे विचार व्यक्त होत असतात. ते आपल्याला नीटपणे समजले तर आपण इतरांना ते विस्तारपूर्वक उदाहरणासहित समजावू शकतो व त्या विचाराचे किंवा कल्पनेचे जीवनात काय महत्त्व आहे हे योग्य प्रकारे मांडू शकतो. कल्पना विस्तार दहा-बारा वाक्यांमध्ये मांडणे पुरेसे असते. भाषेच्या अभ्यासात हा प्रश्न महत्त्वाचा आहे. यातून तुम्हाला लेखनाचा सराव होतो.

नमुन्यासाठी काही वाक्ये अथवा काव्यपंक्ती पुढे दिलेल्या आहेत.

(1) ग्रंथ हेच गुरू आहेत.

(2) एकावे जनाचे, करावे मनाचे.

(3) स्वामी तिन्ही जगाचा, आई विना भिकारी.

(4) उथळ पाण्याला खळखळाट फार.

(5) करावे तसे भरावे.

नमुन्यादाखल पुढील कल्पना विस्तार कसा लिहिला आहे ते पहा.

मरणात खरोखर जग जगते.

ही काव्यपंक्ती भा.रा.तांबे यांच्या कवितेतील आहे. मरणे आणि जगणे या दोन विरोधी गोष्टी एकत्र कशा येऊ शकतात? परंतु जरा खोलवर विचार केला असता या वाक्यातील मर्म लक्षात येते. कोणीतरी मरण पत्करले तरच इतर लोकांना स्वातंत्र्य मिळते. येथे 'मरण' याचा अर्थ त्याग असा होऊ शकत. आपला देश स्वतंत्र करण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. म्हणून आज आपण स्वतंत्र भारत देशाचे नागरिक म्हणून जगतो आहोत. मृत्युनंतर अमरपद मिळू शकते. महान कार्य करण्यासाठी जे लोक आपले सारे जीवन अर्पण करतात ते कीर्तिरूपाने अमर होतात. समर्थ रामदासांनी म्हटलेच आहे 'मरावे परी किर्तिरूपे उरावे.'

माणसाने केवळ स्वत:साठी स्वार्थीपणाने जीवन जगू नये. अशा माणसाला मृत्यूनंतर कोणीही आठवण करीत नाही. आपले अनेक थोर नेते राष्ट्रसाठी, समाजासाठी, गरीबांसाठी आपले सर्व सर्वस्व अर्पण करून अमर झाले आहे.

मृत्यू प्रत्येकालाच येत असतो परंतु जीवन कसे जगावे हे या काव्यपंक्तीतून छान समजेत. तांबे यांची ही कविता वाचल्यास या पंक्तीचा अर्थ चांगल्या प्रकारे समजतो. विद्यार्थ्यांची भाषा आकलन क्षमता आजमावण्यासाठी परिच्छेद व त्यावर आधारित प्रश्ने, असे प्रश्नाचे स्वरूप असते.

गद्य आकलनाच्या प्रश्नाला व्यवस्थितपणे व काळजीपूर्वक हाताळल्या पूर्ण गुण मिळू शकतात.

दिलेला परिच्छेद बारकाईने वाचणे आवश्यक आहे. काही वेळा अगदी सहजपणे उत्तरे सापडतील अशी प्रश्नांची रचना नसते. म्हणून वाचन व मनन नीटपणे करून प्रश्न समजून घेणे आवश्यक आहे.

दिलेला परिच्छेद पाठ्यपुस्तकातला बहुधा नसतो.

नमुना म्हणून अभ्यासाला येथे एक परिच्छेद दिला आहे. या परिच्छेदाखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी लिहावीत.

आपला भारत देश खेड्यांनी बनलेला आहे. हा देश शेतीप्रधान आहे. परंतु आजही देशात साक्षरतेचे प्रमाण हवे तितके चांगले नाही. शासन या साठी विविध योजना राबविते. प्रौढशिक्षणाचे वर्ग देखील कित्येक सेवाभावी संस्था चालवितात. परंतु हवा तेवढा प्रतिसाद मिळत नाही. शिक्षणाअभावी शेतकऱ्यांना नव्या टेक्नॉलॉजीने मिळणारे ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. प्रौढ वयात शिक्षण घेण्याची काहींना लाज वाटते. ही वृत्ती चांगली नाही.

भारताच्या तुलनेत युरोपीय राष्ट्रांची प्रगती शिक्षण प्रसारामुळेच झाली आहे. त्या राष्ट्रांचा विकास झाला आहे. ज्ञानमुळेच मनुष्यजातीचे कल्याण होणार आहे.

(1) 'साक्षर' या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द लिहा.

(2) जो दुसऱ्यावर अवलंबून राहूतो, त्याला काय म्हणतात?

(3) राष्ट्राच्या विकासासाठी कोणती गोष्ट आवश्यक आहे?

(4) 'मात करणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ लिहा?

(5) कोणकोणत्या मार्गांनी साक्षरतेचा प्रसार होऊ शकतो?

●

| 7 | सारांश लेखन |
|---|---|

# 7 सारांश लेखन

आज आपले जीवन इतके गतिमान झाले आहे की वाचन करायला पुरेसा वेळ मिळत नाही. अशावेळी भराभर पुस्तकावर नजर फिरवून, पाल्हाळ वगळून आपण महत्त्वाचे मुद्दे तेवढे टिपतो व पाठ्य विषयाचा संक्षेप करून थोडाक्यात पण महत्त्वाचे तेवढे समजून घेण्याचा प्रयत्न करतो. हाच संक्षेप आपण लिखित स्वरूपात केला की त्यालाच आपण सारांश-लेखन म्हणतो.

सारांश लेखनाचा प्रश्न परीक्षेत विचारतांना सुमारे शंभर शब्दांचा एक उतारा दिला जातो. या उताऱ्याचा एक तृतीयांश (1/3) सारांश करायचा अपेक्षित असतो. हे करतांना काही मुद्दे लक्षात घेऊन सारांश लेखन करायचे असते, ते या प्रमाणे –

(1) लिहायला सुरूवात करण्या आधी उतारा दोन वेळा वाचावा आणि मुख्य विषय समजून घ्यावा, त्या अनुसार उताऱ्यासाठी योग्य शीर्षक मनात योजून ठेवावे.

(2) सारांश लिहितांना स्वत:च्या विचारांची भर घालू नये, लेखकाचेच विचार साररूपाने – कमी शब्दांमध्ये मांडावेत.

(3) मुख्य मुद्यांना अधोरेखित करून घेतल्यास सोपे होते.

(4) उताऱ्यात दिलेली उदाहरणे, दृष्टान्त, अलंकार इ. अनावश्यक वाक्ये गाळून केवळ त्यातील विचार स्पष्ट करावा.

(5) शंभर शब्दांचा सारांश अंदाजे 30 ते 35 शब्दांमध्ये पूर्ण व्हावा. पाच ते सहा वाक्यांत एवढे शब्द सामावले जातात.

(6) मुख्य विषयाला अनुरूप शीर्षक देणे आवश्यक आहे.

पुढील उतारा वाचा व त्याचा 1/3 सारांश लिहा. योग्य शीर्षक द्या.

आज एकविसाव्या शतकात सर्व क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने स्त्रिया यशस्वीपणे कार्य करीत आहेत. आज ती पंतप्रधान होऊ शकते, राष्ट्रपती देखील होऊ शकते.मदर टेरेसा होऊन ती दु:खीतांचे अश्रू पुसते, डॉक्टर, इंजिनीयर, वकील, पोलीस अधिकारी इ. सर्व पदांवर श्रेष्ठ कार्य स्त्रिया करीत आहेत.

परंतु ही प्रगती एका बाजुला दिसते, त्याच बरोबर स्त्रियांवर होणारे अत्याचार, छळ हे ही कमी झालेले नाही. 100% स्त्री शिक्षणावर भर देण्याची गरज आहे. शिक्षणानेच सामान्य स्त्रीची अवस्था बदलणार आहे. शिक्षणानेच तिच्यात आत्मविश्वास येईल व तो परिस्थितीशी हिम्मतीने लढू शकेल. रूढी व परंपराच्या जोखडाला झुगारून देण्याची शक्ती शिक्षणच तिला देऊ शकेल. या साठी समस्त समाजाला तिला सहकार देणे गरजेचे आहे.

**आजची स्त्री**

**सारांशलेखन :** एकविसाव्या शतकाली स्त्री पुरुषांच्या बरोबरीने आपले कर्तृत्व सिद्ध करीत. एक ही क्षेत्र स्त्रीने आपली श्रेष्ठता दाखविण्यास बाकी ठेवलेले नाही. याच बरोबर काहीसे विरोधी चित्रही दिसते आहे. रूढी परंपराच्या जोखडातून सामान्य स्त्री अजून मुक्त झालेली नाही. शिक्षणानेच स्त्री आपली प्रगती करु शकेल. या साठी सर्व समजाने तिला मदतीचा हात दिला पाहिजे.

सारांश लेखनाचा सराव करण्यासाठी या पुस्तकातील पाठ अभ्यासतांना करु शकता. प्रत्येक गद्य पाठातील प्रश्नांची उत्तरे तयार करण्यासाठी सारांश लेखनाचा चांगलाच उपयोग करुन घेता येईल.

●

# 8 निबंध लेखन

निबंध या शब्दाचा अर्थ एकत्र बांधून, जुळवून आपले विचार मांडणे. निबंध लेखनासाठी तरल व तेज कल्पनाशक्ती वाचन व सामान्य ज्ञान या गोष्टी आवश्यक असतात. आपले विचार मुद्देसूदपणे मांडणे हे एक कौशल्य आहे.

ज्या प्रमाणे आपण वेगवेगळी फुले एकत्र करुन, आकर्षक रीत्या त्यांना जुळवून सुंदर हार तयार करतो, त्याच प्रमाणे निबंध लिहितांना विषयाला अनुसरून योग्य मुद्दे एकत्र करणे, सुसंगत रीत्या त्यांना गुंफणे हे जमले पाहिजे. मुद्यांचा विस्तार करणे, त्या साठी अनुरूप उदाहरणे मांडणे हे कौशल्य जमले पाहिजे. हा लेखनप्रकार विस्तारपूर्वक लिहिण्याचा आहे.

सामान्यपणे निबंधाचे पाच प्रकार करता येतील :

(1) वर्णनात्मक (2) कथनात्मक (3) चिंतनात्मक (4) कल्पनात्मक (5) चरित्रात्मक / आत्मचरित्रपर

वर्णनात्मक निबंधात एखाद्या घटनेचे, प्रसंगाचे दृश्य हुबेहूब व नेमकेपणाने वर्णन करायचे असते. कांही वेळा वर्णनात्मक व कथनात्मक एक प्रकार होऊ शकतो. आपले अनुभव सांगणे हे ही त्यात असते कथन हे सर्वच प्रकारांमध्ये आवश्यक घटक आहे.

चिंतनात्मक निबंधात आपले विचार, मते आपण व्यक्त करतो. योग्य भाषेत व मुद्देसूदपणे विचार मांडणे हे जमण्यासाठी भाषाकौशल्य आवश्यक आहे.

कल्पनात्मक निबंध स्वैर कल्पनाविहार हा गुण प्रामुख्याने दिसायला हवा. जे सत्य नाही तरीही काव्यमय व काल्पनिक वर्णन करणे हे यात अपेक्षित. मी पाहिलेले एक अद्‌भुत स्वप्न या सारख्या विषयात तुमच्या कल्पनाशक्तीला मोकळे सोडून अद्‌भुत व वास्तवापासून वेगळे, सुंदर वर्णन करता आले पाहिले.

चरित्रात्मक अथवा आत्मचरित्रात्मक या प्रकारात एक वेगळा गुण आवश्यक आहे. 'माझा आवडता नेता' या सारख्या निबंधात ज्या नेत्याविषयी लिहिणार आहेत, त्याच्या जीवनचरित्राची खरी माहिती लिहायला हवे. या साठी त्या नेत्याचे जीवनचरित्र तुम्हाला माहिती असायला हवे. त्याची वैयाक्तिक माहिती, कुटुंब, शिक्षण हे सारे यात हवे. या निबंध प्रकारात काल्पनिक काही नसावे. कारण आपण सामान्यपणे प्रसिद्ध व खऱ्या व्यक्तीविषयी यात लिहीतो. त्या नेत्याचे कार्य, त्याचे विशेष गुण, नेतृत्व या साऱ्याचे सत्याला धरून वर्णन असावे. म्हणजे हा निबंध प्रकार काही प्रमाणात वर्णनात्मक ही असतोच. हा नेता तुम्हाला का आवडतो, याची कारणे हा या निबंध प्रमुख मुद्‌ा असावा.

आत्मचरित्रात्मक निबंध या प्रकारात ज्याचे आत्मकथन लिहायचे ती व्यक्ती / वस्तू आपणच आहोत अशी कल्पना करून प्रथम पुरुषी लेखन असायला हवे. यात कल्पनाविहाराला भरपूर वाव आहे. मी छत्री बोलते आहे, गाढवाची कैफियत 'मी वृक्ष', 'पूरग्रस्ताचे मनोगत' अशा प्रकारे शीर्षकाचे वैविध्य जरी असले तरी आत्मकथन – स्वत:ची कहाणी स्वत:च सांगणे हा मुख्य मुद्‌ा आहे. संपूर्ण निबंधात तृतीयपुरुषी वर्णन कुठेही नसावे. सर्वात मुख्य मुद्‌ा म्हणजे पूर्ण जीवन कथा सांगून शेवटी 'माझा मृत्यू झाला' है वर्णन येऊ नये. मृत्यू झालेली व्यक्ती आपली कहाणी कशी सांगेल? तेव्हा मृत्यूचे वर्णन करणे ही आत्मकथनात्मक निबंधातली सर्वात मोठी चूक आहे.

निबंध लिहिताना आरंभ, मध्य व शेवट असे कमीतकमी तीन परिच्छेद करून लेखन करावे. सामान्यपणे 20 - 25 ओळीत निबंध लिहिणे अपेक्षित असते.

आरंभ आकर्षक, नाट्यात्मक व काहीसा वेगळ्या पद्धतिने विषयाला हात घालणारा असावा. मुख्य विषयाच्या चर्चेत विषयानुरूप उक्ती, उदाहरणे, म्हणी यांचा उपयोग करावा. काही किस्से, बातम्या, घटना यांचा उचित उपयोग निबंधाच्या मध्यभागात असावा. निबंधाचा शेवट करताना अगोदर लिहिलेल्या सर्व मुद्यांचे सार येईल अशी काळजी निबंध उत्तम प्रकारे लिहिता येणे हे, तुमचे सामान्य ज्ञान व भाषा कौशल्य यावर अवलंबून आहे.

काही विशेष प्रकारच्या निबंधांची तुम्ही तयारी करून ठेवली तर श्रेयस्कर होईल.

(1) **ॠतुवर्णन :** वर्षाॠतू, वसंतॠतू, उन्हाळ्यातली दुपार इ.

(2) **महान व्यक्तींचे चरित्र :** लो. टिळक म. गांधीजी, डॉ. अब्दूल कलाम, कांही सुप्रसिद्ध लेखक व त्यांचे लेखन इ.

(3) **विज्ञानाशी संबंधित विषय :** विज्ञानाचे लाभ, विज्ञान – शाप की वरदान, कॉम्प्युटर इ.

(4) **म्हणी – म्हणीं :** अनुभवाचे सार, म्हणींची यादी करणे, अर्थ समजून घेणे, म्हणी अनुभवाच्या खाणी.

(5) **कल्पनात्मक विषय :** सूर्य उगवलाच नाही तर – घडयाळे बंद पडली तर – टेलिविजन बंद झाले तर – इ.

(6) **वैचारिक विषय :** शिस्तीचे महत्त्व, संस्कारांची आवश्यकता. नम्रता, मातृभाषा, सामाजिक कर्तव्ये, सेवाभाव इ.

●

# स्थूल वाचन

## 1 देव विद्येचा ! उत्सव...?

– **विजय कुवळेकर**

(जन्म : 1952)

विजय कुवळेकर हे ललित लेखक, पत्रकार, कवी चित्रपटअभिनेता अशा अनेक भूमिकांमध्ये सहजपणे वावरणारे प्रतिभावंत कलावंत आहेत. 'शिवार', पूल 'दिशा उनसावल्या' ही त्यांची काही गाजलेली पुस्तके आहेत. हा ललित लेख त्यांच्या 'पैलू' या संग्रहातून घेतला आहे या संग्रहाला महाराष्ट्र शासनाचा व मराठी साहित्यपरिषदे चा पुरस्कार मिळाला आहे.

गौरीगणपतीचा सण म्हणजे महाराष्ट्रातीत सर्वात मोठा उत्सव. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या या उत्सवाचे पूर्वीचे वैचारिक स्वरूप आता मात्र किती वेगळे  झालेले आहे याची खंत लेखकाच्या मनात आहे, तीच शब्दांतून व्यक्त  होते.

---

गणेशोत्सव हे महाराष्ट्रचं एक वैशिष्ट्य. त्यात पुण्याचा गणेशोत्सव विशेष नावाजलेला. आता तर त्याची ख्याती दूरदेशांपर्यंत पोहोचलेली. ती तशी पोहोचविण्यासाठी गेल्या काही वर्षांत वेगळा 'फेस्टिवल' सुरू झालाय. 'दगडूशेठ' च्या 'लक्ष' सोहळयापाठोपाठ या 'फेस्टिवल' ची तयारी सुरू झालीय. खरं तर, केवळ दगडूशेठ ट्रस्टनं एकांडेपणानं शताब्दीमहोत्सव करण्याऐवजी सर्वांनी एकत्र येऊन प्रतिनिधिक असा देखणा सोहळा करायला हवा होता. पण ते झालं नाही. त्यामुळं जो तो आपापल्या ताकदीप्रमाणे शताब्दी करणार. लोकमान्यांनी सगळ्या समाजाला एकत्र आणण्याचा उद्देशानं सुरू केलेला हा उत्सव. आता त्याच्या निमित्तानंच सगळ्यांचे सवते सुभे दुमदमायला लागलेय्त. काळाचा माहिमा. !....... स्पर्धा कशाची आहे ? भव्यतेची ? खर्चाची ? राजकीय, सामाजिक बलप्रदर्शनाची ?.... कसलीही असो, सामाजिक; सांस्कृतिक कार्याची स्पर्धा यात नाही, एवढं निश्चित ! .....अर्थात गणेशोत्सवाच्या सध्याच्या स्वरूपात ती हरवलेलीच आहे. तिची जागा घेतलीय् भपक्यानं, हेव्यादाव्यांनी, शह–प्रतिशहाच्या राजकारणानं... त्यात पक्षीय राजकारणाचे रंगही मिसळून वाढत गेलेय्त. आजच्या गणेशोत्सवाच्या स्वरूपात या साऱ्यांच प्रतिबिंब सामावलेलं आहे. ....

गणेशोत्सवाचं आजचं स्वरूप बव्हंशी केवळ उत्सवी असं झालंय्. त्यात लोकांच्या इच्छेला स्थान कमी, मंडळाच्या 'कार्यकर्त्यां' चं म्हणणंच अधिक प्रभावी असंत. वर्गणी जमा करण्यापासून ते विसर्जन मिरणुकीपर्यंत सगळं त्यांना हवं; त्या, त्यांना रूचेल, तशा पद्धतीनं चालतं. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक उपक्रमांपेक्षा भर असतो भपक्यावर. 'ऐश' करण्यावर. देखाचे चांगले सजवले जातात. नेत्रदीपक रोशणाई केली जाते. आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणावर होते. अनेक कलाकारांना उत्तेजन मिळतं... ही जमेची बाजू. पण सामान्य माणसाच्या वाट्याला यापलीकडेही खूप काही येतं. मंडळी रस्ते खणतात. वाहतुकीची कोंडी होते. इस्पितळांच्या परिसरातही ध्वनिक्षेपक घुमवत ठेवतात. गणपतीचं आगमन असो, की विसर्जन असो, 'धुंद' होतात, बेभान होतात. 'दारूबंदी' असतांनाही मद्य उदंड वाहतं. इतर नशापणी असतंच. स्त्रीयांची टिंगलटवाळी, हिडीस नाचगाणी, भांडणं... हे आणि असे किती तरी प्रकार. करणारेही उदंड. कधी 'कार्यकर्ते', कधी 'पब्लिक' पैशाचा पूर वाहतो, तसा या सगळ्या गैरप्रकारांचाही.

हे सगळं पाहिलं, की गणेशोत्सवाचा शंभर वर्षांचा ताळेबंद मांडला जायला हवा, असं वाटतं, धार्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रांमध्ये गेल्या शंभर वर्षांत गणेशोत्सवानं नेमकं किती, कसं आणि कोणतं परिवर्तन झालं ? राजकीय–सामाजिक जागृती किती वाढली ? विद्या–कलांच्या क्षेत्रांत किती प्रगती साधली ? समाजाच्या वैचारिक उन्नयनाला किती हातभार लागला? ... असे अनेक प्रश्न आहेत. या सगळयांच्या अनुषंगानं शताब्दीचा मागोवा घेऊन ताळेबंद

मांडायला हवा, आणि पुढची दिशा ठरवायला हवी. शताब्दीच्या झगमगटात आणि निनादात चार लोकांनी तरी शांतपणे गांभीर्यानं हा शोध घ्यायला हवा. असा विचार केला, तर काही तरी वेगळा मार्ग चोखाळता येणं शक्य आहे. तसं व्हायला हवं.

गणपती हा विद्येच देव, आणि देवांचा सेनापती. या विद्यादेवाच्या उत्सवात विद्येला स्थान कुठं आणि किती असतं? शोधावंच लागेल. म्हणजे विद्याधिपतीच्या उत्सवात विद्येलाच वळचणीत स्थानं. हे खरं गणेशपूजन नव्हे. किंबहुना कोणत्याही देवाची पूजा म्हणजे काय ? मूलतत्त्वाचा गाभा हरवून बसलेले उपचार ? अथर्वशीर्षात सांगिलेली 'सैषा गणेशविद्या' अशा उपचारात बंदिस्त नाही, ती माणसांच्या बुद्धीत, विद्वत्तेत, विचारप्रधानतेत आणि कर्मप्रधानतेत सामावलेली आहे... निदान तशी ती असली पाहिजे, दिसली पाहिजे. त्यासाठी या गणेशोत्सवातून, गणपतीभक्तांना काही करता येईल, की नाही ? मला वाटतं, सुजाण, विचारी, कृतिशील अशा लोकांनी मनात आणलं, तर येईल.

'कालनिर्णय' कार ज्योतिर्भास्कर जयंतराव साळगावर हे गणपतीचे निःस्सीम उपासक. त्यांचा स्वतःचा 'श्रीगणेश महानिधी' आहे. शिवाय गणेशोत्सव महामंडळ, सिद्धिविनायक ट्रस्ट अशा विविध संस्थांच्या माध्यामातून ते गणेशकार्य करीत आले आहेत. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाला मदत देण्यापासून ते इस्पितळ उभारणीपर्यंत अनेक योजनांना त्यातून हातभार लागतो. गणेशाच्या मूळ रूपाशी सुसुंगत विधायक असं वळण गणेशोत्सवाला लागावं. यासाठी झटणारी जी झपाटलेली माणसं आहेत, त्यांतलं हे आघाडीचं व्क्तीमत्व. ते म्हणाले,

'गणपती ही विद्येची देवता, आणि तो देवांचा सेनापती. गनिमी काव्याच युद्ध प्रथम गणपतीनं सुरू केल. महिलांची पहिली सैनिकी तुकडी गणपतीनं उभी केली...' हा 'आदिदेव' आहे, म्हणजे फक्त पहिल्या नमनाचा मानकारी नव्हे, अनेक कार्यांचा तो प्रारंभकर्ता आहे. म्हणूनच, विद्यार्जन करणाऱ्यांच्या मार्गतली विघ्नं दूर करण ही गणपतीची खरी सेवा आहे, असं मी मानतो, नित्यानुसार काम करायचा प्रयत्न करतो.'

जयंतराव कोकणातले. कोकण दारिद्रयानं समृद्ध तिथल्या मुलांच्या शिक्षणाची आबाळ जयंतरावांनी जवळून पाहिलेली. या कोकणातल्या अनेक गावांमधल्या मुलांचं शिक्षण, अभिनय, वक्तृत्व, लेखन यांत प्रावीण्य मिळविणाऱ्यांना बक्षिसं, गरीब मुलांसाठी दिल्या जाणाऱ्या पेजेच्या योजनेला मदत असं बरंच काही ते करत असतात. लष्करी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या गरीब तरुणांना या 'सेनापती' च्या पूजेचा एक भाग म्हणून ते शिष्यवृत्तीही देतात. मला वाटतं, खरं गणेशपूजन हे असं असायला हवं. जपजाप्य, पूजाअर्यादी उपचार यापलिकडचा देव असा पाहयला हवा.

आज वीजटंचाई, पाणीटंचाई, दारिद्रय, बेकारी जातीयता अशा असंख्य विघ्नांनी समाज ग्रासलेला आहे. विघ्नहर्त्याचा उत्सव करताना मंडळांनी याची आठवण ठेवून मदतीचा हातभार लावायला हवाच. पण या तात्कालिक कार्याच्या पलीकडे जाऊन कायमस्वरूपी, समाजाला सात्विक, बौद्धिक, वैचारिक अधिष्ठान देणाऱ्या कामाचा विचार करायला हवा. विद्येच्या क्षेत्रात दुर्लक्षित राहिलेली, अपुऱ्या अवस्थेत पडलेली, गरज ओळखून हाती घ्यायला हवीत, अशी असंख्य कामं आहेत. हजारो गोरगरीब मुलं शाळेच्या उंबरठ्यापासून मैलोन् मैल दूर आहेत. त्यांना शिकायची इच्छा आहे. पण कधी परिस्थिती मुळं शाळेत जाता येत नाही, कधी शाळा जवळ नाही... कधी दिवसभर काम केल्यावर शिकता येईल, अशी रात्रशाळेसारखी सोय नाही... या आणि अशाच अनेक प्रकारच्या शिक्षणविषयक अडचणी... अप्रकाशित असं विपुल आणि किती प्रकारचं विचारधन आहे ! समर्थ रामदासांची आठशे हिंदी पदं आणि शंभराहून जास्त मराठी रचना यांचं हस्तलिखित जयंतराव

साळगावकरांकडे अप्रकाशित अवस्थेत आहे. मोठ्या प्रयत्नांन त्यांनी ते मिळवलंय. खुद्द शिवाजीमहाराजांची काही पत्रं अप्रकाशित आहेत. कोल्हापूरचे संशोधक डॉ. जयसिंगराव पवार त्यांचा अभ्यास करतायत्. औरंगाबादला नव्वदीच्या वयात असलेले बाब्रेकरशास्त्री आहेत. त्यांच्याकडे संस्कृत हस्तलिखितांचा मौलिक संग्रह आहे. थोडा संग्रह टिळक महाराष्ट्र विद्यापीठांना घेतलाय. पण ज्योतिषशास्त्रविषयक काही महत्त्वाचे ग्रंथ त्यांच्याकडे अजूनही आहेत राजापूरला शंभर वर्षं झालेली, आर्थिक स्थितीचा डोलारा कसाबसा तगवून धरलेली वैदिक पाठशाळा आहे. नाशिकच्या श्रीमती शांताबाई दाणी आता थकल्यायत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जवळजवळ साडेतीनशे पत्रं त्यांच्याकडे आहेत. आंबेडकर शताब्दीच्या काळता तात्यासाहेब शिरवाडकरांच्या सांगण्यावरून ती पत्रं शांतबाईंनी माझ्याकडे दिली. तेव्हा प्रा. यशवंत मनोहर साहित्य–संस्कृती मंडळाचे अध्यक्ष होते. मंडळानं ती प्रकाशित करावीत, असं त्यांनी ठरवलं. पुढं काय झालं, कोण जाणे ! ... अशी असंख्य पत्रं अप्रकाशित आहेत. राजर्षि शाहू महाराजांची पत्रं. निवाडे कोल्हापूर भागात अजूनही कोणाकोणाकडे आहेत. हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या इतिहासाचं चित्र उभं करणाऱ्या संग्रामातल्या सैनिकांच्या आठवणींचं संकलन झालेलं. नाही... किती तरी उदाहरणं सांगता येतील. या वानगीवरून व्याप्तीची कल्पना यावी.

विद्याजतन, विद्याप्रसार आणि विद्यासंवर्धन असं हे काम आहे. आपली संस्कृती, आपलं ज्ञान यांचा मागोवा घेणं आणि त्यातलं विचारधन जतन करून पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवणं याला अशा कामानं हातभार लागणार आहे. नुसत्या रोशणाईनं नि भव्य सजावटी करून ते साधणार नाही. गणेशोत्सवाच्या झगमगाटात विद्येचा प्रकाश झाकोळता कामा नये. उलट, त्याला अधिक झळाळी यायला हवी. विद्याधिपतीची कृतिशील, खरी पूजा अशा कामांतून करता येईल. एक 'विद्यानिधी' उभा करून हे काम आपण चालवलं पाहिजे. गणेशोत्सव मंडळ, गणपतीभक्त, विद्येचे उपासक अशा सर्वांनी मनात आणलं, तर असा निधी सहज उभा करता येईल. मंडळांनी आपल्या वर्गणीतला ठरावीक वाटा दरवर्षी या निधीला द्यायला हवा. तसं झालं आणि ज्यांना ज्यांना शक्य असेल, त्यांनी हातभार लावला, तर भरघोस निधी उभा करता येईल आणि हा ज्ञानयज्ञ चालवता येईल. हे कार्य अखंड आहे, निरंतर गरजेचं आहे. समाजातला अज्ञानाचा अंधार उजळणाऱ्या, ज्ञानाचा प्रकाश देणाऱ्या दीपांची अशी आरती आज हवी आहे.

## शब्दार्थ

**उन्नयन** उंचावणे **विधायक** सकारात्मक **ताळेबंद मांडणे** जमाखर्च मांडणे

●

| 2 | # मुजावर गुरुजी |
|---|---|

**– कृष्णात खोत**

(जन्म : 1972)

हे मराठीतले नव्या दमाचे लेखक असून 'रौंदाळा', 'गावठाण' या त्यांच्या ग्रामीण कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यामधील 'गावठाण' या कलाकृतीस महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. तसेच त्यांच्या. 'पाऊच' कथेस महाराष्ट्र साहित्य परिषेदचा सर्वोकृष्ट कथेचा पुरस्कारही लाभला आहे. यामध्ये गुरूजींचे अतिशय हृदयस्पर्शी असे व्यक्तिचित्रण केलेले आहे.

---

''अहो, कृष्णाला शाळेत पाठवून देता ना ?''

हा आवाज माझ्या कानांत घरातल्यांच्या अगोदर धडकला.

मी नुकताच शाळेत जाऊ लागलो होता; पण चार दिवस उगाचच राहिलो होतो.

शाळेचा कोण कारण नसतांना राहिला की गुरुजी चार थोरड मुलं घेऊन गावात फिरायचे. त्याच्या आई–वडिलांना सांगून, त्या मुलाला समजावून, तर कधी उचलून शाळेत न्यायचे.

शाळा गावाच्या जरा बाहेर. एका खोलीत चार वर्ग. तेथूनच पन्हाळगडाकडं वाट जाते. गावच्या कड्यालगत, कडा फोडून खोलीपुरती सप्पय केलेली जागा. एक सुरूचं झाड आणि शाळेवर सावली धरणारे एक भले मोठे आंब्याचे झाड. त्याला गावातली सारी 'कोंडरातला आंबा' म्हणती.

गुरुजी बरीच वर्षे आमच्या गावात होते. ते पन्हाळगडावर राहत. दररोज चालत जंगलातनं येत. मला आठवतं, आम्ही सर्व मुलं साडेनऊ वाजताच शाळंत जात असू. शाळेची सफाई, परिसर सफाई करीत असू. वर्गात गेलो की वर्गसेक्रेटरी आमचा गुरुजी.

गडावरनं खाली येताना चव्हाटा हे ठिकाण लागतं. ते गावातनं, शाळेजवळून दिसतं. तिथं एखादा पांढरा ठिपका दिसला की, गुरुजी आले असे समजायचे. तेथून शाळेत यायला अर्धा तास लागे. तरी आम्ही गुरुजी आले म्हणून शांत बसायचो.

मग आमचा वर्गसक्रेटरीच तेवढा बाहेर जाऊन बघत असे. तो आत येई. सांगी, ''गुरुजी तांबोळीला आले.'' मुलं आणखी शांत.

गडावरून येताना लागणाऱ्या ठिकाणांची नावं सांगत सेक्रेटरी येई. चार भिंतींच्या आत सगळी त्याच्या डोळ्यानं आम्ही ती ठिकाणं आणि गुरुजी बघत असू. ''एक साथ नमस्ते'' चा पवित्रा घेण्यास तयार होत. श्वास रोखून धरत.

मग सेक्रेटरीही गुरुजी काळवाटावरून खाली उतरले की आत शाळेच्या व्हरांड्यात येई. ते चांभारडुऱ्याव आले की चौकटीत, धबधबीजवळ आले की आमच्या येऊन बसे. तो बसतोय एवढ्यात गुरुजी व्हरांड्यात येत. आम्ही सर्वजण उठून ''एक साथ नमस्ते'' करीत असू.

गुरुजी घामाने थबथबलेले असायचे. तोंड धुऊन थोडा वेळ बसायचे. शाळेत एकच तांब्या होता. मोठा. तो सगळा संपायचा. मग गुरुजी ''थंड पाणी कोण आणणार मातीच्या धागरीतलं ?'' असे म्हणताच आमच्यात चढोओढ लागयची. गुरुजी त्यातल्या एकाला सांगी. पण कालचा आज आणि आजचा उदया असायचा नाही. आणलेला पाण्याचा तांब्या गुरुजी निम्मा प्यायचे. निम्मा दुपारी.

पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग.

गुरुजी एका–एका वर्गाला टेबलाभोवती उभे करून शिकवीत. बाकीच्यांना त्या वेळी काम दिलेलं असायचं.

पण इतिहासातला धडा सगळयांना एकदम.

मला आठवतं; गुरूजी शिवाजी महाराजांचा इतिहास शिकवतांना आम्हां सर्वांना त्या काळात घेऊन जायचे. त्यांचा आवाज आम्हांला रोम–रोम जागा करीत असे. चारी वर्ग भोवती, गुरुजी मध्ये. शिवाजी महाराज कसा असेल, अफजलखानाचा कोथळा कसा फाडला, मग तो कसा ओरडला हे सांगताना त्यांचे देहभान विसरून जाई.

मला तर गुरुजीनी फक्त इतिहासच शिकवावा असे वाटे.

पावसाळयात आमच्या शाळेची इमारत पश्चिम बाजूनं भिजून जाई. इमारत जुनी. बांधकाम वर्षानुवर्षं भिजून ढिसूळ झालेलं. पाऊस वाढेल तशी भिंतीवरची ओल पालीगत वर-वर सरकी. गुरुजी आम्हां मुलांना पंखाखाली पिल्ली घेतल्यागत घेऊन बसत. गावातल्यांना गुरुजी सांगत;

''मी मेलो तर मला काही नाही, पण माझ्या समोर ही चिल्ली-पिल्ली बसतात त्यांचे काय ? हेच उद्याचे देशाचे भाग्यविधाते. त्यांच्यासाठी काय तरी करा!''

गाववाली ऐकायची. वरती कळवायची. मग कोणतरी साहेब यायचा. भिंतीची मापे घेऊन जायचा; पण हे सगळं माकडाच्या घरणत. पावसाळा संपला की पुढच्या पावसाळ्यात त्याची आठवण होई.

गुरुजी आम्हांला भिंत पडली तर कुणी कसं, कुठं पळायचं हे सांगीत. तरी त्यांना फारच काळजी वाटत होती. त्यांनी पंधरा ऑगस्टला गाववाल्यांना ठकणावून सांगिवतलं; नाहीतर मीच तुमचं गाव बदलून घेतो. तुम्ही भिंतीचं बघितलं नाही तर!

त्यानंतर भिंतीचं काम झालं. गुरुजींच्या मनातली पाल थांबली.

गडावर त्यांना सारी जण 'पापागुरुजी' म्हणत. गुरुजींचा वेष नेहमी पांढराशुभ्र. डोक्याला नेहमी तेल लावून केसाचा कोंबडा उजव्या बाजूला पाडून एकही केस हालणार नाही असे बसवलेले असत. चित्रातल्या माणसागत. त्यांच्या हातात सोनेरी घड्याळ. त्याची चर्चा गावभर आम्ही मुलं करीत असू. 'गुरुजींचं घड्याळ सोन्याचं' म्हणून. कधी कधी नेहरू शर्ट-विजार वापरीत. नाकेले, निमगोरे असे गुरुजी त्यातून उठून दिसत.

पहिलीच्या वर्गात बसण्यास परवानगी नसणाऱ्या मुलांनाही ते शाळेत बसवून घेत. त्या वेळी बालवाडी नव्हती आमच्या गावात. दिवसभर कामावर जाणाऱ्या आई-वडिलांना तेवढाच आधार असायचा. गुरुजी त्यांना सांगायचे.

''जावा तुमच्या मुलाला शाळेत सोडून. दोन पैसे मिळवा. तेवढेच येतील चटणी-मिठाला.''

ते आई-वडील दिवस-दिवसभर कामावर जात. त्यांच्या कुटुंबाला गुरुजींनी हातभारच लावल्यागत व्हायचं.

गावातल्या बऱ्याच जणांची नावे; दगड्या, धोंड्या, आर्ज्या, कोंड्या. गुरुजींनी ती दगडोपंत, धोंडोपंत, अर्जुनराव, कोंडीराम अशी रेकॉर्डला लावली. आम्हांस तसंच म्हणयाला लावलं.

चार वाजले की आमची उजळणी. बाराखड्यानं शाळेची खोली घुमायची. तालासुरात चालायचं. खिडकीत येऊन उभा राहिलेला गाववाला कळायचा नाही.

ते सरळाशी सरळ असत. वाकड्याशी वाकडं.

आमची वनभोजन सहल नेहमी पानगडाला निघे. पावट्याच्या शेंगा शिवारात लागल्या की सहल निघे. पावनगडाची वाट जंगलातनं. तिथे मुसलमानांची साताठ घरं. पिराचं देवस्थान. गडाच्या पायथ्याखाली एक मोठा झरा. उतरायला पायऱ्यांची अवघड दगडी वाट. झऱ्याजवळ खळयाएवढ्या जागेत झाडंझुडपं नाहीत. लगेच खाली मोठी दरड, झाडाझुडपांनी वेढलेली. वर्षातला एक दिवस सगळे वर्ग घेऊन गुरुजी तिथे जात असत.

प्रत्येकाच्या घरातनं तांदूळ जमा केलेले असत. आमटी नि भात स्वत: गुरुजी बनवत. आम्ही पिशवीतनं भाकरी नेत असू. मोठी पातेली पावनगडावरची. त्यात आमटी नि भात दगडांच्या चुलीवर होई. त्या आमटीचा-भाताचा वास काही वेगळाच असे. गुरुजी सर्वांना घेऊन जेवायला बसत. सगळी स्वच्छता करून आम्ही निघत असू. मला आठवतं; मी चौथीला असेन. आमची जेवणं आटोपून

आम्ही सगळी गडावरती आलो. सगळीजणं गडाच्या पठरावर खेळत होतो. पावनगड सगळा गुरूजींच्या ओळखीचा. तिथल्या एका माणसाने आमच्या वर्गातल्या एक जणाला मारले. गुरुजी त्याच्यावर एवढे खवळले. आम्ही सर्वजण जमलो.

आम्ही सगळीच गुरुजींचा आवेश पाहून गांगरलो. त्यांचं वेगळंच रूप आम्हांला दिसले. तो माणूस गुरुजींच्या पाया पडाय लागला. गुरुजी थोड्या वेळाने शांत झाले. म्हणाले; ''ही मुलं त्यांच्या आई-बापांनी माझ्या ताब्याता दिलीत. ती माझ्या ताब्यात असेपर्यंत मीच त्यांचा बाप नि आई, मग तुमचा मुलगा-मुलगी असली तरी.''

माझी चौथी झाली. पन्हाळ्यास हायस्कूलमध्ये पाचवीच्या वर्गात प्रवेश घेतला. जाता-येता गुरुजी वाटेत भेटायचे. बरं वाटायचं, ''पोरांनो, मिळून जायाचे, मिळून यायचे,'' असं त्याचं सांगणं, वाटेला आमच्यात भांडण लागली की गुरुजींना कळायचं. गुरुजी जाता-जाता ती मिटवायचे, प्रसंगी रागवायचे.

मी. डी. एड्.ला गेलो. त्यांना बरं वाटलं.

डी. एड्.मध्ये पहिला नंबर आला, हे कळताच ते नाचले. सगळ्यांना सांगत होते; ''बघा मी लावलेली झाडं कशी बहराय लागलीत.''

माझं निकालपत्रक गुरुजींनी किती जणांना दाखवलं आणि स्वत:च त्याबद्दल बोलले भरभरून.

गुरुजी निवृत्तीजवळ आले आणि त्यांची बदली पन्हाळ्याच्या शाळेत झाली. ते मुख्याध्यापक होते.

एके दिवशी त्यांचा निरोप आला. 'कृष्णातला सांगा मला भेटायला!'

तो निरोप मला उशिरा मिळाला. त्यांनी परत दुसया माणसाजवळून दिला म्हणून तो मिळाला.

मी गडावर गेलो. मला काही कळेना; गुरुजींना अडचण तरी कसली नसेल?

त्यांच्या दारात गेलो नि मला त्यांनी मिठ्ठीच मारली.

''ये ये, बस, तुला किती निरोप द्यायचे ? ह्यो मोठ्या माणसाचं लक्षण आहे. मला त्याचंही बरं वाटलं. मोठा झाला तरी तो माझाच विदयार्थी आहे.''

मी ओशाळलो. त्यांच्याकडे बघतच राहिलो. त्यांनी एक पत्रिका आणली. मला म्हणाले; ''ही पत्रकिा बघ!''

मी पत्रिका घेतली. ती गुरुजींच्या निरोपसमारंभाची होती. त्या पत्रिकेवर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माझे नाव होते; कृष्णात खोत. मी ती पत्रिका बघतच राहिलो. गुरुजी म्हणाले;

''आता म्हणशील माझे नाव मला न विचारता कसे टाकले पत्रिकेत ? तेवढा हक्क आहे माझा तुझ्यावर.''

मी एकदमच भुलल्यागत झालो; ''गुरुजी, का लाजवताय?''

''तू आता बोलायचे नाहीस. तुला शाळेत रजाही टाकाय लागणार नाही. हे घे तुझ्या हेडमास्तरला शिक्षणाधिकाऱ्याचे तुझ्या नावाचेच पत्र, तुला त्या दिवशी मुक्त करता येईल त्यांना.''

त्यांनी माझ्याकडे ते पत्र दिले. मी म्हणालो;

'' 'गुरुजी, मला तुमच्यासाठी एक रजा टाकता आली असती आणि त्याचं समाधान मिळालं असतं. मी माझ्या गुरुंसाठी तेवढे करू शकलो म्हणून.'

मी ती पत्रिका आणि ते पत्र घेऊन उठलो. मला धन्य वाटत होतं.

गुरुजींच्या या कार्यक्रमाला दुसरा मोठा कोणतरी पाहुणा मिळाला असता, मग मलाच का निवडाला ?

मी कार्यक्रमासाठी गेलो, तेव्हा त्याचे सविस्तर समजले.

गुरुजींच्या समारंभाचे नियोजन सुरुवातीला फारच मोठे झाले होते. प्रमुख पाहुणाही ठरला होता. गुरुजींना हे समजले तेव्हा त्यांनी सांगितले;

''माझा निरोप माझ्या विदयार्थ्यांच्या हस्तेच व्हावा, नाहीपेक्षा त्याची मला गरज नाही.''

नंतर गुरुजींनी माझे नाव त्यांना दिले होते. बरेच अधिकारी–पदाधिकारी होते. मी गुरुजींच्या शेजारीच होतो. सगळं लहानपण आठवत होतं. गुरुजी बोलाय उभे राहिले. म्हणाले;

''मी आज धन्य झालो, माझं काही राहिलं नाही आता, असं आह्माला मी सांगीन–''

## शब्दार्थ

**थोरड** वयाने व शरीराने इतरांपेक्षा मोठे असणे **पन्हाळगड, पावनगड** कोल्हापुर, जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले **भाग्यविधाते** उज्जवल भविष्य देणारे, चांगले नशीब घडविणारे **सप्पय** सपाट **बाराखडी** क, का, कि, की ..............कं कः अशी अक्षरांची बारा रूपे सांगणारे कोष्टक **वनभोजन** निसर्गम्य परिसरात घेतले जाणारे सामूहिक जेवण **खळे** जनावरांच्या पायाने धान्य पिकांपासून वेगळे करण्यासाठी, म्हणजेच मळणीसाठी तयार केलेली गोलाकार जागा **पठार** टेकडी, पर्वत अशा उंचावरच्या ठिकाणी असणारा सपाट भाग **आवेश** भावनेचे तीव्र प्रकटीकरण **डी. एड्.** प्राथमिक शिक्षक पदासाठीची प्रशिक्षण पदविका.

●

# 3 मराठी अभिमान गीत

– **सुरेश भट**

(जन्म : 1932, मृत्यू : 2002)

मराठीतले श्रेष्ठ गझलकार म्हणून भटांचे नाव घेतले जाते. 'रूपगंधा', 'एल्गार', 'रंग माझा वेगळा' इ. त्यांचे काव्यसंग्रह आहेत.

या कवितेमध्ये मराठी भाषा, मराठी प्रदेश, मराठी माणसाच्या व्याविमत्त्वातील खास वैशिष्ट्ये, त्याची अस्मिता, त्याची वृत्ती यामधिल आगळेवेगळेपणा कवीने रोकड्या आणि नेमक्या शब्दांत सांगितलेला आहे.

---

लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी,
जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी
धर्म पंथ जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात मान्य मानतो मराठी
बोलतो मराठी, ऐकतो मराठी
जाणतो मराठी, ऐकतो मराठी
आमुच्या सनामनात दंगते मराठी
आमुच्या रगारगांत रंगते मराठी
आमुच्या उराउरात स्पंदते मराठी
आमुच्या नसानसात नाचते मराठी
लाभले अम्हांस भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
बोलतो मराठी, ऐकतो मराठी
जाणतो मराठी, ऐकतो मराठी
आमुच्या पिलापिलात जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यात रांगते मराठी
आमुच्या मुलामुलात खेळते मराठी
आमुच्या घराघरात वाढते मराठी
आमुच्या कुळाकुळात नांदते मराठी
येथल्या फुलाफुलात हासते मराठी
येथल्या दिशा दिशात दाटते मराठी
येथल्या नगनगात गर्जते मराठी
येथल्या दरीदरीत हिंडते मराठी

येथल्या वनावनात गुंजते मराठी
येथल्या तरुलतात साजते मराठी
येथल्या कळीकळीत लाजते मराठी
येथल्या नभामधून वर्षते मराठी
येथल्या पिकांमधून डोलते मराठी
येथल्या नद्यांमधून वाहते मराठी
येथल्या चराचरात राहते मराठी
पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी
आपुल्या घरात हाल सोसते मराठी
हे असे कितीक खेळ पाहते मराठी
शेवटी मदांध तख्त फोडते मराठी
लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी,
जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी

## शब्दार्थ

**मदांध** अभिमानाने आंधळा झालेला **तख्त** सिहांसन

●

# 4 माणसं अजून गाऊ शकतात

– मंगेश पाडगावकर

(जन्म : 1929)

मराठीतले एक महत्त्वाचे कवी म्हणून पाडगावकरांचे नाव सुप्रसिद्ध आहे, 'छोरी', 'जिप्सी', 'धारानृत्य', 'उत्सव', इ. संग्रह असून 'सलाम' या त्यांच्या काव्यसंग्रहाला साहित्यअकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

त्यांच्या 'बोलगाणी' या संग्रहातून ही कविता घेतलेली आहे, यामध्ये आसपासच्या विपरित परिस्थितीमध्ये सुद्धा माणसं आपल्या मनातला आनंद कसा टिकवून धरतात हे यात कवी सांगतात.

---

शीळ घालील माणसं अजून गाऊ शकतात,
हातात हात गुंफून अजून जाऊ शकतात !
प्रत्येक वाट
गोंगाटाच्या रानात घुसते;
मोटरींच्या आवाजांची
खिळेठोक कानात असते !
असं असलं तरी माणसं
गाण्याला ताल अजून देऊ शकतात!
शीळ घालीत माणसं अजून गाऊ शकतात
हातात हात गुंफून अजून जाऊ शकतात!
कटुतेचा पाऊस
घरं झोडून जातो;
विश्वासाचा कणा
पार मोडून जातो!
तरी माणसं मायेने
बाळाचा पापा अजून घेऊ शकतात!
शीळ घालीत माणसं अजून गाऊ शकतात,
हातात हात गुंफून अजून जाऊ शकतात!
पेटलेल्या दंगलीमध्ये
किती घरं जळून खाक झाली बरं ?
द्वेषाचे बॉम्ब फुटून
किती गावं बेचिराख झाली बरं ?
असं असलं तरी माणसं
कुंडीमधे फुलं अजून लावू शकतात!
शीळ घालीत माणसं अजून गाऊ शकतात,
हातात हात गुंफून अजून जाऊ शकतात!

●●●